१८२६
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
अ. नं.

पे परांजपे

# चरित्र व आठवणी

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. चरित्र
ठाणे.

REFBK-0005440

– शि. ल. ओगले
– द. के. बर्वे

किंमत १ रुपया.

# शिवराम महादेव परांजपे

## यांचें चरित्र

( जीवनकार्य व आठवणी )

—:o❀o:—


लेखक :

शिवराम लक्ष्मण ओगले, वाडिया कॉलेज.

दत्तात्रय केशव बर्वे, फर्ग्युसन कॉलेज.



REFBK-0005440



२७ सप्टेंबर ]   किंमत १ रुपया   [ १९३६

प्रकाशक
यशवंत गोपाळ जोशी
७२३ सदाशिव पेठ, पुणें २.

ह्या आवृत्तीचे सर्व हक्क प्रकाशकानें आपणाकडे राखून ठेवले असून, यापुढील आवृत्त्यांचे हक्क लेखकांच्या स्वाधीन आहेत.

मुद्रक
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु आणि कंपनीज् प्रेस,
५१३ शनवार पेठ, पुणें २.

# अंतरीच्या ऊर्मि

दे० भ० शिवराम महादेव परांजपे यांना दिवंगत होऊन आज सांत वर्षें झालीं. एवढ्या दीर्घ अवधींत त्यांचें चरित्र वास्तविकपणें लिहिलें जावयास पाहिजे होतें. पण कांहींहि कारणांमुळें असो, तशा प्रकारचा एकहि ग्रंथ अद्याप प्रसिद्ध झाला नाहीं, ही उणीव अंतश: तरी भरून निघावी म्हणूनच प्रस्तुतचा अल्पसा प्रयत्न आहे.

ज्या वेळीं शिवरामपंतांचें चरित्र लिहिण्याचें आम्हीं ठरविलें तेव्हां आम्हांस अनेकजणांनीं नाउमेद जरी नाहीं—तरी विशेष उत्तेजित केलें नाहीं ही गोष्ट मात्र या ठिकाणीं जरूर नमूद करावीशी वाटते. विद्यार्थिदशेंतच लिहिलेल्या या चरित्रग्रंथास शक्य तितकी सर्वांगीणता आणण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे. आमच्या नजरचुकीनें कदाचित् कांहीं उणीवा राहून गेल्या असतील तर त्यांबद्दल वाचकांनीं आम्हांस क्षमा करावी. शिवरामपंतांविषयीं वाटणाऱ्या जिव्हाळ्यामुळें व त्यांच्या चहात्यांच्या सहकार्यामुळेंच हें अल्पसें कार्य आमच्या हातून तडीस गेलें, याबद्दल आम्हांस कर्तव्यपूर्तीचा आनंद वाटत आहे.

शिवरामपंतांचें चरित्र 'काळां'तील जप्त झालेल्या लेखांशिवाय लिहिणें हें जरी एक प्रकारें अपुरें ठरत असलें तरी त्यांची इतर कामगिरीहि कमी मोलाची आहे असें आम्हांस यत्किंचितहि वाटत नाहीं. राष्ट्राच्या सुदैवानें 'काळा'वरील बंदी उठल्यास व द्वितीय आवृत्तीचा सुयोग आल्यास, त्याचा योग्य तो परामर्श आम्ही अवश्य घेऊं एवढेंच तूर्त वाचकांस आश्वासन देऊन ठेवतों.

सद्यःस्थिति लक्षांत घेतां, कांहीं मजकूर या ग्रंथांत समाविष्ट करतां येत नाहीं याबद्दल आम्हांसहि खेद वाटतो. तथापि 'काळाची कामगिरी' हें प्रकरण उपलब्ध असलेल्या अल्प साधना-वरून उठावदार करण्याचा प्रयत्न केला आहे.

'The biographer's main duty is not to record but to reveal.'

ह्या तंत्रानुसार पुस्तकाची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळें इतर चरित्रग्रंथांपेक्षां प्रस्तुत ग्रंथाची रचना कांहींशी निराळ्या प्रकारची भासणें स्वाभाविक आहे व याच दृष्टीनें आमचे मर्मज्ञ टीकाकार या चरित्रग्रंथाकडे पाहतील अशी आम्हांस आशा वाटते.

आतां राहतां राहिलें आभार-प्रदर्शनाचें काम. आभार-प्रदर्शन ही अलीकडील एक औपचारिक बाब होऊन बसली आहे. तथापि ज्या ज्या सद्गृहस्थांनीं इतक्या आस्थेनें आठवणी पाठविल्या त्यांचे व ज्या ज्या वृत्तपत्रांच्या चालकांनीं आठवणी पाठविण्या-संबंधींच्या मजकुरास आपल्या पत्रांत स्थळ दिलें त्यांचे आभार मानल्याशिवाय राहवत नाहीं. विशेषतः अण्णासाहेबांचे चिरंजीव श्री० विनायकराव व भाचे श्री० हरि सखाराम गोखले, व बेळगांवचे श्री० सावंत यांचे हार्दिक आभार मानणें अत्यंत जरूर आहे. शेवटीं ज्यांच्या सक्रीय सहकार्यानेंच पुस्तक प्रकाशित होत आहे त्या सुप्रसिद्ध लघुकथालेखक श्री० यशवंत गोपाळ जोशी, यांचे कितीहि शाब्दिक आभार मानले तरी ते कसे पुरे होणार ?

५९४, सदाशिव, पुणें.
२७ सप्टेंबर १९३६.

शि. ल. ओगले
द. के. बर्वे

चरित्र-माला

# दुर्दैवी मोहरे

( ऐतिहासिक चरित्रें )

[ सर्जेराव घाडगा व त्रिंबकजी डेंगळा ]

लेखक—वि. गं. लेले

प्रस्तावनालेखक—इतिहाससंशोधक, द. वि. आपटे

किंमत १ रुपया

... ग्रंथ संग्रहालय ... दा. क्र. ५४४८

बिहारचे प्रख्यात बंडवाले

# कुंवरसिंह

यांचें चरित्र

लेखक—श्री० गणेश सीताराम जोशी, बी. ए.
शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें.

नोव्हेंबर १९३६ मध्यें प्रसिद्ध होईल.

# माझें प्रकाशन—

१ वळवांचे पाऊस ( कथासंग्रह ) किं. १। रुपया.
२ पुनर्भेट भाग २ रा ( कथासंग्रह ) किं. १ रुपया.
*३ पुनर्भेट भाग ३ रा ( कथासंग्रह ) किं. १। रुपया.
४ कणसाचे दाणे ( कथासंग्रह ) किं. १ रुपया.
*५ दुर्दैवी मोहरे ( ऐतिहासिक चरित्रें ) किं. १ रुपया.
६ पैसाच पैसा ( सचित्र नाटक ) किं. १ रुपया.
७ जीवन-पथ ( कथासंग्रह ) किं. १ रुपया.
८ आवडत्या गोष्टी (६१ लेखकांचा कथासंग्रह) किं. ३ रु.
*९ चित्तरंजन किं. १। रुपया.
१० फुलबाग ( कविता ) किं. १ रुपया.
११ वायफळांचा मळा किं. २॥
१२ वाहते वारे ( कथासंग्रह ) किं. १२ आणे.
१३ गारांचा वर्षाव ( कथासंग्रह ) किं. १। रुपया.
१४ सोनेरी नागीण ( कादंबरी ) किं. १ रुपया.
१५ हायस्कूल विद्यार्थी ( कादंबरी ) ८ आणे.
१६ संसार ( विडंबनात्मक कवितांचा संग्रह) किं. १ रुपया.
१७ खेड्यांतील स्वभावचित्रें ( ले. मो. गो. सोमण, बी. ए.)
किं. १। रुपया.

शिवाय सर्व तऱ्हेचीं पुस्तकें ऑर्डरप्रमाणें पाठविलीं जातील.

प्रकाशक—यशवंत गोपाळ जोशी,
७२३ सदाशिव पेठ, पुणें नं. २.

* मुंबई इलाखा शाळाखात्यांत लायब्ररयांकरिता व बक्षिसाकरितां मंजूर.

# दे० भ० बॅ. सावरकर यांची

# पुष्पांजलि

-:०❀०:-

रत्नागिरी

महाशय, ५-८-३६

गुरुवर्य 'काळ'कर्ते यांचें 'वाङ्मयीन नि राजकीय कामगिरीस विवेचिणारें' चरित्र लिहीत आहां हें आपल्या पत्रीं वाचून आनंदलों. परंतु त्या चरित्रास प्रस्तावना लिहिणें मला त्याच्या वरील स्वरूपामुळेंच अशक्य. कारण मजवर स्थलबंदीचीच नव्हे तर विषयबंदीचीहि अट आहे ! राजकारणासंबंधीं मला कांहीं लिहितां येत नाहीं.

आणि राजकारण गाळून कै० अण्णारावांचें चित्र रेखाटणें, 'काळा'संबंधीं नुसती वाङ्मयीन समालोचना करणें किंवा 'काळ' गाळून काळकर्त्यांचें चरित्र लिहिणें म्हणजे राम गाळून रामायण लिहिण्यासारखेंच विडंबन होय.

एवढ्याकरितां माझ्या प्रस्तावनेसाठीं त्या तेजस्वी पुरुषाचें चरित्र मिळमिळीत करण्यापेक्षां माझी प्रस्तावनाच गाळणें इष्ट.

कै० अण्णाराव परांजप्यांच्या चरणीं फूल नाहीं फुलाची पाकळी तरी वाहण्याची ही संधि सुद्धां मला साधतां येत नाहीं याविषयीं खेद वाटणारा

आपला

सावरकर

# स्वदेशी पाकिटें
व
# स्वदेशी ( Office ) फाइल्स वापरा

आपला पत्रव्यवहार देशी पाकिटांतूनच व्हावा व आपलें दप्तर ( Record ) स्वदेशी फाइलसमधून ठेवलें जावें हे प्रत्येक हिंदवासियाचें कर्तव्य आहे.

सर्वस्वीं स्वदेशी कागदापासून पाकिटें तयार केलीं असून पाकिटांचा डिंकहि रासायनिक दृष्ट्या येथेंच बनवून पाकिटांस वापरला जातो.

स्वदेशी फाइल्सच्या आंतिल टिनच्या पट्या याच कारखान्यांत तयार होत असून वरील कागदहि देशीच आहे.

---

एजन्सीकरितां लिहा.

गांवोगांवीं एजन्ट्स पाहिजेत.

पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा :—

**सावळे आणि कंपनी,**

स्वदेशी फाइल्स व पाकिटें यांचे कारखानदार,

**पुरंदरे बाग कॉलनी, प्लॉट नंबर ५२, पुणें २.**



जन्म सन १८६४ ]

[ मृत्यु २७।९।१९२९

'काळकर्ते'

प्रो० शिवराम महादेव परांजपे

# शिवराम महादेव परांजपे
# चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय

## १ जीवन-रहस्य

**थोडा इतिहासः**—सन १८१८ सालीं भारतवर्षांतील स्वराज्य-सूर्य पूर्णपणें अस्ताला गेला व इंग्रजी राजवटी सुरू झाली. 'नवी विटी व नवें राज्य' या कारणानें असो किंवा पेशवाईच्या शेवटीं शेवटीं झालेल्या अन्यायी न्यायाला कंटाळून असो, हिंदी लोक या नव्या राजवटीच्या छत्राखालीं कांहीं वर्षे सुखानें नांदत होते, पण वरवर दिसणारा हा सोन्याचा मुलामा जाण्याला फार वर्षे लागलीं नाहींत. १८५७ सालीं पेशवाईतील उरलेली सत्ता व संपत्ति यांचा शक्य तो उपयोग करून कांहीं स्वातंत्र्येच्छु वीरांनीं स्वातंत्र्ययुद्ध पुकारलें, व तें यशस्वी करण्याचे आटोकाट प्रयत्न केलें. पण हिंदभूमि पारतंत्र्याच्या शृंखलांतून मुक्त व्हावयाची नव्हती, म्हणून त्या वेळीं हिंदी वीरांच्या श्रमांचें चीज न होतां त्यांच्या पदरीं अपयश आलें ! यानंतर खुद्द महाराष्ट्रांत व इतर प्रांतांतहि राज्यकर्त्यांनीं चालविलेल्या पद्धतशीर व 'नमुनेदार' फसवणुकीला वेशीवर टांगण्याचें काम अनेक धुरंधर लोकांनीं

पत्करलें. त्यांत अनुक्रमानें पहिला नंबर लावावयाचा झाल्यास तो 'लोकहितवादी' यांचा लावावा लागेल. पण दुर्दैव हें, कीं त्या काळीं त्यांनीं प्रतिपादन केलेले विचार या ना त्या कारणामुळें लोकांना ग्रहण करतां आले नाहींत तरी पण क्रांतिकारक विचारांचा पाया घालण्याचें श्रेय 'लोकाहितवादी' यांना निःसंशयपणें द्यावें लागेल. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं देशोद्धारार्थ प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीत्या पुष्कळच कामगिरी केली; पण शास्त्रीबुवांमध्यें तडफदार भाषा असूनहि निश्चित ध्येय नसल्यामुळें त्यांच्या हातून पार्श्वभूमि तयार करण्यापलीकडे फारसें काम झालें नाहीं. कै० आगरकरांनीं सुधारकाग्रणी म्हणून आपलें नांव अजरामर करून ठेवलें. खवळलेल्या जनसंमर्दरूपी सागरांत स्वतःच्या नवविचारांची नौका बेधडकपणें लोटणें याला कमालीची धडाडी व धैर्य लागतें हें तर खरेंच, पण त्याबरोबरच ती नौका यशस्वी रितीनें पैल-तीराला नेऊन पोंहोचविणें याला अंगीं कौशल्य व समयसूचकता असावी लागते. पण आगरकरांनीं फक्त समाजकार्यालाच वाहून घेतलें व त्यासाठींच आपला देह शेवटपर्यंत झिजविला. आगर-करांचें कार्य एकांगी पण पूर्ण होतें. कै० लोकमान्य टिळकां-नीं पुष्कळ वर्षें राज्यकर्त्यांना सुखाची झोंप लागूं दिली नाहीं व 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हें लोण प्रत्येक हिंदी माणसाच्या उंबरठ्यापर्यंत नेऊन पोंहोचविलें. यानंतर वरील मालिकेंत कै० शिवरामपंत परांजपे यांचेंच नांव कुणासहि गुंफावें लागेल.

* * *

**कुळकथा :**—कुळकथा-कथनावरून चरित्रनायकाच्या जीवना-वर प्रकाश पडण्याचा बराच संभव असतो, आणि म्हणून शिवराम-

पंतांची कुळकथा थोडक्यांत सांगणें आम्हांस इष्ट वाटतें. शिवरामपंतांचे पणजे सदाशिवराव हे सवाईमाधवराव पेशवे यांचे पदरीं नौकर होते. सवाईमाधवरावांचे कारकीर्दींत राज्यांत बरीच शांतता व सुबत्ता नांदत असल्यामुळें गुणी लोकांच्या गुणांचें चीज होत असे. पण सवाईमाधवरावांचे मृत्यूनंतर राज्यांत बरीच अव्यवस्था माजली व त्यामुळें सदाशिवरावांच्या गुणांची पारख होईनाशी झाली. पुढें त्यांना रावबाजीच्या हाताखालीं काम करावें लागलें; व मानानें जगणें त्यांना कठीण जाऊं लागल्यामुळें नौकरी सोडावी लागली. नौकरी सोडल्यावर ते कुलाबा जिल्ह्यांतील महाड या गांवीं येऊन राहिले. परांजपे घराण्यांत स्वाभिमान व बाणेदारपणा पूर्वींपासूनच होता असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. शिवरामपंतांचे आजे प्रसिद्ध वैद्य व गवई होते; व त्या वेळीं त्यांचे घरांत अतिशय गरिबी होती असें सांगतात. महादेवराव—पंतांचे वडील—हे मोठे अष्टपैलू व हरहुन्नरी गृहस्थ होते. त्यांनीं गायनकला आपल्या वडिलांपासून उचलली होती, व त्याच्या जोडीस चित्रकलाहि उत्तम प्रकारें संपादन केली होती. आयुष्याच्या सुरुवातीस त्यांनीं या दोन कलांवर भिस्त ठेवून जीवन कंठण्याचा प्रयत्न केला; पण कला आणि जीवन यांची व्यवहारांतील फारकत त्यांच्या लक्षांत आल्यामुळेंच कीं काय, त्यांनीं त्या वेळची वकिलीची परीक्षा दिली व ते उत्कृष्ट वकील म्हणून पुढें आले. उत्तम कमाई व काटकसरीची राहणी यांमुळें घरांतील दारिद्र्याचा काळोख लक्ष्मीच्या प्रभावी प्रकाशापुढें फार दिवस टिकाव धरूं शकला नाहीं. महादेवरावांच्या पत्नी पार्वतीबाई या संसारदक्ष व व्यवहारकुशल असल्यामुळें तर महादेवरावांचा संसार जास्तच सुखाचा झाला. या पति-पत्नींनीं अंगच्या गुणांनीं स्वतःचें घर

उत्तम सुधारून आपल्या मुलानें आपला देश सुधारावा म्हणूनच जणूं काय आपले सर्व सद्गुण त्याच्या स्वाधीन केले !

*　　*　　*

**बाळपण :**—महादेवरावांना तीन मुलगे व तीन मुली अशीं एकंदर सहा अपत्यें होतीं. त्यांपैकीं मुलांत पहिलें अपत्य म्हणजे शिवरामपंत होत. पंतांचा जन्म शके १७८६ ( सन १८६४ ), रक्ताक्षीनाम संवत्सरे, ज्येष्ठ शुद्ध सप्तमीचे दिवशीं महाड येथें झाला. पंतांना लहानपणीं घरांतील मंडळी 'बाळक्या' या नांवानें संबोधीत असत. पंतांच्या पुढील आयुष्यक्रमावरून पाहिलें तर किंवा ज्यांना पंतांच्या फक्त पुढील आयुष्याविषयीं माहिती आहे अशा लोकांना पंत हे लहानपणीं 'हूड' म्हणून प्रसिद्ध होते हें खरें सुद्धां वाटावयाचें नाहीं; पण वस्तुस्थिति मात्र तशी होती. लहानपणीं शिवरामपंतांचें अभ्यासाकडे विशेष लक्ष नसे 'शाळेला जातों' म्हणून सांगावें, व शाळेचा वेळ होईपर्यंत कोठें तरी वेळ दवडून संध्याकाळीं मात्र पाटीदप्तर घेऊन शाळेहून आल्याचा देखावा करावा, हा क्रम कित्येक दिवस त्यांनीं नियमितपणें चालविला होता ! अर्थात् पंतांचा नंबर वर्गांत नेहमीं शेवटचा असावयाचा हें जणूं ठरल्यासारखेंच होतें. स्वभाव लहानपणापासून एकान्तप्रिय असल्यामुळें चार मित्र जमवावे, त्यांच्याशीं खेळावें, कोठें तरी सहल काढावी, या व अशा गोष्टींचा त्यांना तिटकारा असे. खेळावयाचें झालें तर तें आपल्या ठराविक मित्रांशीं खेळत असत; पण घरांतील मंडळीबरोबर मात्र दंगा करण्याची त्यांना फार हौस !

पंतांना खेळण्यापेक्षां झाडावर चढणें किंवा पोहणें याचा फार नाद होता. एखाद्या नोकराला ते बरोबर घेऊन जवळील शेडाव

नदीच्या डोहांत तासचे तास पोहत पडत असत. महादेवरावांना आपल्या मुलानें पुढें नांवलौकिकास चढावें, कर्तृत्ववान् व्हावें अशी फार इच्छा होती, व त्या दृष्टीनें त्यांनीं प्रयत्नहि केले. विशेषत: महादेवरावांनीं चित्रकला व गायनकला शिकवण्यासाठीं फार मेहनत घेतली; पण बाळकोबांनीं त्याकडे कधींच लक्ष दिलें नाहीं. तथापि गायनश्रवणामुळें जो रसिकपणा व प्रेमळपणा येतो व चित्रकलेनें जी सौंदर्यदृष्टि प्राप्त होते ती शिवरामपंतांचे अंगीं न कळत का होईना पण आली होती ही गोष्ट मात्र निश्चित. पंतांच्या अशा या वागणुकीमुळें वडिलांचे हातून त्यांना बराच 'प्रसाद' मिळत असे. व साहजिकच पंतांना वडिलांचेविषयीं आदरयुक्त भीति नेहमीं वाटत असे; व त्यामुळें जें कांहीं मागावयाचें तें सरळ वडिलांच्याकडे न मागतां ते आईकडे किंवा आपल्या आत्याबाईकडे मागीत असत. ज्या भविष्यवाद्यांनीं जन्मकालीन कुंडलीवरून हा 'बाळक्या' विद्वान्, लोकप्रिय व भाग्यशाली होईल असें भविष्य वर्तविलें होतें त्यांचींहि मनें बाळक्याचे हे लहानपणीचे चाळे पाहून साशंक झालीं असल्यास त्यांत नवल तें काय?

* * *

**विद्यार्थिदशा:**—बालपणीं जरी चाळे व उनाडक्या थोड्याफार कौतुकाच्या मानल्या गेल्या तरी पुढें पोराचीं लक्षणें एकंदरींत ठीक नाहींत हें पाहून महादेवरावांनीं पंतांना रत्नागिरी येथें आपल्या स्नेह्याकडे नेऊन ठेवलें. पंतांना रत्नागिरी 'मानवल्या'मुळें असो किंवा अन्य कारणानें असो, पंतांना अभ्यासाची गोडी लागली व ते तेथील शाळेंतून इंग्रजी चार इयत्ता पासहि झाले.

याच सुमारास कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं पुणें येथें

स्थापिलेल्या 'न्यू इंग्लिश स्कूल'ची कीर्ति कानांवर गेल्यामुळें रत्नागिरी येथील शाळा सोडून जीं मुलें पुण्यास 'पळून' आलीं, त्यांमध्यें शिवरामपंतांनीं बराच पुढाकार घेतला होता असें सांगतात. पंत जात्या बुद्धिमान् असल्यामुळें व अभ्यासाची गोडी लागल्यामुळें त्यांची प्रगति फार झपाट्यानें होऊं लागली. पंत ज्या वेळीं 'न्यू इंग्लिश स्कूल'मध्यें आले त्या वेळीं कै० आपटे हे मुख्याध्यापक होते, व कोण विद्यार्थी कोणत्या विषयांत पारंगत आहे हें बारकाईनें पाहावयाचें व त्याला उत्तेजन द्यावयाचें हा त्यांचा परिपाठ असे. पंतांची–विशेषतः संस्कृत विषयांतील प्रगति पाहून ते पंतांना आपण होऊन तो विषय शिकवीत असत. पंतांची अलौकिक बुद्धिमत्ता व ग्रहणशक्ति यांवर कै० आपटे हे बेहद्द खूष झाले व त्यांनीं पंतांना एकदम पांचवींतून सातवींत घेतलें. पण दुर्दैव हें, कीं अशा प्रकारची समाधानकारक प्रगति असतांना सुद्धां पंत पहिल्या खेपेस मॅट्रिक परीक्षेंत नापास झाले ! या अनपेक्षित अपयशामुळें पंतांना अतिशय दुःख झालें; पण निराशेनें ते खचून गेले नाहींत. तर या अपयशाचा वचपा त्यांनीं १८८४ सालीं त्याच परीक्षेंत जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलरशिप मिळवून काढला. पंतांच्या वडिलांना साहजिकच हें यश पाहून समाधान वाटलें व त्यांनीं आपल्या बाळक्याला धन्यवाद दिले. पंत विद्यार्थिदशेंत असतांनाच पूर्ववहिवाटीला अनुसरून त्यांचें लग्न महादेवरावांनीं वयाच्या अकराव्या-बाराव्या वर्षी केलें; लग्नाचे वेळीं पंतांचें कुटुंब तर सात-आठ वर्षांचें असेल नसेल !

मॅट्रिकच्या परीक्षेंत मिळालेल्या अपूर्व यशामुळें पंतांनाहि आत्मविश्वास उत्पन्न झाला व पुढील उच्च शिक्षण घेण्यास एक प्रकारें हुरूप आला. कॉलेजमधील पहिलें वर्ष त्यांनीं फर्ग्युसन

कॉलेजमध्यें काढलें व त्या वर्षी लो० टिळक यांच्या अध्यापनाचा लाभ त्यांना मिळाला. यानंतर त्यांनीं आपलें नांव डेक्कन कॉलेजमध्यें दाखल केलें. याच सुमारास पंतांनीं गांवांत ढमढेरे यांच्या बोळांत एक लहानशी जागा घेऊन त्या ठिकाणीं आपलें बिऱ्हाड थाटलें होतें. दरम्यान त्यांचे वडील वारले व त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला; कठीण परिस्थितीच्या कचाट्यांत सांपडल्यामुळें त्यांचें मन कांहींसें बावरलें; किंचित् काल का होईना, पण त्यांच्या मनांत वैचारिक वादळ माजलें, पण आलेल्या आत्मविश्वासामुळें व मनांतील महत्त्वाकांक्षेमुळें त्यांनीं विद्याभ्यास सोडला नाहीं. घरची सर्व व्यवस्था पाहण्याचें काम धाकटे बंधु विष्णुपंत यांच्या संमतीनेंच त्यांच्यावर सोंपविलें व स्वतःचा विद्याभ्यास पुढें चालू केला. स्वतःचा खर्च धाकट्या बंधूंच्यावर टाकणें त्यांना योग्य न वाटल्यामुळें स्वतःचा खर्च आपल्या मिळकतींतूनच करावयाचा निश्चय त्यांनीं केला. कांहीं दिवस कॉलेजमध्यें मिळणाऱ्या स्कॉलर-शिपवरच काटकसरीनें वागून त्यांनीं आपला चरितार्थ चालविला; पुढें स्कॉलरशिपचे पैसे अपुरे पडतात हें पाहून त्यांनीं शिकवणीहि धरण्यास कमी केलें नाहीं. प्रापंचिक व अन्य तऱ्हेच्या अनेक अडचणींमुळें पंतांना बी. ए. होण्यास सहा वर्षें लागलीं. पंतांची अभ्यास करण्याची पद्धत फारच तऱ्हेवाईक होती. कॉलेजमधील अभ्यास असा ते फारच थोडा करीत, पण त्यांत कोणत्याहि प्रकारचा उणेपणा न राहण्याची ते खबरदारी घेत असत. उत्तम उत्तम उतारे त्यांना मुखोद्गत असत. असो. १८९० सालीं ते बी. ए. पास झाले व त्यांना कॉलेजची फेलोशिप देण्यांत आली; त्या जागेवर ते दोन वर्षें होते. दे. भ. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, रा. न. चिं. केळकर,

श्री. पोतदार हे त्यांचे कॉलेजमधील सहाध्यायी होत. फेलो असतांना पंत आर्थिक विवंचनेंतून थोडेफार मुक्त झाले होते, व साहजिकच मनःस्वास्थ्यहि भरपूर मिळत होतें. कॉलेजमधील कामहि बेताचेंच असल्यामुळें वाचनाकडे पंतांना लक्ष देण्यास भरपूर वेळ मिळाला. पुढें १८९५ सालीं ते एम्.ए. झाले; व संस्कृतमध्यें त्यांना एक पांचशें रुपयांचें व एक चारशें रुपयांचें अशीं भगवानदास व गोकुळदास पारितोषिकें मिळालीं. याच वेळीं बक्षिसादाखल म्हणून बरींच पुस्तकेंहि मिळालीं. पंतांनीं मिळालेले पैसे स्वतःकडे ठेवून न घेतां महाडास पाठवून दिले व पुस्तकें मात्र स्वतःसाठीं ठेवून घेतलीं. पंत वेदान्त व अलंकार यांचा अभ्यास करीत असतांच कै० डॉ. भांडारकर यांची त्यांच्या-वर बहाल मर्जी बसली होती, व पंतांनीं त्यांच्याकडून शाबासकी-हि मिळविली होती.

* * *

**वाङ्मयाचा अभ्यास :**—'न्यू इंग्लिश स्कूल'मध्यें असल्या-पासूनच शिवरामपंतांना कविता करण्याचा नाद होता. कविता केली कीं ती प्रि० आपट्यांना नेऊन दाखवावी व त्यांनीं सुच-विल्यास त्यांत शक्य तर फेरफार करावे हा त्यांचा क्रम असे. कित्येक वेळीं ते आपल्या कविता समारंभप्रसंगीं म्हणून दाखवीत असत. सुरुवातीच्या कांहीं कवितांमधून सृष्टिचमत्कारांचीं वर्णनें फारच बहारीचीं साधलीं आहेत. कवितांशिवाय त्यांनीं कांहीं भूपाळ्या, पदें व आरत्याहि याच सुमारास रचिल्या. एखादी आरती किंवा भूपाळी उत्कृष्ट झाली असें वाटल्यास ते तावडतोब ती महाडास रवाना करीत असत; व घरची मंडळीहि मोठ्या कौतुकानें त्या आरत्या श्रीगणेशोत्सवाचे वेळीं म्हणत

असत. कॉलेजमध्यें असतांना अभ्यासापेक्षां संस्कृत व इंग्रजी वाङ्मय वाचण्याचा त्यांना फार नाद होता. प्रथम प्रथम त्यांना कादंबरीवाचनाची गोडी लागली, पण पुढें त्यांना कादंबऱ्यांचा वीट आला व त्यांनीं आपली दृष्टि उच्च वाङ्मयाकडे वळविली. एखादें पुस्तक वाचावयास घेतलें कीं, टांचणासाठीं एक-दोन वह्या तयार असत. फार महत्त्वाचें जें असेल तें एका वहींत व साधारण महत्त्वाचें जें असेल तें दुसऱ्या वहींत टिपून ठेवावयाचें अशी त्यांची वाङ्मयाचा अभ्यास करण्याची पद्धत असे. वाचन चाललें असतांना प्रासानुप्रासाचे शब्द आढळून आलेच तर ते एका निराळ्या वहींत टिपून ठेवण्याचाहि त्यांचा परिपाठ असे.

प्लेटो, सार्क्रेटिस, गिबन्, होमर, बायरन्, कार्लाइल, शेक्स्पिअर व विशेषतः व्हाल्टेअर व रूसो हे ग्रंथकार त्यांच्या फार आवडीचे होते. त्याचप्रमाणें महाभारत, भागवत, रामायण वगैरे धार्मिक ग्रंथहि ते अत्यंत आवडीनें वाचीत. ह्यावरून अण्णासाहेबांच्या हातून जें इतकें प्रभावी लिखाण निर्माण झालें त्याच्या पूर्वतयारीसाठीं त्यांनीं किती श्रम घेतले होते ह्याची पुसट कल्पना येते. मोरोपंत, ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, वामन, कबीर वगैरे कविश्रेष्ठांच्या ग्रंथांचा त्यांनीं सूक्ष्म अभ्यास केला होता. मोरोपंतांवर ते इतक्या अधिकारवाणीनें बोलत, कीं मोरोपंतांच्या काव्यांत काव्यगुण नाहींत असें सांगणाऱ्या टीकाकारांच्या तोंडाला त्यांनीं अनेक वेळीं समर्पक व तर्कशुद्ध उत्तरें देऊन कुलुपें घातलीं आहेत. थोडक्यांत म्हणजे त्यांचें वाङ्मयवाचन सर्वांगीण होतें. अर्थात् अशा या वाङ्मयाचा परिणाम त्यांच्या मनावर जो व्हावयाचा तो झालाच. स्वदेशप्रेम, स्वधर्मप्रेम व स्वबंधुप्रेम वगैरे गोष्टींनीं त्यांच्या मनाची पूर्ण पक्कड घेतली व एक प्रकारें त्यांचें मानसिक बल वाढलें. विशेषतः क्रान्तिविषयक

वाङ्मयाचा अभ्यास शिवरामपंतांनीं फारच सूक्ष्म रितीनें केला होता. फ्रान्समध्यें जी क्रान्ति झाली तिला बहंशीं कारणीभूत झालेल्या व्हॉल्टेअर व रूसो यांच्या वाङ्मयाचा अभ्यास त्यांनीं फारच परिश्रमानें केला होता. क्रान्ति करूं इच्छिणाऱ्या कोणत्याहि माणसावर सरकारचे डोळे नेहमींच वटारलेले असतात हेंहि त्यांच्या याच वेळीं लक्षांत आल्यामुळेंच कीं काय स्विफ्ट या उपरोधप्रचुर लेखकापासून उपरोधिक भाषणाची पद्धत त्यांनीं उचलली! एखादी गोष्ट स्पष्टपणें मांडतां येणें कालमहिम्यामुळें अशक्य असलें तरी त्याच गोष्टीचा सूर व्याजोक्ति, रूपकें, व्यंगोक्ति, वगैरे तऱ्हेचा नवीन पेहराव त्यावर चढवून काढतां येतो ही गोष्टहि अशा वाङ्मयाच्या अभ्यासामुळेंच त्यांच्या लक्षांत आली असावी.

* * *

**ध्येय ठरण्यापूर्वी :**—शिवरामपंत एम्. ए. झाल्यावर पुढें काय करावें हा महत्त्वाचा प्रश्न त्यांच्यापुढें उभा राहिला. पण त्याच सुमारास कै० विष्णुपंत भावे यांनीं 'महाराष्ट्र कॉलेज' नुकतेंच चालू केलें होतें; व त्यांत पंतांना संस्कृतचे अध्यापक म्हणून नेमून घेण्यांत आलें. कॉलेजला उत्कृष्ट अध्यापकवर्गाची जोड मिळाल्यामुळें कॉलेजची प्रगति झपाट्यानें होऊं लागली. १८९६ व १८९७ हीं दोन वर्षें पंत या कॉलेजमध्यें प्रोफेसर होते. या दोन वर्षांत शिवरामपंतांनीं विद्यार्थ्यांचीं मनें आकर्षण करून घेतलीं. विषय समजावून देतांना पंत त्या विषयाशीं इतके समरस होऊन जात, कीं कित्येक वेळीं त्यांचा कंठ दाटून येत असे व नेत्र अश्रूंनीं भरून येत असत. स्वभावतःच शिवरामपंत अत्यंत कोमल अंतःकरणाचे व हळव्या हृदयाचे असल्यामुळें अशा गोष्टी होणें अगदीं स्वाभाविक होतें. कॉलेजमध्यें काम करीत असतांना विद्यार्थि-

दशेंतच राजकारणाचें बाळकडू घेतलेल्या पंतांना कॉलेजच्या चार भिंती अपुऱ्या वाटूं लागल्या. केवळ शिक्षणक्षेत्राची मर्यादा त्यांना आकुंचित भासूं लागली. कर्तृत्वशक्ति व मिळालेला व्यवसाय यांचा मेळ बसेना. स्वातंत्र्यासाठीं हपापलेलें त्यांचें मन त्यांना एकसारखें डिवचूं लागलें. 'तूं करीत आहेस त्यापेक्षां जास्त महत्त्वाची व भरीव कामगिरी करण्यासाठीं तुझा जन्म आहे'—असें त्यांचें मन त्यांना ग्वाही देऊं लागलें. पारतंत्र्याखालीं मायभूमि पिचत पडली असतांना केवळ पांचपन्नास विद्यार्थ्यांना शिकवून व महिन्याकांठीं पगार घेऊन स्वर्गीय सुख प्राप्त झाल्याचें समाधान मानणाऱ्या आजकालच्या प्रोफेसरांपेक्षां पंतांची मनोरचना निराळी असल्यामुळें त्यांना असें वाटल्यास त्यांत नवल तें काय ? खरोखरीच्या रणवीराला लुटुपुटीच्या लढाईत समाधान कसें प्राप्त व्हावें ? त्याच वेळीं लोकमान्य टिळकांची चळवळ फैलावत चालली होती; स्वदेश-प्रेमाची ज्योत कायमची तेवत ठेवण्यासाठीं लोकमान्यांनीं जे अनेक मार्ग शोधून काढले त्यांपैकीं गणेशोत्सवाची चळवळ याच वेळीं सुरू झाली होती; दहा दिवसपर्यंत ज्ञानसत्र चालू ठेवणें ही ह्या उत्सवाच्या कार्यक्रमापैकीं महत्त्वाची बाब होती. पंतांनीं चालून आलेली ही संधि वायां जाऊं दिली नाहीं. ह्या ज्ञानसत्रापैकीं बराचसा भाग शिवरामपंतांनीं आपखुषीनें स्वतःच्या शिरावर घेतला. व्याख्यानें, प्रवचनें, पुराणें करण्याचा परिपाठ त्यांनीं चालू ठेविला. एवढा आंग्ल-विद्याविभूषित पंडित पुराण सांगणार हें समजल्यावर लोकांच्या झुंडींच्या-झुंडी तें ऐकण्यास जमत असत. डॉ० भांडारकर यांच्या कानांवर ही वार्ता जातांच त्यांनीं शिवरामपंतांना बोलावून नेऊन म्हटलें कीं, " हें तुम्ही काय करीत आहां ! गळ्यांत तंबोरा अडकवून

बोवा का होणार आहां? आपली विद्वत्ता अशी वायां दवडूं नका!" यावर शिवरामपंतांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं.

शिवरामपंत प्रत्येक व्याख्यानांतून हिंदी लोकांच्या हालाचें वर्णन इतक्या सफाईदार रीतीनें करीत, कीं राजनिष्ठ व फत्तर-हृदयी श्रोत्यांच्या भावना उचंबळून आल्याशिवाय राहत नसत. अर्थात् पंतांचें हें करणें सरकारला बाधक व बोंचक वाटूं लागलें. सरकारनें कॉलेज-अधिकाऱ्यांना कानपिचक्या दिल्यामुळें असो, किंवा अन्य कारणानें असो, कॉलेजच्या अधिकाऱ्यांना पंतांनीं राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेणें आवडेनासें झालें. अशा रितीनें पंतांनीं पेटविलेला स्वातंत्र्य अग्नीची झळ कॉलेजलाहि लागूं लागली व पंतांना आपल्या जागेचा राजिनामा देणें भाग पडलें, व अशा रितीनें पंत मोकळे होऊन बसले.

*　　*　　*

**काळाचा जन्म:**—कॉलेजमधील नोकरी सोडल्यावर पंतांनीं राष्ट्रसेवा करण्याचा निश्चय केला; व त्यासाठीं त्यांनीं 'काळ' पत्र काढण्याचें ठरविलें. 'काळा'ला सुरुवातीपासूनच लोकांनीं उत्तम आश्रय दिला. याला कारण काळाची चटकदार भाषा, त्या वेळच्या परिस्थितीचें उघडें-नागडें व सत्य चित्र काढण्याची विशिष्ट पद्धति वगैरे होत. १८९८सालीं ज्या वेळीं काळ जन्माला आला, त्या वेळीं त्याची विक्री सहाशें होती. पुढें १९०४सालीं ती बारा हजार प्रतींपर्यंत आली. या वेळीं काळानें सुमारें सोळा-सतरा वर्षें एकनिष्ठेनें जनतेची सेवा करीत असलेल्या 'केसरी'च्या खपा-लाहि मागें टाकलें व काळाची योग्यता लोकांच्या निदर्शनास आणून दिली. 'काळा'वर मध्यंतरीं एक-दोन गंडांतरेंहि आलीं; पण सुदैवानें त्यांतून 'काळ' बचावला. पुढें १९०८ मध्यें काळाचा

खप सोळा हजारांपर्यंत वाढला होता. काळाची ही वाढती लोकप्रियता सरकारला सहन होईना व १९०८ सालच्या उत्तरार्धांत 'काळ' पत्रावर खटला भरण्यांत आला. ह्या खटल्यांत शिवरामपंतांनीं बचावाचें काम स्वतःच केलें व आपलें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व शिवरामपंतांनीं जनतेच्या निदर्शनास आणलें. या खटल्यांत पंतांना एकोणीस महिन्यांची शिक्षा झाली. पुढें दोन वर्षें काळ पत्राचें संपादकीय काम श्री० खरे व सोमण यांनीं केलें व काळाची लोकप्रियता कायम राखिली. पुढें १९१० सालीं काळाकडून दहा हजारांची जामिनकी मागण्यांत आली; व अशा रितीनें काळ पत्र बंद पाडणें सरकारनें भाग पाडलें.

* * *

**'काळानंतर'**:—शिवरामपंतांच्या आयुष्याचे जर दोन भाग पाडावयाचे झाले तर पंत तुरुंगांतून सुटून येण्यापूर्वींचा एक व तुरुंगांतून सुटून आल्यानंतरचा दुसरा असे दोन भाग पाडावे लागतील. पंतांच्या मागोमाग टिळक तुरुंगांत गेले व अशा रितीनें महाराष्ट्र आपल्या दोन पुढाऱ्यांना कांहीं दिवस पारखा झाला होता. देशभर औदासिन्याची छटा पसरली होती, नवचैतन्याची पसरलेली लाट हळूहळू ओसरूं लागली होती; आणि पंत ज्या वेळीं सुटून आले त्या वेळीं जिकडे तिकडे वाताहत झाली होती, निराशेचें वातावरण पसरलें होतें. त्यांतच शिवरामपंतांच्या प्रकृतीला सरकारचा पाहुणचार मानवला नसल्यामुळें पंतहि अगदीं खंगून आले होते. अशा स्थितींत पंतांनीं विशेष हालचाल केली नाहीं. १९१४ सालीं टिळक परत आले. याच वेळीं महायुद्धाचा वणवा भडकला होता; व या वेळीं हिंदी लोकांची सहानुभूति मिळवणें सरकारला जरूरीचें वाटल्यामुळें सरकारनें आपलें धोरण

बदललें. लोकमान्य टिळकांनीं या संधीचा फायदा घेऊन होमरूलची चळवळ चालू केली; पण कांहीं झालें तरी शिवरामपंतांना विशेष महत्त्वाची चळवळ करण्याला स्फूर्ति येईना. १९१० ते १९२० या दहा वर्षांच्या काळांत त्यांनीं जीं काय पुस्तकें लिहिलीं असतील व व्याख्यानें दिलीं असतील तीच तेवढी त्यांची कामगिरी होय.

पुढें महात्मा गांधींनीं असहकारितेची चळवळ चालू केली होती. या चळवळींत जरी ते सामील झाले होते तरी समरस झाले नव्हते. कारण पंतांच्या राजकीय धोरणांची व गांधींच्या राजकीय विचारांची सांगड पुष्कळ बाबतींत बसत नव्हती; तथापि गांधींच्या चळवळींत क्रांतिकारक विचारांची किंचित् छाया आहे, हें पाहून शिवरामपंत त्यांत सामील झाले व आपल्या शक्त्यनुरूप त्यांनीं कामगिरीहि केली. 'क्रांती'ची मनोभावें पूजा करणारे पंत अहिंसावादी गांधींच्या राजकारणाची पताका हातीं घेऊन सरकारशीं टक्कर देऊं लागले हें पाहून त्यांच्या कित्येक निकटच्या स्नेह्यांनाहि आश्चर्य वाटलें. पण यावरून शिवरामपंतांनीं क्रांतिकारकाची पवित्र भूमिका सोडली असें विधान कोणी केल्यास तें मात्र चुकीचें ठरेल. केवळ ज्या योगानें क्रांति जवळ येईल, देशाला स्वातंत्र्य प्राप्त होईल तो मार्ग पत्करावयाचा, हेंच त्यांचें राजकीय धोरण होतें. गांधींच्या राजकारणांत अस्पष्ट अशीं क्रांतीचीं बीजें त्यांना दिसलीं होतीं व म्हणूनच ते त्या चळवळींत सामील झाले. त्या वेळीं कौन्सिल-निवडणुकी बुडविण्यासाठीं हजारों कॉंग्रेसभक्तांनीं कंबरा कसल्या व व्याख्यानद्वारें आपल्या मतांचा फैलाव करून इच्छित कार्यांत सुयश मिळवलें. निवडणुकी बुडवल्यावर विजयाच्या आनंदानें भारून गेलेली ही सर्व मंडळी

पुढील कार्यक्रम आंखण्यासाठीं एकत्र जमली होती. अनेकांनीं आपआपल्या कुवतीप्रमाणें मतें दिलीं. शिवरामपंतांच्यावर पाळी आली तेव्हां ते म्हणाले, 'ज्या बाबीनें, 'रेव्होल्यूशन' जवळ येईल ती बाब आधीं हातीं घ्यावी.' या त्यांच्या एकाच वाक्यावरून असें दिसून येईल, कीं तरुणपणीं क्रांतीसाठीं हपापलेलें त्यांचें मन वृद्धापकाळींहि त्याच गोष्टीसाठीं तळमळत होतें; तारुण्यांतील उत्साह त्या वेळींहि कायम होता; इतकेंच नव्हे तर त्याला अनुभवाचा उजळा आला होता. ते शरिरानें वृद्ध होते पण मनानें अखेरपर्यंत तरुण होते !

कोणत्याहि चळवळींत एकदां पडले, कीं ती चळवळ यशस्वी करून दाखविण्यासाठीं कायावाचामनें करून झटावयाचें हा पंतांचा एक विशेष गुण होता. गांधींच्या चळवळींत पडल्यानंतर त्या चळवळीच्या प्रचारार्थ त्यांनीं 'स्वराज्य' नांवाचें साप्ताहिक पत्र चालू केलें. पण या 'स्वराज्या'ला 'काळा'ची सर कधींहि आली नाहीं. इतकेंच नव्हे तर 'काळ' व 'स्वराज्य' यांतील फरक पाहून शिवरामपंतांच्या कित्येक चाहत्यांना वाईट वाटलें; आणि असा फरक पडण्याचें कारण उघड आहे. पंत स्वराज्यांतून ज्या तत्त्वाचा फैलाव करूं इच्छीत होते, ज्या मतांच्या प्रचारार्थ ते आपली लेखणी झिजवीत होते, तीं तत्त्वें व तीं मतें पंतांना पूर्णांशानें मान्य नव्हतीं. शिवरामपंतांची त्यांवर विशेष अशी श्रद्धा नव्हती. अगदींच स्वस्थ बसण्यापेक्षां कांहीं तरी करणें बरें वाटूनच शिवरामपंतांनीं गांधींच्या चळवळींत भाग घेतला होता. मग जीं तत्त्वें स्वतः पंतांना पटत नव्हतीं तीं दुसऱ्यांना पटवून देण्यांत त्यांना यश तरी कसें यावें ? तसें पाहावयाचें झाल्यास 'काळ' व 'स्वराज्य' यांमधील भाषेमध्यें म्हणण्याजोगा फरक होता असें नव्हे;

पण 'काळां'तला जिव्हाळा 'स्वराज्यां'त नव्हता. काळांतील कळकळ व तळमळ स्वराज्यांत नव्हती; व याचें कारण गांधींचें राजकारण पूर्णांशानें त्यांना पटलें नव्हतें हेंच होय. मध्यंतरीं मुळशी-प्रकरण उद्भवलें व त्यांतहि अण्णासाहेबांनीं योग्य तो वांटा उचलला व त्यांची कामगिरी सरकारदरबारींहि मान्य होऊन त्यांना १९२२ सालीं म्हणजे वयाच्या अठ्ठावन्नाव्या वर्षीं पुन्हा एकदां सहा महिन्यांची शिक्षा होऊन कारागृहवास पत्करावा लागला. ही शिक्षा धैर्यानें भोगून आल्यावर मात्र वृद्धापकाळामुळें त्यांना कार्याकडे जितकें लक्ष देतां यावें तितकें देतां आलें नाहीं. त्यांनीं 'स्वराज्य' पत्र व छापखाना दे. भ. शंकरराव देव यांचे स्वाधीन करून राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें. तथापि पुढें सायमन कमिशनवरील बहिष्कार यशस्वी करण्यांत त्यांनीं जसा हातभार लावला तद्वतच नेहरू रिपोर्टाच्या प्रचारासहि त्यांनीं चांगलीच मदत केली. १९२८ सालीं पुणें येथें भरलेल्या महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे ते स्वागताध्यक्ष होते. तसेंच पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं स्थापिलेल्या स्वातंत्र्य संघाच्या पुणें येथील शाखेचे ते अध्यक्ष होते. १९२९ सालीं बेळगांव येथें भरलेल्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे ते अध्यक्ष होते.

केवळ साहित्यसेवेच्या दृष्टीनें पाहिलें तरी शिवरामपंतांनीं वाङ्मयक्षेत्रांत अत्यंत भरीव अशी कामगिरी केली आहे. तर्कभाषा, भामिनीविलास, प्रसन्नराघव इत्यादि संस्कृत ग्रंथांच्या सटीप इंग्रजी आवृत्त्या त्यांनीं काढल्या आहेत. तसेंच शेक्सपिअरच्या 'मॅकबेथ'चें मानाजिराव, शिलरच्या 'रॉबर्स'चें भीमराव व ॲडिसनच्या 'केटो'चें रामदेवराव अशीं रूपांतरित नाटकेंहि लिहिलीं आहेत. त्याचप्रमाणें संगीत कादंबरी हें नाटकहि त्यांनींच लिहिलें

आहे. 'पहिला पांडव' व अर्धवट राहिलेली 'मिराबाई' व 'महाराष्ट्र-लक्ष्मी', 'जयसिंग व पद्मिनी' हीं नाटकें त्यांच्याच लेखणींतून उतरलीं आहेत. 'विंध्याचल' ही कादंबरी, 'गोविंदाची गोष्ट' ही दीर्घ-कथा, साहित्यसंग्रहाचे दोन भाग, तर्कसंग्रह व अर्थसंग्रह, मराठ्यांच्या लढायांचा इतिहास, इत्यादि ग्रंथ त्यांनीं लिहिले आहेत. त्यांची ही वाङ्मयाची सेवा लक्षांत घेऊन बेळगांवच्या वाङ्मय-चर्चा-मंडळाच्या त्या वेळच्या कार्यकारी मंडळानें शिवरामपंतांची अध्यक्ष म्हणून निवड केली हें खरोखरीच त्या कार्यकारी मंडळाला भूषणावह आहे. कारण त्या वर्षी ( १९२९ ) जर शिवरामपंत संमेलनाचे अध्यक्ष होते ना, तर एका अत्यंत थोर अशा साहित्य-सेवकाची सेवा महाराष्ट्राच्या लक्षांत आली नाहीं असा आरोप महाराष्ट्रावर केला गेला असता व या आरोपापासून बेळगांवच्या वाङ्मय-चर्चामंडळानें महाराष्ट्रास वांचाविलें म्हणून मंडळाचे आभार मानणें आम्ही आमचें कर्तव्य समजतों.

देशोद्धारार्थ पंतांनीं केवळ लेखणीचाच उपयोग न करतां व्याख्यान किंवा प्रवचनाच्या द्वारेंहि पुष्कळच प्रयत्न केला आहे. पंतांची वक्तृत्वशैली इतकी उत्तम होती कीं तीन-साडेतीन तासपर्यंत जरी ते बोलत राहिले तरी श्रोत्यांना त्यांचा कंटाळा येत नसे. कुठलाहि साधा विषय घ्यावयाचा व त्या विषयाची फोड करून सांगतां सांगतां त्या वेळच्या राजकारणाचे घुटके लोकांना पाजावयाचें किंवा सरकारच्या बारीकसारीक, पण परिणामीं घोर अशा दुष्कृत्यांचा अप्रत्यक्ष रितीनें उल्लेख करून सरकारबद्दल चीड उत्पन्न करावयाची ! मराठीप्रमाणें ते इंग्रजीहि उत्तम बोलत

असत व याचें प्रत्यंतर त्यांनीं स्वतःचा खटला चालविण्याच्या प्रसंगीं आणून दिलें आहे.

**मनोरचना :—** शिवरामपंतांनीं 'काळ' व 'स्वराज्या'मधून इतकें अवर्णनीय कार्य केलें तरी पण ते लोकांच्या नजरेपुढें 'पुढारी' या नात्यानें कधींच आले नाहींत. लेखणी आणि वाचा या बाबतींत किती तरी कमी दर्जा असणारे लोक पुढारी म्हणून गाजले जात आहेत. मग शिवरामपंतांना वरील दोन अमोघ शक्तींचें साहाय्य असतांना ते मागें कसे राहिले? या प्रश्नाचें उत्तर एकाच वाक्यांत द्यावयाचें झालें तर तें असें देतां येईल, कीं राजकारणाच्या बाबतींत पंत हे ध्येयवादी होते, लो. टिळकांप्रमाणें व्यवहारी नव्हते. ध्येयवादी मनुष्याच्या मनाची मांडणीच अशा एका विशिष्ट तऱ्हेनें केलेली असते, कीं तो ध्येयप्राप्तीसाठीं क्षणभर 'व्यवहार' बाजूला ठेवतो व ध्येयप्राप्तिप्रीत्यर्थ जनतेच्या दृष्टीनें अव्यवहार्य असलेले मार्गहि चोखाळतो. अशाच कित्येक गोष्टी पंतांना कराव्या लागल्या; व जनतेला त्या वेळीं त्यांचीं कृत्यें जाज्वल्य जहालांच्या कृत्यांनाहि मागें टाकणारीं भासल्यामुळें तीं जनतेला आकलन करतां आलीं नाहींत. याचा दोष लोकांनीं पंतांना दिला व कित्येक त्यांच्यावर नाराजहि झाले. पुढारीपणाला अवश्य लागणारी अपूर्व धडाडी शिवरामपंतांच्या अंगीं नव्हती असें म्हटल्यास फारसें चुकीचें होणार नाहीं. अपूर्व धडाडीच्या जोरावर लोकमान्यांनीं आपल्याकडे कित्येक लोकांना खेचलें; पण ती कला पंतांना अवगत नव्हती. वेळप्रसंग आला त्या वेळीं पंतांनींहि मोठ्या आनंदानें तुरुंगवास भोगला, तुरुंगांतील हाल-अपेष्टा सहन केल्या; यावरून ते असल्या संकटांना भीत होते असें म्हणणें समंजसपणाचें ठरणार नाहीं. आणि ज्या वेळीं एखादा मनुष्य अपूर्व अशी चळ-

वळ स्वतःच्या नेतृत्वाखालीं चालू करतो, एखादी संस्था काढून त्यातर्फे जनतेच्या पुढें पुढें येतो, तेव्हां त्याच्या नेतृत्वाखालीं जनता येण्यास तयार होते. पण पंतांनीं अशा प्रकारचें कोणतेंहि कृत्य न केल्यामुळें—किंवा त्यांना करावें असें न वाटल्यामुळें—सहजसाध्य असलेला पुढारीपणा त्यांना मिळाला नाहीं. तरी पण त्यांनीं केलेली कामगिरी ही इतकी श्रेष्ठ आहे, कीं महाराष्ट्रानें स्वातंत्र्यप्राप्तीप्रीत्यर्थ केलेल्या गतगोष्टींचा जर कोणी इतिहास लिहूं लागला, तर त्याला शिवरामपंतांचें नांव टिळकांच्या नांवाइतक्याच जाड ठशांत छापावें लागेल.

कै० अच्युतराव कोल्हटकर म्हणतात, 'आपल्या विचारांच्या-बरोबर स्वतः वर जाण्याची ताकद त्यांच्या (शिवरामपंतांच्या) अंगांत नव्हती—मनाचा कमकुवतपणा हा त्यांचा निसर्गसिद्ध दोष होता ! तो नसता तर ते लेनिन किंवा मुसोलिनीच झाले असते ! ह्या वैगुण्यामुळें ते मागें राहिले ! परंतु ते स्वतः मागें राहिले तरी त्यांच्या शब्दांत तो जोर कायमचा आहे व तें त्यांचें वाङ्मय महाराष्ट्रीयांतून लेनिनला जन्माला आणल्यावांचून कधींहि राहणार नाहीं ! तरवारीचे कारखानदार स्वतः तरवारबहाद्दर असतात असें नाहीं, पण पाणीदार तरवारी कशा कराव्या हें त्यांना समजतें; व अशी एखादी तरवार एखाद्या पराक्रमी पुरुषाच्या हातांत पडली म्हणजे तीच भवानी तरवार बनून त्यास श्रीशिवाजी महाराजांचें यश येतें.' त्याचप्रमाणें प्रो. न. र. फाटक म्हणतात, 'त्यांच्या आयुष्याच्या एकंदर पद्धतीकडे लक्ष दिल्यास ते समुदाया-च्या चळवळींत आवडीनें पडणारे असावेत असें वाटत नाहीं. एकान्तवास, मननशील, निसर्गरसिक, विचारप्रिय कोटींतले ते भास-तात. तेव्हांच्या चळवळीची जर त्यांना मनापासून हौस असती

तर त्यांनीं आपल्या शहरांतल्या भिन्नभिन्न संस्था, म्युनिसिपालिटी, लोकल बोर्ड, कौन्सिल वगैरे कार्यक्षेत्रांत प्रामुख्यानें भाग घेतला असता. आपल्यापुढें चालणाऱ्या चळवळींत खरा जीव नाहीं अशी त्यांची समजूत, हें त्यांच्या वरील संस्थांपासून अलिप्त राहण्याचें जेवढें कारण असूं शकेल, तेवढेंच त्यांनीं स्वतःकडे उपदेशकाची भूमिका घेतली होती, हें देखील वरील कार्यक्षेत्रांतून ते आघाडीवर प्रासंगिक अपवादाशिवाय उत्साहानें न दिसण्याचें एक बलिष्ठ कारण आहे.' तसेंच श्री. दि. वा. दिवेकर म्हणतात, '—कठीण समय असतां महाराष्ट्र स्वातंत्र्योन्मुख करण्यासाठीं त्यांनीं आपली विद्वत्ता, आपलें वक्तृत्व व आपले स्वाभाविक गुण खर्च केले हीच त्यांची प्रधान कामगिरी, व तिजबद्दल महाराष्ट्र त्यांचा सदैव ऋणी राहील. पावसाचें कार्य म्हटलें म्हणजे पडण्याचें. शेतीच्या पिकांकरितां त्याचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याचें काम दुसऱ्याचें. अफाट धरण बांधून, त्यांतील पाणी डोंगरावरून जोरानें सोडून त्यापासून वीज उत्पन्न करावयाची व विद्युत्संचय करून ठेवावयाचा; पण त्याच्यापासून योग्य फलनिष्पत्ति करून घेणें हें काम जो करील त्याचें. हें न घडलें तर पर्जन्याचा अथवा विजेचा दोष काय?'

"अण्णासाहेबांना १९०८ मध्यें पकडल्यानंतर व लो० टिळकांना गिरफदार करण्यापूर्वीं उभयतांची गांठ पडली तेव्हां टिळकांनीं त्यांना कानमंत्र सांगितला तो देखील हा कीं, 'हें पहा शिवरामपंत, तुम्ही तर सरकारी तोहमतींत आहांतच. आम्हीहि तुमच्यापाठोपाठ येतोंच. हें सतीचें वाण आहे हें लक्षांत ठेवा.' राष्ट्रस्वातंत्र्यासाठीं आंदोलन करतांना ज्या सरकारी आपत्ति व हालअपेष्टा सोसाव्या लागल्या त्या शिवरामपंतांनीं मोठ्या आनंदानें

सोसल्या. किंबहुना बालपणापासून त्यांच्या बाह्य वागणुकी-वरून कल्पना न येण्यासारखा सोशिकपणा त्यांच्या अंगीं वसत होता, म्हटलें तरी चालेल. महाडास अगस्त्याच्या झाडावरून फुलें काढतांना खालीं पडून, शरिराची एक सबंध बाजूच्या बाजू चांगली दुखावली असतां ज्या 'बाळक्या'नें नेसलेल्या धोतराचा सोगा पांघरून घेऊन, जखम घरच्या माणसांपासून चोरून ठेवली, त्यानेंच पुढें दोनदां तुरुंगवासांतील भोगास सादर व्हावें हें स्वाभा-विक वाटतें. अशी सहनशीलता बाणलेली होती म्हणून नेहरू रिपोर्टाच्या सर्वपक्षीय दौऱ्यांत जळगांवीं पायास ठेंच लागली, त्यामुळें मधुमेहानें वाढलेलें दुखणें त्यांनीं सहा महिने शान्त चित्तानें काढलें. कपाळावर पोफळाहून मोठें एवढें गळूं झालें तें वाहत असतां बेळगांवच्या साहित्य-संमेलनाच्या प्रसंगीं त्यांनीं अध्यक्षीय भाषण तयार केलें. फार कशाला, कानामागें प्राणांतिक पुटकुळी उठली, ती वाहूं लागली, अत्यंत ठणका लागला, तरी शिवराम-पंतांचें रूसोच्या 'सोशल कॉंट्रॅक्ट'चें मराठी भाषांतरहि चाललेलें व नाटकाच्या प्रवेशलेखनाचें कार्यहि तहकूब नाहीं अशी स्थिति !"

पण एवढी सहिष्णुता अण्णासाहेबांच्या एकंदर राहणीशीं विजोड अशी दिसते. लहान वयापासून ते रसिक, रंगेल व गुल-हौशी वृत्तींत वाढलेले. त्यांचे पूर्वज पेशव्यांचे पदरीं होते. ती पेशवाई जणुं काय त्यांच्या अंगीं पक्की मुरलेली ! मॅट्रिकच्या परीक्षेंत पहिल्या वर्षी नापास झाले तेव्हां त्राग्यानें रेशमी धोतरें कांहीं दिवस टाकलीं व अंगावरचें सोनें-मोतीं बाजूस ठेविलें तितकेंच ! बाकी १९२१ सालापर्यंत अण्णासाहेब म्हणजे नेहमीं दरबारी थाटाच्या पोशाखांत असावयाचे; व्याख्यानाला जावयाचे म्हणजे उन्हाळा असेल तर, चॉसरनें यतीचें वर्णन केल्याप्रमाणें 'कांचे-

साररूया तुळतुळीत डोक्यावर' मोतिया रंगाचें पागोटें, भालपटावर रुंद नामानें लावलेलें उभें केशरी गंध, एका कानांत झळकणारी टपोऱ्या मोत्यांची भिकबाळी, दुसऱ्या कानांत अत्तराचा फाया, अंगांत पांढरा स्वच्छ पेशवाई अंगरखा, उजव्या बाजूच्या कांखेजवळ चकाकणारा आंतील जरीच्या जाकिटाचा भाग, अंगावर गोखलेपद्धतीप्रमाणें गळ्याभोंवताळून नव्हे अगर टिळक पद्धतीप्रमाणें बाहुवस्त्रावरूनहि नव्हे असें स्वतंत्रपणें, कांखेखालून घेऊन त्याच बाजूनें खांद्यावरून पाठीवर सोडलेलें दर्शनी वीतभर करवती कांठ असलेलें उपरणें, नेसलेलें शुभ्रकांठी धोतर, पायांत लाल पुणेरी जोडा व हातांत छत्री किंवा काठीच्याऐवजीं एखादें सुवासिक फूल अगर गजरा; अशा ऐटबाज तऱ्हेनें यांची स्वारी निघावयाची व रस्त्याच्या बाजूनें ताठ पण मंदमंद पावलें टाकीत गंभीर मुद्रेनें जावयाची. सभा संपून घरीं येतांच वडीलधाऱ्या बायकामंडळीकडून त्यांची दृष्टहि काढली जावयाची. महात्मा गांधींनीं त्यांचा पेहेराव हिरावून घेतला, पण त्यांचें उपजत रसवैदग्ध्य कोण नष्ट करणार ?

" जो पोषाखांत रसिकपणा, रुबाबदारपणा व ऐषआराम तोच त्यांच्या इतर सर्व बारीकसारीक बाबतींतील वागण्यांतहि दिसून येतो. नुसता चहा प्यायचा तरी तो देखील प्रसन्न चेहरा करून, सावकाश डाव्या हातांत बशी व उजव्या हातांत पेला घेऊन तो कढत कढत डोळ्याला लावावयाचा व मग त्याची थोडी महती गायल्यासारखें करून धीरोदात्तपणानें चाखत चाखत घोटघोट ओष्ठ-प्रदेशाच्या खालीं विनिर्मुक्त व्हावयाचा. अशा प्रकारचा त्यांचा कांटेकोरपणा व स-रसत्व हे गुण केवळ स्वत:पुरतेच नसून त्यांजकडे कोणत्या तरी प्रसंगानें चार लोक जमले तरी त्यांच्या

व्यवस्थेंतहि नजरेस पडत. 'राष्ट्रीय क्लब' करण्याची अण्णासाहेबांची पाळी आली म्हणजे तर कांहीं विचारूं नये. त्यांच्या घरचा क्लब म्हटला म्हणजे टापटीप, श्रीमंती थाटमाट, षड्रसपूर्ण पदार्थ हें पाहून आपण एखाद्या सरदाराच्या मेजवानीला तर आलों नाहीं ना असें वाटावें! १९२८ च्या महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे अण्णा-साहेब स्वागताध्यक्ष होते, त्यांनीं अध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांच्या सन्मानार्थ केलेली 'ॲट होम' किती नमुनेदार होती तें ती समक्ष पाहणारांसच माहीत. कोणी एकादा सामान्य मनुष्य देखील त्यांजकडे प्रसंगोपात्त कामाकरतां गेला तरीहि त्याची बरदास्त व्हावयाची. स्वत: कितीहि घाई-गर्दींत असले तरी त्याचें म्हणणें अगदीं स्तब्ध अंत:करणानें ऐकून घ्यावयाचें व जरी ते त्याच्याशीं मोकळ्या मनानें बोलले नाहींत, तरी येणारा गृहस्थ त्यांच्या नितान्त-मधुर वाणीनें संतुष्ट होऊन आपली फत्ते झाली असें समजून माघारी जावयाचा व तेहि दारापर्यंत त्याला 'बरें, ठीक आहे; या बरें' असें म्हणण्यासाठीं पोंचविण्यास जावयाचे. 'वाङ्माधुर्या-न्नान्यदस्ति प्रियत्वं' म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. त्यांना शर्कराखंडखाद्य जें इतकें प्यार होतें त्याचा सर्व रस त्यांच्या जिभेंतच संचित होऊन राहत असें कीं काय, न कळे! टिळक सुद्धां एखादे प्रसंगीं एक घाव दोन तुकडे करणारा प्रश्न समोरच्या मनुष्याला विचारीत. तात्यासाहेब केळकरांची मिठास भाषणाबद्दल प्रसिद्धि, पण तेहि क्वचित् भेटीस येणाराला तुटक बोलून परत लावतील. दुसऱ्यांशीं वागण्याची खाडिलकरांची पद्धति तर बरीच तापटपणाची व माणुसघाणेपणाची, पण शिवरामपंतांची रसना ही जशी कांहीं माधुर्यनिर्झरणी व तीहि सतत वाहणारी!"

—दिवेकर, स्वभावचित्रें.

परक्या माणसाबद्दल त्यांना जर इतकी कळकळ व आपलेपणा तर खुद्द नातेवाइकांशीं ते किती प्रेमळपणानें वागत असत याची कल्पनाच करणें ठीक. स्वतःच्या नातेवाइकांना सुख लागावें व त्यांचा संसार सुखानें चालावा म्हणून त्यांनीं घर व जमीन यांवरील हक्कहि सोडला होता ! शिवरामपंत वर वर दिसण्यांत अत्यंत कठोर असावेत असें वाटे; पण मन मात्र अत्यंत हळवें. शिवरामपंतांचे थोरले चिरंजीव कै. कृष्णाजीपंत बॅरिस्टरीच्या परीक्षेसाठीं विलायतेला गेल्यावर थोड्याच दिवसांत त्यांना ताप येत आहे हें जेव्हां पंतांना समजलें, तेव्हां बॅरिस्टरीच्या परीक्षेची वाट न पाहतां त्यांनीं आपल्या चिरंजिवास परत बोलावलें. तसेंच 'टिळकांच्या धाकट्या मुलाची प्रेतयात्रा चालली असतां टिळकांच्या केसरी-मराठा संस्थेच्या ट्रस्टींविषयीं कांहीं असभ्यपणाचें व गालिप्रचुर ओरडणें त्यांच्या कानीं पडतांच त्यांच्या डोळ्यांतून खळकन् आंसवें गळलीं !'

धार्मिक दृष्ट्या मनानें व आचरणानें पंत जवळ-जवळ जुन्या जमान्यांतीलच होते असें म्हटलें तरी चालेल. कितीहि काम असो, गर्दी असो, पंतांची संध्या ही व्हावयाचीच ! पण त्यांची ही धर्मनिष्ठा त्यांच्या इतर बाबतींत आड येत नव्हती हें या ठिकाणीं लक्षांत ठेवलें पाहिजे. एकदां मित्र म्हटला, कीं त्याची जात-गोत पहावयाची नाहीं, त्याच्या शक्य तों उपयोगी पडावयाचें ही त्यांची मित्राबद्दलची कल्पना. एकदां पंत महाड येथें असतांना तेथील मुसलमान-मोहल्याला भर दोन प्रहरीं आग लागली ही गोष्ट पंतांच्या कानांवर येतांच स्वतःच्या गडी-माणसांसह ते त्या स्थळीं धावत गेले व आग विझविण्यांत त्यांनीं इतकी जिवापाड मेहनत घेतली, कीं त्या प्रसंगीं त्यांचें अंगाहि थोडेंबहुत होरपळलें होतें !

इतकेंच नव्हे, तर संकटांत सापडलेल्या सर्व मुसलमान लोकांना त्यांनीं त्या दिवशीं जेवण घातलें ! गव्हर्नरसाहेबांची स्वारीहि त्याच वेळीं तिकडून जायची होती, व या संधीचा शक्य तर फायदा करून घ्यावा म्हणून त्यांनीं मदतीचा अर्ज लिहून दिला व तो साहेबांना देण्यासंबंधीं लोकांना सांगितलें.

शिवरामपंत कधीं महाडास गेले तर मोठेपणा विसरून धोतराचा काच्या मारून विटीदांडू खेळण्यास उभे राहात ! या साध्या गोष्टीवरून पंतांच्या स्वभावावर किती तरी प्रकाश पडत नाहीं काय ? एकदां पंत असेच महाडास गेले असतां त्यांच्या मातोश्रींनीं एका उत्तम कथेकऱ्याचें कीर्तन करण्यास पंतांना सांगितलें. पंतांनीं लगेच एका राष्ट्रीय कीर्तनकारास मुद्दाम बोलावून आणलें व स्वतःच्या अंगणांत कीर्तन करवलें. कीर्तनसमाप्तीच्या वेळीं कथेकऱ्याला काय द्यावयाचें याची वाटाघाट चालू झाली तेव्हां पंतांनीं आपल्या आईला सांगितलें, कीं 'बाती ! तुला कथेकऱ्यांना जें कांहीं द्यावेंसें वाटत असेल तें मी देण्यास तयार आहें' यावर त्यांच्या मातेनें 'मला ओंजळभर रुपये द्यावयाचे आहेत' असें सांगितलें. यावर पंतांनीं मुळींच वेळ न दवडतां आपल्या आईच्या हातीं ओंजळभर रुपये दिले व पंतांनीं आपल्या आईकडे हसत हसत पाहिलें; तेव्हां त्या माउलीच्या नेत्रांतून खळकन् आनंदाश्रु बाहेर पडले ! अशा त्यांच्या प्रेमळ मातेला शिवरामपंतांना तिच्या निधनसमयीं केवळ सरकारच्या बंदीमुळें भेटतां येऊं नये हा दैवदुर्विलास नव्हे काय ?

दे० भ० काकासाहेब खाडीलकर यांच्याविषयीं पंतांना वाटणारा आपलेपणा व आदर आणि सरकारबद्दल वाटणारा तिटकारा त्यांनीं एकाच वेळीं किती उत्तम रितीनें प्रदर्शित केला आहे हें

खालील उताऱ्यावरून दिसून येईल. त्यांच्या बुद्धीची चमक, मित्राबद्दल आदर, परस्परविरोधी चित्र रंगविण्यास लागणारी कुशलता, उपरोधिक भाषणाचा एक नमुना वगैरे अनेक गुण या एकाच उताऱ्यावरून दिसून येतील. '—पुढील भाग वाचून न दाखवितां माझ्यापेक्षां दुसऱ्या अधिक लायक गृहस्थाची या जागीं योजना व्हावयास पाहिजे होती असें मी जाहीर करतों. मी हें कोणत्या गृहस्थांना उद्देशून बोलत आहें हें आपल्यापैकीं पुष्कळांच्या लक्षांत आलें नसेल. कित्येकांच्या चेहऱ्यांवरून त्यांना मी कोणाला उद्देशून बोलत आहें याची कल्पना आली आहे असें वाटतें....ते गृहस्थ म्हटले म्हणजे श्री० कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर हे होत. आज या वेळीं वास्तविक ते बेळगांवीं असावयास पाहिजे होते; पण त्या ऐवजीं सरकारनें त्यांना महाराष्ट्राच्या दुसऱ्या टोंकाला असलेल्या अहमदाबाद शहरीं ठेवलें आहे. इंग्रजी भाषेंत एक म्हण आहे. तिचा पूर्वार्ध Man Proposes असा आहे. म्हणजे मनुष्य एक गोष्ट चिंतीत असतो; पण तिचा उत्तरार्ध या परिस्थितींत God च्या ऐवजीं Government disposes म्हणजे सरकार तिचा नाश करतें असा अर्थ आहे. कारण हल्लीं परमेश्वर आहे कोठें? तेव्हां त्याचेऐवजीं सरकार असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. तुम्हांला वाटतें त्यांनीं इकडे दक्षिणेंत यावें; पण सरकार त्यांना उत्तरेकडे नेत आहे. तुमची एक इच्छा तर सरकारची इच्छा निराळीच. ज्या ठिकाणीं श्री० खाडीलकर हे अध्यक्ष या नात्यानें समर्थ रामदासस्वामींच्या भगव्या रंगाचे पोषाख केलेल्या येथील स्वयंसेवकांच्या रांगांतून सलामी घेत गेले असते, त्याऐवजीं ते आज दुसऱ्याच कोठल्या तरी पंथाच्या कोठल्या तरी रंगाच्या पोषाखाच्या शिपायांच्या रांगेंतून जात आहेत. ज्या ठिकाणीं

त्यांच्या गळयांत पडलेले पुष्पहार हातावर घेऊन ते चालले असते, त्या ठिकाणीं सरकार त्यांना मुंबईहून अहमदाबादेकडे नेतांना लोखंडी बेड्या ठोकून नेत आहे.' किती हृदयद्रावक देखावा हा! किती हृदयभेदी तुलना आहे ही!

शिवरामपंतांचा स्वभाव लहानपणापासून विनोदी होता. अगदीं लहान असतांना ते आपल्या म्हाताऱ्या आजीची फार गंमत करीत. दोनप्रहरीं वामकुक्षी करण्यासाठीं म्हणून आजी जाऊन निजली, कीं तिथें जात, व म्हणत 'आजी, आजी! तूं मला पोथी वाचून दाखव म्हणून सांगतेस ना, चल तर तुला आतां वाचून दाखवतों.' बिचाऱ्या आजीला हें खरेंच वाटे व ती हळूहळू बाहेर येऊन बसे; पण आजी बाहेर आल्यावर मात्र पंत म्हणत, 'आजी, आतां नाहीं कांहीं मी तुला वाचून दाखवणार; आपली उगीच केली तुझी गंमत.' बालपणीं त्यांच्या अंगीं मुरलेला हा खेळकर विनोद त्यांना त्यांच्या 'मोठेपणीं' सोडून गेला नाहीं. काळ पत्रावरील खटला चालू असतांना मॅजिस्ट्रेटनीं १२४ (अ) व १५३ (अ) या कलमांखालीं त्यांचेवर आरोप ठेवून खटला सेशन-कमिट केला. तेव्हां कांहीं घरगुती गोष्टींबद्दल सल्ला घेण्यासाठीं म्हणून परांजपे यांना भेटण्यासाठीं दंडवते, बेहरे व साठे यांनीं मॅजिस्ट्रेटची परवानगी मिळविली व नंतर ते तिघे कोर्टांतून कैदी जेथें ठेवतात तेथें परांजपे यांना आणल्यावर भेटण्यासाठीं म्हणून गेले. परंतु पोलीस-अधिकारी परवानगी देईना. तेव्हां त्यांनीं पुनः परवानगी घेतली. नंतर ते तिघे खोलींत गेल्यावर परांजपे म्हणाले 'तुम्हांलाहि कांहीं वेळ तुरुंगाचा अनुभव माझ्यामुळें मिळत आहे, बरं का!'

बेळगांवला मराठी साहित्य-संमेलन भरवलें म्हणून कानडी

लोक परांजपे यांना काळीं निशाणें दाखवणार अशी गप्प उठली होती. त्याला उद्देशून परांजपे आपल्या अध्यक्षीय भाषणाचा समारोप करतांना म्हणतात '—हीं जीं काळीं निशाणें दाखविण्यांत येणार होतीं ती खादीचीं तरी होतीं का ?'

समयसूचकता हा एक पंतांचा विशेष होता. एकदां पुणें येथें भरलेल्या सभेंत राजनिष्ठेचा ठराव मांडण्याचा प्रसंग पंतांवर आला. लोक 'आतां आहे खरी कसोटीची वेळ' अशा अर्थानें पंतांच्या चेहऱ्याकडे पाहूं लागले. पंत उठले, ठराव मांडला; पण अशा विचित्र रितीनें, कीं त्यांत राजनिष्ठाच काय पण राजनिष्ठेची पुसट छायाहि नव्हती. पण उच्चारलेले शब्द मात्र असे, कीं वरवर पाहणाऱ्यास त्यांत राजनिष्ठा 'शंभर टक्के' दिसावी. इकडे आड व तिकडे विहीर अशा बिकट परिस्थितींतून पंत इतक्या सफाईनें बाहेर आले हें पाहून कित्येकांनीं त्यांचें कौतुक केलें, कित्येकांनीं त्यांना शाबासकी दिली.

त्याचप्रमाणें बेळगांव-संमेलन-प्रसंगीं कानडी-मराठी वादासंबंधाचे ठरावांत श्री० गंगाधरराव देशपांड्यांनीं श्री० केळकरांसारख्या विचारप्रधान माणसावर छाप पाडून त्यांना ठरावाला अनुकूल करून घेतलें. पण शिवरामपंत मात्र गंगाधररावांना 'बनले' नाहींत; व त्यांनीं मराठीला अत्यंत योग्य असा ठराव पास करून घेतला.

शिवरामपंतांना लिखाणाचा नाद इतका, कीं ते जवळ जवळ शेवटपर्यंत लिहीतच होते. जुलै व ऑगस्ट ( १९२९ ) हे दोन महिने त्यांचा कान अतिशय दुखत होता. तशांतहि त्यांनीं रूसोचें 'राजनीतिशास्त्र' या पुस्तकाचा शेवटचा भाग लिहून काढला व 'मिराबाई' हें नाटकहि लिहिण्यास प्रारंभ केला होता.

पुढें कानदुखी उपचारांनीं बरी होण्याचीं चिन्हें न दिसल्यामुळें मंगळवार ता. २४ सप्टेंबर १९२९ रोजीं त्यांना इंजेक्शन देण्यांत आलें. परंतु त्याचा इष्ट परिणाम न होतां बुधवार तारीख २५-९-२९रोजीं सकाळीं सात वाजल्यापासून त्यांना अस्वस्थता वाटूं लागली व सकाळीं १०-११ पासून ते बेशुद्ध झाले. तेव्हांपासून ती बेशुद्धावस्था अखेरपर्यंत कायम होती. अखेर शुक्रवार ता. २७-९-२९ रोजीं सकाळीं सात वाजण्याचे सुमारास त्यांचें प्राणोत्क्रमण झालें! चारच दिवस म्हणजे मंगळवारीं सबंध दिवसभर त्यांची प्रकृति अतिशय उत्तम होती. त्या दिवशीं सकाळीं त्यानीं 'मिराबाई' नाटकाच्या पहिल्या अंकांतील दुसरा प्रवेश लिहून काढला होता.

असो, 'शिवरामपंत ही एक व्यक्ति नव्हती! शिवरामपंत ही स्फूर्ति होती! शिवरामपंत ही शक्ति होती! शिवरामपंत ही चेतना होती! शिवरामपंत ही बुद्धीची रत्नपेटिका होती! शिवरामपंत ही विचारांची सुवर्णखनी होती! शिवरामपंत गेल्यामुळें महाराष्ट्रांतील तेज लुप्त झालेलें आहे—महाराष्ट्रांतील निस्सीम स्वातंत्र्यप्रीति दृष्टिपार गेलेली आहे-महाराष्ट्रांतील अतुल वाक्चातुर्य महाराष्ट्राला पारखें होऊन बसलें आहे.'

आणि हें नुकसान केव्हां बरें भरून येणार?

शिवरामपंत गेले! स्वातंत्र्याचा दिवा मालवला गेला!!

स्वातंत्र्याच्या तुतारीचे पडसाद आकाशांत विरून गेले व स्वातंत्र्याचा शाहीर देवा घरीं गेला!!!

—आणि त्याचा आत्मा केव्हां बरें शान्त होणार?

# २ काळाची कामगिरी

"देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा देऊन सुद्धां मला जितका धक्का बसला नसता तितका सरकारनें माझा प्रतिप्राण असणारें दहा वर्षांतलें वाङ्मय जप्त करून दिला व हाच माझा तरुणपणचा जिवंत मृत्यु होय."

— शि. म. परांजपे

हाय! दुर्भागी महाराष्ट्रा! शुद्ध स्वातंत्र्याची घोषणा ज्या 'काळा'तील लेखांनीं प्रथम केली त्यांना तूं आज पारखा व्हावास ना? पारतंत्र्याची बेडी तोडून टाकण्यासाठीं तळमळणाऱ्या महाराष्ट्रा! राज्यकर्त्यांच्या अंधारकोठडींत धूळ खात पडलेल्या 'काळा'-तील लेखांना प्रकाश-किरण दाखविण्यासाठीं तूं कांहींच प्रयत्न करूं नयेस ना? ध्येयवादी 'क्रान्ती'ची शिकवण आत्मसात् केलेल्या महाराष्ट्रा! एके काळीं नोकरशाहीलाहि कृतांतकाळाप्रमाणें भासणाऱ्या 'काळा'तील विचारसरणीचा आज तुला विसर पडावा ना?—पण नाहीं. 'बंडखोर' महाराष्ट्र असा स्वस्थ बसणार नाहीं. ध्येयवादी क्रान्तिच्या शिकवणीचें दृश्यफल, असहकारिता, कायदेभंग इत्यादि चळवळींत अगदीं थोड्या अंशानें का होईना, पण निदर्शनास आलें नाहीं काय?

'मवाळांना जहाल, भेकडांना कर्तबगार आणि तरुणांना बंडखोर बनविण्याऱ्या 'काळ' पत्राची कारकीर्द अवघी दहा वर्षांची आहे.

'महाराष्ट्र कॉलेज'च्या चार भिंती स्वतःच्या कर्तबगारीला अपुऱ्या पडूं लागल्या म्हणून शिवरामपंतांनीं तेथील जागेचा

राजीनामा दिला व ते मोकळे होऊन बसले. पंत अशा वेळीं मोकळे होऊन बसले, कीं जेव्हां एखाद्या मवाळालाहि सरकारचा तिटकारा वाटावा, मग अण्णासाहेबांसारख्या जहालाचें मन स्वदेश-प्रेमानें उचंबळून आल्यास नवल नाहीं. १८९७ सालचा पुण्याचा प्लेग म्हटला, कीं अजूनहि अंगावर कांटा उभा राहतो! प्लेग-निवारणार्थ मायबाप सरकारनें आटोकाट (!) प्रयत्न केले असें सरकार-दप्तरीं नमूद असेलच; पण वस्तुस्थिति मात्र निराळी होती. आलेल्या आपत्तीमुळें लोक अगोदरच भांबावून गेले होते, त्यांत सरकारनें स्वच्छतेसाठीं नेमलेल्या सोजिरांचे सोज्ज्वळ चाळे ऐकले म्हणजे सहृदय माणसास आजहि चीड आल्या-वांचून राहणार नाहीं, मग ज्यांनीं ती दुःस्थिति प्रत्यक्ष अवलोकिली त्यांचीं मनें त्यांच्या ताब्यांत कशीं आणि काय म्हणून राहावीं? नोकरशाहीच्या हस्तकांनीं जुलमाचा, ठगगिरीचा आणि किळसवाण्या कृत्यांचा इतका कळस केला, कीं क्रियेला प्रतिक्रिया म्हणूनच कीं काय विचारवंतांचीं खाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या महाराष्ट्रांतील एका वीरानें रँड साहेबांना यमसदनास पाठवून होणाऱ्या अन्यायाला थोडाफार आळा घालण्याचा प्रयत्न केला. याच वेळीं लोकमान्य टिळक यांच्यावरील खटल्याचा निकाल लागून त्यांना दीर्घकाल कारागृहवासाची शिक्षा झाली होती. पण निःशस्त्र हिंदी लोकांच्या आशा-आकांक्षा, त्यांचीं मतें, त्यांचे विचार ऐकून घेण्याइतकें सरकार त्या वेळीं विचारी नव्हतें! चाल-लेल्या धांदलींत सरकारचीहि धांदल उडाली होती. सर्व 'टोप्या' एकत्र होऊनहि शांतता प्रस्थापित होण्याचा मार्ग निघेना, तेव्हां सरकारनें दडपशाहीचा अंगीकार केला. जिकडे तिकडे धरपकड चालू झाली. 'धर, पकड आणि घाल तुरुंगांत' हा प्रकार सर्रास

चालू झाला. सरकारनें पत्करलेली ही आसुरी वृत्ति पाहून स्वदेश-भक्तीची खरी योग्यता लोकांना समजली. थोडक्या अवधींत फार प्रसिद्धि मिळविण्याचें साधन म्हणजे देशभक्त बनणें हा जो प्रकार रूढ होऊं पाहत होता त्याला बराच आळा बसला गेला. हंगामी दे. भ.च्या तोंडचें पाणी पळालें, व त्यांच्या तोंडाला कुलपें घातलीं गेलीं. सवंग लोकप्रियतेला हपापलेल्या व आतुर झालेल्या उदयोन्मुख व होतकरू देशभक्तांना खरी देशभक्ति ही स्वतःच्या पोळीवर तूप ओढून घेण्याइतकी सोपी नसून, ती सुळावरची पोळी आहे हें ध्यानीं आलें. स्वतःचा कमकुवतपणा माहीत असतांहि ज्यांनीं त्या वेळच्या रणक्षेत्रांत केवळ करमणूक व हौस म्हणून उडी घेतली होती त्यांनीं संधि सांपडतांच मागल्या पावलीं परत जाण्यास सुरवात केली. केवळ स्वदेशप्रेमाचें सोंग करणें सुद्धां कठीण जाऊं लागलें. विद्वत्ता व पुढारीपणा हीं एकच होत हा भ्रम पार मावळून गेला आणि बहुभाषावक्तृत्व केव्हां अंगावर उलटेल याचा नेम नाहीं, याचें ज्ञान सभाधीटांना व वाचीवीरांना आलें. केवळ शेजारचा 'बाळ' करतो तें आपणांसहि करणें शक्य आहे अशा समजुतीनें ज्यांनीं 'हाताला हात' लावण्याची चळवळ केली त्यांना स्वतःच्या (अ)योग्यतेची पूर्ण कल्पना आली व मूग गिळून स्वस्थ बसावें लागलें !

ज्या वेळीं 'स्वातंत्र्य' हा शब्द उच्चारणें म्हणजे एक पाय तुरुंगांत ठेवण्यासारखेंच होतें, लोकमान्यांचा फोटो लावणें म्हणजे सरकारच्या रोषास आपण होऊन आमंत्रण देण्यापैकीं होतें, क्रांतीची भाषा बोलणें म्हणजे गळ्याभोंवतीं असणाऱ्या फांसाची दोरी आवळण्यापैकीं होतें, अशा वेळीं शिवरामपंतांच्या मनाची चुळबूळ चालू झाली होती. इतके दिवस कोंडलेली स्वदेशप्रेमाची

व स्वातंत्र्यलालसेची वाफ सरकारी रोषाच्या आवरणाची पर्वा न करतां बाहेर पडण्याची वेळ आली होती. परिश्रमानें साध्य केलेली विद्या केवळ स्वार्थ साधण्याकरतां नसून सामान्य जनतेला तिच्या साहाय्यानें सत्यस्थितीची कल्पना आणून देण्यासाठीं आहे असें पंतांना वाटूं लागलें. त्या वेळीं विद्या ही कौतुकाची होती ही गोष्ट खरी पण त्या विद्येचा उपयोग राज्यकर्त्यांची दुष्कृत्यें चव्हाटयावर आणण्याकडे करणें म्हणजे संकटांच्या खाईत स्वतःला लोटून घेणें होय ही गोष्ट पंतांना माहीत होती. तरी सुद्धां अशा भिषण व भयानक परिस्थितींत स्वतःचें ध्येय ठरविणें ही गोष्ट सोपी नाहीं. 'वाङ्मयाच्या द्वारांतून स्वदेशभक्ती-च्या आणि पुढारीपणाच्या मुलखांत कित्येक लोक उतरलेले असतात, त्यांतल्या कित्येकांना पुढें काय वाढून ठेवलें आहे हें घाटांतून उतरतांना दिसत नाहीं; पण खालीं मैदानांत येऊन दाखल व्हावें तो तरवारींच्या टिपरघाईत सामील व्हावें लागतें; मग चुळबूळ होते, जीव कासावीस होतो, व अपयश पत्करून धैर्याचा डौल राखीतच, पण मागल्या पायांनीं पीछेहाट करावी लागते.' अशा सर्व गोष्टींची पंतांना पूर्ण जाणीव होती व असें असूनहि घरचीं माणसें, हितचिंतक, स्नेही व शेजारीपाजारी यांच्या विरोधास न जुमानतां पंतांनीं पूर्ण विचारान्तीं 'काळ' वर्तमानपत्र ( साप्ताहिक ) काढण्याचें ठरविलें.

पंत 'काळ' पत्र काढणार ही गोष्ट हां-हां म्हणतां पसरली व काळाच्या पहिल्या अंकाची लोक मोठ्या आतुरतेनें वाट पाहूं लागले; कारण 'काळां'तील लेख कोणत्या प्रकारचे असणार या-

विषयींची कल्पना, दिलेलीं व्याख्यानें व प्रवचनादिवरून लोकांनीं आधींच करून ठेवली होती. कॉलेजांतहि उत्तम वक्ते म्हणून त्यांनीं कीर्ति मिळवली असल्यामुळें त्यांचे विद्यार्थी व इतर लोकहि मोठ्या आतुरतेनें पत्राची वाट पाहूं लागले. अशा वेळीं ही गोष्ट पंतांचे गुरु डॉ० भांडारकर यांना समजली व त्यांना कसेंसेंच वाटलें. एक विद्वान गृहस्थ अशामुळें फुकट जाणार असें वाटून त्यांनीं पंतांना भेटीस बोलावलें व मोठ्या कळकळीनें उपदेश केला, कीं " आपण घेतलेलें वेड सोडून द्या, संस्कृतचे उच्च अध्यापक होण्यास आपण सर्वतोपरी लायक आहांत व म्हणून तुम्ही तोच व्यवसाय करावा." यावर पंतांनीं " आपला निश्चय झाला आहे तो बदलणें शक्य नाहीं." असें विनयानें उत्तर दिलें. डॉ. भांडारकर पुन्हा म्हणाले, कीं " हें चूक आहे, मी लवकरच रिटायर होणार आहें; व आपण हें वेड सोडून देण्यास कबूल असाल तर तुमची शिफारस मी सरकारांत करून ती जागा तुम्हांला देववितों." पंतांनीं परत नकारार्थी उत्तर दिलें व गुरुशिष्यांचा मतभेद होऊन ताटातूट झाली. या साध्या गोष्टीवरूनहि पंतांच्या जाज्वल्य देशभक्तीची कल्पना आल्याशिवाय राहत नाहीं. सत्ता ( अर्थात् कांहीं विशिष्ट क्षेत्रापुरती ) व संपत्ति आपल्या पायानें चालून आली असतां ज्या पुरुषानें तिकडे कानाडोळा केला त्याची दृष्टि किती विशाल असेल बरें ?

मनुष्याला सर्व कांहीं लाथाडणें शक्य आहे, पण स्वार्थ लाथाडणें शक्य नाहीं म्हणतात; या नियमाला धरून न वागतां जे पुरुष जनतेपुढें स्वतःच्या आचरणानें सामान्य जनतेला सन्मार्गावर आणण्याचा इशारा देतात तेच खरे श्रेष्ठ पुरुष होत; व त्यांतच त्यांचा मोठेपणा आहे. एवढी मोठी जागा पायीं लोळण घेत

असतांना तिचा अव्हेर करणाऱ्या माणसाचें मनोधैर्य किती प्रभावी असेल याची कल्पनाच करणें वरें. स्वदेशभक्तीचें किती अलौकिक उदाहरण हें ? केवळ स्वतःच्या विचारांचा व मतांचा फैलाव करण्यासाठीं ज्या सत्पुरुषानें अनाहूतपणें चालून आलेल्या मोठेपणाची होळी केली त्याच्या अंतःकरणांत देशाच्या स्वातंत्र्याची जागती ज्योत शेवटपर्यंत तेजानें तेवत असल्यास नवल तें काय ?

याच ठिकाणीं दुसरी एक गोष्ट ध्यानीं घेणें जरूर आहे. अण्णारावांच्या 'काळ' पत्राच्या वेळचें निरीक्षण करतांना आजच्या परिस्थितीचा चष्मा लावून उपयोगी नाहीं. तसें केल्यास 'काय, साप्ताहिक पत्रच चालविलें ना ? त्यांत काय मोठेंसें ?' असे उद्गार निघणें स्वाभाविक आहे. कारण आजच्या परिस्थितींत कोणीहि उठावें व पत्र काढावें, असा प्रकार चालू झाला आहे; किंवा इतर क्षेत्रांत नालायक ठरलेल्या लोकांनीं पत्रपटु बनण्याचा प्रयत्न केल्यास तो फळाला येण्याची आशा फार, असें कोणी विधान केल्यास त्यांत थोडीफार अतिशयोक्ति आहे ही गोष्ट खरी, पण या विधानांतील फक्त तत्त्वाकडेच लक्ष दिल्यास हल्लींची सुलभता चटकन् ध्यानीं येईल. हल्लींप्रमाणें कांहीं ठराविक व्यक्तींची स्तुतिसुमनानें पूजा करावी, तर कित्येकांवर खऱ्याखोट्या, बऱ्यावाईट टीकेचें अस्त्र टाकून जनतेमध्यें असणारा पूज्यभाव कमी करावा, असल्या प्रकारची 'धडाडी' त्या वेळच्या वृत्तपत्रकारांमध्यें नव्हती. त्या वेळचीं पत्रें हीं एका विशिष्ट हेतूनें निघालेलीं असत; त्यांचें ध्येय उच्च असे, व त्यांचे प्रयत्नहि त्यांच्या ध्येयास साजेसेच असत. सर्वसाधारणपणें कुठलेंहि 'देशी' पत्र घेतलें तर त्यांत टीका असेल—पण ती सरकारवर ! हल्ले असतील—पण ते त्या वेळच्या राज्य-

पद्धतीवर! गिला असेल, पण तो फितुरी लोकांबद्दल; व शिकवणूकहि असेल, पण तीहि स्वातंत्र्याबद्दलची! थोडक्यांत म्हणजे जेणेंकरून स्वातंत्र्य जवळ येईल त्या मार्गाचा अवलंब करावयाचा याकडे त्या काळीं असलेल्या पत्रपटूंचा कटाक्ष असे; व अर्थात् अशा तऱ्हेनें पत्र चालवितांना सरकारचा रोष होण्याचा संभव तर असावयाचाच पण त्याशिवाय स्वतःस जें साधत नाहीं तें दुसऱ्यास साधतें म्हणून त्यांच्या मार्गांत कांटे पसरण्याचा उद्योग करणाऱ्या लोकांचाहि एक कंपू होता. या कंपूनें तर टिळक व परांजपे यांना 'सवंग लोकप्रियतेसाठीं हपापलेले' अशा दुरुत्तरानें संबोधण्याचा धूमधडाका चालू केला होता. ज्या काळीं विचारांनीं व आचारांनीं नेमस्त असलेल्या पुढाऱ्यांवर सरकार गुप्त पोलिसांचा पहारा ठेवीत असे त्या काळीं सरकारला स्पष्टपणें हांकून लावण्याची भाषा बोलणाऱ्या माणसावर सरकार कोणत्या तऱ्हेची दृष्टि ठेवीत असेल याची कल्पनाच करणें बरें व हें सर्व माहीत असूनहि ज्यांनीं वरील हेतूनें पत्रें चालविलीं त्यांतच त्यांची धडाडी आहे, धाडस आहे!

अशा रितीनें 'काळ' पत्र मुळामुठा नदीचे कांठीं कोणकरांचे वाड्यांतील 'काळ कचेरीं'त दर शुक्रवारीं निघूं लागलें व लोकांना त्यांतील लिखाणाचा आस्वाद घेतां येऊं लागला. 'काळा'ची लोकप्रियता तर झपाट्यानें वाढूं लागली. सरकारला वाटूं लागलें, कीं एक वेळ टिळक पुरवले पण परांजपे नकोत. कारण कुठली तरी एखादी क्षुल्लक गोष्ट घ्यावयाची व त्याचें रूपक करून त्या वेळच्या राज्यपद्धतीला अप्रत्यक्षपणें पण इतक्या सफाईनें ते दाखवून देत कीं, सरकारच्या सर्व कायदेपंडितांना कायद्याचें उल्लंघन पंत करीत आहेत ही गोष्ट पटत असून सुद्धां प्रत्यक्ष पुरावा देतां येऊं नये!

त्यांचें लिखाण फक्त सरकारलाच बाधक होऊं लागलें असें नाहीं तर कांहीं देशी साहेबांनाहि तें बोचक होऊं लागलें; म्हणून कांहीं देशी पत्रकारांनीं व मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशनमधील मेथा-प्रमुख गृहस्थांनीं 'काळा'विरुद्ध बरेंच काहूर उठविलें. पुण्याच्या लोकांनीं—विशेषतः 'केसरी'नें —'काळ' पत्राचा निषेध करावा असा त्यांनीं आग्रह चालविला. टिळक तुरुंगांत असल्यामुळें केसरी-मराठा पत्रें चालविण्याचें काम दे. भ. तात्यासाहेब केळकर यांच्या-कडे होतें. साहजिकच वरील स्वरूपाचा लकडा त्यांच्यामागें लाव-ण्यांत आला. फिरोजशहा मेथा यांनीं एक वेळ ॲ. सेटलूर यांच्या-मार्फत श्री. केळकरांना संभाषणाला बोलावून रागानें असें सांगि-तलें, कीं 'तुम्ही केसरी व मराठा या पत्रांतून जर 'काळ' पत्राचा निषेध न कराल तर तुमचें आमचें बनणार नाहीं. तुमच्यावरच काय पण सर्व पुण्यावर मुंबईची अवकृपा होईल.' यावर श्री. केळकरांनीं सांगितलें कीं, 'मतांच्या कामांत ज्याचा तो मुखत्यार व जबाबदार असतो.' श्री. केळकरांनीं अशा रितीनें तोंडाला पानें पुसल्यामुळें वरील मंडळी त्यांचेवर नाराज झाली; पण पुढें जेव्हां टिळक सुटून आले तेव्हां त्यांच्याहि मागें हीच भुणभुण लाविली. तिकडे बंगालमधील कॉंग्रेस कमिट्यांनीं 'काळ' पत्रावर बहिष्कार टाकला पाहिजे असें ठरवूनहि टाकलें होतें ! पण टिळकांनीं या निषेधाच्या किंवा बहिष्काराच्या कल्पनेस मुळींच थारा दिला नाहीं. चॅंपिअन, रास्तगोफतर वगैरे पत्रांनीं तर 'काळा'वर ताबडतोब खटला करावा असें ध्वनित केलें. पण सर-कारला आपली गैरव्यवस्था व त्याबद्दल मिळणारें प्रायश्चित्त यांची सुसंगति पटल्यामुळें असो किंवा 'काळ आला होता पण वेळ आली नव्हती' म्हणून असो, मेथाप्रभृतींच्या दुर्दैवानें व अण्णा-

रावांच्या, किंबहुना महाराष्ट्राच्या, सुदैवानें सरकारला 'काळ' पत्रावर खटला भरण्याची किंवा त्याला बंदी करण्याची दुर्बुद्धि झाली नाहीं; व अशा रितीनें 'काळ' पहिल्यांदां काळाच्या जबड्यांतून वाचला गेला.

त्याचप्रमाणें १९०४सालींहि मुंबईच्या 'टाइम्स' पत्रानें 'काळ'-कर्त्यांच्या माथीं भयंकर हेतूंचा आरोप करण्यासाठीं एका लेखाचें तुटक तुटक भाषान्तर करून त्यावर आपल्या मतांची मल्लीनाथी केली. ताबडतोब अण्णारावांनीं त्यासंबंधीं आपला खुलासा सादर केला; परंतु दुसऱ्या अनेक देशी वृत्तपत्रांनीं काहूर माजविल्यामुळें अण्णारावांना आपल्यातर्फेंचा विस्तीर्ण लेख लिहावा लागला. अण्णासाहेबांनीं या दुसऱ्या वृत्तपत्रांच्या कामगिरीचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे '—कित्येक मंडळींनीं आम्हांस शिव्या देऊन, काल्पनिक ठरवून अगर वेडेपणांत ढकलून आमचें संरक्षण करण्याचा आव आणला आहे. परंतु त्यांना आमची एवढीच विनंति आहे, कीं आपल्या शिव्यांनीं आमचें संरक्षण करण्याची अजब युक्ति काढून आपण जी तसदी घेतली आहे ती आपण विनाकारण घेतली ! कारण असलें संरक्षण 'काळा'ला नको आहे. कारण हा Killing with kindness चाच एक प्रकार आहे !' याच प्रसंगाला उद्देशून ते दुसऱ्या ठिकाणीं म्हणतात, 'प्रस्तुत प्रसंगीं 'टाइम्स'नें लिहिल्यानंतर आमच्या कित्येक व्यवसायबंधूंनीं मात्र 'टाइम्स'च्या इच्छेप्रमाणें अगदीं बिनमोल कामगिरी बजाविली आहे. सरकारच्या कोर्टांत फिर्याद व्हावयाची किंवा न व्हावयाची हें अजुनी बाहेर यावयाचें आहे. परंतु टाइम्सनें छू: म्हटल्याबरोबर आमच्या बहुतेक समंजस व्यवसायबंधूंनीं आपलें अनधिकारी कोर्ट भरवून आपला फैसला देऊन टाकला

आहे; व त्यांच्यापाशीं जर एखादा तुरुंग असता तर त्यांनीं त्यांत आम्हांला कोंडूनहि टाकलें असतें !' असो.

काळाच्या लेखांत अनेक स्थळीं 'शिक्षणाचें पर्यवसान स्वातंत्र्य-प्राप्तीच्या अभिलाषांत व्हावयास पाहिजे' या तऱ्हेचीं वाक्यें सांपडतात. यावरून त्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोण कोणत्या प्रकारचा होता हें दिसून येतें. त्याचप्रमाणें 'लोकांत दृढमूल व रूढ झालेल्या कित्येक राजकीय कल्पनांच्या उच्छेदासाठींच काळाचा जन्म आहे' असेंहि एकदोन ठिकाणीं त्यांनीं स्पष्टपणें म्हटलें आहे; व 'काळ' ज्यासाठीं जन्माला आला त्यासाठीं त्यानें कितपत प्रयत्न केला हें पुढें दिलेल्या कांहीं उताऱ्यां-वरून पुसट रितीनें तरी खास कळून येईल. (जप्त न झालेल्या लेखांतील हे उतारे आहेत, यावरून जप्त झालेले लेख किती जहाल असतील याचीहि कल्पना वाचकांना पुढील उताऱ्यांवरून येईल.)

इंग्रजी राज्यपद्धतीचा हा एक विशेष आहे, कीं अगदीं साध्या गोष्टीपासूनहि हिंदी लोकांना राजनिष्ठ राहण्याची हुकूमवजा सूचना करावयाची; व असें करीत असतां आस्ते आस्ते हिंदी लोकांच्या नाड्या आवळावयाच्या. केवळ आपल्या राज्यकर्त्यांनीं ट्रान्सव्हालच्या युद्धांत प्रिटोरिया घशाखालीं घालून तेथील जनतेला आम्हां हिंदवासियांप्रमाणेंच गुलाम बनविलें, पारतंत्र्याखालीं पिचत पाडलें, म्हणून आनंदप्रदर्शनार्थ हिंदुस्तानांतील मुख्य मुख्य शहरीं उत्सव करण्यांत आले ! तसाच एक उत्सव पुण्यालाहि करणें भाग पडलें. त्या वेळीं गव्हर्नरसाहेबांच्या स्वागतासाठीं शाळेंतील अगदीं लहान लहान मुलें रांगेनें उभीं केलीं होतीं. त्यासंबंधानें 'काळां'त पुढील मजकूर आला होता. " आईबाप आपलीं मुलें शाळेंत पाठवितात तीं शिकण्यासाठीं पाठवितात. साहेबांच्या दुतर्फा उभीं

राहण्यासाठीं पाठवीत नाहींत. वयांत आलेल्या खुशामती लोकांनीं आपल्या साहेबांच्या पुढें पाहिजे तसा पिंगा घालावा, त्याला ते मुखत्यार आहेत; पण आपल्याबरोबर दुसऱ्यांचीं अल्पवयी मुलेंहि साहेबांच्यापुढें नाचविण्याला त्यांना कोणताहि अधिकार नाहीं. अशा प्रसंगीं लहान मुलांनीं तेथें येण्यासाठीं त्यांना खाऊची लालूच दाखविण्यांत येत असे.—पण लहान मुलांना जें समजत नाहीं, तें त्यांच्या आईबापांना समजलें पाहिजे. प्रत्येक आईबापाला या बाबतींत असा अभिमान पाहिजे, कीं माझ्या मुलाला दोनचार पेढे खावयास मिळाले नाहींत तरी हरकत नाहीं, पण एखाद्या साहेबाची जेथें वृथा स्तुति चालली आहे, तेथें माझ्या मुलानें जावें आणि तेवढे तेथले पेढे खावे असें होतां कामा नये. या खाऊच्या पुड्यांनीं पुष्कळ अनर्थ झालेला आहे; आणि ते बंद करणें हें मुलांच्या आईबापांच्या हातांत आहे. साहेबांच्या पानसुपाऱ्या आणि मेजवान्या यांमध्यें पुष्कळ वादग्रस्त अशा राजकीय आणि सामाजिक प्रश्नांचा अंतर्भाव झालेला असतो. तेव्हां असल्या संभारंभांत लहान लहान कोंवळ्या मुलांना काय म्हणून ओढावें!—शाळेंतील अभ्यास सोडून साहेबांच्या खुशामती करण्याचें लहान मुलांना कांहीं एक कारण नाहीं; व त्यांच्या आईबापांनीं त्यांना तसें कधींहि करूं देऊं नये. हें राष्ट्रनीतीच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. हल्लीं आपलें राष्ट्र म्हणजे तोंडपुजांचें राष्ट्र झालें आहे; व तोंडपूजा ही आपली राष्ट्रीय नीति झाली आहे. ही शोचनीय स्थिति ज्यांना लयाला न्यावी असें वाटत असेल त्या आईबापांनीं तरी असलें बाळकडू आपल्या मुलांना पाजूं नये!"

त्याचप्रमाणें राणीसाहेबांच्या निधनानंतर हिंदुस्थानांत त्यांचें

स्मारक केलें जावें असा बूट निघाला, त्यावर शिवरामपंत काळांत लिहितात—

" राणीसाहेब ! या कोठल्या राणीसाहेब ? तर इंग्लंडच्या ! त्यांच्यापासून अधिक सुख झालें असेल तर तें हिंदुस्थानांतील लोकांना का इंग्लंडमधील लोकांना ? तर अर्थात् इंग्लंडमधील लोकांना ! तर मग त्याबद्दल उतराई होण्याची घाई हिंदुस्थानांत व्हावी कीं, इंग्लंडांत ? पण वस्तुस्थिति कशी आहे ? इंग्लंडांत राणीच्या स्मारकाबद्दल लोकांनीं काय केलें आहे ? इंग्लंडांत कोण लगबगीनें वर्गण्या गोळा करूं लागले आहेत ? कोणी नाहीं. तर मग हिंदुस्थानांतच इतकी घाई कां ? यांत कांहीं उद्देश नाहीं काय ? व तो कोणालाच दिसत नाहीं काय ? आम्हांला राजनिष्ठा दाखवावयाची आहे; पण त्या बाबतींत आम्ही इंग्लंडचा उपमर्द कां करावा ? इंग्लंड ही आपली वडील बहीण आहे. तिनें आपल्या आईचा सत्कारविधि केल्यावर आपली हिंद ही धाकटी बहीण आहेच तयार—पूर्वींचे बादशहा आपल्या स्मारकांचें ओझें आपल्या करांच्या ओझ्याप्रमाणेंच आपल्या रयतेवर लादीत नसत. तर उलट प्रत्येक प्रसंगविशेषीं आपल्या प्रजेला कांहीं तरी देणग्याच देत असत. हल्लीं असल्या देणग्या बादशहांकडून रयतेला मिळण्याच्या नांवानें अंक्षवच, उलट रयतेपाशींच जें असेल नसेल तें रयतेला कोणत्या ना कोणत्या स्वरूपानें या बादशहांच्या भरीला घालावें लागत आहे. अलीकडचा बादशहा शब्दाचा अर्थच असा झाला आहे, कीं ज्यांच्यापाशीं कर उकळण्याला मुकी प्रजा पुष्कळ आहे, ज्याचे उत्सव, पुतळे आणि स्मारकें उपासमारींतून जगलेल्या रयतेनें केलीं पाहिजेत, आणि ज्याच्यापासून अगदीं सर्टिफिकेटा-

पेक्षां जास्त बक्षिसाची अपेक्षा धरण्यांत अर्थ नाहीं तो बादशहा म्हणून म्हणावा."

केवळ कागदाचें चिठोरें देऊन सरकार हिंदी जनतेला कसें झुलवीत ठेवतें याचें चित्र खालील उताऱ्यावरून दिसून येईल.

"सर्टिफिकेट ही वस्तु इंग्रजांबरोबर हिंदुस्तानांत आली व इंग्रजी कारकीर्दीमध्यें सेव्यसेवकभावाचा जो अत्यंत अभ्युदय झाला त्याच्याबरोबरच सर्टिफिकेटाचा चोहोंकडे झपाट्यानें प्रसार होऊं लागला...........या आमिषाची आजकाल इतकी गोडी लागून राहिली आहे, कीं चाकरीचा फास गळ्याला टोंचूं लागला तरी सर्टिफिकेटाच्या आमिषाची आशा नोकरलोकांच्या मनांतून कधींहि नाहींशी होत नाहीं. एक वेळ पेन्शन मिळालें नाहीं तरी हरकत नाहीं, पण साहेबाची चांगली नोकरी केल्याचें सर्टिफिकेट मिळालें पाहिजे अशी पुष्काळांची महत्त्वाकांक्षा असते. साहेबाचें सर्टिफिकेट मिळालें नाहीं तर इतकीं वर्षें चाकरी करून अखेरीस आपण आपला जन्म फुकट घालविला म्हणून कित्येक खरोखर रडत बसतात. एकाहि साहेबाचें सर्टिफिकेट आपल्यापाशीं नाहीं; तेव्हां आपल्याला या जगांत कोण थारा देणार अशा विचारांनीं कित्येक अगदीं उद्विग्न आणि उदास होऊन जातात .... हें सर्टिफिकेट मिळविण्याविषयीं जितकी आशा असते; तितक्याच आस्थेनें तें जपून ठेवण्यांत येत असतें. कोणी उत्तम लेखकांकडून त्याच्या प्रती करून ठेवतात. तर कोणी त्याच्या छापील प्रती काढतात. कोणी तें सुंदर रितीनें लिहून त्याच्याभोंवतीं सुंदर वेलवुट्टी काढतात. कोणी तें नळकंड्यांत ठेवतात. आणि कोणी तें सोनेरी चौकटीच्या तसबिरींत बसवून सहज सर्वांच्या नजरेस पडेल अशा ठिकाणीं ठेवतात. एकानें

केलें म्हणजे दुसरा करतो आणि दुसऱ्याचें पाहून तिसरा करतो. अशा रितीनें लोक गतानुगतिक झाल्यामुळें अनेक मूर्खपणाच्या कल्पना लोकांच्या हाडामांसांत खिळून जातात, व साहेबानें सही केलेल्या चिठोऱ्यांचे जे देव्हारे माजले आहेत ते अशानेंच. दुसऱ्याच्या सर्टिफिकेटावर चालणारा मनुष्य काठीच्या आधारावर चालणाऱ्या मनुष्याप्रमाणेंच पंगू समजला पाहिजे. त्याला स्वतःच्या जोरावर चालण्याची धमक मुळींच राहात नाहीं. मनुष्यानें हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, दुसऱ्याचें सर्टिफिकेट आपणाला कितिसें उपयोगी पडणार आहे ? आपण आपल्या अंगच्या गुणांवरच भिस्त ठेवली पाहिजे. परमेश्वरानें जेव्हां आपणास जन्माला घातलें तेव्हांच त्यानें आपणाला सर्टिफिकेट देऊन ठेवलें आहे. परमेश्वरानें तें आपल्या चेहऱ्यावर लिहून ठेवलेलें आहे. आणि आपल्या लहानशा बुबुळावर अतिशय विस्तीर्ण अक्षरांनीं परमेश्वरानें आपलें सर्व गुण व अवगुण लिहून ठेवले आहेत....आपलें सर्टिफिकेट आपल्या मनगटांत आहे. आणि आपल्या चेहऱ्यावर आहे."

समाजांत रूढ झालेल्या, अधोगतीला नेणाऱ्या, स्वातंत्र्याचें ध्येय दृष्टिआड करणाऱ्या, अगदीं साध्या पण परिणामीं अत्यंत घोर अशा वाईट कल्पना मुळापासून काढून टाकण्याकडे अण्णासाहेबांचा कटाक्ष असे. 'चित्रें' या लेखांत अण्णासाहेब म्हणतात—

"पुतळे किंवा चित्रें हीं केवळ डोळ्यांना सुख देण्यासाठीं नाहींत जर तीं मनाला कांहीं तरी उपदेश देण्यासाठींच आहेत हें तत्त्व कोणीहि विसरतां कामा नये. व या दृष्टीनें पाहिलें असतां कोणत्या चित्रांना कोणतें स्थळ योग्य आहे या विचाराला बरेंच प्राधान्य देणें आवश्यक आहे. अलीकडे एकोणिसाव्या शतकांतील

अनेक अमर्याद शोधांमुळें चित्रकला तर फारच स्वस्त झाली आहे. त्यामुळें साहेबलोकांचीं चित्रें पैशाला पन्नास मिळतात. कित्येक वेळां असें दृष्टोत्पत्तीस येतें कीं, जुनीं इंग्रजी सचित्र वर्तमानपत्रें विकत घेऊन कित्येक अडाणी लोक त्यांतील साहेबांचीं, त्यांच्या घोड्यांचीं, त्यांच्या गाड्यांचीं, त्यांच्या खुर्च्यांचीं, त्यांच्या मडमांचीं किंवा त्यांच्या कुत्र्यांचीं चित्रें कातरून आपल्या घरांतील भिंतीला डकवून ठेवतात. कित्येक ठिकाणीं खुद्द देवघरांतलि भिंतीलाहि साहेबांचीं आणि त्यांच्या टोप्यांचीं चित्रें डकविलेलीं दृग्गोचर होतात. लहान मुलांना रॅली ब्रदर्स कंपनीचा, एकाद्या मडमेचें चित्र काढलेला कापडावरील छाप मिळाला म्हणजे तीं आपल्याला स्वर्गच मिळाला असें मानतात. पण हे सर्व वेडगळपणाचे प्रकार आहेत. विशिष्ट स्थळींच विशिष्ट चित्रें असण्यांत एक प्रकारचें स्वारस्य आहे. देवळांतून देवांचीं चित्रें असावींत, पुराणांतलि गोष्टींचीं चित्रें असावींत, साधुसंतांचीं चित्रें असावींत. सारांश, ज्यांच्या योगानें पाहणाराचें मन परमेश्वराकडे लागेल अशींच चित्रें तेथें असावींत. देवळांत साहेब कशाला पाहिजेत ? तेथें साहेबांचीं चित्रें काय करावयाचीं आहेत ? देवळांत अशा तसबिरी ठेवणें हें अरसिक-पणाचें व अश्रद्धेचें लक्षण आहे. राजाच्या दरबारांत राजांच्या पूर्वजांचीं चित्रें असावींत, त्यांच्या उत्तम प्रधानांचीं चित्रें असावींत पण तेथें एकाद्या सुंदर स्त्रीचें किंवा एकाद्या उंच साहेबाचें चित्र असण्याचें काय प्रयोजन आहे ? परंतु कित्येक रंगमहालांतून सुद्धां सवंग सवद्याचीं चित्रें दृष्टीस पडलीं तर त्याला काय म्हणावें. इतका स्थानास्थान विचार नसणें हें मनुष्यजातीला शोभत नाहीं. मन उदात्त करणें हा जर चित्रांचा एक उपयोग असेल तर

साहेब खुर्चीवर बसलेले व आपण त्यांच्या खुर्चीमागें उभे राहिलेले असल्या चित्रांनीं मन कसें उदात्त होणार ?"

वरील उताऱ्यावरून अण्णासाहेबांची दृष्टि किती विशाल होती हें सहज समजून येईल. अगदीं साध्या गोष्टींतूनहि सरकार, पारतंत्र्याच्या शिक्षामोर्तबाचा ठसा जास्त जास्तच उठावदार रितीनें कसा मारीत आहे हें त्यांना पक्कें समजलें होतें; व म्हणूनच ते लोकांना समजावून देत होते. सरकारचा प्रत्येक कावा ते काळजी-पूर्वक पाहत असत व त्यांतील मर्म जनतेला सांगून कधीं सावध-गिरीचा इशारा देत तर कधीं स्वातंत्र्याच्या ध्येयापासून कळत न कळत लांब जाणाऱ्या हिंदी जनतेला चुचकारत असत, तर कधीं कानपिचक्या देऊन जनतेला कार्यप्रवण करीत असत.

काळाची लोकप्रियता एकसारखी वाढत गेली याचीं मुख्य कारणें म्हणजे काळाची चटकदार भाषा, हृदयंगम लेखनशैली व स्वदेशाभिमानी विचार हीं होत. काळाची भाषा म्हणजे महाराष्ट्र वाङ्मयांतील एक अभूतपूर्व नमुना होऊन बसली आहे. शिवरामपंत हे वाङ्मयप्रांतांतले एक जादुगार होते! ज्यांचीं राजकीय, धार्मिक व सामाजिक मतें शिवरामपंतांहून अगदीं भिन्न होतीं ते लोकहि 'काळ' मोठ्या आवडीनें वाचीत असत व घटकाभर का होईना पण आपलीं मतें बाजूला ठेवीत! वक्रोक्ति हा 'काळ' पत्राचा एक विशेष होय, पण ही वक्रोक्ति म्हणजेच 'काळा'चें सौंदर्यसर्वस्व नव्हे, वक्रोक्ति हा एक 'पद्धतिविशेष' होता इतकेंच.

'काळा'चें मुख्य काम म्हणजे वाचकांना देशाभिमानी बनविणें अगर त्यांच्या सुप्त वा गूढस्थ देशाभिमानाला चेतवून, त्यांच्या-पुढें शुद्ध स्वातंत्र्याच्या कल्पना मांडणें हें होय. शिवरामपंतांनीं हें काम काळाच्या दहा वर्षांच्या ( १८९८–१९०८ ) कारकीर्दींत

इतक्या सुंदर रितीनें बजावलें आहे, कीं वर्तमानपत्राच्या इतिहासांत त्याला तुलना सांपडणें अशक्य! 'केसरी'तील लेख विचारप्रधान व तर्कशुद्ध असत तर काळांतील लेख भावनाप्रधान व काव्यरम्य असत. एक बुद्धीची पकड घेणारे तर दुसरे मनाची पकड घेणारे. 'केसरी' व्यवहाराच्या दृष्टीनें राजकारणाकडे पाहणारा तर 'काळ' व्यवहार बाजूला ठेवून ध्येयाच्या दृष्टीनें राजकारणाकडे पाहणारा. पण यावरून 'केसरी'ला किंवा टिळकांना शुद्ध स्वातंत्र्य नको होतें असें म्हणणें समंजसपणाचें होणार नाहीं. 'कारण व्यवहारांत उतरलेल्या माणसास आपल्या उच्च तंद्रींतून खालीं यावेंच लागतें' शिवरामपंतांनीं व्यवहाराचा बोजा शिरावर केव्हांच घेतला नाहीं. तो त्यांनीं आपल्या गुरूंच्या शिरावर दिला व आपण जणूं काय ध्येयवादासाठीं मोकळे राहिले. अशा रितीनें कर्मवादाची व ध्येयवादाची फारकत झाली.

शिवरामपंतांनीं ध्येयवादाचा किंवा ध्येयवादी क्रांतीचा अंगिकार केल्यानंतर त्याला साजेल अशींच उदाहरणें शोधून काढलीं. व अशा रितीनें धुंडाळून काढलेलीं उदाहरणें इकडील लोकांस ते 'काळ' पत्रांतून गोष्टिरूपानें सांगूं लागले. 'ऐतिहासिक गोष्टी' हें सदर त्यांनीं 'काळां'त याचसाठीं उघडलें होतें. आणि गोष्टिरूपानें ध्येयवादी क्रान्तीची शिकवण करणें पंतांना सोपें जाऊं लागलें, पण सरकारच्या डोळ्यांत या गोष्टीहि सलूं लागल्या व पंतांना एकदोनदां त्याबद्दल समजहि देण्यांत आली. याच वेळीं त्यांच्या लिखाणांतून सोशॅलिस्ट मतांचें कांहीं अंशीं प्रतिपादन होत असे. यामुळें श्रीमंत लोकांनींहि पंतांच्याविरुद्ध त्या वेळीं बराच गहजब केला. तेथून पुढें बोअर युद्ध व रूसो-जपानी युद्ध हें खाद्य वर्तमानपत्रांना सांपडलें. रूसो-जपानी युद्ध म्हणजे

आशियांतील एका लहान राष्ट्रावर रशियासारख्या प्रचंड राष्ट्रानें उगारलेलें शस्त्र! मग याचा उपयोग कसा करून घ्यावा व स्वदेशांत स्वातंत्र्याची ऊर्मि कशी बलिष्ठ करावी हें शिवरामपंतांना कोणी शिकवावयास हवें होतें असें थोडेंच आहे! बोअर युद्ध म्हणजे एका स्वातंत्र्यप्रिय राष्ट्रावर त्याला गुलाम करण्यासाठीं इंग्रजांनीं उचलेलें हत्यार! मग पंत ही सुवर्णसंधि वाया कशी जाऊं देतील?

'सह्याद्रीच्या मूक पाषाणांतून सुद्धां स्वातंत्र्याच्या गर्जना ज्याच्या कानांला ऐकूं येत, त्याला बोअर लोकांनीं प्रत्यक्ष ठोक-लेल्या आरोळ्यांतून काय काय ऐकूं आलें असेल हें कोणी सांगावें? प्रत्यक्ष डोळ्यांदेखत होत असलेला हा स्वातंत्र्यनाश पाहून पूर्वीं हाच नाश येथें कसकसा झाला असेल याविषयींच्या त्यांच्या कल्पना स्पष्ट झाल्या आणि मग परमाणूचा परमेश्वर करण्यासारखी ज्याची मूळची कल्पनाशक्ति त्याला इतकें साहित्य मिळाल्यावर त्याचा पसारा कसा करावा हें कळावयास कांहीं अवकाश लागणार होता काय? जपानच्या अभ्युदयाचा आणि त्यानें रशियाशीं चालविलेल्या प्राणांतिक संगराचा अत्यंत खोल परिणाम हिंदुस्थान-वर होत होता. हीं सर्व प्रकरणें परांजप्यांनीं इंधनासारखीं उप-योजिलीं व त्याच्या आंचेवर तरुण वाचकांचीं मनें नुसतीं उबविलीं नाहींत; तर चडफडावयास लाविलीं. 'तरवारीचा हक्क' व 'राज्यापहार आणि न्याय' अशांसारख्या लेखांत त्यांनीं दाख-विलेली प्रतिपादनाची नवी तऱ्हा वाचकांना उल्हसित करी. 'दिल्लीचें तख्त व भाऊसाहेबांचा घण', 'कानपूरची विहीर', 'ब्लॅक होल' अशांसारख्या लेखांनीं मेलेल्या लोकांचा इतिहास किती जिवंत आहे, याची खात्री नसानसांतून अंगांत भिने. 'पिका-

च्या पाहणी'नें स्वातंत्र्याचा अपहार आणि स्वातंत्र्यासाठीं कष्ट कसे होत असतात याची जाणीव तरवारीच्या धारेप्रमाणें, वाचकांच्या मनांत शिरत असे. ते लेख आतां विसरले गेले. त्यांचीं नांवें मात्र आठवतात आणि तेव्हां त्यांच्या वाचनानें मनावर झालेले संस्कार हेच मात्र शिल्लक आहेत. बाकी तें सर्व धीरोदात्त, प्रगल्भ आणि चैतन्यकारी वाङ्मय " अगात् स्मृतिपथम् " !

आतां 'सोमयज्ञाची हकीकत' वर्तमानपत्रांत कोठें तरी भेटेल काय ? 'वुल्फटोन' इतर कोठें भेटण्यासारखा आहे काय ? गिरणीच्या मजुरानें स्वतःच्या शेतावर पाहिलेला, तो आधीं वठलेला व पश्चात् प्रफुल्लित झालेला 'आम्रवृक्ष' कोणाच्या वाङ्मयांत डोलतांना दिसेल काय ? 'परमेश्वरी लीला अगाध आहे' हें उदात्त तत्त्व येवढ्या करुणवाणीनें सांगण्याचें सामर्थ्य कोणा भगवद्भक्ताला तरी आहे काय ? 'रुमाल्या भिल्लाच्या पोरांनीं केलेल्या विश्वासघातानें प्रत्यक्ष पवाडे करणाराला किंवा गाणाराला तरी इतकी हळहळ वाटलेली कोठें दिसेल काय ? 'सगळ्यावर उपाय आहे पण'— पण गुलामगिरीवर उपाय नाहीं म्हणून उत्पन्न झालेली नैराश्याची तळमळ कोणा स्वातंत्र्यभक्तानें कागदावर तशा प्रकारें वठविलेली पाहावयास सांपडेल काय ? गोरक्षक लोकांची छावणी कोठें आहे याची बातमी देणाऱ्या ब्राह्मणांची 'फितुरी' स्पष्टपणें सांगून त्यांची निर्भर्त्सना करण्याचा जात्यतीत देशाभिमान या जातिविचारानें बुजबुजलेल्या काळांत कोणी दखवील काय ? 'देहूहून परत येतांना' टाळ कुटण्याचें सोडून आसपासच्या रणमैदानाच्या भयाण शांततेंत दिवसेंदिवस अस्पष्ट होत असलेले शूर शिपायांच्या गर्जनांचे प्रतिध्वनी कधीं कोणास ऐकावेसे वाटतात काय ? तें सर्व वाङ्मय आतां नष्ट झालें आहे. ती वाङ्मयांत दाखल झालेली

देशाभिमानाची तळमळ, ती फितुरीची चीड, ती चिल्हर सुधारणांची तिरस्कृति, ती स्वातंत्र्याची उपासना, वैदिक संस्कृतीची अभिमानवृत्ति, आतां वाङ्मयांत तरी इतक्या गांभीर्यानें, लीलेनें व आवेशानें चित्रित झालेली दिसणार नाहीं. महाराष्ट्रांतील तरुण पिढीचें दुर्दैव, कीं असलें उदात्त वाङ्मय त्यांच्यापासून हिरावलें जावें. महाराष्ट्र भाषा या हिरावणीनें गरीब झाली आहे. खालसा झालेल्या राज्याच्या मालकिणीची भावी आशा ज्या तेजस्वी मुलावर अवलंबून, तेंच जसें शत्रूंनीं ओलीस म्हणून उचलून न्यावें तशी, हें वाङ्मय नाहींसें झाल्यामुळें अथवा केल्यामुळें मातृभाषेची स्थिति झाली आहे.'

'काळ'पत्रानें अशा रितीनें १९०८ पर्यंत जनतेची सेवा करून तिच्याकडून धन्यवाद घेतले, व सरकारदरबारीं त्याची सेवा रुजू होण्याची संधि 'काळां'तील एका लेखानें आणून दिली. १९०८ सालच्या उत्तरार्धांत त्यांच्यावर सरकारनें राजद्रोहाच्या गुन्ह्याबद्दल खटला भरला. फितुरी केल्याबद्दल हिंदी लोकांना मात्र बक्षिसें द्यावयाचीं पण एकाद्या इंग्लिश माणसानें जर फितुरी केली तर त्याला मात्र फांशीं द्यावयाचें! एकाच गुन्ह्याबद्दल एकाला द्यावयाची बक्षिसी तर दुसऱ्याला फांशी! ही काय न्यायाप्रियता कां न्यायप्रियतेचें सोंग! अशा आशयाचा अग्रलेख पंतांनीं लिहिला होता. पंतांवर खटला भरला गेला व त्या खटल्यांत त्यांनीं बचावाचें जें इंग्रजी भाषण केलें तें सुमारें चार तास चाललें होतें. या भाषणांत पंतांनीं यत्किंचितहि छाननी न करतां लिहिलेला लेख तर्कबुद्धीला धरून कसा लिहिला आहे हें इतक्या उत्कृष्ट रितीनें समजावून दिलें कीं, ज्यूरीनें देखील परांजपे यांनीं

हे लेख देशभक्तीनें प्रेरित होऊन लिहिले आहेत असा अभिप्राय दिला ! भाषण करतांना परांजपे म्हणाले कीं, “दडपशाहीनें कोणत्याहि मनोविकारांना दडपून टाकतां येत नाहीं व येणार नाहीं........वाटेल तर आपण मला दोषी ठरवून शिक्षा करा, मी ती भोगण्यास तयार आहें; पण देशभक्तीसारख्या उज्ज्वल कल्पनेला गुन्हेगारीचें काळें फासूं नका.” शेवटीं एकदां खटल्याचा निकाल लागला व जज्जसाहेबांनीं मोठ्या नाखुषीनें शिवरामपंतांना १९ महिन्यांची शिक्षा फर्माविली ! शिवरामपंतांच्या मागोमाग लोकमान्य टिळकांनाहि सहा वर्षांची शिक्षा झाली. टिळक व परांजपे तुरुंगांत गेल्यानें पुणें शहराला काय वाटलें असेल याची कल्पनाहि करणें अशक्य आहे ! परांजपे तुरुंगांत गेल्यावर श्री० खरे व सोमण यांनीं 'काळ'पत्र पूर्वीच्याच धडाडीनें चालवून त्याची लोकप्रियता कायम राखिली. पुढें १९१० सालीं प्रेस ॲक्टखालीं सरकारनें काळ पत्र बंद केलें व काळांतील निवडक निबंधांचीं पुस्तकेंहि जप्त केलीं.

ता० १४ जुलै १९०८ चा 'केसरी' म्हणतो, 'काळ' पत्रावरील ह्या खटल्यासंबंधानें विशेष गोष्ट अशी आहे कीं, हायकोर्टांत परांजपे यांनीं हा खटला चालविला व आरोपीतर्फेचें भाषण इंग्रजींतहि त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणेंच स्वदेशभक्तीच्या कळकळीनें, प्रामाणिकपणाच्या उत्साहानें व उदात्त कार्याच्या प्रेरणेच्या नेटानें सुमारें चार तास झालें. प्रो० परांजपे यांनीं कार्यनिष्ठेचा उच्च धडा महाराष्ट्र किंवा मुंबई इलाखा या प्रांतांनाच नव्हे तर सर्व हिंदुस्थानला घालून दिला; व इंग्लंडांतील स्वदेशभक्तांसारखें तेजस्वी, विचारी, करारी व विद्वान् देशभक्त हिंदुस्थानांतहि निपजूं शकतात हें त्यांचें भाषण ऐकणाऱ्यांच्या आणि वाचणाऱ्यांच्या

प्रत्ययास आणून दिलें. याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन केल्या-वांचून आमच्यानें राहवत नाहीं.

ता. १५ जून १९०८चा ‘देशसेवक’ म्हणतो, ‘....शिवाजी-महाराजांनीं दिलेलें सर्व स्वातंत्र्य खपून गेल्यामुळें, हतवीर्य व परवश बनलेल्या महाराष्ट्राचा स्वातंत्र्य-इतिहास, लिहिण्याचा ज्या वेळीं सुप्रसंग येईल त्या वेळीं, त्यांत लिहितांना ‘काळ’ पत्राच्या कामगिरीबद्दल कांहीं पानें मुद्दाम राखून ठेवावीं लागतील, यांत संशय नाहीं. महाराष्ट्र-वाचकवर्गांत स्वातंत्र्यसुखाची अनिवार लालसा उत्पन्न करण्याचें परमपवित्र श्रेय ‘काळ’ पत्राचें व केवळ काळ पत्राचेंच आहे.’

कै० अच्युतराव कोल्हटकर शिवरामपंतांविषयीं व ‘काळा’-विषयीं आपल्या लेखांत म्हणतात ‘........महाराष्ट्राच्या वाता-वरणांत उत्पन्न केलेला स्वातंत्र्याचा वारा—ह्यांत खरे शिवरामपंत आहेत! परकीय राजसत्तेसाठीं उत्पन्न झालेला तिटकारा—ह्यांत शिवरामपंत आहेत! मनाच्या चोंचीला स्वातंत्र्याच्या अमृत-बिंदूची लागलेली चटक—यांत खरे शिवरामपंत आहेत! नको ती परकीय सत्ता, अशी अंत:करणानें घेतलेली शपथ—यांत खरे शिवरामपंत आहेत!—ह्याकरतांच त्यांनीं प्रवचनें दिलीं. ह्याकरतांच वक्तृत्व चालविलें—ह्यासाठींच ‘काळ’ काढला—ह्यासाठींच तुरुंग-वास सोसला! ते स्वातंत्र्याचे खरे शाहीर होते! स्वातंत्र्याचे राजहंस, स्वातंत्र्याचे भारद्वाज होते! स्वातंत्र्य-कूजनाचे कोकिल होते! त्यांच्या त्या स्वातंत्र्याच्या ध्वनींनीं महाराष्ट्राचा काना-कोपरा भरून गेला आहे! मागें, पुढें, ह्या बाजूस, त्या बाजूस त्यांचीं स्वातंत्र्यगीतें गजबजून राहिलेलीं आहेत! शिवराम-

पंत—शिवरामपंत! ही स्वातंत्र्याच्या काव्याची मुरली कुणाचे हातीं दिलीत?'

'काळा'ची योग्यता इतकी मोठी आहे, कीं शब्दांनीं केलेलें वर्णन केव्हांहि अपुरेंच पडेल! 'काळा'नें मराठी भाषेची व महाराष्ट्र देशाची अमोलिक सेवा बजावली आहे. राष्ट्रांत नव चैतन्य उत्पन्न केलें आहे. काळाच्या काव्यरसानें आल्हाद दिला आहे; काळांतील कल्पनांनीं दुर्बलांना सबल व भेकडांना धीट बनविलें आहे. काळानें धर्माला जागृति, जनतेला प्रगति, देशाला उन्नति, कल्पनेला गांभीर्य आणि स्वातंत्र्याला जन्म दिला आहे. ही 'काळा'ची स्तुति नसून वस्तुस्थिति आहे, ही बढाई नसून सत्यता आहे, हा स्तुतिपाठ नसून वस्तुपाठ आहे, ही गर्वोक्ति नसून स्वभावोक्ति आहे—आणि ही आत्मश्लाघा नसून हें आत्मस्वरूप आहे!

# ३ वाङ्मयीन समालोचन

**कथात्मक वाङ्मय :**—कै. अण्णासाहेबांच्या जीवन-रहस्यावरून त्यांच्या मनोभूमिकेची ठेवण वाचकांच्या स्पष्ट लक्षांत आली असेलच. त्यांची विशिष्ट प्रकारची मनोभूमिका आपल्या मनःपटलावर एकदां पूर्णपणें बिंबल्यावर त्यांच्या वाङ्मयीन कार्याचें अंतर्बाह्य स्वरूप, स्थूलमानानें कशा प्रकारचें असलें पाहिजे याविषयीं कोणासहि कांहीं विधानें करतां येणें शक्य होणार आहे. 'ज्यांत शुद्ध स्वातंत्र्यवादाचें एकहि मूलतत्त्व नाहीं असा एकहि विचार मी माझ्या मनास कधींहि शिवूं देणार नाहीं' असे स्वातंत्र्यप्रणेता अब्राहाम लिंकन नेहमीं उद्गार काढीत असे. अण्णासाहेबांची एखाद्या संपादकानें मुलाखत घेऊन 'तुम्हांस आपल्या वाङ्मयासंबंधीं काय वाटतें ?' असा प्रश्न केला असता, तर या प्रश्नास अब्राहामचेच उद्गार त्यांच्याकडून उत्तरादाखल मिळाले असते. त्यांच्या मनोरचनेचें वैशिष्ट्यच हें होतें, कीं सौंदर्यासंबंधीं असो, इतिहासासंबंधीं असो, फार काय पण एखाद्या क्षुल्लक व्यावहारिक प्रश्नासंबंधीं असो, त्यांच्या मनांत कोणत्याहि विचारानें एकदां प्रवेश केला, कीं त्याला स्वातंत्र्यप्राप्तीच्या दुर्दमनीय अभिलाषेची कलाटणी मिळावयाची हें अगदीं ठरलेलें !

कै० अण्णासाहेबांचें विचारवैभवच असें देदीप्यमान होतें, कीं त्यापुढें कला, तंत्र, शैली वगैरेस स्वतंत्र तऱ्हेनें वावरण्यास वावच मिळूं नये. काळ पत्रावरील बंदीनंतर त्यांनीं जें अफाट लेखनकार्य केलें त्यांतील ध्येयवादाचें अंतर्बाह्य स्वरूप मात्र त्यांच्या मनोभूमिकेनें

कधींच स्पष्टपणें ठरवून ठेविलें असलें पाहिजे. स्वातंत्र्याकरितां तळमळणाऱ्या अण्णासाहेबांच्या वाङ्मयाच्या प्रचंड व्यापाचें बाह्य स्वरूप क्षणभर बाजूस ठेवून त्याच्या अंत:स्वरूपाविषयीं विचार केला असतां हेंच निदर्शनास येतें, कीं स्वदेशभक्तीचें तेज, स्वाभिमानाचा प्रखरपणा, आणि स्वतंत्र बुद्धीच्या सामर्थ्यानें वाचकांना चेतविणारी शक्ति त्यांच्या लेखनांतील प्रत्येक शब्दांतून सळसळत आहे. 'गोविंदाच्या गोष्टी'सारखी पाल्हाळानें सांगितलेली कथा काय, किंवा 'विषासाठीं चाललेला कंठशोष' असल्या लघुकथा काय, लेखकाची स्वातंत्र्यप्राप्तीकडे ओढ घेणारी दुर्दमनीय तळमळ वाचकांच्या हृदयाचा ठाव पूर्णपणें घेतल्याशिवाय राहातच नाहींत. अण्णासाहेबांची कोणतीहि लघुकथा वाचल्यावर, कलावन्ताच्या प्रतिभेचें अंत:स्वरूप एकदां स्पष्टपणें निश्चित ठरलेलें असलें, कीं तंत्राची विशेषशी पर्वा न करितांहि तो वाचकांना आपल्या 'कटांत' कसा घेतो याचें मोठें नवल वाटतें. केव्हां भीति, केव्हां धाक तर केव्हां आवेशयुक्त चिथावणी येण्यासारखे प्रसंग मोठ्या कुशलतेनें आपल्या कथानकांत गोवून वाचकांच्या मनावर इष्ट तो परिणाम करण्यांत अण्णासाहेबांनीं सारें कौशल्य खर्चीं घातलें म्हणूनच त्यांच्या वाङ्मयाला चिरंतनत्वाचें श्रेष्ठ स्थान लाभण्याची योग्यता प्राप्त झाली आहे. अण्णासाहेबांच्या स्वातंत्र्यवादाचें अंत:स्वरूप स्थूलपणें आपल्या लक्षांत आलें, कीं त्यांच्या वाङ्मयांतील आनंद ग्रहण करण्यास आपण समर्थ बनूं शकतों; पण त्याच स्वातंत्र्यवादाची जास्ती सखोल छाननी करण्याचा प्रयत्न करणें, म्हणजे त्यांतील उद्दिष्ट अशा स्वारस्याचें सौंदर्य नष्ट करण्यासारखें होय. म्हणून स्वातंत्र्यवादाची तात्त्विक छाननी करण्याचा खटाटोप न करतां, ध्येयवादी स्वातंत्र्यवादाला कवटाळूं पाहणारें

चैतन्य, तात्त्विक गांभीर्य, ऐतिहासिक देशाभिमानाची उत्कटता, गंभीर धर्मबुद्धि, प्रचंड व्यासंगांतून निर्माण झालेला विचारविलास, जळजळीत देशाभिमान, अशा प्रकारच्या मनोभूमिकेवर अधिष्ठित झालेल्या त्या स्वातंत्र्यवीराच्या वाङ्मयकार्याचें आतां किंचित् विस्तारानें निरीक्षण करूं.

'चित्रमय-जगत्', 'विविधवृत्त', 'रत्नाकर', 'लोकशिक्षण' इ. नियतकालिकांतून अण्णासाहेबांचे स्फुट लेख व गोष्टी प्रसिद्ध होत. ललित वाङ्मयाचे लेखक या दृष्टीनें अण्णासाहेबांची योग्यता ठरवितांना ही गोष्ट स्पष्टपणें लक्षांत घेणें अत्यंत आवश्यक आहे, कीं केवळ बहुजनसमाजाचे लोकप्रिय लेखक बनण्याकरितां ते कधींच लघुकथे-कडे वळले नाहींत. 'कलेकरितां कला' कीं 'जीवनाकरितां कला' असले मोहक, पण सर्वसामान्य व्यवहाराचे दृष्टीनें निरुपयोगी प्रश्न सोडविण्यांत त्यांचें मन कधींच आकर्षलें नसलें पाहिजे. परांजप्यां-च्यानंतर जी ललितवाङ्मयनिर्मिति झाली तिच्यांत कलेचें अवास्तव स्तोम माजविण्याचे प्रयत्न झाल्यामुळें असो अगर साम्य-वादाचा पुरस्कार करणारा वर्ग वाढूं लागण्यासारखी परिस्थिति दिवसेंदिवस निर्माण होत चाललेली आहे म्हणून असो, 'कलेकरितां कला' कीं 'जीवनाकरितां कला' हा प्रश्न धसास लावणें आजचे साहित्यिकांस जरूर वाटत आहे. शिवरामपंत आज हयात असते तर 'अचेतनाला चेतविणारें वाङ्मयच या सामाजिक संक्रमणाच्या कालांत निर्माण झालें पाहिजे' अशी या वादास निराळीच कलाटणी देऊन, जीवनांतील वास्तवतेचें मिश्रण करण्यां-तच आपल्या प्रतिभेचें क्षेत्र मर्यादित करणाऱ्या तरुण साहित्यि-कांना 'ध्येयवादित्वाचे विशाल क्षेत्रावर' विपुल वाङ्मयनिर्मिति करण्याचा सल्ला दिला नसता कशावरून ?

आपल्या सामाजिक राजकीय व क्वचित् प्रसंगीं धार्मिक मतांचा प्रसार करण्याचें ठरवूनच कीं काय, त्यांनीं 'अप्रिय पण हितकारक' अशा मतांच्या कडू कोयनेलच्या गोळ्या आकर्षक कथानकाच्या साखरेंत घोळून पारतंत्र्याच्या उदासीनतेचा हिंवताप जडलेल्या बहुजनसमाजाला देण्याचें कार्य त्यांनीं अव्याहत केलें. या कोयनेलच्या गोळ्यांनीं पारतंत्र्याच्या उदासीनतेचा हिंवताप कितपत नाहींसा झाला हा अर्थातच वाङ्मयकक्षेंतील प्रश्न नसल्यामुळें निराळा ठेवून वाङ्मयापुरताच जरी विचार करावयाचा झाला तरी सुद्धां मतप्रचारामुळें कलेला यत्किंचितहि गौणत्व न येतां उलट कांहीं वेळां तिला जास्ती वास्तव व यथार्थ स्वरूप कसें प्राप्त होतें हें परांजपे यांच्या कथा-वाङ्मयावरून दिसून येईल.

त्यांच्या 'आम्रवृक्ष' ह्या रमणीय व परिणामाचे दृष्टीनें पहिल्या प्रतीची ठरण्यास योग्य अशा लघुकथेंत एका गिरणीकामगाराच्या मनांत उद्भवलेले विचार मोठे मार्मिक आहेत. एका हिंवाळ्यांत तो आपल्या गांवीं गेला असतां आपल्या आवडत्या आम्रवृक्षाचीं पानें गळून गेलेलीं दृष्टीस पडून तो गहिंवरून म्हणतो. "हाय हाय! माझ्या देशाचे चांगले गुणाहि ह्या पानांप्रमाणेंच गळून गेले आहेत. पूर्वीं जे शहाणे, शूर आणि गुणी लोक होते ते या वृक्षावरील पक्ष्यांप्रमाणें उडून गेले आहेत..........." तथापि लेखकाची खरी तळमळ गिरणीकामगाराच्या वसंतऋतूचे वेळच्या उद्गारांतून प्रतीत होत आहे. "माझा देश हल्लीं जो चोहोंकडून करपला जात आहे त्याला तुझ्याप्रमाणें नवीन पालवी केव्हां फुटणार ?........" लेखकाला झोंबणारें हेंच पारतंत्र्याचें विषारी शल्य त्यांच्या 'प्रभाकरपंतांचे विचार' या लघुकथेवरून जास्ती स्पष्टपणें दिसून येतें. लहानपणीं मुलें किती आनंदानें बागडत असतात पण त्यांचा खेळ पाहून

'मोठेपणीं या मुलांवर जबर कर देण्याची पाळी येईल; यांचे अंगीं गुण असूनहि मोठी जागा मिळविण्याची त्यांची आशा निष्फळ होईल' इत्यादि प्रभाकरपंतांचे विचारांवरून लेखकाचें आत्मनिरीक्षण किती सखोल असावयास पाहिजे हेंच दिसत नाहीं काय ? पिंजऱ्यांतील पोपट पाहून, " बंदिवासांतील नाचणें सोडून जरा आत्मविवेक करशील तर तूंहि परमेश्वराच्या सृष्टींतील अगदींच टाकाऊ प्राणी नाहींस " असें बोलून परशुराम त्याला सोडून देतो. पारतंत्र्याच्या पिंजऱ्यांत बागडणाऱ्या जनतेचे, सहानुभूति व तिरस्कार या भावनांच्या समतोलानें रेखाटलेल्या रूपकांवरून किंवा '१६२७ पूर्वी पांच वर्षें' या कथेंतलि पैठण येथें गतप्राण झालेल्या एका दुर्दैवी मनुष्याच्या हृदयद्रावक वर्णनावरून लेखकाच्या स्वातंत्र्या-करितां तळमळणाऱ्या मनोवृत्तींत भावनोद्दीपकता व कलाकुसरता यांचा सुंदर मिलाफच दिसून येऊन कला निर्माण करण्यास विवक्षित प्रसंगाचीच अपेक्षा त्यांनीं कधींच बाळगली नाहीं याचा मोठा अचंबा वाटतो. लेखकाची विलक्षण कल्पना पाहावयाची असल्यास म० गांधी तुरुंगांत गेले असतां राजकीय वातावरण कसें भलती-कडेच प्रवृत्त केलें जात होतें, हें दर्शविण्यासाठीं लिहिलेली 'एका चिनीबाईची गोष्ट' एकवार अवश्य वाचण्यासारखी आहे. स्वातंत्र्य-प्राप्तीचे विचार व तत्त्वज्ञान यांत बाह्यांगीं एकरंगता असली तरी व्यक्तिनिष्ठतेनें तिच्यांत जो भिन्नपणाःप्राप्त होऊन पक्षोपपक्षांच्या ज्या निरनिराळ्या सांप्रदायिक कल्पना बनतात त्यांचें यथायोग चित्रण करण्यांत परांजपे किती वाकबगार आहेत, हें तौलनिकदृष्ट्या पाहतांना 'राष्ट्रीय कामगिरी', 'स्वातंत्र्याच्या अटी' व 'एक देशभक्त विद्यार्थी' यांतील राष्ट्रीय कल्पनांचा फरक लक्षांत घेणें आवश्यक होय. देशभक्त विद्यार्थ्यानें आपल्या बापाला पाठविलेल्या पत्रांत,

'सरकारी किंवा राष्ट्रीय संस्थांतून शिक्षण घेण्यांत फरक नाहीं; पण राष्ट्रीय विचारांच्या चर्चेनें विद्यार्थांच्या मनाला देशभक्तीचें चालन मिळालें पाहिजे' या तत्त्वाची छाननी केलेली आढळते; तर 'स्वातंत्र्याच्या अटी' या कथेंतील धूर्त यजमानानें भोळसट नीग्रोला दिलेल्या अटींत, नोकरशाहीच्या राजकारणाचा मुत्सद्दीपणा उघड होतो. राजकारणाची टवाळी करणाऱ्या तमासगीर वृत्तीच्या लोकांचें इतकें खोंचक शब्दचित्र 'राष्ट्रीय कामगिरी' शिवाय इतरत्र क्वचितच आढळेल. गृहकलहांचें बीज सुद्धां स्वातंत्र्यप्रीतींतच असावयाचें ! म्हणूनच रामभाऊला सोडून त्यांची पत्नी अज्ञातवासांत राहिली. देशद्रोही फंदफितुरी करून सरकारपाशीं लोकांच्या चुगल्या करणाऱ्याला, पति म्हणून मानणें त्यांच्या बायकांना केव्हांहि सहन होणार नाहीं ही अत्यंत व्यावहारिक कल्पना 'शंभर टक्के प्रेमकथा' लिहिणाऱ्या 'अभिजात' लेखकांना सुचावी कशी ? शिवरामपंतांची कोणतीहि गोष्ट वाचली तरी विषय अगदीं घरगुती स्वरूपाचा, कथानक अगदीं सुटसुटीत आणि वर्णनशैली अत्यंत आकर्षक असते........पण त्यांतून हृदयाला जाऊन भिडणारी आणि मनावर चिरकालीन परिणाम करणारी अशी जी जोरदार विचार-प्रणाली, तीच त्या थोर पुरुषाच्या वाङ्मयकार्याचें खरें महत्त्व वेळोवेळीं पटवून देते. अण्णासाहेबांच्या कथात्मक वाङ्मयाचे स्वरूप जेव्हां राष्ट्रीय स्वातंत्र्यवादाचें समर्थन करणारें आहे असें संबोधण्यांत येतें तेव्हां मुख्य गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही, कीं त्यांच्या स्वातंत्र्यवादाचें स्वरूप जें त्यांच्या लघुकथांतून, नाट्य-वाङ्मयांतून अगर कादंबऱ्यांतून दृग्गोचर होत असतें तें शुद्ध ध्येय-वादी असतें. पण कथानकासाठीं व्यवहारांत प्रत्यहीं घडणाऱ्या प्रसंगांचा आधार घेतांना वास्तवतेची यत्किंचितहि मर्यादा

ओलांडण्याचा प्रमाद त्यांच्याकडून नजरचुकीनेंहि घडला नसून, कथानकासाठीं निवडलेल्या प्रसंगांत मात्र स्वातंत्र्यासंबंधींच्या कल्पना ध्येयवादात्मकतेनें गोंवण्याकडे त्यांची मनःप्रवृत्ति आहे.

परकीय सत्ताधारी आपल्या दुबळ्या जनतेला जनावरांहून जास्त किंमत देत नाहींत. पण आमची चाकरीच्या विषासाठीं लागलेली अहमहमिका मात्र कमी होत नाहीं हें 'विषासाठीं चाललेल्या कंठशोषां'त उपरोधिक विनोदानें दर्शविणारें अण्णासाहेब 'एका खडी फोडणाऱ्या'च्या गोष्टीसारख्या करुणरसाचा कळस करणाऱ्या गोष्टीहि तितक्याच सरसपणें लिहूं शकतात. अण्णासाहेबांत अभिजात कलादृष्टीचा अभाव आहे अशी अवास्तव हाकाटी करणाऱ्या सोंवळ्या कलावंतांचीं तोंडें बंद करण्यास या दोन गोष्टीहि पुरेशा ठरण्यासारख्या आहेत. एका खडी फोडणाऱ्याच्या गोष्टींत मनुष्य परवशतेच्या पाशांत सांपडला म्हणजे तो किती नीच बनतो हें यथार्थपणें रंगविलें असून 'केवळ पैशासाठीं मुलाचें प्रेत आईच्या पायांखालीं तुडविलें जातें,' हें या लघुकथेंतील कारुण्यपूर्ण दृश्य वाचकांच्या हृदयांस भेदून गेल्यावांचून राहत नाहीं. एका काल्पनिक कारखान्याचें चित्र रंगवून, स्पष्टवक्तेपणा, स्वाभिमान, देशभक्ति, खरेपणा, निस्पृहीपणा इत्यादि गुणांची वाण असलेल्या व नोकरीकरितां 'हां जी' करणाऱ्यांना समाजांत 'सभ्य गृहस्थ' समजण्यांत येतें ही साधीच बाब 'एक कारखाना' या गोष्टींत त्यांनीं उपरोधिकपणें व विनोदप्रचुर रितीनें सांगण्यांत कलादृष्टि न कळत ठेविली आहे. 'बेकारी'च्या प्रश्नावर ललित वाङ्मयांतून समाजचित्रें रेखाटण्यासाठीं आतां कोठें आपल्या प्रथितयश साहित्यसेवकांच्या लेखण्या फुरफुरूं लागल्या आहेत. दहा-पंधरा वर्षांपूर्वीं हल्लींइतक्या भीषण स्वरूपांत बेकारीचें भूत आपल्या

देशांत पिंगा घालीत नव्हतें, तरी बेकारीचें प्रमाण त्या वेळींहि वाढत्या प्रमाणावर असल्यानें वर्तमानपत्रांतून बेकारीसंबंधीं कांहीं स्फुट लेख प्रसिद्ध होत. तथापि तरुण मनोवृत्तीचें द्योतक सूक्ष्मपणें अभ्यासून बी. ए. पदवीधराची व्यावहारिक जगांत खरी योग्यता काय, त्याची कर्तबगारी किती, हें रूपक व व्याजोक्तीचा अवलंब करून 'एका यात्रेकरूच्या प्रवासां'त गोष्टीरूपानें पटवून देणारे शिवरामपंत हे एकटेच मार्मिक लेखक होत. एका पहारेकऱ्याच्या गोष्टींत, एकीकडे नोकरी आणि दुसरीकडे स्वातंत्र्यप्रियता या परस्परविरोधी द्वंद्वांनीं पहारेकऱ्याच्या मनाची उडविलेली खळबळ किंवा एका 'गुणी माणसाची बदछान' या कथेंतील पोषाखावरून माणसाची किंमत ओळखणाऱ्या त्रिंबकरावाची झालेली फजिती लेखकाच्या मानवी मनोरचनेच्या सूक्ष्म अभ्यासाची साक्ष पटविण्यास पुरेशा आहेत.

एकंदरींत त्यांच्या लघुकथांच्या विषयांची वर्गवारीच ठरवावयाची असली, तर मोलमजुरी करून जगण्याकरितां धडपड करणाऱ्या गरीब जनतेविषयीं तळमळ, भेकड वृत्तीच्या पदवीधरांविषयीं तिरस्कार, 'हां जी', 'हां जी' करणाऱ्या व विशेषतः 'फितुरी'-सारखें निंद्य कर्म करणाऱ्या राष्ट्रद्रोही लोकांविषयीं जळजळीत संताप, अशा प्रकारें विषयांची निवड करावी लागेल. अण्णासाहेबांच्या कथात्मक वाङ्मयावरून ओझरती दृष्टिफेक केली असतां वेळोवेळीं हृदयांत उचंबळणाऱ्या विचारतरंगांचीं प्रतिबिंबें त्यांनीं आपल्या कथांतून चितारलीं असलीं पाहिजेत हें अगदीं उघड उघड दृग्गोचर झाल्यावांचून राहत नाहीं. इतिहासाचा त्यांचा प्रचंड व्यासंग त्यांच्या कथांतूनहि लपून राहत नाहीं. व्यंगोक्ति, व्याजोक्ति, काल्पित पात्राचें स्वगत भाषण, उपरोधोक्ति,

अशा प्रकारच्या लेखनशैलींत रूसो, व्हॉल्टेअर, स्विफ्ट इत्यादि पाश्चात्य उपरोधप्रचुर लेखकांचे ते अनुयायी असले तरी ते परकीय वाङ्मयाच्या केव्हांहि आहारीं पडले नाहींत हें लक्षांत घेणें विशेष महत्त्वाचें आहे. परकीय वाङ्मयाचें वाचन करणारे अनेक नामांकित मराठी ग्रंथकार अंधतेनें परकीय वाङ्मयाच्या आहारीं गेल्याचीं उदाहरणें आपल्या महाराष्ट्रांत आज कांहीं कमी नाहींत. ग्रीक किंवा रोमन पुराणांतील, स्वातंत्र्यप्रीतीच्या ध्येयास पोषक अशा कांहीं सुंदर कथा शिवरामपंतांनीं मराठींत रूपान्तरित केल्या नाहींत असें नाहीं; पण आपल्या हिंदु पुराणांतील अनेक कथा थापटून थोपटून देशस्थितीकडे वळविण्यांतच त्यांच्या स्वातंत्र्यप्रिय मनोरचनेचें वैशिष्ट्य आहे.

तत्कालीन लेखकांच्या ललित-वाङ्मयासंबंधीं विचार करावयाचा तर, सार्वजनिक दोषांवर टीकास्त्र न सोडतां हरिभाऊ आपट्यांनीं ते अत्यंत सौम्यपणानें दाखवून कांहीं प्रसंगीं निराकरणाचेहि मार्ग सुचविले आहेत. कै० सहकारी कृष्ण यांना, आपल्या कथा-द्वारा समाजाला 'संकृति-वर्धना'चीं शिकवण देऊन लोकजागृति करण्याचें कार्य साधावयाचें होतें, तर सुंदर श्लेष व चमत्कृतिजन्य कथानकरचना यांच्या साहाय्यानें कै० तात्यासाहेब कोल्हटकरांनीं विवाहसंस्थेवर झोड उठविण्यांतच लेखनाचें ध्येय ठेविलें. कै० कृ. के. गोखल्यांनीं मनोरंजन हाच प्रधान हेतु ठेवून व कोणत्याहि वादग्रस्त अशा सामाजिक अगर राजकीय प्रश्नांपासून अलिप्त राहून 'कलेकरितां कले'चें पुण्य संपादन करण्याकडे दृष्टि ठेविली. समाजचित्र प्रतिबिंबित करण्याची बरीचशी उणीव असूनहि कुतूहल निर्माण करणाऱ्या आकर्षक भाषाशैलीनें श्री० तात्यासाहेब केळकरांनीं अनेक लघुकथा यशस्वी लिहून दाखविल्या; पण समकालीन

लेखकांपेक्षां आपल्या ओजस्वी भाषाशैलीनें काव्यमय अशा वातावरणाचें चित्रण करतांना देखील मोठ्या कल्पकतेनें ध्येयात्मक स्वातंत्र्यवादाच्या दाट छटा त्यावर देऊन आपलें लेखनवैशिष्ट्य शिवरामपंतांनीं कायम राखिलें आहे.

त्यांच्या लघुकथेच्या तंत्रासंबंधीं जेव्हां प्रश्न उद्भवतो तेव्हां ही गोष्ट पुष्कळजण विसरतात, कीं लघुकथेच्या रचनावैशिष्ट्यामुळें व केव्हां केव्हां तिच्या अंत:स्वरूपांतील भिन्नतेमुळें उत्पन्न झालेला पोटविभागांचा पृथक्‌पणा हा अगदींच दहा-पांच वर्षांतला आहे. लघुकथेच्या मुळाशीं मानवी वंशाच्या उगमापासूनचा इतिहास असला आणि काल व परिस्थिति यांस अनुसरून ती निरनिराळ्या स्वरूपांत दिसली हेंहि खरें असलें, तरी अवघ्या वीस-बावीस वर्षांपूर्वीं कै० हरिभाऊ आपटे यांचे वेळींहि कथेच्या रचनेविषयीं आधुनिक कल्पना प्रचलित नव्हती. श्री० वि. सी. गुर्जरांच्या अनेक गोष्टी किंवा कै० हरिभाऊंच्या स्फुट गोष्टी, विस्तार व रचना या दोन्ही बाबतींत लघुकथा नसून 'लघु कादंबऱ्या'च नाहींत काय? लघुकथेच्या दीर्घ इतिहासाचीं स्थित्यंतरें म्हणून स्त्रियांच्या 'आटपाट नगर'च्या कहाण्या, पोवाडे, किंवा 'अरेबियन नाइट्स', 'पंचतंत्र', 'गुलबकावली'सारख्या अद्‌भुतरम्य गोष्टी हीं सगळीं कथेचींच भिन्न स्वरूपें म्हणून दर्शविण्यांत आलीं तरी आज आपण कथात्मक वाङ्मयाचें जें वर्गीकरण करीत आहोंत त्या दृष्टीनें गेल्या दहा-पांच वर्षांतच प्रयत्न सुरू झाले आहेत असें म्हणावें लागतें. कां कीं, शिवरामपंतांच्या लेखनकार्याचे ऐन मध्यावरहि वाङ्मयाचे विदग्ध आणि गंभीर असे दोनच स्थूल भाग मानण्यांत येऊन 'तंत्र' या 'मंत्रा'बरहुकूम या दोन प्रकारच्या वाङ्मयांत विशेषसे तीव्र भेदहि मानण्यांत येत नव्हते. ज्या वाङ्मयाचें आज

आपण 'लघुकथा', 'भावकथा', 'संपूर्ण गोष्ट', 'लोककथा', 'शब्दचित्र', 'कादंबरी', 'स्फुट गोष्ट' असे पोटविभाग पाडून वर्गीकरण करतों त्या सर्वांचें एकीकरण 'कथा' या शब्दप्रयोगांत समाविष्ट होई. आणि हें सर्व लक्षांत घेतलें असतां अण्णासाहेबांच्या कथा, भाषेच्या दृष्टीनें वाचनीय असल्या तरी कथेची शिथिल रचना व विवक्षित मांडणीचा अभाव यांमुळें त्या सामान्य दर्जाच्याच ठरतील असा जो एका टीकाकाराचा त्यांच्यावर आक्षेप आहे तो अस्थानीं आहे. सुप्रसिद्ध इंग्रजी ग्रंथकार आर्नोल्ड बॅनेट यानें 'The great writers of the world have either ignored technique or failed to understand it' ( जगांत जे विख्यात ग्रंथकार होऊन गेले त्यांनीं 'तंत्र' समजून घेण्याचें टाळलें आहे किंवा त्यांना 'तंत्र'च समजलें नसावें ) असें आपलें मोठें मार्मिक मत प्रतिपादन केलें आहे. त्यांत 'तंत्रा'चें स्तोम करणाऱ्या 'तांत्रिकां'ची चांगलीच नांगी मोडली आहे. कै० परांजप्यांच्या स्वैरसंचारी अष्टपैलू प्रतिभेनें 'तंत्रा'ची कधींच दिक्कत बाळगली नाहीं; तरी मौज ही, कीं आजतागायतच्या भाषेंत बोलावयाचें झालें तर अण्णासाहेबांचें स्वतःचें असें कथेचें 'तंत्र' निर्माण झालेलें आहेच. आतां 'तंत्रा'चें अस्तित्व एकदां ग्राह्य झाल्यावर त्या भाषासरणींतच लिहावयाचें तर त्यांच्या गोष्टींत विद्वत्तेचा ओजस्वी बोज व हृदयाला जाऊन भिडणाऱ्या भावनांचा कल्लोळ पदोपदीं आढळतो. कोणतेहि बारीक सारीक विषय, मनोरम निसर्गदृश्यें अथवा समाजचित्रें, यांना नेहमीं राजकीय स्वरूपाची कलाटणी देण्याकडे लेखकाचा तीव्र कटाक्ष असल्यामुळें क्वचित् एकसारखेपणाचा टाळतां न येण्यासारखा क्षुल्लक दोष निर्माण झाला आहे. विशिष्ट राजकीय तत्त्वें प्रतिपादन करण्याच्या

प्रधान हेतूमुळें त्यांच्या बऱ्याचशा कथांत कथासूत्रता किंवा मानवी स्वरूपाचें सर्वांगीण यथातथ्य असें चित्रण दिसून येत नाहीं. कै० अण्णासाहेबांच्या कथानकाची सारी भिस्त ओसाड रणमैदानें, उध्वस्त राजवाडे, पडीक किल्ले, जुनाट देवळें, डोंगराळ मुलूख व त्यांच्या दऱ्याखोऱ्यांतून असलेलीं खेडीं, नद्यांचे घाट, पवित्र क्षेत्रें इत्यादिकांवर अवलंबून असते.

त्यांच्या कथा-वाङ्मयावरूनच लेखकाच्या मनोवृत्तीचें अनुमान ठरवावयाचें असलें तर एकान्तवासी, मननशील, निसर्गरसिक व विचारप्रिय पुरुषांच्या कोटींतले ते भासतात. ध्येयवादाशीं समरस असें वातावरण निर्माण करीत असतांच कलेला आवश्यक अशी ( Unity of impression ) रसैक्य व सूचकता उत्पन्न करण्याची हातोटी, सामाजिक विषयांवर लिहिलेल्या त्यांच्या कांहीं गोष्टींत चांगलीच दिसून येते. आधुनिक लेखकांप्रमाणें कथा ( किंवा जास्ती कांटेकोरपणें 'लघुकथा' ) हा स्वतंत्र वाङ्मय-प्रकार करण्याकडे त्यांचें यत्किंचितहि लक्ष असणें शक्य नव्हतें. व्यावहारिक नीतिशास्त्र व मनरंजन हींच ध्येयें प्रामुख्यानें लेखकाच्या नजरेसमोर असल्यानें कथानकाच्या कमानदारीवरच गोष्टींचा सरसनीरसपणा अवलंबून असे. आणि त्यामुळेंच आपल्या कथानकांस केव्हां 'स्वप्न', तर केव्हां 'पत्र', केव्हां 'कोणाकडून वदविलेली गोष्ट' अशा प्रकारें लेखनशैलीनें कथानकाची कमानदारी अण्णासाहेबांना आकर्षक करावी लागत असे हें उघड आहे.

शक्तिर्निपुणता लोकशास्त्र काव्याद्यवेक्षणाम् ।
काव्यज्ञ शिक्षयाभ्यास इति हेतुस्तदुद्भवे ॥ (मम्मट, काव्यप्रकाश) म्हणजे उत्तम काव्य निर्माण होण्यास नैसर्गिक प्रतिभा, निपुणता, सृष्टिनिरीक्षण, मार्मिक वाचन, शिष्यत्वानें राहून केलेला अभ्यास

इत्यादि गुण लेखकाचे अंगीं असावे लागतात. वरील सर्व प्रकारचे सद्गुण अण्णासाहेबांनीं आत्मसात् केल्यामुळेंच स्वातंत्र्याची 'अमरज्योत' त्यांच्या पारतंत्र्यांत जखडलेल्या देशबांधवांच्या हृदयांत चिरकालीन तेवत ठेवणारें प्रचंड कथावाङ्मय त्यांना निर्माण करतां आलें.

शिवरामपंतांच्या वेळीं असहकारितेच्या चळवळीची रणधुमाळी ऐन रंगांत आली होती. 'स्वराज्य', 'स्वातंत्र्य' अशा अर्थाचे नुसते शब्दहि राजरोसपणें उच्चारण्याची जेव्हां चोरी होती अशा ऐन आणीबाणीचे काळांत स्वातंत्र्यासाठीं कसकसे आघात सोसावे लागतात याची जाणीव, तरवारीच्या धारेप्रमाणें वक्रोक्तिकुशल अशा लेखनशैलीनें व स्वातंत्र्यवादाच्या रसरशीत प्रतिपादनानें तरुण पिढीस करून देऊन व त्यांच्यांतील रक्त सळसळविणारा स्वदेशाभिमान जागृत करणारे अण्णासाहेब आज आपल्या दुर्दैवानें हयात नाहींत. महाराष्ट्राची झालेली ही हानि केव्हांहि भरून निघणें शक्य नाहीं. स्वातंत्र्याकरितां अहोरात्र तळमळणाऱ्या अण्णासाहेबांना निर्घृण कालानें आपल्या जबड्यांत ओढल्यानें त्या पवित्र नामोच्चाराबरोबर हजारों महाराष्ट्रीयांचीं अंतःकरणें दुःखानें भरून येतात. तथापि मृत्यु हा कधींहि कोणालाहि चुकला नाहीं अशा प्रकारें स्वतःचें सांत्वन करण्यापलीकडे त्यांच्या जीवनकार्याचें विशेष मर्म समजून घेण्याची आस्था ठेवणें हेंच तरुण पिढीचें आजचें एकमेव कर्तव्य ठरतें.

शिवरामपंतांच्या वेळची जाज्वल्य राजकीय परिस्थिति आतां बरीच निराळ्या स्वरूपाची झाली आहे. तथापि राजकीय आणि सामाजिक

स्थितींत महदंतर पडलें असलें तरी त्यांच्या वाङ्मयस्मारकाचें साहित्य दृष्ट्या महत्त्व मात्र केव्हांहि चिरकालीनच ठरणार !

शिवरामपंतांच्या वाङ्मयांत इतकें अलौलिक तेज आहे. भावनांची इतकी उत्कटता आणि भाषेची इतकी ओजस्विता आहे, कीं वाचकांची दृष्टि त्यांजकडे पाहतांना लोपून जाते. अशा प्रकारच्या श्रेष्ठ दर्जाच्या साहित्यश्रेष्ठाच्या वाङ्मयाचा सूक्ष्माभ्यास करतांना एक विशिष्ट दृष्टि ठेवून अभ्यासकांनीं त्यांच्या कलाकृतींचें समालोचन करणें अत्यंत आवश्यक होय.

आणि अशा प्रकारची दृष्टि ठेवतांना 'रहस्य' किंवा 'मर्म' म्हणून आम्हांस एवढेंच सांगावेंसें वाटतें, कीं या साहित्यरत्नाच्या प्रत्येक कलाकृतीचे मुळाशीं **ध्येयवाद व वस्तुस्थिति, सत्य व सौंदर्य, नियमबद्ध कला आणि स्वातंत्र्य** यांची कौशल्यपूर्ण सांगड घालण्याचा यशस्वी प्रयत्न आहे आणि हेंच त्यांच्या वाङ्मय-स्मारकाच्या चिरकालीनत्वाचें द्योतक होय !

## गोविंदाची गोष्ट व विंध्याचल

कादंबरीकार या दृष्टीनें जेव्हां आपण शिवरामपंतांच्या कामगिरीसंबंधीं विचार करूं लागतों तेव्हां संख्येच्या दृष्टीनें साहित्याच्या या शाखेंत त्यांनीं विपुल कामगिरी केली नाहीं हें चटकन नजरेंत भरतें. किंबहुना कै० हरिभाऊ आपट्यांच्या-सारख्या विपुल सामाजिक कादंबऱ्या किंवा कै० नाथमाधव यांच्या-प्रमाणें अनेक ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिण्यासारखी त्यांच्या मनाची जडण-घडणच नव्हती. ईश्वरी इच्छेनें त्यांची आयुर्मर्यादा वाढली असती व त्यांनीं ललितलेखन करावयाचें ठरविलें असतें तर कादंबऱ्यांपेक्षां नाटकाचे प्रांतांतच बहुतेक त्यांनीं विहार केला असता. त्यांच्या प्रतिभेची खरी स्वैर भरारी कादंबऱ्यांतून वर्णन-

शैलीचे रूपानें जास्त संचार करूं शकली असती, तथापि त्यांना स्वतःच्या कलाकृतींतून जें अंतिम ध्येय साधावयाचें होतें त्यास नाटक हाच प्रांत जास्ती पोषक असल्यामुळें, त्यांनीं 'विंध्याचल' व 'गोविंदाची गोष्ट' या दोनच कादंबऱ्या लिहिल्या-नंतर आपल्या कल्पनावैभवास नाट्यवाङ्मयांत विहार करूं दिला आहे. 'गोविंदाची गोष्ट' ही कथा, विस्तारानें लिहिलेली असल्यानें आकार व लांबीचे मानानें हिची घडण कादंबरीलाच शोभण्या-सारखी असली तरी कथेच्या तंत्राशीं तिचीं अंगेंउपांगें ताडून पाहतां सामान्य भाषेंत तिला 'गोष्ट' हेंच अभिधान देणें जास्त समर्पक ठरतें.

या गोष्टीचा नायक गोविंदा हा एक निसर्गभोक्ता व स्वातंत्र्यप्रिय वृत्तीचा तरुण असतो. समुद्रावर एकदां सोसाट्याचें वादळ होऊन तो चांचे लोकांच्या हातीं पडतो. चांचे लोकांकडून त्याचे अतिशय हाल होत असतांच रोशन नांवाच्या एका तरुण मुलीचा त्यावर अकृत्रिम लोभ जडतो. शेवटीं चांचे लोकांच्या जहाजावरील अनेक संकटांस धैर्यानें तोंड देऊन 'स्वर्गादपि गरी-यसी' अशा जन्मभूमींत तो पदार्पण करतो. पण त्याचें दुर्दैव त्याचा इतका पिच्छा पुरवीत असतें, कीं जन्मभूमीवर पाय ठेवतांच आईबापांच्या व बालवयांत प्रेम केलेल्या नर्मदेच्या मृत्यूची अत्यंत शोकरसपूर्ण कहाणी त्याच्या कानांवर पडते.....स्वतःच्या आयुष्यांत जिकडे तिकडे त्याला निराशेचा अंधःकार दिसूं लागतो.

या कथानकांत एकसूत्रता राखण्याविषयीं लेखकानें कटाक्ष बाळगल्यानें कथेच्या मुळाशीं असलेला लेखकाचा मुख्य हेतु यशस्वी-पणें वाचकांच्या मनावर ठसविण्याचें कार्य साधलें आहे. कथा-नकाच्या प्रत्येक घटनेची छाननी करतांच, 'गुलामगिरीचे पाश

**मनुष्याचें जीवन कसें मातीमोल बनवितात'** हें सुंदर तत्त्व आपल्या मनावर खोल खोल रुजत जातें.

निर्मल, परोपकारी, धाडसी व मरणप्राय संकटांना तोंड देणारा, रोशनच्या प्रेमाला योग्य कलाटणी देणारा असा गोविंदासारखा स्वातंत्र्यप्रिय नायक निर्माण करणाऱ्या त्यांच्या कुशल लेखणीनेंच शूर, धाडसी पण पापपुण्याची कदर न बाळगणारा, करारी, कावेबाज, मुत्सद्दी आणि स्वहेतुपूर्ततेकरितां भयंकर कृत्यें करण्यांत कदर न बाळगणारा खलनायक कप्तान निर्माण करून आपल्या वैभवशाली प्रतिभेची साक्षच लेखकानें पटविली आहे. चाणाक्ष पण पातिव्रत्याच्या भंगानें पश्चात्ताप पावणारी अशी रोशनची भूमिका कथानकाचें रहस्य वाढविणारी असली तरी स्त्रीस्वभावांतील खोंचदार आंदोलनें तिच्या स्वभावचित्रणांत दिसून येत नाहींत. कथेच्या अंतर्यामीं असलेल्या हेतूचा वाचकांवर साकल्यानें परिणाम होण्यास कप्तानाच्या भूमिकेस विशेष महत्त्व आहे. इतर पात्रांचें स्वभाव-रेखाटन साधारण प्रतीचें असल्यामुळें त्याविषयीं विशेष विवेचन करणें आवश्यक नाहीं.

कथानक-रचना अत्यंत साधी असून सुद्धां, ठिकठिकाणीं प्रवेश (प्रकरण) संपवितांना कांहीं तरी विलक्षण घटना निर्माण करून विस्मय उत्पन्न करण्याची हातोटी आणि पुढील कथानकाविषयीं जिज्ञासा उत्पन्न करण्याची शैली अत्यंत आधुनिक तंत्राशीं बरोबरी करूं शकते. या दृष्टीनें प्रवेश २, ५, ६, ८ यांतील शेवटच्या घटना पाहिल्या असतां प्रवेशाचे अखेरीस उत्पन्न केलेली जिज्ञासा वाचकांच्या हृदयाचा ठाव घेण्यास समर्थ आहे हें दिसून येतें. आपल्या विषयवासनेंत आडकाठी आल्याचें खरें कारण शोधून काढण्याकरितां कप्तानानें रोशनशीं लढविलेली मुत्सद्देगिरी, त्याचें

रोशनशीं लाघवी व कपटी भाषण, 'मधु तिष्ठति जिह्वाग्रे हृदये तु हलाहलं' अशा दुष्ट स्वभावाची परीक्षा नसेल्यामुळें भाबड्या रोशननें दिलेला निर्वाळा व त्यामुळें गोविंदाला भोगावी लागलेली प्राणान्तिक शिक्षा ही करुणरसाची परमावधि करणारी घटनांची परंपरा या कथेंत महत्त्वाची ठरते.

अद्भुतरम्य कथांच्या युगाचा त्याकाळीं पूर्ण लोप न झाल्यानें वाचकांची अभिरुचि लक्षांत घेऊन लेखकाला स्वाभाविकतेला किंचित् फाटा देऊन, गोविंदाच्या आईच्या भुताची जोड कथानकाला देणें भाग पडलें असलें पाहिजे. भूतयोनीवरील लेखकाच्या विश्वासामुळें या भुताच्या चमत्कारांची जोड कथानकाला देण्याचा मोह पडला असेलसें वाटत नाहीं. तथापि कसेंहि असलें तरी या भुताच्या हालचालीनें कथानकांत काव्यमाधुर्य निर्माण झालें आहे हें नाकबूल करून चालावयाचें नाहीं.

कथानकाच्या सौंदर्याचें लक्षण जी सूचकता तिकडे फार कमी लक्ष पुरविलें गेलें असूनहि, गोविंदाची निसर्गाविषयीं आवड, त्याचें नर्मदेवरील प्रेम, वादळांत सांपडणें, चांचे लोकांच्या गुलामगिरींतील संकटांची चढती कमान, रोशनच्या लोभाचा किंचित् ओलावा, सुदैवाचा आशातंतु पण अखेर जन्मभूमीचें निराशाजनक दृश्य अशा रितीनें परंपरांचें वर्तुळ निर्माण करण्यांत अण्णासाहेब कारागीर आहेत.

एखादें 'गोड गुपित' गुलदस्तांत ठेवून वाचकांना शेवटपर्यंत झुलवायचें कसबहि त्यांना साधलें आहे. नर्मदेच्या प्रेमाविषयीं पहिल्या प्रवेशांत किंचित् ओळख देऊन शेवटपर्यंत तिच्याविषयीं कांहींच न सांगतां ते वाचकांना चटका लावून ठेवतात; आणि मग अगदीं शेवटच्या प्रवेशांत वाचकांच्या कल्पनाशक्तीवर फारसा

ताण बसूं नये अशा प्रकारें रसहानि होऊं न देतां, त्या गुप्त गोष्टीचें ते दुःखपर्यवसायी आविष्करण करतात.

प्रसंगाविरोध किंवा भावनाविरोध यापेक्षां पात्र (व्यक्ति)–विरोध ते जास्ती चांगल्या प्रकारें दाखवूं शकतात. याचें उदाहरण म्हणून कप्तान व गोविंदा यांच्यामधील व्यक्तिविरोध निरीक्षण करण्यासारखा आहे. सृष्टिसौंदर्याच्या नानाविध कलांचें यथातथ्य चित्ररेखाटन व त्यांतून स्वतःच्या भावनांचीं प्रतिबिंबें पाहण्यांत तत्कालीन लेखकांपेक्षां ते केव्हांहि सरस ठरतील. गोविंदाच्या जन्मभूमीचें निसर्गप्रधान वर्णन वाचतांना प्रत्यक्ष तेथें वावरल्याचा भास होतो; आणि लेखकाच्या बालपणीच्या महाड येथील 'गोड आठवणीं'चें तर हें प्रतिबिंब नसेल ना, अशी क्षणभर शंका आल्यावांचून राहत नाहीं. त्याचप्रमाणें समुद्रांतील वादळ ( प्रवेश ७ पृष्ठ ११५ ), जहाजाच्या निरनिराळ्या खात्यांचीं सत्य वर्णनें, गोविंदाच्या अद्‌भुत स्वप्नांचें वर्णन या सर्वांवरून त्यांच्या अफाट वर्णनशैलीनें मन थक्क होतें. 'परोपकाराच्या पौष्टिक पाकाच्या अहर्निश सेवनानें मन नेहमीं उदात्त होत असतें' अशा प्रकारचीं सामाजिक जीवनांतील तत्त्वें व प्रसंग कथानकाच्या ओघांत ठिकठिकाणीं सोडून दिलीं आहेत. जहाजाच्या निशाणाला आधार देणाऱ्या, तळघरांतील खांबाकडे पाहून गोविंदाला सुचलेलें 'तत्त्वज्ञान' गुलामगिरीच्या तीक्ष्ण बोचणीची जाणीव करून देण्यास पुरेसें आहे. 'मुद्रेवर किंचित् उदासीनता, गालांवर किंचित् हास्य आणि डोळ्यांत किंचित् अश्रु' असें तें तिचें ( नर्मदेचें ) सुखदुःखमिश्रित मुखकमल पाहून मला अत्यानंद झाला" ( पृष्ठ ९३ ) अशा प्रकारचे चित्ररेखाटनाचे फटकारे चमक उत्पन्न करतात. आपल्या मानसमंदिरांतील एक विशिष्ट दालन खुलें करून देतांना

राहून गेलेल्या कांहीं दोषांचें दिग्दर्शन करावयाचें तर पात्रांच्या तोंडीं संवाद योजतांना त्यांची योग्यता, मनावरचे संस्कार मनोविकार लक्षांत घेतलेले दिसत नाहींत असें म्हणणें भाग आहे. पण याच्या मुळाशीं संवादरूपानें स्वतःचें मनोगत दर्शवावयाचा 'स्वार्थ'च असला पाहिजे. प्रादेशिक किंवा जातिनिविष्ट बोली कथेंतील संवादांत वापरण्यासंबंधीं अजूनहि साहित्यिकांचें निश्चित मत नाहीं. शिवरामपंतांनीं कोंकणी किंवा खलाशी वर्गाच्या विशिष्ट बोलीचा बोलीच्या कथेस अजिबात संपर्क लागूं दिला नाहीं हा साहित्य दृष्ट्या दोष ठरविणें इष्ट होणार नाहीं. नीति दृष्ट्या जबाबदारी संभाळण्याकडे व विप्रलंभ शृंगाराची झळ कथानकाला लागूं न देऊन आण्णासाहेबांनीं राखलेली उदात्त नैतिक बैठक आजच्या 'पवित्र गुन्हा' करणाऱ्या प्रथितयश साहित्यिकांना आदर्श म्हणून ठेवण्याची सद्बुद्धि होईल तोच आपल्या राष्ट्राचा खरा भाग्योदय होय ! प्रणयाची पुसट पुसट छटा पहिल्या तिसऱ्या व चवथ्या प्रवेशांत चितारण्यांत आणि तिथेंहि स्वातंत्र्य वृत्तीचें बीज पेरण्यांतलें वैशिष्ट्य लेखकाच्या बाण्याला अनुसरूनच आहे. चमत्कृतिजन्य समरप्रसंगांच्या परंपरेचे सोपानावरून कळसास (climax) पोंहोचण्यास शिवरामपंतांना बराच अवधि लागतो, पण कथानकाची उतरण मात्र चटकन संपते. 'रक्ताचा डाग उडाला असला तर सुवासिक साबण लावून तो ताबडतोब धुवून टाकून ते आपले हात निर्मल व निष्कलंक करीत असत' अशा प्रकारचीं वाक्यें व कप्तानाच्या तोंडची भाषा त्यांच्या व्याजोक्ति-व्यंग्योक्ति-उपरोक्तीची आठवण देतात. पृष्ठ २०–२४ वरील ऐतिहासिक प्रसंगाची माहिती त्यांच्या इतिहासाच्या सूक्ष्म अभ्यासाची कल्पना देण्यास पुरेशी आहे. कथानक संथ आणि तत्त्वज्ञानपूर्ण, ठिकठिकाणीं

विखुरलेलीं निसर्गाची नितान्त मनोहर व आल्हाद दायक वर्णनें, आकर्षक भाषाशैली, यांमुळें वाचकांचे मनावर एक प्रकारचा चिरकालीन आघात होऊन कथानकांतील कांहीं प्रसंग त्याच्या चित्तवृत्तींत पुनः पुनः भ्रमूं लागतात. गोविंदाची शेवटची मनःस्थिति त्याच्याच तोंडून किती मोजक्या शब्दांत वर्णिली आहे. तो म्हणतो, "रोशन, गोविंदानें आपले आईबाप आपल्यासाठीं मेलेले आणि वेडे झालेले ऐकले आणि आपल्या बापाचें मृत्युपत्र आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष वाचलें. याची जी बायको झाली असती तिच्या पोटीं उत्पन्न झालेला मुलगाहि त्यानें पाहिला आणि तिनें अब्रू बचावण्यासाठीं अखेरीस जीव दिलेलाहि त्यानें सहन केला असा हा पाषाणहृदयी गोविंदा! याचें हृदय दुःखानें उकललें नाहीं तर त्यांत काय आश्चर्य!" अशा प्रकारें 'गोविंदाच्या गोष्टी'चा शेवट जरी कांहींसा उद्वेगजनक असला तरी कलेच्या दृष्टीनें याच कारणामुळें तो चटकदार व स्वाभाविक ठरून त्याला महत्त्व प्राप्त झालें आहे.

विंध्याचल—इ. स. १८०७–१८१२ पर्यंतच्या काळांत हिंदुस्थानांत (मध्यभागांत) ठग लोकांचा अत्यंत सुळसुळाट झाला होता. या कालस्थितीचें निदर्शन करण्याच्या प्रधान हेतूनेंच प्रस्तुत कादंबरीचा जन्म झाला आहे. यात्रेकरू किंवा प्रवासी लोकांना ठग लुटारूंपासून किती त्रास सोसावा लागत असे हें प्रस्तुतच्या कथानकांत पाहावयास मिळतें. गर्भवती अशी आपली पत्नी गंगाबाई हिला माहेरीं पोंहोचविण्यास भय्यासाहेब कोंकणांत चालले असतां वाटेंत करीमबक्षाच्या ठगांचे टोळीकडून त्यांच्यावर छापा घातला जातो. ठग लोकांनीं त्यांचा नाश करण्यासाठीं रचलेले अनेक व्यूह भय्यासाहेब हाणून पाडतात. शेवटीं विंध्यवासिनीच्या

जत्रेचे प्रसंगीं पतिपत्नींचें पुनर्मीलन होऊन गंगाबाईचें लहान मूलहि सुरक्षित परत मिळतें. अशा आनंदपर्यवसायी प्रसंगांत कादंबरीचा शेवट होतो. ह्या मुख्य कथानकाला आनुषंगिक अशीं किसन-प्रसाद व जमनाबाई, आणि गणपतिभय्या व सरस्वती-बाई यांचीं उपकथानकें ओघाओघानें मूळ धाग्याशीं गुंफण्यांत आलीं आहेत, अशा प्रकारें बारा-तेरा प्रमुख पात्रांच्या कथानकाचें रहस्यमय जाळें कादंबरीकारानें कुशलतेनें विणलें आहे. कादंबरी-करितां निवडलेल्या विशिष्ट कालांतलि सामाजिक परिस्थिति लक्षांत घेऊन वातावरणाचें यथातथ्य चित्र रेखाटण्याकरितां विंध्याचल पर्वताचा डोंगराळ भाग, गुहा, देवळें, जुने वाडे, काशी-प्रयागांतील गंगेचें रमणीय पात्र, यात्रा, अशा प्रकारच्या पार्श्व-भूमीची सजावट उभारली आहे. त्याचप्रमाणें पात्रांची निवडहि कथानकाला पोषक अशीच आहे. ‘लोकांचिया एक शिरीं सजावें ! वनींच कीं एक सुकोनि जावें’ या वृत्तीचा, राजकीय परिस्थिती-मुळें तळमळणारा, ऐन ज्वानींतील जवान, स्वरूपानें देखणा आणि कांतीनें तेजःपुंज, आणि शिपाग्रीबाणा व मुत्सद्दीपणा या गुणांनीं परिपूर्ण असा भय्यासाहेबांसारखा नायक आणि त्याला अनुरूप अशी पतिदक्ष, धर्मपरायण, कोमलवृत्तीची पण अनेक संकटांत पतीच्याकरितां जीव जगविणारी पत्नी गंगाबाई यांच्या स्वभावपरिपोषावर व त्यांच्या वियोगामुळें उद्भवणाऱ्या उभयतांच्या मानसिक आंदोलनावर कादंबरीची उभारणी आहे.

यात्रेकरूंवर छापा घालून त्यांना लुटणें, टेहळणी करून बातम्यां-चा सुगावा लावणें, पराक्रमी माणसाला आपल्या कंपूंत सामील करून घेऊन असमर्थ व दुबळ्या माणसांचे हाल करणें, अशा नीच कृत्यांतच मानवी जीवनाची इतिश्री समजणारा, कणखर

पण रानटी असा करीमबक्षासारखा खलपुरुष लेखकानें निर्माण केला आहे. तथापि कक्षानाप्रमाणें कुलीन स्त्रियांच्या शीलभ्रष्टतेकडे या खलनायकाची यत्किंचिताहि प्रवृत्ति नाहीं हें लक्षांत घेतलें पाहिजे. हातपाय तोडले तरी त्याची पराक्रमी वृत्ति सळसळते, मुलाच्या आजारांत पापपुण्याच्या कल्पना त्याला त्रास देतात, देवाला तो भितो, इतर दरवडेखोरांपेक्षां त्याच्यांत जास्ती चाणाक्षपणा आहे, माणसाची खरी किंमत तो ओळखूं शकतो, अशा गुणावगुणांचा खलनायक निर्माण करण्यांत वास्तवतेची मर्यादा त्यांनीं अत्यंत कांटेतोलपणानें संभाळली आहे. शांतपणें वाहणाऱ्या निर्झराप्रमाणें सुरुवातीपासून तों अखेरपर्यंत कथानक शांतपणें वाहत आहे आणि त्यांत फारशी गुंतागुंताहि नाहीं. तरी उपकथानकांच्या अनेक धाग्यांमुळें कथानकाची प्रगति ध्यानांत येण्यास स्मरणशक्तीस थोडा ताण द्यावा लागतो.

वेश्यांत स्वाभाविक दृग्गोचर होणाऱ्या कुभांडी वृत्तीचें द्योतक अशी कमलाबाई; निष्कपटी, विचारी आणि संसार-विरागी असा गणपतिभय्या; वयोवृद्ध, शांत आणि एकुलत्या एक मुलीवर जीव कीं प्राण करणारे रामचंद्रराव व तशाच प्रकारची त्यांची पत्नी सीताबाई; अशा प्रकारचीं विविध स्वभावाचीं पात्रें निर्माण करून त्यांचे समरप्रसंग खोंचदारपणानें रंगविले आहेत. करीमबक्षाच्या टोळीचा छापा आणि भय्यासाहेब व गंगाबाई यांची ताटातूट हा सुरवातीचा समरप्रसंग वाचकांचे मनांत भावनांची खळबळ उडवून पुढील कथानकाकडे त्यांचें लक्ष वेधण्यास पुरेसा आहे. तदनंतर भय्यासाहेबांचा अरण्यवास किंवा संन्यास-आश्रमांत त्यांचें वेषान्तर या घटनांपेक्षां पतीच्या छत्राचा आसरा नसलेल्या व गर्भार अशा स्थितींत गणपतिभय्याच्या दास्यत्वाचाहि आधार तुटल्या-

मुळें रानोमाळ भटकणाऱ्या, मूल विकलें गेल्यानें भ्रमिष्ट बन-लेल्या गंगाबाईसारख्या एका आर्य सतीचें या प्रतिभाशाली कादंबरी-कारानें हळुवार हातानें रेखाटलेलें चित्र पाहून कोणत्या सहृदय रसिकाला दयेचा पाझर फुटणार नाहीं ! कलात्मकदृष्ट्या गंगा-बाईच्या स्वभावपरिपोषाच्या सर्वच घटना अत्यंत उच्च प्रतीच्या वठल्या आहेत.

गुहेला आग लावून भय्यासाहेबांना जाळून टाकण्याचा ठगांचा कट उलथून पाडून भय्यासाहेबांनीं उलट दोन ठगांनाच अग्नींत फेकून देण्याचें दाखविलेलें धाडस, वाघावर धांवत जाऊन त्याला घायाळ करण्यांत व गर्भिणी हरिणीला वांचविण्यांत त्यांनीं दाखविलेलें प्रसंगावधान, संन्याशी वेषांत त्यांच्या अंगीं फुरफुरणारी कर्तबगारी आणि शेवटीं करीमबक्षाशीं झुंज खेळून त्याचे हातपाय तोडण्यां-तील त्यांची पराक्रमी वृत्ति अशा अनेक प्रसंगांचीं या कादंबरींत रेल-चेल असल्यामुळें प्रत्यक्ष कृतीच्या जिवंतपणाची जोड कथानकाला मिळाली आहे. पात्रांच्या प्रत्यक्ष कृति दर्शविणारे असे या कादंबरीं-तील अनेक प्रसंग वाचले असतां आजच्या परिस्थितींत 'विंध्या-चला'ची कल्पना शिवरामपंतांच्या मनांत घोळत असती तर 'विंध्याचल' ही कादंबरी म्हणून जगापुढें न येतां कदाचित् 'बोलपटकथा' म्हणून रुपेरी पडद्यावर पाहावयास मिळाली असती कीं काय असें राहून राहून वाटूं लागतें.

स्वाभाविक प्रसंगांची निवड व अद्भुतरम्य चमत्कृतींचें उच्चाटन हें या कादंबरीचें वैशिष्ट्य होय. भय्यासाहेबांच्या व गंगाबाईच्या मनोवृत्तीचें विश्लेषण ठिकठिकाणीं घातलेल्या मनोगत भाषणांनीं स्पष्टपणें दर्शविण्याचा व तें मार्मिकपणें रेखाटण्याचा प्रयत्न ठीक आहे; पण पात्रांकडूनच त्यांचें मनोगत स्पष्ट करतां आलें असतें तर

कलात्मकदृष्टचा कादंबरीस सरसता प्राप्त झाली असती. मनोवृत्तीचें विश्लेषण करतांना कांहीं ठिकाणीं लांबलचक व्याख्यानांचा उपयोग केला आहे; तरी पण छोटे छोटे, कांहींसे चमकदार घरगुती संवाद कादंबरींत चांगल्या तऱ्हेनें योजिले आहेत. पात्रांच्या योग्यतेकडे व अर्थपूर्णतेकडे जास्ती लक्ष पुरविलें जाणें आवश्यक होतें.

वर्डस्वर्थ कवीच्याप्रमाणेंच प्रो० परांजप्यांची निसर्गदेवतेच्या नानाविध स्वरूपांची आवडाहि दृग्गोचर झाल्यावांचून राहत नाहीं. किंबहुना प्रस्तुत कादंबरीची पार्श्वभूमीच मुळीं निसर्गवर्णनाला मुबलक वाव देणारी आहे. विशेषत: विंध्याचलाचें वर्णन, सह्याद्रि व हिमालय हे अनुक्रमें लहान व मोठे भाऊ कल्पून केलेली तुलना ही संस्मरणीय अशीच आहे. या वर्णनांत नुसती कविकल्पनेची भरारी नाहीं, तेथें जिव्हाळ्याचा अंत:करणांतून उमटलेला पडसाद आणि पौराणिक प्रसंगाची साक्ष आहे, आणि महाराष्ट्राच्या उज्ज्वल इतिहासांतील अनेक जिवंत दृश्यें तेथें समाविष्ट झालीं आहेत. अशा या ओजस्वी लेखनशैलीची चुणुक पुढील उताऱ्यावरून दिसून येईल.

"........सह्य पर्वताची स्वारी जवळ येऊं लागली म्हणजे जिकडे तिकडे हत्तीच्या रांगांसारखे मोठाले किल्लेच किल्ले दिसूं लागत. त्यांच्यावर शिबंदीचे लोक गर्दीगर्दीनें चाललेले आहेत, चौघडे झडत आहेत, मंगल वाद्यें वाजत आहेत, भगवीं आणि जरीपटक्याचीं निशाणें जिकडे तिकडे फडकत आहेत, देवळांचे सोनेरी कळस उन्हामध्यें चमकत आहेत, तोफांच्या सरबत्त्या होत आहेत, भालदार-चोपदार ललकारत आहेत, मंत्री आणि प्रधान मनसुबे करीत आहेत, सैन्यें लढत आहेत आणि राजे विजयश्री मिळवीत आहेत असे अपूर्व समारंभ जिकडे तिकडे भय्यासाहेबांना दृग्गोचर

होऊं लागत—पण अशा राजकीय वैभवाच्या थाटमाटामध्यें मिरवीत येत असतांहि तो सह्याद्रि आपल्या जवळपासच्या गरीब बिचाऱ्या मावळ शेतकऱ्यांना मात्र कधींहि विसरत नसे —"

या सुंदर वर्णनाप्रमाणेंच पंचविसाव्या रांगेंतील, गंगाबाईनें मंगलागौर पूजिलेल्या वनराजीचें वर्णन अत्यंत सौंदर्यपूर्ण व आल्हाददायक आहे. निसर्गाच्या पूजासाहित्यानें गंगाबाईनें केलेलें मंगलागौरीपूजन महाराष्ट्रीय ब्राह्मण-स्त्रियांच्या सखोल धार्मिक भावनेचें व पतिविषयींच्या उच्च मनोवृत्तीचें द्योतकच ठरेल.

झुणझुण पांखरा । जा माझ्या माहेरा
कमानी दरवाजा । त्यावर बसा जा
सांग माझ्या आईला । न्या मला माहेरा

अशा प्रकारचीं प्रासादिक विरहगीतें लेखकाच्या पद्यमय काव्यरचनेची आवड दर्शवितात.

एकंदरींत ही कादंबरी वाचल्यावर लेखकानें आपली तत्त्वपुरस्कारी दृष्टि किंचित् बाजूस ठेवून, कथानकाची मांडणी, परिपोष, क्रिया, संवाद यांजकडे मार्मिकपणें लक्ष पुरवून तिची कलात्मकता वाढविण्याचा हेतुपुरःसर प्रयत्न केला असला पाहिजे असेंच वाटूं लागतें व त्याबरोबरच वर्तमान परिस्थितींतील राजकारणाच्या वातावरणाचें प्रतिबिंब दाखविण्याचा मोह त्यांना इतक्या सफाईनें कसा टाळतां आला याचेंच राहून राहून आश्चर्य वाटतें.

**समालोचन :**—येथपर्यंत शिवरामपंतांच्या दोन बृहत्कथा किंवा कादंबऱ्यांचें व कांहीं लघुकथांचेंहि निरीक्षण केलें. कथा या स्वरूपाच्या किती तरी प्रकारचें ललित वाङ्मय तत्कालीन नियतकालिकांतून व त्यांच्या स्वतःच्या 'काळ' व 'स्वराज्य' पत्रांतून प्रसिद्ध झालें आहे. तथापि प्रतिकूल राजकीय परिस्थिती-

मुळें किंवा अन्य कांहीं कारणांमुळें आपली तरुण पिढी त्या खऱ्या जिवंत वाङ्मयाला पारखी होऊन राहिली आहे. काळांतील अनेक तेजस्वी लेख घडाघड पाठ म्हणून दाखविणारी त्यांच्या वेळची तरुण पिढी खरोखर किती भाग्यवान् !

'पिकांची पहाणी', 'दगडी कोळसा', 'दिल्लीचें तख्त व भाऊसाहेबांचा घण', 'कानपूरच्या विहिरी', 'पशूंच्या साम्राज्यांत', 'एका पूजेच्या गणपतीचें चित्र', 'झोंपेंतील देखावा', 'तरवारीचा हक्क', 'राज्यापहार आणि न्याय', 'अगात् स्मृतिपथं', 'सोमयज्ञाची हकीगत', 'वूल्फटोन', 'रुमाल्या भिल्ल', 'सगळ्यावर उपाय आहे पण....', 'श्री शिवाजीचे पुण्याहवाचन', 'देहूहून परत येतांना', 'ऐतिहासिक प्रदर्शन', 'गोविंदपंतांचें पत्र', 'डेक्कन कॉलेजला पाहून केशवरावांच्या मनांत आलेले विचार', 'मृत्यूचा दरबार आणि दिल्लीचा दरबार', 'उच्च पर्वताच्या उच्च शिखरावर', 'पितृतर्पण', 'जुनीं मढीं आणि नवीं अंतःकरणें' इत्यादि तात्त्विक विचारांनीं परिपूर्ण असें कथात्मक स्वरूपाचे लेख 'दक्षिण अमेरिका', 'टायरोल', 'पिकांची पहाणी सर्वे नं. १ ते ४', 'रॉबर्ट एमेट' 'यंग इटली', 'पोलंडची अधोगति', 'ग्रीक देश कसा स्वतंत्र झाला ?', 'स्वित्सर्लंडची स्वतंत्रता' यांसारखे ऐतिहासिक आधारावर लिहिलेले व मनोवृत्तीला ध्येयवादाच्या पायरीवर नेऊन सोडणारे लेख; त्याच प्रमाणें 'ईश्वर-विभु आणि नित्य आहे', 'जमिनीचा सारा जमिनीशिवाय दुसऱ्या उत्पन्नांतून कां घ्यावा ?', 'इन्कमटॅक्स व सोशॅलिझम्', 'कराराची कल्पना', 'जर करार तर उत्सव कसला, वगैरेसारखे तर्कशास्त्राच्या भक्कम आधारावरील कोटिक्रमांनीं भरलेले; तसेंच 'नीतिशिक्षणाची शाळा', 'एक नवीन कारखाना', 'एका गुणी माणसाची बदछान', 'सगळेच नरसु', 'कॉंग्रेसच्या उमेदवाराला

उपदेश' वगैरे विनोदात्मक पण उपरोधिक भाषेंत लिहिलेले त्यांचे शेंकडों लेख आहेत. पण त्यांपैकीं आमच्या दुर्दैवानें त्यांतील निवडक अशा लेखांपैकीं फारच थोडें वाङ्मय आज आपल्या हातांशीं आहे. तथापि नसलेल्या गोष्टीचा शोक करीत बसण्यापेक्षां त्या पुरुष-श्रेष्ठानें बेळगांवच्या सम्मेलनप्रसंगीं सांगितलेला मंत्रच आजच्या तरुण पिढीनें 'स्फूर्तिसंदेश' म्हणून पठन करणें हेंच इष्ट नाहीं काय ?

बेळगांवच्या महाराष्ट्र साहित्य-संमेलन-प्रसंगीं केलेल्या अध्य-क्षीय भाषणांत अण्णासाहेब म्हणतात, " सरकारनें सर्व कांहीं जप्त करून नेलें, तरी जोंपर्यंत स्वदेशाभिमानी ग्रंथकाराच्या डोक्यामध्यें त्याची बुद्धि कायम आहे, तोंपर्यंत आपल्या भाषेला स्वदेशा-भिमानमूलक अशा उत्कृष्ट वाङ्मयाची कधींहि उणीव पडणें शक्य नाहीं. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या सद्यःस्थिति निबंधाला किंवा विनायकराव सावरकर यांच्या मॅझिनीचरित्राला सरकारनें बंदी केली म्हणून कोणाचें काय अडलें आहे ? त्यांच्यापेक्षां शंभरपटींनीं तीव्र अशीं कम्युनिझमपर्यंत मजल मारणारीं वाङ्मयें आज देशा-मध्यें उत्पन्न झालीं नाहींत काय ? तेव्हां सरकारकडे विनंत्या करा-वयाच्या बाह्यांगभूत आणि औपचारिक ठरावांकडे जुजबी आणि जरूरीपुरतेंच लक्ष देऊन बाकीचा सर्व वेळ महाराष्ट्र-साहित्यांतील अंतरंगभूत आणि आवश्यक अशा विषयांच्या विवेचनामध्येंच आपण खर्च करणें आपल्या हिताचें आहे ! "

शिवरामपंतांच्या अतृप्त आत्म्यास अंशतः तरी शांति मिळावी अशा प्रकारचें ओजस्वी वाङ्मय निर्माण करण्याचें 'प्रतिमा-साधन' करावयाची स्फूर्ति झाल्यावर त्यांच्या उपलब्ध अशा स्फुट लेखांचें नुसतें परिशीलनच नव्हे तर त्यांतील अंतर्यामीचें तत्त्वज्ञान अगदीं आत्मसातच करावयास नको काय ?

# स्फुट - लेख

(राजकीय, सामाजिक व प्रासंगिक)

"कांहीं मूर्ख माशांनीं समुद्रांतील मोत्यें गळ्यावर घालण्याऐवजीं गळ्याखालीं घातलीं असलीं म्हणून त्याच्या योगानें जगांतील संपत्ति थोडीच कमी झाली आहे? कित्येक संशयग्रस्त सरकारी अधिकारी, रानांतील अविचारी वणव्याप्रमाणें आपल्यापुढील वाङ्मयाचें उभें पीक जाळून खाक करीत असतात...." सरकारच्या वक्रदृष्टींतून बचावलेल्या शिवरामपंतांच्या वाङ्मयांतहि नाना विचारांचीं असंख्य मौक्तिकें आहेत. त्यांपैकीं टपोरें व पाणीदार मौक्तिक म्हणून कोणत्याहि मोत्याकडे अचूक अंगुलिनिर्देश करावा अशी त्यांच्या प्रत्येक लेखाची योग्यता आहे. भास कवीचीं नाटकें जाळलीं अशा अनुमानावरून लिहिलेला 'भासाची भवितव्यता' हा लेख वाचून सहृदय वाचकाच्या हृदयाची विदीर्ण अवस्था झाल्याशिवाय राहणार नाहीं. हा लेख म्हणजे लेखकाच्या अंत:करणाच्या खोल कप्प्यांतून बाहेर पडलेले स्वत:च्या वाङ्मयसंसाराच्या स्थितीचें जिवंत गद्यकाव्यच असलें पाहिजे. "भासा, कोणाला तुझी दया आली नाहीं? आणि या उत्कृष्ट कवीचे ग्रंथ जाळूं नका हो नका असें कोणी म्हटलें नाहीं? तुझीं नाटकें जाळलेलीं पाहून तूं रडला असशील, ओरडला असशील, हळहळला असशील, तळमळला असशील,....तुझ्या पुस्तकांची आग विझली असेल पण तुझ्या मनाची आग कधीं तरी विझली असेल काय रे?....' अशा प्रकारचे हृदयनिनाद असलेला हा एकच लेख तरी प्रत्येकानें

वाचल्याशिवाय केव्हांहि राहूं नये. शिवरामपंतांच्या प्रचंड संशोधक बुद्धींतून जे अनेक लेख निर्माण झाले त्यांपैकीं 'मेघदूतावरून कालिदासाविषयीं' हा तर्कशास्त्रीय विचारसरणीनें लिहिलेला व माहितीपूर्ण लेख वाचनीय आहे. या लेखांत मेघदूतांतील संदर्भा-वरून सूचित होणारें कालिदासाचें स्थळ आणि मालविकाग्निमित्रा-वरून दिसून येणारी कालिदासाची वेळ हीं एकमेकांशीं विसंगत कशी आहेत हें दाखविलें आहे. 'मृच्छकटिक' नाटकाच्या अभ्यासकास त्यांनीं लिहिलेला 'चारुदत्त आणि मृच्छकटिक' हा चिकित्सापूर्ण लेख बहुमोलाचा आहे. भासकवीच्या 'चारुदत्त' नाटकावरून आपलें मृच्छकटिक नाटक बनवितांना शूद्रकानें कसकसे फेरफार केले ही विवेचनात्मक गोष्ट अगदीं सुलभपणें शिवरामपंतांनीं प्रस्तुत लेखांत चातुर्यानें उलगडून दाखविली आहे. याच्याच तोडीचा असा 'प्रियदर्शिका व नागानंद हीं नाटकें कोणाचीं ?' हा लेख असून शिवाय 'श्रीमद्भगवत्गीतेंतील एक शंकास्थान', 'शाकुन्तल नाटकाचा चौथा अंक', 'विष्णुसहस्रनाम' अशा प्रकारच्या अनेक संशोधनात्मक लेखांवरून त्यांचा संस्कृत ग्रंथांचा अभ्यास किती व्यापक पण सूक्ष्म असला पाहिजे याची कल्पना वाचकांनींच केलेली बरी !

संस्कृत कवींच्या ग्रंथांवरील टीकात्मक स्वरूपाच्या अनेक संशोधनात्मक लेखांप्रमाणेंच धर्मविषयक कल्पनांवर प्रकाश पाडण्यासाठीं केवळ हिंदु पुराणांवरच लेखन करून त्यांची दुर्दमनीय अभ्यासू वृत्ति थांबली नाहीं, तर तिनें बौद्ध धर्म, तसेंच ग्रीक व रोमन पुराणांचा प्रांतहि पूर्णपणें आक्रमून टाकला आहे. आपल्या-मागचे इतके राजकीय व्याप संभाळून त्या स्वातंत्र्यवीरानें एखाद्या

जाड्या संस्कृत पंडितालाहि लाजविण्यासारखें केलेलें विविध व चौफेर विस्तारलेलें कार्य पाहिलें असतां मति गुंग होऊन जाते. धर्मप्रसाराच्या पद्धतीचा 'बौद्ध धर्मांतील एक नमुना' कथन करतांना असो किंवा अंगावर शहारे आणणारी 'इफिजिनिआ आणि ऑरेस्टेस' ही ग्रीक पुराणांतील करुण व वीररसपरिपूर्ण कहाणी सांगतांना असो, अण्णासाहेबांची हिंदु धर्माच्या श्रेष्ठतेची महती पटविण्याची विचारसरणी वाचकांच्या मनावर योग्य तो परिणाम आपोआपच केल्यावांचून राहत नाहीं. 'मदनदहन' या बाह्यांगी धार्मिक कथेंत वाचक इतका तन्मय होऊन जातो, कीं त्यांतील स्वर्गाच्या वर्णनानें त्याला सत्यसृष्टीचा विसर पडून आपण तेथेंच वावरतों आहों कीं काय, असा भास होतो. 'सांपडलेल्या संपुष्टांत' ईश्वरानें स्वतःचें स्वरूप निसर्गांत निर्माण केलें असतां जें स्वरूप मनुष्यास दररोज दिसतें त्याजकडे मनुष्य दुर्लक्ष करतो व ज्या मूर्तींची उत्पत्ति हास्यास्पद आहे तिच्यासाठीं तो हळहळतो हें तत्त्व गोविलें आहे. 'मनाची मीमांसा' हा सकृद्दर्शनीं गंभीर आणि शास्त्रीय निबंध असला तरी सौंदर्यवर्णनाच्या व कथेच्या छटा मनमुराद विखरून हा लेख सामान्य वाचकांसहि लेखकानें सुबोध केला आहे. 'कर्म' व 'माया' या वेदान्तविषयक गोष्टींतून 'मनुष्याला सुख मिळतें तेव्हां कोणत्या जन्मीच्या कर्माचें तें फळ आहे याच्या स्मरणाची अपेक्षा बाळगण्यांत तो कधीं थांबत नाहीं तर दुःखाच्या वेळींच त्यानें हे आक्षेप कां बाळगावे? सृष्टींतील चराचर प्राण्यांचे व्यापार म्हणजे मायेचा बाजार आहे. ही माया नाहींशी झाली, कीं मनुष्याच्या आकांक्षा नाहींशा होऊन सर्वजण विरक्त आणि उदासीन होतील' अशा प्रकारची विचारसरणी प्रकट केली आहे. 'नवी सृष्टि', 'पूर्वजन्म

आणि पुनर्जन्म', 'श्रद्धा' इत्यादि लेखांत शिवरामपंतांनीं जुन्या भ्रामक समजुतींची चांगली विचक्षणा करून त्यावर स्वतंत्र विधानें प्रतिपादिलीं आहेत. अशा प्रकारच्या लेखांना अभ्यासकाच्या दृष्टीनें केव्हांहि महत्त्व आहे हें तर खरेंच, पण शिवरामपंतांची जी डोळ्यांत भरणारी महत्त्वाची कामगिरी ती राजकीय स्वरूपाचीच होय. कर्मवाद व ध्येयवादाची सांगड घालण्याचें अंतिम कार्य ठरल्यावर, देशभक्तीचीं उदाहरणें शोधण्याकरितां त्यांनीं रोम, ग्रीस, स्वित्सर्लंड, रशिया, अमेरिका इत्यादि राष्ट्रांच्या इतिहासाचें परिशीलन केलें. इतकेंच नव्हे तर फ्रान्सच्या राज्यक्रान्तीचा इतिहास, रूसो-व्हॉल्टेअर यांचीं तत्त्वज्ञानें यांतून आपल्या स्वातंत्र्य-चळवळीस लागू असलेले भाग इकडल्या परिस्थितीस जमवून घेतले. साम्यवादाच्या तत्त्वज्ञानाचा सूरहि त्यांच्या लेखनांतून निघूं लागल्यानें जमिनदारवर्गाचा व नोकरशाहीचा रोष शिवराम-पंतांना पत्करावा लागला. बोअर युद्ध व रूसो-जपानी युद्ध यांच्या-संबंधीं साधक-बाधक चर्चा सुरू असतां स्वातंत्र्याची ऊर्मि स्वदेशांत उत्पन्न करण्यासारखे लेख बोअर लोकांच्या आरोळ्यांतूनहि शिवरामपंतांनीं दणाणून सोडले. जपानच्या अभ्युदयाचा आणि त्यानें रशियाशीं चालविलेल्या प्राणान्तिक युद्धाचा प्रसंग साधून त्यांनीं जे लेख लिहिले ते आतां कदाचित् विसरले गेले असले तरी त्याच्या वाचनानें मनावर झालेले संस्कार हे मात्र चिर-काल राहणारच !

'स्वराज्य' पत्र सुरू केल्यावर त्यांनीं जें लेखनकार्य करून ठेवलें आहे त्यांत 'काळा'तील लेखनाची भावनोद्दीपकता, कल्पनेची स्वैर भरारी आणि धाडसी बेफिकिरी नसली तरी स्वातंत्र्यवादाचें उदात्त स्वरूप, गंभीर ध्येय आणि राष्ट्रीय मताचें तार्किक व

व्यावहारिक प्रतिपादन आहे. 'मवाळांच्या प्रयत्नांना निराळें वळण' या लेखांत युरोपियन असोशिएशन किंवा सत्यसमाज यांच्या भुलथापांनीं मवाळांना फूट पाडणें शक्य नाहीं असा नोकरशाहीस स्पष्ट इशारा दिला आहे त्याचप्रमाणें 'महात्मा गांधी, तुम्ही चुकलांत—' असे सडेतोड व स्पष्टोद्गार काढण्यासहि त्यांनीं कमी केलें नाहीं. 'नाकाशीं क्लोरोफॉर्म व पायावर ऑपरेशन', 'इंग्लिश अधिकारी', 'नेटिव राजे आणि इंडियन रयत', 'कमकुवतपणा कीं प्रजाद्रोह' इत्यादि लेखांवरून 'शुद्ध स्वातंत्र्याचा महाराष्ट्रांतील पहिला प्रतिपादक' अशी त्यांची पुण्यस्मृति महाराष्ट्राला चिरकालीन राहील.

वाङ्मयाचें स्वरूप किंवा कला यांविषयीं स्वतंत्र असें फारसें लेखन आढळत नाहीं. तथापि प्रसिद्ध हिंदी चित्रकार ठाकूरसिंग यांनीं काढलेल्या 'प्रणयिनीचा मनोभंग' ((Letter hit) या चित्रावर त्यांनीं 'रत्नाकर' मासिकांत एक नाविन्यपूर्ण स्वरूपाचा टीकालेख लिहिला आहे. हें चित्र 'रत्नाकर' मासिकाच्या जुलै १९२८ चे अंकांत प्रसिद्ध झालें होतें व त्यांत शृंगाररसाचा मर्यादेबाहेर अतिरेक झाला आहे अशी टीका झाली होती. शिवरामपंतांनीं या चित्रावर टीकालेख लिहितांना सूक्ष्मपणें या चित्राचें निरीक्षण करून समतोल व निर्विकारपणें अनुमानें काढलीं आहेत. त्यावरून अभिजात कलेविषयींची त्यांची विचारसरणी किती पायाशुद्ध असली पाहिजे हें दिसून येण्यासारखें आहे.

'सूर्याच्या गैरसोयी' हें राजकारणापासून किंवा लौकिक व्यवहारापासून शंभर टक्के अलिप्त असें नितान्तमनोहर गद्यकाव्य आहे. एका अमावस्येच्या दिवशीं चंद्राची गांठ पडली असतां सूर्य

आपलीं दुःखें चंद्राला सांगतो. तीं वाचीत असतां वाचकहि सूर्याच्या गैरसोयींची कहाणी ऐकून क्षणभर समदुःखी होतो. “ मला स्नेही-सोबती नाहींत– झोंप नाहीं आणि प्रेमाचें स्थान नाहीं.......” अशा प्रकारच्या सूर्याच्या गैरसोयींची कल्पना शिवरामपंतांसारख्या अचाट कल्पनाशक्ति-संपन्न कवीशिवाय कोणास सुचणार ? चैतन्योक्ति व अन्योक्ति यांच्या धाग्या-दोऱ्यांनीं समग्र गद्यकाव्य विणलेलीं सरस उदाहरणें आपल्या भाषेंत बोटांवर मोजण्याइतकींच आहेत.

अशा प्रकारें शिवरामपंतांच्या स्फुट लेखनाचें ओझरतें पर्यालोचन केल्यावर पुनः त्यांच्या ललित वाङ्मयांतील महत्त्वाच्या नाट्यविषयक कामगिरीचा परामर्श घेतल्याशिवाय आपल्या वाङ्मय-समालोचनास परिपूर्णता प्राप्त येणार नाहीं. ‘रंगभूमीवर गाजलेलें नाटक’ ही कांहीं शिवरामपंतांच्या नाटकांची कसोटी नव्हे. त्यांच्या नाटकांनीं रंगभूमीवर दीर्घकाळ टिकाव धरला नसेल किंवा तितकीशी लोकप्रियताहि कदाचित् संपादन केली नसेल; तथापि एकोणिसाव्या शतकाचे अखेरीस त्यांची स्वदेशभक्ति, स्वातंत्र्य व आर्यसंस्कृति यांच्या भक्कम पायांवर उभारलेलीं त्यांचीं नाटकें रंग-भूमीवर आलीं असतीं तर मराठी रंगभूमीचें ‘मन्वन्तर’ होण्यास आणखी तीस वर्षें वाट पहावी लागली नसती हें निःसंशय !

## नाट्यवाङ्मय

शिवरामपंतांना कॉलेजमध्यें असल्यापासूनच नाट्यवाङ्मयाची खरी आवड उत्पन्न झाली असली पाहिजे आणि ऐन पंच-विशीच्या भरांतहि या सव्यसाची साहित्यश्रेष्ठाची तपश्चर्या इतकी होती, कीं कै० अण्णासाहेब किर्लोस्करांच्या ‘सौभद्र’ नाटकाचें

त्यांनीं संस्कृत भाषांतर केलें होतें. कर्तबगारीच्या क्षेत्रांत उतरल्यावर पाश्चात्य नाटककारांचीं रूपान्तरें व पौराणिक प्रसंगांवर आधारभूत अशी नाट्यरचना करून त्यांनीं आपला नाट्यसंसार सजविला. अण्णासाहेबांच्या सर्वांगीण कामगिरीचें स्वरूप लक्षांत घेतां कलावंत नाटककार होण्याची कल्पना त्यांच्या मनास शिवली असेल हें यत्किंचितहि संभवत नाहीं. सामाजिक जीवनावर कल्पनांचे डोलारे उभारण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाहीं, रंगभूमीचें तंत्र त्यांना नाट्यरचनेंत पायबंद घालूं शकलें नाहीं, 'हाउस फुल' अशी आपल्या नाटकांच्या प्रयोगांची जाहिरात होऊन त्यांचे शेंकडों प्रयोग व्हावेत अशी हिम्मतहि त्यांनीं बाळगली नसेल, पण मराठी नाट्यवाङ्मयाच्या इतिहासांत युगप्रवर्तकाचें स्थान त्यांनीं मिळवून ठेविलें आहे. अखिल विश्वांत साहित्य दृष्ट्या विख्यात असे शेक्सपियर, गटे किंवा कालिदासासारखे प्रतिभाशाली नाटककार होऊन गेले त्यांच्या यशाचें खरें मर्म त्यांनीं निवडलेल्या नाट्यवस्तूंत नसून त्यांच्या प्रगल्भ मांडणींतच होय. कथानक पौराणिक असो अगर ऐतिहासिक असो, तें परभाषेंतील नाटककारांच्या नाट्यकृतीवरून रूपांतरित केलेलें असो अगर स्वतंत्र कल्पनाशक्तीवर उभारलेलें असो, विशिष्ट तत्त्वज्ञानावर अधिष्ठित अशी नाट्यरचना करण्याकरितां जबर तपश्चर्या करावी लागते. शिवरामपंतांची तपश्चर्या कांहीं पांच-पन्नास मराठी नाटकांपुरतीच लेचीपेची नव्हती. शेक्सपियर, गोल्डस्मिथ शेरिडन व शेक्सपियरकालीन, बेन जॉन्सन, फ्लेचर, मार्लो इत्यादि पाश्चात्य नाटककारांच्या कृति; त्याचप्रमाणें फ्रेंच नाटककार कॉर्निल रेसीन, व्हॉल्टेअर व मोलिअर यांच्या कृतीहि त्यांनीं अभ्यासल्या होत्या. इतकेंच काय, पण जुने ग्रीक नाटककार व जर्मन नाटककार

गटे, शिलर, केटो यांचीं नाटकेंहि त्यांच्या सर्वव्यापी व्यासंगांतून सुटलीं नव्हतीं.

इंदूर दरबारच्या बक्षिसाकरितां त्यांनीं 'कादंबरी' हें संगीत नाटक बाणाच्या कादंबरीचे कथानकावर १८९६ चे सुमारास लिहिलें. मराठी रंगभूमीवर कै० गो. ब. देवलांसारख्या अभिजात नाटककाराचीं शापसंभ्रमासारखीं नाटकें या वेळीं दुमदुमत असल्या-मुळें इंदूर दरबारकडून 'कादंबरी' नाटकास पारितोषिक मिळण्याचें भाग्य लाभलें नाहीं; एवढ्यावरून या नाटकाची योग्यता ठरविणें रास्त होणार नाहीं. हें नाटक पुढें नाट्यकला प्रवर्तक मंडळीनें रंगभूमीवर आणून यशस्वी करून दाखविलें.

शिलरच्या 'रॉबर्स' नाटकावरून 'भीमराव', ॲडिसनच्या 'केटो'वरून 'रामदेवराव' व 'मॅकबेथ'वरून 'मानाजीराव' हीं तीन शोकपर्यवसायी नाटकें त्यांनीं लिहिलीं आहेत. फितुरीचा दुष्परिणाम हा 'रामदेवराव' नाटकाचा विषय असून स्वातंत्र्य-प्रिय देशभक्तीचा विजय 'भीमरावां'त दाखविला आहे. राज्यलोभा-नें धन्याचा खून करणाऱ्या सेवकाचें चरित्र 'मानाजीरावां'त दाखविलें आहे. यावरून रूपांतराकरतां कै० अण्णासाहेबांनीं किती मार्मिक व आपल्या ध्येयवादी विचारसरणीस अनुरूप अशी निवड केली हें दिसून येईल. 'पहिला पाण्डव' हें त्यांचें शोक-पर्यवसायी पौराणिक नाटक त्यांनीं अत्यंत परिश्रमानें लिहिलेलें असल्यामुळें कलाविलासयुक्त, चित्ताकर्षक व परिणामकारक ठरतें. शोकरसप्रधान नाट्यसृष्टि, जन्मसिद्ध मनोधर्म व परिस्थितीचा प्रवाह यांत सांपडून वहकत जाणाऱ्या भावनाप्रधान मनाला गूढ तत्त्वज्ञानाची भूक उत्पन्न करते व त्या भुकेच्या समाधानाचाहि मार्ग दाखवते. मानवीचारित आणि दैवदुर्विलास यांवरच आपल्या

शोकपर्यवसायी नाटकाची इमारत रचून त्यांनीं मानवी जीवनाचें वास्तवदर्शन व ध्येयवादी आनंद यांच्या सुंदर छटा आपल्या नाटकांतून इतस्ततः विखुरल्या आहेत.

त्यांच्या सर्व नाटकांत 'पहिला पाण्डव' या पौराणिक नाटकास रंगभूमीवरील परिणामाचे दृष्टीनें अग्रगण्य स्थान देणें क्रमप्राप्त आहे. नाटकाचा धीरोदात्त नायक एकीकडे प्रतिज्ञापूर्तीचा तत्त्वनिष्ठपणा व दुसरीकडे तितकीच प्रिय अशी कुंतीची आज्ञा, अशा दुहेरी पेंचांत सांपडलेला कर्ण, दैवदुर्विलासामुळें अर्जुनाच्या अमोघ अस्त्रास बळी पडतो. या निराशामय अखेरीमुळें प्रेक्षकांच्या मनावर दुःखाचा पगडा बसतो. शोकान्त नाटकापासून होणाऱ्या दुःखांतून एक विलक्षण आनंद श्रोत्यास मिळतो.

दे० भ० खाडिलकरांचा विनोद उच्छृंखल व केळकरांचा विनोद गुलगुलीत; पण शिवरामपंतांचा विनोद प्रसंगनिष्ठ असून त्यांत कोणत्याहि प्रकारची झाक दिसून येत नाहीं याचें खरें कारण त्यांची गूढ-तत्त्वविवेचक अशी मानसिक ठेवण हेंच असलें पाहिजे.

त्यांच्या 'मानाजीराव' नाटकाची भाषा बोजड व अवजड असून तिच्यांत प्रसाद नसल्याचे गु० किरात यांनीं स्पष्टोद्गार काढिले, तेच कमीजास्त प्रमाणांत पंतांच्या इतर नाटकांच्या भाषेस लागूं पडतील. 'मानाजीराव' हें नाटक शाहूनगरवासी मंडळीनें रंगभूमीवर आणलें व नटवर्य बाळाभाऊ जोगांनीं दर्याबाईच्या अभिनयकुशल भूमिकेनें यशस्वी करूनहि दाखविलें. 'पहिला पांडव' याचा महाराष्ट्र मंडळीनें बसविलेला प्रथम प्रयोग पाहण्यास ते दुर्दैवानें ह्यात नव्हते. 'महाराष्ट्रलक्ष्मी' किंवा 'महाराष्ट्रसुंदरी' या नांवाचें संगीत नाटक लिहून त्यांनीं तें रा० शं. मो. रानडे यांस दाखविलें असतां ते सरकारी नियमांस धोक्याचें आहे असा त्यांचा

अभिप्राय पडल्यावरून कधींहि जनतेच्या हातीं पडूं शकलें नाहीं. गु० किरात यांनीं आपल्या आठवणींत "सूत्रधाराच्या प्रवेशाचे शेवटीं नटीचें कोणी तरी वस्त्रहरण करीत आहेत, पुढील प्रवेशांत राजदर्शन घेण्याकरितां कोणी आला असतां राजसेवक त्याला धुडकावून लावीत आहेत; पण राजसेवकाचा हात दाबल्याबरोबर त्याला राजदर्शनाचें आश्वासन देत आहेत' अशा प्रकारची स्मृति दिली आहे. तसेंच 'राजसिंह आणि पद्मिनी' हें संगीत नाटक त्यांनीं लिहिलें होतें, त्यांतील पदांची भाषा सरळ, साधी, ओघवती आणि प्रसादयुक्त असून नाटक चांगल्या प्रकारचें होतें असा गु० किरात यांचा अभिप्राय आहे. मृत्यूपूर्वीं दोनच दिवस आधीं शिवराम-पंतांनीं 'मीराबाई' नाटकाचे दोन प्रवेश लिहिले. यावरून नाट्य-लेखनाविषयीं त्यांच्या आशा-आकांक्षा किती जबर होत्या, व हें शस्त्र त्यांनीं पाजळून पाजळून स्वातंत्र्यदेवीस शृंखलामुक्त करण्याच्या ध्येयवादी संग्रामांत तीव्रतर करूनहि लोकजागृति निर्माण केली असती, पण काळाच्या मनांत तसें नव्हतें !

## काव्य

-:❀:-

स्वतंत्र काव्यलेखन त्यांनीं संख्येच्या मानानें फार थोडें केलें असलें तरी, पर्जन्यवृष्टीनें प्रफुल्लित झालेलें सृष्टिसौंदर्य पाहून कवीला देशाच्या दुःस्थितीची आठवण करून देणारें 'वर्षा-वर्णन' किंवा रसरशीत स्वातंत्र्यप्रीतीची घोषणा करून हृदयाला पीळ पाडणारें 'आयासाठीं कोयत्याचें गाणें' अगर 'अनीतीनें जरीं राज्य मिळविलें तरी हातीं हो टिकेल का' अशा तडफ-दार ओळीचा कोणत्या सहृदय रसिकास विसर पडेल. काव्य-विषयाचा ऊहापोह त्यांनीं साहित्य-सम्मेलन प्रसंगीचे अध्यक्षीय भाषणांत केला आहे. त्यावरून या प्रांतांतहि त्यांची किती अमोघ प्रगति होती याची कल्पना येते. नाटकांतील पद्यरचना साधी, सोपी व माधुर्यपूर्ण आहे. 'अहिल्याजार' नामक एक नितान्त-मनोहर काव्य त्यांनीं कॉलेजच्या आयुष्यांत लिहिलें त्यांतहि ओज, भाषासौष्ठव, रसात्मकता, सौंदर्य इत्यादि गुण प्रतीत होत आहेत.

## संस्कृत ग्रंथांवरील टीका वगैरे

स्वातंत्र्यवादाचें दणदणीत प्रतिपादन करणारा चतुरस्र ग्रंथकार म्हणून अण्णासाहेबांच्या अतुल कामगिरीनें डोळे दिपून गेले म्हणजे त्यांनीं भासाच्या संस्कृत ग्रंथांचें दीर्घ परिशीलन केलें, अर्थसंग्रह, तर्कसंग्रह, व तर्कभाषा यांवर मार्मिक व विस्तृत टीका लिहिल्या, 'भामिनीविलास', 'प्रसन्नराघव' इत्यादि ग्रंथांच्या सटीप इंग्रजी आवृत्त्या प्रसिद्ध केल्या, रूसोच्या सोशल कॉन्ट्रॅक्टवरून

राजनीतिशास्त्र(अपूर्ण) लिहिलें, या सगळ्या अभ्यासू लेखनव्यापाचा, क्षणमात्र विसरच पडतो ! तथापि मीमांसेसारख्या विषयावर अर्थसंग्रहासारखा ग्रंथ लिहिणें कांहीं 'येरा गबाळाचें' काम नव्हे. आधींच संस्कृत भाषा क्लिष्ट व त्यांत पुरातन ग्रंथकारांचे तर्क, न्याय, मीमांसेंतील प्रयोग किती दुर्बोध्य, अशा या सर्व शास्त्रांत स्वतःचें अवगाहन करून त्यांवर विस्तारानें व सुलभतेनें मराठी भाष्य लिहिणाऱ्या शिवरामपंतांची, तरुण पिढी केव्हांहि उतराईच होईल. स्वातंत्र्यवादाचें रसरशीत प्रतिपादन करावयाचें असतांना हा सर्व खटाटोप न केला असतां तरी चाललें असतें असा एखाद्या खवचट टीकाकारानें प्रश्न उपस्थित केला तर त्यास त्यांच्याच शब्दांत उत्तर हें कीं, " चांगल्या ग्रंथरचनेस शिक्षण हें सर्व प्रकारांनीं चांगलें असलें पाहिजे, म्हणून न्याय, व्याकरण, अलंकार या शास्त्रांची तपश्चर्या जरूर आहे. व्याकरणशास्त्रानें शब्द सुंदर होतील, न्यायशास्त्रानें विचार सुंदर होतील आणि अलंकारशास्त्रानें ते विचार सुंदर रितीनें मांडतां येतील."....ज्या शिवरामपंतांच्या भरघोंस लेखनशैलीनें अखिल महाराष्ट्रांत नवचैतन्य आणि राष्ट्रजागृति निर्माण केली तिची पूर्वपीठिका किती भक्कम पायावर उभारली होती हें 'पदवाक्यप्रमाणज्ञः' होण्याकरितां केलेल्या या प्रचंड व्यापावरूनच दिसून येण्यासारखें आहे.

येथपर्यंत शिवरामपंतांच्या प्रत्येक वाङ्मयविभागाविषयीं झालेल्या ओझरत्या चर्चेवरून त्यांची खरी योग्यता वाचकांस पटली असेलच. त्यांचें वक्तृत्व जितकें अमोघ, तितकीच त्यांची लेखनशैली प्रखर. स्विफ्ट, व्हॉल्टेअर, रूसो इत्यादि पाश्चिमात्य व भास, सौमिल्लक, कालिदास इत्यादि संस्कृत कवींच्या वाङ्मयसागराचें मंथन करून त्यांनीं स्वतंत्र लेखनशैली व स्वतंत्र विचार-

सरणी निर्माण केली. स्वातंत्र्य हें त्यांच्या जीवनाचें ध्येयसर्वस्व होतें, व स्वातंत्र्य हाच त्यांच्या लेखनाचा आत्मा होता. त्यांनीं कथा, काव्य, कादंबरी, नाटक अशा प्रकारचें कल्पनाप्रधान, त्याचप्रमाणें संशोधनात्मक, ऐतिहासिक किंवा राजकीय स्वरूपाचें प्रचंड वाङ्मय लिहून, या आत्म्याचीं बाह्य स्वरूपें दाखविलीं व जनतेंत सर्वांगीण चैतन्य उत्पन्न करण्याचें व्रत एकनिष्ठेनें तडीस नेलें. त्यांच्या महत्त्वाच्या कामागिरीचें खरें मर्म या सर्वसंचारी प्रतिभेंत आणि अखंड अभ्यासू वृत्तींत आहे.

आजच्या विचारवंत व उत्कर्षप्रिय अशा तरुण पिढीनें त्यांच्या वाङ्मयापासून काय शिकावें हें लिहिण्याइतकी निचेतन परिस्थिति आतां आमच्या महाराष्ट्रांत खास राहिलेली नाहीं !

साम्यवादाचें तत्त्वज्ञान निर्भयपणें प्रतिपादन करणारे व रूढीच्या बंधनाच्या बेड्या तोडून टाकून स्वतंत्र विचारांना चालना देण्यास उद्युक्त करणारे अनेक तरुण लेखक व निःस्पृह वक्ते आतां लेखणी व कंबर कसून सरसावले आहेत. अशा वेळीं ध्येयवादी स्वातंत्र्य-वादाचे पुरस्कर्ते शिवरामपंत असते तर ?—पण छे; गत गोष्टींचा शोक कशाला ? ते आजहि आपल्या वाङ्मयानें जिवंत आहेत, नव्हे अमर आहेत ! त्यांचा 'स्फूर्तिसंदेश' तरुणांचीं मनें गुलामगिरीच्या शृंखला तोडण्याकरितां उद्युक्त करण्याइतका जोमदार नाहीं काय ?

## इतिहास

आजचें राजकारण हें उद्यां ऐतिहासिक सत्य बनतें; आणि म्हणून कोणत्याहि देशाचा इतिहास हें एका काळचें राजकारणच होय. वक्तृत्वांतील भावनेच्या भरारीनें श्रोत्यांच्या भावना क्षणभर उद्दीपित होतील, किंवा समाजांत प्रचलित अन्यायांसंबंधीं सडेतोड

लिहून अन्यायाची चीड जनतेमध्यें उत्पन्न करतां येईल; तथापि अवमानाचें शल्य जनतेच्या मनास कायमचें डिंवचत राहण्यास ऐतिहासिक गोष्टीच साकल्यानें पटवून दिल्या पाहिजेत हें ओळखून 'मराठ्यांच्या लढायांच्या इतिहासा'चें त्यांनीं व्यापक संशोधन केलें. इ. स. १८०२ पासून १८१८ पर्यंत मराठ्यांच्या इंग्रजांशीं अनेक लढाया झाल्या. त्यांत खर्डी, येरवडा, अष्टें, रायगड, असई, अरगांव इत्यादि लढाया महशूर आहेत. या सर्व लढायांत महाराष्ट्रांतलि बुद्धिभेद व फंदफितुरीमुळें मराठ्यांचा बहुतेक लढायांत पराभव होत गेला. मात्र शेवटची यशवंतराव होळकरांची मोहीम यशस्वी होऊन कर्नल मॉन्सन या इंग्लिश सेनापतीस मराठ्यांच्या सैन्यासमोर हार खाऊन पळ काढावा लागला हा केव्हांहि उत्साहपूर्णच प्रसंग होय. अशा या आणीबाणीच्या काळांत 'इंग्लिश लोक लांच देण्यांत निष्णात आणि आपल्यापैकीं कित्येक लोक गुप्तपणें लांच खाऊन फितुर होण्याच्या कामांत निष्णात' यामुळें स्वराज्यसूर्य कसा कायमचा अस्ताला गेला याची दुःखद साक्षच जणूं ते 'महाराष्ट्रांतलि किल्ले' देत आहेत !

"सर्व संकटांना आणि मोहपाशांना पायाच्या ठोकरीनें दूर लाथाडणारा वीर, प्रसंग आला कीं एका क्षणांत उत्पन्न होत नसतो. रोजच्या रोज घडणाऱ्या नित्यनैमित्तिक क्रियांचे, विचारांचे आणि विश्वासाचे घाव घालूनच वीरवृत्तीची घडण होत असते." याची शिकवण देण्याकरितांच तर मराठ्यांच्या लढायांच्या इतिहासाचा झगझगति बिलोरी आरसा त्यांनीं पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या जनतेपुढें उभा केला नसेल ना ?

# ४. सामाजिक व राजकीय दृष्टिकोन

शुद्ध स्वातंत्र्यवादाचे निर्भय पुरस्कर्ते शिवरामपंत यांच्या, आतांपर्यंत निरीक्षण केलेल्या जीवन व कार्यावरून, तसेंच त्यांच्या-संबंधींच्या आठवणींवरूनहि राजकीय व सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन कशा प्रकारचा असला पाहिजे याची बरीच कल्पना येण्यासारखी आहे. कोणत्याहि व्यक्तीचीं वैयक्तिक मतें तिच्या लेखनांतून, व्याख्यानांतून व संभाषणांतून स्पष्ट होत असतात. शिवरामपंतांचे अनेक लेख व व्याख्यानें चिरकालीन महत्त्वाचीं आहेत हें निःसंशय, तथापि त्यांच्या एकंदर लेखनावरून त्यांनीं फारच थोड्या प्रसंगीं आपलीं वैयक्तिक मतें स्पष्टपणें उद्धृत केलीं आहेत असें निदर्शनास येतें. असें जरी असलें, तरी त्यांच्या हृदयांत उचंबळणाऱ्या विचारतरंगांचीं प्रतिबिंबेंच त्यांच्या लेखनांत ठिकठिकाणीं पडलीं असल्यामुळें, बाह्यांगी असणारें व्याजोक्ति, व्यंग्योक्ति, उपरोधोक्तीचें आच्छादन दूर केल्यास, त्यांचा दृष्टिकोन समजून घेण्यास बरीच मदत होईल. 'काळ' पत्राच्या उपलब्ध असलेल्या अनेक लेखांवरून आपल्या शाळा-कॉलेजांतील शिक्षणाचें पर्यवसान, स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं सर्वस्व अर्पण करण्यांत झालें पाहिजे हें महत्त्वाचें तत्त्व त्यांनीं जोरानें प्रतिपादन केल्याचें दिसून येतें.

स्वातंत्र्य संपादण्याच्या दुर्घट कार्यास अत्यंत विघातक अशा 'फितुरी' या निंद्य कर्माविषयीं त्यांना किती तिटकारा वाटत होता हें निराळें लिहिण्याची आवश्यकता नाहीं.

" आपल्या या वैभवशाली भूतकाळाच्या सर्व गोष्टी एखाद्या

फितुरी बदमाषाप्रमाणें सर्व जगाला सांगण्यासाठीं, एखाद्या राजवाड्यानें तीन-चारशें वर्षें जिवंत राहण्यापेक्षां आपल्या धन्याबरोबरच तोहि जमिनींत गाडला गेला असता तर काय वाईट झालें असतें ! ....” अशा प्रकारचीं वाक्यें, स्वातंत्र्यप्राप्तीचे मनोरे ढांसळून पाडणारें फितुरीचें विषारी शल्य त्यांना किती यातना देत होतें याची कल्पना पटवितील !

‘कायदेभंगा’विषयीं अण्णासाहेबांचीं मतें किती तर्कशुद्ध व समतोल विचारसरणीवर अधिष्ठित झालीं होतीं हें पुढील एका अवतरणावरून दिसून येईल. “ सरकारच्या कायद्यानें जें निषिद्ध ठरविलें तेंच सदसद्विवेकाच्या कसोटीला लावून पाहून जर कांहींच्या मतानें अनिषिद्ध ठरलें तर त्यामुळें कायद्याचा बोज कमी होतो; व हे कायदे मूर्खपणाचे आहेत, आणि हे पाळण्याची मुळींच आवश्यकता नाहीं असा समज लोकांत वाढूं लागतो व त्या योगानें दुफळी होऊन राज्याच्या इमारतीचे खांब लटपटूं लागतात.”

शिवरामपंत हे खरे कर्तबगार संपादक होते. वर्तमानपत्राच्या कार्याविषयीं त्यांनीं मोठ्या सूक्ष्मपणें विचार करून आपलें मत प्रकट केलें आहे. ते लिहितात, “ तीस कोटी ‘प्रसिद्ध न होणारीं वृत्तपत्रें’ आम्ही प्रत्येक आठवड्याला काळजीपूर्वक रितीनें फक्त वाचून पाहतों. आमच्या लेखांत जेवढी राजनिष्ठा पाहिजे तेवढी आपण घालूं; परंतु आम्ही राजनिष्ठेला देशभक्तीहून बलवत्तर होऊं देणार नाहीं.” आणि त्यांचा हाच दृष्टिकोन त्यांच्या तडफदार लेखांत दृष्टोत्पत्तीस आल्यावांचून राहत नाहीं.

१८९७ सालीं मुंबई इलाख्यांत ज्या राजकीय स्वरूपाच्या धामधुमी झाल्या त्यांवर साधकबाधक लिखाण अनेक नियतकालिकांतून

प्रसिद्ध झालें. या लिखाणावर मि. जाइल्स साहेबांनीं एका सरकार-पक्षाच्या इंग्रजी वर्तमानपत्रांत एक भलेंमोठें भाष्य लिहून त्या लिखाणांतील देशभक्तीस साजेल अशा प्रकारच्या मजकुरावर 'राजद्रोहानें प्रेरित झालेला मजकूर'....अशा प्रकारचा आरोप केला; तेव्हां मि. जाइल्स यांच्या अवास्तव विधानांस झणझणीत उत्तर म्हणून लिहिलेल्या लेखांत 'देशभक्ति'विषयीं अत्यंत निःस्पृहपणें त्यांनीं आपले विचार मांडले आहेत.

"आम्हीं आपल्या देशाचा–हिंदुस्थानचा–अभिमान धरूं नये तर कोणाच्या देशाचा धरावा ? दुसऱ्या देशाचा अभिमान आम्हांस मनापासून, वास्तविकपणें कसा बाळगतां येईल ? आम्हीं आपल्या देशाबद्दलचा अभिमान बाळगला तर त्यानें कांहीं राजनिष्ठेला बाध येऊं शकणार नाहीं. दांत पाडून टाकलेल्या सर्पानें मोठी फडी काढली तर त्यांत भिण्यासारखें कांहीं नसतें. आमच्या देशाचा अभिमान आम्हांला असणें अगदीं नैसर्गिक आहे; व तो राजद्रोहाच्या धमकावणीनें कोणालाहि बंद पाडतां यावयाचा नाहीं."

आदर्श देशभक्त कसा असला पाहिजे याविषयीं अण्णासाहेबांचीं मतें आजहि अत्यंत अनुकरणीय ठरतील. एखाद्या देशभक्ताची राष्ट्रीय कामगिरी कितीहि मोलाची असली तरी त्याचें खासगी वर्तन अत्यंत पवित्र व निष्कलंक असणें अतिशय महत्त्वाचें आहे यावर त्यांचा कटाक्ष होता. "एखाद्याच्या अंगांत कितीहि दुर्गुण असूं द्या ! त्यानें नॅशनल कॉंग्रेसमध्यें एखादा ठराव पुढें आणून त्यावर मोठें भाषण केलें, कीं झालाच तो पेट्रियट ( देशभक्त ).... ! खाजगी व सामाजिक दुर्गुण पेट्रियट मंडळीमध्यें अनेक असतात. परस्त्रीसंसर्गानें दूषित झालेला पेट्रियट हा चोर ठरतो; आणि जर तो चोर आहे तर राष्ट्राच्या हिताहिताच्या गोष्टींचा विचार चालला

असतां तेथें बसण्याचा त्याला अधिकार काय बरें ?....सद्गुणाच्या जोरावांचून महत्कृत्य कधींहि होणें नाहीं हा सिद्धान्त कोणीहि विसरतां कामा नये ...."

महात्माजींच्या असहकारितेच्या चळवळींतहि त्यांनीं मोठ्या आस्थेनें भाग घेतला. या गोष्टीकडे स्थूलपणें विचार करणाऱ्यांच्या मनांत 'त्यांनीं आपला ध्येयवादी दृष्टिकोन फिरविला' असा गैर-समज उत्पन्न होणें अगदीं स्वाभाविक आहे. तथापि वस्तुस्थिति मात्र तशी नाहीं. "ज्या बाबीनें रेव्होल्यूशन जवळ येईल ती बाब हातीं घेण्याकरितांच त्यांनीं महात्माजींच्या चळवळीचा अंगिकार केला. 'स्वराज्या'मधून त्यांनीं प्रतिपादन केलेल्या मतांवरून त्यांचा ध्येयवाद उतारवयांतहि किती निश्चित व शाश्वत होता हें स्पष्ट दिसून येईल."

'रूसो'चें तत्त्वज्ञान अण्णासाहेबांना बऱ्याच अंशीं ग्राह्य असलें पाहिजे असें धरून चालल्यास 'राजनीतिशास्त्रां'तील "आपल्यावर जो कोणी राजा राज्य करीत असेल त्याची आज्ञा आपण पाळली पाहिजे या नियमाचा खरा अर्थ, जबरदस्ताच्यापुढें मान वांकविली पाहिजे असाच असेल तर हा नियम चांगला नाहीं. कारण जबरदस्तापुढें मान वांकविली पाहिजे हा नियम असा आहे, कीं तो कोणालाच मोडतां यावयाचा नाहीं. पण जबरदस्ती म्हणजे कांहीं हक्क नव्हे! आणि कायदेशीर हक्कानें निर्माण झालेल्या अधिकाराशिवाय दुसऱ्या कोणत्याहि सभेपुढें आपण आपली मान वांकविण्याला बांधले गेलों नाहीं...." या रूसोच्या शिकवणुकीचा पुरस्कार करण्याकडेच त्यांचा दृष्टिकोन असला पाहिजे असें दिसून येत नाहीं काय ?

अण्णासाहेबांच्या वाङ्मयाचे एक मर्मज्ञ व रसग्राही अभ्यासक प्रो०नरहरपंत फाटक यांनीं त्यांच्या वाङ्मयाला 'तुफानी' ही संज्ञा दिली आहे ती अत्यंत समर्पक आहे. " स्वदेशप्रेम हा अण्णा-साहेबांच्या वाङ्मयाचा प्रमुख विषय आणि प्रमुख रस होता."—यामुळेंच त्यांच्या वाङ्मयीन मतांचें पर्यवसान बहुतेक ठिकाणीं स्वातंत्र्यप्राप्तीची अभिलाषा व्यक्त करण्यांत व्हावें हें साहजिकच होय. चित्रकलेसंबंधीं लिहितांना 'चित्रें ही केवळ डोळ्यांना सुख देण्यासाठीं नाहींत, तर मनाला कांहीं तरी उपदेश करण्यासाठींच आहेत.' हें तत्त्व प्रतिपादन करून चित्रकलेच्याविषयीं अनेक महत्त्वाची माहिती 'चित्रें' या लेखांत उद्धृत केली आहे. आणि शेवटीं अण्णासाहेबांच्या विचारांना, " मन उदात्त करणें हा जर चित्रांचा उपयोग असेल तर साहेब खुर्चीवर बसलेले आणि आपण त्यांच्या खुर्चीमागें उभे राहिलेले असल्या चित्रांनीं मन उदात्त कसें होणार—" अशी कलाटणी मिळाली आहे.

नेहमींच्या व्यवहारांतील साध्यासुध्या गोष्टींतून निघणाऱ्या कल्पनांना स्वातंत्र्यप्रीतीची मुरड घालण्याकडे अण्णासाहेबांचा कसा दृष्टिकोन होता हें वरील उदाहरणावरून दिसून येईल.

अण्णासाहेबांनीं एके ठिकाणीं स्वातंत्र्यप्राप्तीच्या इतिहासांना 'भक्तविजय', 'भक्तलीलामृत' असें म्हटलें आहे आणि त्यांच्या वाङ्-मयीन 'भक्तलीलामृतां'तून स्वराज्यस्थापनेस आवश्यक अशा सर्व प्रकारच्या शिकवणीचें बाळकडू त्यांनीं आपल्या हजारों वाचकांना यथास्थित पाजिलें आहे.

आपल्या वाङ्मयाविषयीं त्यांचीं मतें कशा प्रकारचीं असावीं असें कुतूहल उत्पन्न होणें साहजिक आहे. पुढील उताऱ्यावरून

त्यांचे यासंबंधीं विचार कशा प्रकारचे होते हें कळून येण्यासारखें आहे. “ आमच्या देशांतील स्वराज्य गेल्यामुळें तें परत मिळविण्या-करितां आमच्या वाङ्मयामध्यें हल्लीं क्रान्ति घडून येत चालली आहे, ‘राजा कालस्य कारणम्’ ह्या तत्त्वाचा अंमल आमच्या वाङ्मयांतील प्रत्येक ओळीवर आणि त्या ओळींतील प्रत्येक अक्षरावर होत आहे आणि अशा रितीनें उचंबळलेल्या राष्ट्रीय भावनांच्या दिवसांत भावनाप्रधान कवींच्या भावगीतांतील आणि नाट्यगीतांतील सुंदर लता, आणि त्यांच्यावरील फुललेलीं कोमल फुलें, सतारवाल्यांच्या हातांतील सतारी आणि तुतारी-वाल्यांच्या तोंडांतील तुतार्‍या, हीं सगळीं, हल्लीं स्वातंत्र्य ! स्वातंत्र्य ! म्हणून एकमुखानें चारी दिशांनीं एकच गर्जना करीत आहेत ! पण चांगलें वाङ्मय जास्त कसें निर्माण होईल याबद्दलचें संशोधन आणि संसूचन साहित्यसभांतून झालें पाहिजे.”

आपल्या भाषेप्रमाणेंच मोडी लिपीविषयीं त्यांच्या मनांत कसा प्रखर अभिमान वसत होता हें १९१७ सालीं मुंबई कौन्सिलांत मोडी लिपीच्या संरक्षणाबाबत सुप्रसिद्ध रँ. परांजपे यांनीं जो ठराव मांडला होता त्याला पाठिंबा देण्याच्या उद्देशानें, अण्णासाहेबांचें किर्लोस्कर थिएटरांत भाषण झालें त्यांत दिसून आलें. ते म्हणाले, “ आपल्या राष्ट्रीय लिपीची व आपली गांठ पडून आज ७०० वर्षे वर्षें झालीं. तेव्हां तिची आमची तातातूट होण्याचा योग आला असतां आपणांस दुःख होणें साहजिकच आहे. हा वियोग होऊं नये म्हणून कायदेशीर रीत्या इलाज करणें हें आपलें कर्तव्य ठरतें. मोडी लिपी बंद करण्यांत सरकारचा सोय पाहण्याचा हेतु आहे. मोडी ही जाणूनबुजून कठीण आहे. पण इंग्रजीपेक्षां खास कठीण नाहीं ! मोडीचा कठीणपणा साहेबांना जाणवतो पण

आम्हांला मोडीबद्दल जो खेद होतो तो आमचीं सातशें वर्षांचीं बंधनें तुटूं नयेत म्हणून ! भाषा, लिपी व आचार-विचार यांवर राष्ट्रीय अंतःकरणाची संघटना अवलंबून असते. राष्ट्रीयत्वाचे घटकावयव असे एका पाठीमागून एक तुटूं लागले म्हणून आम्हांला पीळ पडणारच !"

"मराठी भाषेचा भावि काल अण्णासाहेबांना किती उज्ज्वल वाटत होता याची कल्पना पुढील रसरशीत उद्गारांवरून येईल, "मराठी भाषा मरणोन्मुख झालेली नसून ती उत्तरोत्तर उदयोन्मुखच होत चाललेली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या भावार्थदीपिकेपासून तों लो० टिळकांच्या गीतारहस्यापर्यंत ज्या मराठीमध्यें अनेक ओजस्वी ग्रंथ निर्माण झाले आहेत, ज्या भाषेंत रामदासांनीं शिवाजीला स्वधर्मरक्षणाची प्रेरणा केली, ज्या भाषेमध्यें शिवाजीमहाराजांनीं मराठ्यांचें स्वराज्य आणि स्वातंत्र्य प्रस्थापित केलें ती मराठ्यांची भाषा मारण्याकरितां जन्माला आली आहे. मरण्याकरितां नव्हे !"

आपल्या धर्मशास्त्राचा त्यांनीं निर्विकार दृष्टीनें सर्वांगीण अभ्यास करून आपलीं मतें बनविलीं असल्यामुळें, पूर्वजन्म आणि पुनर्जन्म, श्रद्धा, कर्म, माया इत्यादि गहनविषयांसंबंधीं त्यांनीं आपलीं मतें साधकबाधक प्रमाणांचें तौलनिक महत्त्वमापन करूनच ठरविलीं असल्याचें दिसून येतें.

अवतरणांचे अकुंचित क्षेत्राचे साहाय्यानें, अण्णासाहेब यांचीं पारडीं समतोल ठेवणारीं, विचारप्रगल्भ मतें मांडणें हें केव्हांहि आटोक्याबाहेरचें आहे. तत्कालीन राजकारणांतील प्रासंगिक विषयांसंबंधीं त्यांचीं मतें समजून घेऊं इच्छिणाऱ्या जिज्ञासूंनीं ते

लेख मुळांतूनच वाचणें व त्यांचें मनन करणें हें केव्हांहि इष्ट होय. या 'मधाच्या गालबोटा'वरून त्या थोर विभूतीच्या ध्येयवादाचा अभ्यास करण्याची स्फूर्ति आमच्या तरुण वाचकांस झाली तरी पुष्कळच कार्य सफल होईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५४४८

# शिवरामपंत व नरसोपंत

( लें०:—त्र्यंबक गणेश बापट, बी. ए., शिक्षक, भावेस्कूल, पुणें. )

## ( १ ) राजकीय भूमिकांमधील भेद

वाचकांना शंका येईल कीं, या मान्यवरांच्या जोडगोळीवर लेख लिहिण्याचें बंड आज कां उद्भवलें? तात्यांच्या परिणतप्रज्ञ लेखणींतून बाहेर पडलेल्या बॅ. सावरकरांवरील प्रतिभासंपन्न लेखाला मार्गदर्शक करून हा लेख लिहिला आहे. या छोटचा प्रबंधांत या पंडितद्वयांच्या राजकारण, लेखन, वक्तृत्व, अशा त्रिगुणात्मक संसाराची निर्भीड चर्चा केली आहे.

कधींहि न सांपडणारी कार्यकारी उद्योगशक्ति या दोघांमध्यें आहे. 'कामाचा बदल म्हणजे विश्रांति' हें त्यांचें ब्रीदवाक्य; पण, दोघांच्या स्वभावांत जमीनअस्मानाचें अंतर. तात्या विचाराला प्राधान्य देणारे; पण अलीकडच्या कटु अनुभवांमुळें थोडें त्रासिक बनलेले. पंत विकाराला प्राधान्य देणारे; पण शांत हिशोबी. तात्या व्यवहारावर उभे राहतात तर भावनावादी पंत भविष्यावर भराऱ्या मारतात. हुल्लड करून माणसांचें रान उठवावें पंतांनींच.

स्वातंत्र्याकरितां सज्ज असलेल्या समाजाच्या हृदयरूपी डंक्यावर लेखणीची टिपरी टाकण्याचें सामर्थ्य पंतांमध्यें विशेष. समर संपल्यावर तहाच्या अटी मात्र ठरवाव्या केळकरांनींच. तात्यांच्या प्रदीप्त भावनवन्हींतहि विचाराचा ओलावा सांपडतो; पण, पंतांच्या सहज विचारालाहि भावनेची झिलई दिलेली असते !

केळकर सर्व ठिकाणीं आहेत; पण उत्कटत्वानें ते कुठेंहि तळपत नाहींत; पंत थोड्या ठिकाणीं पण उत्कटत्वानें आहेत. पंतांमध्यें तळमळ आहे; पण चौकसपणा कमी ! तात्यांच्या राजकारणांत चौरसपणा आहे; पण तळमळ कमी ! पंत पाल्हाळिक तर तात्या आटपशीर. पंतांचें राजकारण वादळ उठविणारें; पण स्वतःची कातडी संभाळणारें ! तात्या वादळहि उठवीत नाहींत व जीवहि धोक्यांत घालीत नाहींत. पंत गांधींच्या आहारीं गेले; तात्यांनीं स्वत्व राखून गांधींच्या चळवळीचा जेवढा होईल तेवढा उपयोग करून घेतला. साहस करीत नाहींत हा तात्यांचा गुणहि आहे आणि दोषहि आहे. केळकर लिहितात आणि बोलतात त्या वेळीं 'यांपैकीं आपण किती करूं शकूं' हा विचार त्यांच्या मनांत जागृत असतो. पंतांना लिहितांना आणि बोलतांना शक्याशक्यतेचें भान राहत नाहीं. या दृष्टीनें तात्यासाहेब पंतांपेक्षां निःसंशय श्रेष्ठ आहेत.

पंत आधीं ज्वलज्जहाल राष्ट्रभक्त आणि नंतर संपादक ! केळकरांची राष्ट्रभक्ति संपादकीय खुर्चीवर अधिष्ठित झालेली. तारुण्याच्या उन्मादांत केवळ पर्यंकपांडित्य पंतांना विशेष मानवलें नाहीं. साधें पत्राचें उत्तर लिहावयाचें असलें तरी केळकर त्याला अलंकाराची महिरप टाकतील. पंतांना आपली वाढती लोकप्रीति

टिकवितां आली नाहीं. तात्यांच्या काटेतोल संपादन कौशल्यामुळें, त्यांच्याबद्दलचें लोकप्रेम त्यांनीं बरेंचसें टिकवून धरलें आहे. कॉंग्रेसचा अध्यक्ष होण्याची तात्यांची योग्यता आहे; पण उत्तरेच्या दाक्षिण-द्वेषामुळें त्यांना तें पद मिळालें नाहीं. तात्या राजकीय प्रबंधांच्या पंख्यालाहि कोरीव आणि कातीव कलाकुसर करून वाङ्मयाची झालर लावतात तर पंत आपल्या 'दगडी कोळशा'-सारख्या रूक्ष विषयाला किंवा शकुंतलेवरच्या ललितलेखाला सुद्धां राजकारणाच्या पोलादी चौकटींत बसवतात. ललित वाङ्मयांत, नाटकांत आणि कादंबऱ्यांत—ज्यांनीं राज्यपत्राचा आचार संभाळावयाचा ते केळकर लघुकथेंतील तंत्राचा विचार करण्यांत दंग पाहून टिळकांच्या राजकीय परंपरेच्या कित्येक अभिमान्यांना विषाद वाटतो ! पंतांनीं साधेल त्या प्रसंगानें लोकांना स्वातंत्र्याचे घुटके दिले. केवळ लालित्याकरितां म्हणून पंतांनीं फारसें लेखन केलें नाहीं.

## ( २ ) लेखनशैली व वक्तृत्वशैली

राजकारणानंतर या दोन ग्रंथकारांच्या लेखनशैलीवर शोधकिरणांचा प्रकाश पाडून पाहूं. एका निबंधनिष्णातानें वाङ्मयाचे 'स्फूर्तिलेखन' आणि 'ज्ञानलेखन' असे दोन भाग कल्पिले आहेत. शिवरामपंतांच्या दुथडी वाहणाऱ्या लेखनगंगेंत वाचक वाहात जातो; केळकरांचें चौरस लिखाण जीवनाभोंवतीं गुरफटलेले ज्ञानाचे कण प्रत्यहीं टिपून घेत असतें. पंतांचें लिखाण ठरीव पद्धतीचें, पण खोलींत जास्त; तात्यांचें व्यापक, पण खोलींत कमी; दोघांच्याहि लेखांचें घनपरिमाण ( व्हॉल्यूम ) मात्र प्राय: सारखेंच ! पंत वेळेलाच लिहीत; तात्या अवेळीं सुद्धां हुकमी व

चांगलें लिहितात. पंतांच्या लिखाणांत स्पष्टोक्तीचा अभाव, तर तात्यांचें लिखाण प्रासादिक. पंतांची भाषा बुरखा घेतलेल्या काश्मिरी युवतीप्रमाणें ! शरिराला त्वचा त्याप्रमाणें लेखणीला भाषा ! अर्थ व्यक्त करण्याकरितां लेखन करतात; पंत कांहीं वेळीं अर्थ गुप्त ठेवण्याकरितां लेखणी सरसावीत. तात्यांची भाषा देवदर्शनाला निघालेल्या प्रौढ गंभीर महाराष्ट्रीय स्त्रीप्रमाणें आहे.

तात्या आधीं लेखक आणि नंतर वक्ते; पंत आधीं वक्ते आणि नंतर लेखक. तात्यांच्या वक्तृत्वांत ग्रंथकाराचा संयम, तर पंतांच्या ग्रंथांत वक्तृत्वाचा ओघ. पंतांची शैली प्रदीर्घ आणि पल्लेदार; तर तात्यांची आटपशीर आणि सुटसुटीत; पंतांच्या गद्यांतहि काव्याचा विलास तर तात्यांच्या काव्योपहारांतहि प्रसंगीं गद्याचा साधेपणा व तार्किकपणा ! मुक्तेश्वरांप्रमाणें पंतांची भाषा जोमदार आणि मर्मभेदक आहे; अर्थाच्या स्वरूपाप्रमाणें ती आकार धारण करते. तात्यांची भाषा श्रीधराच्या भाषेप्रमाणें बहुजन समाजाला सहज कळेल, अशी आहे.

केळकरांचें शनवारवाड्याचा जीर्णोद्धार करणारें भरदार वाक्य पहा—

" अठराव्या शतकाच्या विशींत बांधलेल्या, एकोणिसाव्या शतकाच्या विशींत नाश पावलेल्या व विसाव्या शतकाच्या विशींत पाये उकरून काढलेल्या या वाड्याला एकविसाव्या शतकाच्या विशींत काय दिसणार आहे, तें परमेश्वराला माहीत ! " हीच कल्पना पंत कशी नटवतील बरें ? प्रतिभेच्या पंखांवर उड्डाण करून, त्यांची तंद्री लागेल. नंतर विकट हास्य करून, छद्मी स्वरानें, वक्रोक्ति आणि व्याजोक्ति अशा टोंकांनीं त्यांची लेखणी कुरकुरूं लागेल, ती कालकन्या त्या शनवावाड्याला म्हणेल—

'हे शनवारवाड्या, तूं शनीप्रमाणें मराठ्यांच्या राशीला लागलास! वास्तविक श्रीवर्धनाच्या धैर्यमेरूंना अंकावर खेळविण्याचें भाग्य तुला लाभलें होतें....' भावनेची शाई सुटून लेखणी पल्लवित झाल्यावर, पंत शनवारवाड्याला डिवचून म्हणतील--'जुनाट पुरुषा, फुकट तुझा जन्म! भेद आपापसांत पाडूं नये, परकीयांत पाडावा, हें राजनीतीचें साधें तत्त्व देखील तुला समजत नाहीं, तेव्हां तुला काय म्हणावें! डोळे मिटल्यावर तूं मला दिसूं लागतोस आणि तुझ्यावर शिबंदीचे लोक गर्दीगर्दीनें चालले आहेत, चौघडे झडत आहेत, भगवीं आणि जरिपटक्याचीं निशाणें जिकडे तिकडे फडकत आहेत, कालभगिनी महांकाळीच्या सरबत्त्या होत आहेत, भालदार, चोपदार, ललकारत आहेत, मंत्री आणि प्रधान मनसुबे करीत आहेत, सैन्यें लढत आहेत आणि राजे विजयश्री मिळवीत आहेत, असे अपूर्व समारंभ जिकडे तिकडे दृग्गोचर होऊं लागतात!'

पंतांचा भाषाविलास संस्कृताभिमुख, तर तात्यांची भाषा महाराष्ट्रीय वळणाची. दोघांचें इंग्रजी सारखेंच असलें तरी इंग्रजीच्या प्रकृतीचा परिणाम त्यांच्या शैलीवर झाला आहे. तात्यांच्या शब्दांचीं नाणीं परिचयाचीं, पण उपयोगामुळें किंचित् घासलेलीं. पंतांचीं नाणीं पिवळींधमक आणि कलदार. पंतांचा खजिना नेहमीं भरलेला. कोणत्याहि राष्ट्रीय दामाजीवर संकट आलें, कीं पंतांच्या कल्पनेचा विठोबा सैरावैरा धांवूं लागतो. तात्यांची लेखणी तोल संभाळून विचार करूं लागते. दामाजी दरवडेखोर आहे काय? बादशहांची परवानगी न घेतां कोठारें मोकळीं केलीं हा त्याचा लहान का होईना पण अपराधच नव्हे काय असे विचार तिच्यापुढें उद्भवतात.

दोघांनाहि शब्दचित्रें रेखाटतां येतात. तात्यांचें शाहिराचें चित्रण पहा-- " बुदलीनें ओतल्या जाणाऱ्या तेलानें पेटणारे हिलाल पाजळत आहेत; रंगीबेरंगी कपडे घातलेले अर्धउघडे लोक गोळा झाले आहेत; पायांत तोडा, डोक्यावर कंगणीदार पगडी व त्यांत तुरा खोंवलेली अशी अर्धगोंधळी, अर्धतमासगीर मंडळी तुण्‌तुणें खेंचून तिसऱ्या सप्तकांत सूर खेंचून गात व साथ करीत आहेत; कडकडीत डफावर डाव्या हाताची टिचकी व उजव्या हाताची थाप मारून त्यांचा पुढारी एकाहून एक सरस असे पोवाडे आठआठवून म्हणत आहे; आणि सर्व श्रोतेमंडळी तल्लीन होऊन तटस्थ झाली आहे."--

या चित्रणांत डफावर थाप पडते; पण डफ कडाडत नाहीं. ठराविक मर्यादेवर तात्यांची लेखणी थांबते; पंत त्या मर्यादेच्या पलीकडे भरारी मारतात. पंतांची शैली श्रद्धा उत्पन्न करते त्यामुळें आपणांस प्रस्थानत्रयीची एकवाक्यता पटून, जुनी पुराणांतरीची गोष्ट नवीन रूपांत सांपडते. मदनाचें दहन झाल्यावर पूर्वजन्म आणि पुनर्जन्म यांबद्दल जिज्ञासा उत्पन्न होऊन, आपलें लक्ष नव्या सृष्टींतील शब्दांच्या वाढीचा इतिहास आणि त्यामधील कारस्थानें यांकडे जातें.

तात्यांचें लेखन अफाट ! सर्व विषयांत लेखणी चालविण्याचा त्यांना हव्यास. त्यांच्या ग्रंथांतील उतारे काढून एक वाचनीय ग्रंथ होईल. विषय आत्मसात् करण्याकरितां तात्या ग्रंथ लिहितात. तो विषय त्यांना कळतो; पण खोलदृष्टीच्या वाचकांच्या मनांत भरत नाहीं. त्यामुळें त्यांचें कांहीं लिखाण कांहीं वाचकांना खर्ड्यासारखें भासतें. पण पंतांचें बहुतेक लिखाण कित्येकांना कित्त्यासारखें भासतें. दोघांच्या भाषेंत खळखळ नाहीं. दोघेहि शब्दांच्या कह्यांत जात नाहींत. तात्यांची भाषा अर्थवती तर पंतांची अर्थवती असूनहि

नादवती. पाठ करण्यासारखे उतारे पंतवाङ्मयांत जास्त. तात्यांची शैली वर्तमानपत्री आहे. पंतांची ओघवती लेखनशैली वर्तमान काळाचे दरवाजे खुले करून, वाचकाला भव्य भविष्याकडे नेते. तात्यांच्या लेखणीचें टोंक एकसारख्या लेखनानें झिजल्यामुळें गुळगुळीत झालें आहे. पंतांची लेखणी उसंत मिळतांच स्फूर्तीच्या-वालुकापत्रावर घासून अणकुचीदार बनते !

ॲडिसन आणि स्विफ्ट यांच्या रचनेची धाटणी अनुक्रमें तात्या व पंत यांच्या लिखाणांत दिसून येते. पंतांजवळ, स्विफ्टजवळ नसलेली काव्याची देणगी होती. ॲडिसन तात्यांप्रमाणें राजकारणी नव्हता. केळकर ॲडिसनप्रमाणें विषयाचें निरीक्षण करतील तर पंत स्विफ्टप्रमाणें चिकित्सेच्या चाकूनें त्याचे वाभाडे काढून सत्त्व-परीक्षण करतील. केळकरांच्या सर्वसंग्राहक न्यायालयांत गेलेला अपराधी हसतमुखानें परत जातो. पंतांच्या विरोधाच्या आणि उपहासाच्या कात्रींत सांपडलेल्या बंदिजनाची एका डोळ्यांत असूं आणि दुसऱ्या डोळ्यांत हसूं अशी अवस्था होते. तात्या कल्पनेचें धागे जमवून त्याचा गोफ विणतात. पंत कल्पनेचें सूत सांपडल्यावर सुतानें स्वर्गाला जातात. तात्यांचे विचार समतोल तर पंतांचे बिनतोल. पंतांच्या गुलगुलीत लेखनशैलींत मांजरीचीं नखें लपलेलीं असतात तर तात्यांनीं, प्रो० पोतदारांच्या म्हणण्याप्रमाणें, केसरीच्या खडतर, नखाग्रांना कलेचीं कांकणें चढविलेलीं दिसतात.

राजकारण आणि लेखनाचें विवरण झाल्यावर वक्तृत्वाची तुलना करून पाहूं. वक्तृत्वाच्या प्रासंगिक परिणामकारित्वांत केळकर परांजप्यांच्या मानानें फारच कमी. सिसरो, डेमॉस्थेनीस आणि नटवक्ता शेरिडन, यांच्याप्रमाणें परांजपे असाधारण वक्ते होते. त्यांच्या आवाजाची पट्टी लहान पण कमावलेली. नामदार शास्त्री

स्वरांचें आंदोलन बारकाव्यानें दाखवितात, गांधींचा आवाज थंड, सुरेंद्रांचे सूर गगनभेदी, पालबाबूंच्या गर्जनेंत पल्लेदार फेक होती, गोखल्यांचें स्वरमाधुर्य अवर्णनीय होतें. जयकरांचा बोल म्हणजे बांसरी, सावरकरांचा कठोर कंठ आवेशदर्शक, रणधीर लालाजींचा आवाज घुमणारा आणि पहाडी, या सर्वांच्या जोडीला बसण्याची पंतांची योग्यता होती.

पंत बोलूं लागले कीं, ऐतिहासिक काळांत प्रवेश करीत आणि म्हणत "यशवंतराव होळकरांची मोहीम यशस्वी होऊन, कर्नल मॉन्सन या इंग्लिश सेनापतीला मराठ्यांच्या सैन्यासमोर हार खाऊन माघारें पळत जावें लागलें." यापुढचीं जळजळीत वाक्यें पहा. "रामदासस्वामींची संघटना ही धर्माच्या पायावर रचलेली होती." "धर्मासारखी जलद पेट घेणारी आणि एकदम धडाका उडवून देणारी दुसरी दारू कोणतीच नाहीं. आपल्या शौर्यावर आपल्या देशाची सत्ता आहे. त्या शौर्याचा आपण बाजारांत पाहिजे त्याच्यापुढें विक्रय करतां कामा नये, हा स्वदेशभक्तीचा पवित्र धर्म होय. आपले पराभव आपल्या नैतिक अधःपातानें घडवून आणलेले आहेत."

पंत म्हणजे वक्तृत्वाचा अवतार. पुणेरी जोडा, चोपीव धोतर, पोपटी जाकिटावर पांढरा स्वच्छ अंगरखा, चाराप्रमाणें खांद्यांवरून शोभणारा उपरण्याचा आंकडा, टपोऱ्या मोत्यांची पाणीदार भिकबाळी, तुळतुळीत घेरेदार डोकें, गोऱ्यापान कपाळपट्टीवर शोभणारे केशरी गंध आणि सोनेरी झिळमिळ्यांची कुसुंबी पगडी,— अशा थाटांत शिवरामपंत बोलूं लागले म्हणजे वाग्देवता त्यांना प्रसन्न होई. आवाजाचा लय कसलेल्या नटालाहि साधणार नाहीं असा नमुनेदार. नादमाधुर्य अशा हळुवारपणानें

वाढवीत कीं, सगळीकडे ऐकूं येईल, पण दुर्लक्ष करून ऐकूं येणार नाहीं. कोळी ज्याप्रमाणें पोटांतून धाग्यावर धागे बाहेर काढतो त्याप्रमाणें पंतांची कल्पना आपल्या पोटांतून घोसदार वाक्यांमधून उपवाक्यें काढते.

लालाजींवर झालेला लाठीमार त्यांनीं दोन तास घोळवला. त्यांच्या व्याख्यानांचे उतारे करतांना लघुलेखकांची तिरपीट उडे. भविष्यदर्शी डोळे श्रोत्यांवर पकड घेऊन सभागृहांत सारखे फिरते राहात. कोट्या, उपहास, वक्रोक्ति आणि व्याजोक्ति यांची खैरात चाले. व्याघ्री ज्याप्रमाणें आपल्या पिलांना अलद सोडते त्याप्रमाणें पंत व्याकरणशुद्ध शब्दांना उच्चारसुलभतेनें बाहेर सोडीत. भाषण अशा वेळीं संपवीत, कीं ज्या वेळीं तें संपूं नये असें वाटे. मोरोपंतांच्या 'झाले बहु होतिल बहु आहेतहि बहु परंतु यासम हा' या आर्यार्धाची या वेळीं आठवण होते. पंतांच्या भाषणांत मुद्दे थोडे, गुद्दे फार. स्वतः शांत राहून ते श्रोत्यांच्या भावना उद्दीपित करीत व प्रतिपक्षावर कोपरखळ्यांचा वर्षाव करीत. केळकरांचें भाषण मुद्देशुद्ध, कोटिबाज, आणि घड्याळाकडे लक्ष देऊन केलेलें. पंतांचें भाषण ऐकतांना घड्याळाकडे लक्षच जात नसे. पंतांच्या प्रभावी वक्तृत्वामुळें श्रोत्यांची ऐतिहासिक समाधि भंग पावत असे, आणि पूर्वीचे उध्वस्त राजवाडे, भंगलेलीं देवालयें, कोसळून पडलेले किल्ले, आणि तुडविलेलीं सिंहासनें श्रोत्यांच्या मनश्चक्षूंसमोर उभीं राहात !

---

# दोन उतारे

———:❀:———

(प्रो. श्रीपाद महादेव माटे, एम्. ए.)

बंगालच्या फाळणीनंतर बंगाल्यांत जबरदस्त मतांतर झालें आणि परांजप्यांना कॉंग्रेसमधून बहिष्कृत करावें असें आपल्या कमिटयांतून ५-७ वर्षांपूर्वींच सुचविणारे लोक बंडखोरीची भाषा बोलूं लागले! मवाळांचे जहाल झाले व जे पूर्वींच जहाल होते ते स्वातंत्र्यवादी बनले. अशांनीं आपल्या नवमताचें प्रतिपादक म्हणून 'वंदे मातरम्' पत्र सुरू केलें व स्वतंत्रतेचीं अत्यंत रसरशीत, तेजस्वी व गंभीर प्रतिपादनें येऊं लागलीं. तीं ज्यांनीं वाचलीं त्यांना वाटलें, कीं हें सर्व मराठी भाषेंत व महाराष्ट्रांत एका स्वातंत्र्योपासकानें पूर्वींच केलेलें आहे. तेंच विचारवैभव, तीच प्रतिभा, तीच गंभीर धर्मबुद्धि, तोच धाडसी बेफिकीरपणा, तेंच भविष्यत्कालाला कवटाळूं पाहणारें चैतन्य, खुद्द आपल्या घरीं शिवरामपंतांनीं आधींच दाखविलें आहे हें पाहून वाचकांना अभिमान वाटला. बंगाल्यांत जे विचार केवळ इंग्रजी जाणणारांनाच वाचतां आले ते येथें खास देशी भाषेंत हजारों लोकांस आधींच वाचतां आले होते. म्हणून महाराष्ट्रानें शुद्ध स्वातंत्र्योपासना ही बंगालपासून घेतली हा जो ध्वनि कोठें कोठें उठविला जातो तो साफ खोटा आहे. महाराष्ट्रांत शुद्ध-स्वातंत्र्याची आवड आणि तिच्या जोपासनेस लागणारा तद्विषयक विचारांचा अखंड पुरवठा आधींच सुरू होता आणि तो कै० शिवरामपंत परांजपे यांनींच केला हें निर्विवाद आहे. केवळ याच स्फूर्तिदायक मंत्राचा मूळ मांत्रिक

कोण म्हणून शोधूं जातां असें दिसून येईल कीं, कै० शिवरामपंत हेच त्या मंत्राचे मांत्रिक होते. या स्वातंत्र्याच्या शिकवणीस जेव्हां केव्हां फळ येणार असेल तें येवो; पण केव्हांहि जरी आलें तरी याचा मूळ पाठ कोणी दिला म्हणून जर पुढील शोधक इतिहासांत उरफाटा प्रवास करील तर त्यास सरकारनें जप्त केलेल्या 'काळा'च्या फायलांत शिरावें लागेल. बंगाल्यांतील स्वातंत्र्यवादी लोकांचें मुखपत्र 'वंदे मातरम्' हें होय. त्याचे मुख्य लेखक जे श्री० अरविंदबाबू त्यांची या बाबतींतील कामगिरी फार मोठी आहे. त्यांच्या विचारांत ओज आणि लेखनांत प्रचंड खळखळाट होता. त्यांनीं कित्येक दिवस स्वातंत्र्यविचारांचा बेसुमार पाऊस पाडला. चालू रटमट जी असेल ती झिडकारून देऊन केवळ शुद्ध स्वातंत्र्यबुद्धीच्या वातावरणांत फिरत राहण्याची त्यांची हौस, तदनुसार धीरोदात्त विचार आणि सर्वांच्याहि वर त्यांची ती सिंधूच्या ओघाप्रमाणें खळबळ करीत आणि घोंघावत रकानेच्या रकाने भरभरून वाहणारी डौलदार व काव्यमय इंग्रजी भाषा, हीं पाहून तरुण पिढींतील लोक केवळ बेहोष होऊन जात असत! पण ज्यांनीं कै० शिवरामपंतांच्या स्वातंत्र्यपोषक वाङ्मयाची त्या वाङ्मयाशीं तुलना केली असेल त्यांस दिसून आलें असेल कीं, एक इंग्रजी भाषा सोडली तर शिवरामपंतांच्या प्रतिपादनांतील विविधता, तात्त्विक गांभीर्य, गुलामगिरीच्या अवमानाची खणती, ऐतिहासिक देशाभिमानाची उत्कटता, काव्याची मनमुराद पेरणी हीं अरविंदांच्या लिहिण्या-पेक्षां निःसंशय श्रेष्ठ होतीं. हेंच शिवरामपंतांचें लिहिणें जर इंग्रजी भाषेंत असतें तर त्यांची प्रसिद्धि आणि लोकप्रियता महाराष्ट्राच्या चतुःसीमा ओलांडून अखिल भारतावर पसरली असती. पण तें झालें नाहीं. त्यांच्या उदात्त कल्पना महाराष्ट्राच्या चतुःसीमेंतच

गुंगत राहिल्या; आणि यामुळें इतर बाजूंच्या राजकारणांतील व समाजकारणांतील पुढारीपणाचा मान जसा महाराष्ट्रास आपल्याकडे ओढतां आला तसा स्वातंत्र्योपासनेच्या गुरुत्वाचा मान, शक्य असून त्याला इकडे आणतां आला नाहीं. पण हा मान जरी महाराष्ट्रास मिळाला नाहीं तरी स्वातंत्र्य-कल्पना लोकांकडून शिकण्याचा प्रसंग मात्र त्याजवर आला नाहीं आणि या गोष्टीचें सर्व श्रेय कै० शिवरामपंत परांजपे यांसच आहे. म्हणून त्यांचें नांव महाराष्ट्राच्या इतिहासांत 'शुद्ध स्वातंत्र्याचा महाराष्ट्रांतील पहिला प्रतिपादक' असेंच लिहिलें जाईल. शिवरामपंतांचा हाच खरा गौरव होय.

**( २ ) लक्ष्मण बळवंत भोपटकर**, एम्. ए., एल्‌ल्. बी.

सन १८५७ सालच्या बंडानंतर महाराष्ट्रांत ज्या थोड्याशा लोकोत्तर व्यक्ति निर्माण झाल्या, त्यांमध्यें कोणीहि दे० भ० अण्णासाहेब परांजपे यांची गणना निःसंशयपणानें करील. सत्तावन सालच्या प्रयत्नांस राज्यकर्ते व त्यांचे बगलबच्चे बंड म्हणून खुशाल म्हणोत; परंतु तो एक स्वातंत्र्यप्राप्तीचा जबरदस्त प्रयत्न होता, व दैवाचा फांसा उलटा पडल्यामुळें, तात्या टोपी, नानासाहेब पेशवे, झांशीवाल्या लक्ष्मीबाईसाहेब इत्यादि वीरांच्या हातांस यशःप्राप्ति झाली नाहीं, आणि हिंदुस्थानच्या मानेवर पारतंत्र्याचें जोखड येऊन बसलें !

या बंडाच्या स्मृतीनें गेल्या पन्नास-साठ वर्षांमध्यें अनेक महाराष्ट्रीय अंतःकरणें प्रस्फुरित झालीं व अद्यापाहि होत आहेत ! बंडाचा नामोच्चार झाल्याबरोबर महाराष्ट्राच्या अंतःकरणांत जी एक विलक्षण खळबळ उडते, तिची यथार्थ कल्पना इतर अंतः-

करणांस होणें शक्य नाहीं! बंडांतील अपयशामुळें, महाराष्ट्रभूच्या डोईवर श्रीशिवाजीमहाराजांनीं चढविलेला स्वराज्याचा मुकुट, आणि पेशव्यांनीं रूपांतरित केलेला व तात्या, नाना आणि राणीसाहेब यांनीं आपल्या तेजस्वी बाहूंनीं सावरून धरलेला तो साम्राज्याचा मुकुट ढांसळून खालीं पडला, आणि दोन-तीन शतकें गर्जत असलेला महाराष्ट्र स्मशानभूमीच्या शांततेंत मग्न झाला!

सत्तावन सालच्या बंडामुळें महाराष्ट्राचें दृश्य साम्राज्य जरी नष्ट झालें, तरी त्याच्या अंतःकरणांत स्फुरणारी स्वातंत्र्याची लालसा मात्र नष्ट झाली नाहीं! ही लालसा अनेक अंतःकरणांतून अनेकविध मार्गांनीं मूर्तस्वरूप घेऊं लागली! वासुदेव बळवंत फडके यांच्या या लालसेनें आचार-परिवर्तनाचें स्वरूप घेतलें, तर दे० भ० अण्णासाहेब परांजपे यांच्या या लालसेनें मत-परिवर्तनाचें स्वरूप प्रकट केलें! हीं स्वरूपें भिन्न भिन्न असलीं, तरी तीं उद्दीपित करणारी भावना व लालसा एकच होती, व ती म्हणजे गमाविलेलें स्वातंत्र्य परत कमाविणें ही होय!

वासुदेव बळवंत फडके यांनीं स्वातंत्र्य कमाविण्याचा आपल्या समजुतीप्रमाणें प्रयत्न केला; पण तो सर्वांच्याच दुर्दैवानें अयशस्वी ठरला; आणि एक स्वातंत्र्यवीर दैवदुर्विपाकामुळें चोर, दरवडेखोर यांच्या दावणींत बांधला गेला! हा प्रयत्न फसो; परंतु त्यानें स्वातंत्र्यप्राप्तीची एक स्पष्ट दिशा दाखवून दिली व या दृष्टीनें वासुदेव बळवंत यांच्या बंडास निःपक्षपाती इतिहासकारास एक विशिष्ट महत्त्व द्यावें लागेल, यांत बिलकुल संशय नाहीं.

वासुदेव बळवंत यांनीं तरुण महाराष्ट्रीय शारीरिक दृष्ट्या बंडखोर बनण्याची स्फूर्ति निर्माण केली, तर दे० भ० अण्णासाहेब

परांजपे यांनीं तरुण महाराष्ट्रीय हार्दिक दृष्ट्या बंडखोर बनण्याची अपूर्व कामगिरी सतत तीस वर्षे केली ! एक आचार-प्रवर्तक होता, तर दुसरा विचार-प्रवर्तक होता; परंतु दोघेहि मनानें व अंतःकरणानें बंडखोरच होते ! दे० भ० अण्णासाहेब यांच्या बहुमोल कामगिरीचें रहस्य यांतच आहे !

सन १८९६ ते १९२९ पर्यंतच्या कालांत अण्णासाहेबांनीं अनेक लेख लिहिले, ग्रंथ निर्माण केले, व्याख्यानें दिलीं व प्रवचनें केलीं. मराठी भाषेवरील त्यांचें प्रभुत्व तर असामान्य होतें. त्यांची प्रतिभा उज्ज्वल व अत्यंत उच्च दर्जाची होती. वाग्देवी तर त्यांच्या-वर सुप्रसन्न असून त्यांच्या मुखावाटे उत्कृष्ट कवित्व व मोहक वक्तृत्व प्रसवीत असे ! पण या सर्वांमधील विशेष हा कीं, त्यांच्या लेखणींतून किंवा जिव्हेंतून स्रवणारा शब्द न् शब्द जाज्वल्य देशभक्तीनें ओथंब-लेला असे ! हजारों श्रोत्यांचा समुदाय चित्राप्रमाणें तटस्थ बसविण्या-चें व तल्लीन करून सोडण्याचें सामर्थ्य त्यांच्या रसनेमध्यें होतें !

ज्या कालांत नुसता स्वराज्य हा शब्द उच्चारण्याचीहि चोरी होती, त्या कालांत स्वराज्याच्या भावनेनें तरुण अंतःकरणें चेत-विण्याची अलौकिक शक्ति त्यांच्यामध्यें होती, व तिचा उपयोग त्यांनीं सढळ हातानें व बिनदिक्कत त्या कार्याकडे केला, व त्या-बद्दल कांहीं दिवस बादशहांचा पाहुणचार खाण्याचा मानहि त्यांना लाभण्याचें चुकलें नाहीं !

अशा प्रकारें बुद्धीनें तेजस्वी व अंतःकरणानें स्वातंत्र्यप्रिय असा एक अस्सल देशभक्त व अनुभविक पुढारी त्या निर्घृण काळानें अचानक उचलून नेल्यामुळें झालेली महाराष्ट्राची हानि भरून येण्यास बराच कालावधि लागेल, यांत मुळींच शंका नाहीं.

“ रत्नाकर.”

# आठवणी

—:०※०:—

## १. दे० भ० तात्यासाहेब केळकर

१८९६–९७ ची गोष्ट. लो० टिळकांनीं सार्वजानिक सभेमार्फत दुष्काळनिवारणाची चळवळ सुरू केली होती. ती सरकारला पसंत न पडल्यानें त्यांनीं चळवळ करणाऱ्या लोकांवर हत्यार धरलें. सार्वजनिक सभेचे एक चिटणीस, कै० प्रो० अच्युतराव साठे, यांच्यावर खटला झाला. त्याची सुनावणी पेण येथें होत असतां टिळकांचा मुक्काम तेथें पडला होता. त्यांच्याबरोबर प्रो० परांजपे व मी गेलों होतों. या वेळीं बाहेरगांवच्या लोकांकडून सभेला व्याख्यानाला जाण्याचीं निमंत्रणें टिळकांकडे येत. तसलें एक निमंत्रण पेणच्या मुक्कामांत आलें. पण टिळकांना जातां येण्यासारखें नव्हतें म्हणून त्यांनीं परांजपे व मी या दोघांना जाण्यास सांगितलें.

हें निमंत्रण कल्याणजवळील टिटवाला या गांवचें होतें व त्यांत "सभेची मोठी तयारी केली आहे, गांवगन्नाचे पुष्कळ लोक येणार आहेत" असें लिहिलें होतें. त्याप्रमाणें आम्ही आधीं पत्र पाठवून पेणहून कल्याणवरून टिटवाला स्टेशनावर सकाळीं दहाचे गाडीला उतरलों.

आमची अपेक्षा अशी होती कीं, स्टेशनावर स्वागत करण्याला गांवची मंडळी आली असतील ! पण एकहि नव्हता ! फार काय त्या गाडीला आम्हां दोघांशिवाय इतर एकहि प्रवासी स्टेशनवर उतरला नाहीं. प्रथम आम्हीं विचार केला कीं, कांहीं वेळ थांबून

दुसऱ्या गाडीनें कल्याणास परत जावें, पण पुनः म्हणालों, कीं कांहीं तरी गैरसमज वा चुकामूक झाल्यामुळें स्टेशनावर कोणी आलें नसेल. तरी गांवांत जावेंच.

मग एक बैलगाडी करून आम्ही टिटवाल्यास गेलों. पण गाडी कोणाच्या दाराशीं उभी करावी? एरवीं कांहीं नाहीं म्हटलें तरी अशा खेडेगांवीं पागोटीं घातलेले दोन 'पुणेरी पाहुणे' आले एवढ्या-मुळें तरी चार लोक जमतील व आमची विचारपूस करतील असें वाटलें होतें. पण कदाचित् प्लेग असल्यामुळें अगर दुष्काळ असल्यामुळें गांव अगदीं उजाड दिसत होता.

शेवटीं आम्हीं गाडीवाल्यास सांगितलें, कीं 'गांवांतील शाळा-मास्तर कोणी असेल त्याच्या घरीं गाडी घेऊन जा.' शोध करतां करतां त्याला तें घर सापडलें. सुदैवानें मास्तर घरीं होते. आम्हां-ला पाहून त्याला अचंबा वाटला. त्यानें अधिकउणें कांहीं न विचारतां त्याच्या दोनखणी घरांत नेऊन आम्हांला बसविलें. पण पाहुणचाराचा पत्ता नाहीं! आम्हींच तोंड धुण्याला पाणी मागून घेतलें. तेव्हां चहाची सोय अर्थातच नाहीं हें लक्षांत येऊन, मास्तर नाहींसें पाहून, आम्हीं एकमेकांची बरीच थट्टा केली. पुढें बारा वाजले तरी यजमान स्नानाला उठा म्हणेनात तेव्हां आम्हां-लाच तोंड उघडून, आम्ही कां, कशाकरितां आलों हें सांगावें लागलें. आणि तो, कांहीं झालें तरी, शाळामास्तर असल्यामुळें व कदाचित् वर्तमानपत्रें वाचणारा असल्यामुळें, आमच्यासारखे पाहुणे अशा कामाकरितां आले हें पाहून एका बाजूनें त्याला सद्भाग्य वाटलें. पण लगेच सरकारी नोकर म्हणून त्याला आमचा पाहुणचार करण्याची भीति वाटूं लागली! तरी त्यानें आपलें सर्व धैर्य एकवटून, "आपण आतां येथेंच राहा. गावांत सभेचा कार्य-

क्रम वगैरे ऐकिवांतहि नाहीं. आज माझ्या घरीं श्राद्ध आहे. परगांवाहून ब्राह्मण येण्याची वाट पाहत आहे. ते आल्यावर चार वाजतां जेवण होईल आणि मग संध्याकाळचे गाडीनें आपण परत जा " असें सांगितलें.

श्राद्धाच्या दिवशीं घरांत जेवणापूर्वीं कोणी कांहीं खात नसतें; मग आम्हांला आमचा यजमान 'कांहीं खा' कसें म्हणणार ? आम्ही आंघोळी करून आलों तरी ब्राह्मण येईनात. तेव्हां त्याची अडचण ओळखून शिवरामपंत मास्तरला हळूच म्हणाले, " आम्ही दोघे गृहस्थ असलों तरी तुमचे ब्राह्मण न आल्यास क्षण घेऊन पाटावर बसूं. तुमची मुळींच अडचण होऊं देणार नाहीं."

पण कांहीं वेळानें ब्राह्मण आले व श्राद्धकर्म सुरू झालें. मग आम्ही उपरणीं पांघरून, कपडे उशाला घेऊन, रिकाम्या पोटीं चांगली दोनअडीच तास झोप काढली. साडेतीन वाजतां उठलों. तोंवर पानें मांडलीं होतीं व चूळ भरून आम्ही जेवावयास बसलों. जेवण कशा प्रकारचें होतें याचें वर्णन करीत नाहीं. भोजन होतांच आम्ही गडबड करून, यजमानांचे आभार मानून, एक गाडी काढून, सामान घालून निघालों. गांवाबाहेर सुमारें एक मैलभर गेल्यावर लांबून कोणी एक मनुष्य, " अहो थांबा, अहो थांबा ", असें म्हणून धांवत येतांना दिसला. आम्हीं गाडी थांबविली. गाडीशीं येतांच त्यानें रस्त्यावर दंडवत घातलें व दोन्ही हातांनीं आपल्या तोंडांत मारून घेऊं लागला. आम्हांला कांहींच अर्थ कळेना. पण मग हुंदके आवरून तो म्हणाला, " मी तुमचा मोठा अपराधी आहें. येथें दुष्काळी चळवळीनिमित्त व्याख्यान देण्याकरितां नामदार टिळकांना बोलावण्याचें पत्र मींच धाडलें. पण तें गांवांत कळल्यापासून माझ्यावर बहिष्कार पडला आहे. गांवांत चार

कुणबी होते ते मुद्दाम आपल्या शेतांवर निघून गेले. सभा करीन तर या देहाशिवाय दुसरा श्रोता तुम्हांला मिळाला नसता. गांव भिऊन गेला. तेव्हां तुम्हांला येऊन भेटून तरी काय करूं ? मला माफ करा."

तेव्हां सर्व मजकूर आमच्या लक्षांत आला. मग शिवराम-पंतांनीं आपल्या मोहक वाणीनें त्याला परोपरीनें आळवून, विनय-शीलतेनें त्याचीच उलट क्षमा मागून, मनधरणी व सांत्वन कसें केलें असेल याची कल्पना शिवरामपंतांच्या खासगी भाषण-शैलीची ज्यांना ओळख असेल त्यांना चांगली येईल.

शिवरामपंतांना मनांत वाटणारा विनोद त्यांच्या तोंडावर इतका सूक्ष्म प्रगट होई, कीं तो त्यांच्या परिचितांनाच उमगा-वयाचा. म्हणून त्या बिचाऱ्या तिऱ्हाइताला तो उमगला नाहीं. शिवरामपंत जें जें बोलत तें तें सर्व खऱ्या मनानें बोलत आहेत असेंच तो समजला. पण मला विनोद पोटांत ठेवतां येत नाहीं; हसूं आल्याशिवाय राहात नाहीं. त्याप्रमाणें तोंडाला पदर लावून मी खूप हसत होतों. शेवटीं या प्रसंगांतून निभावून आम्ही कसे तरी स्टेशनावर गेलों.

पुढें पुण्यास आल्यावर विंचूरकरांच्या वाड्यांत मंडळी जमली व टिळकांपुढें ही सर्व हकिगत शिवरामपंतांनीं सजवून सांगितली, तेव्हां किती हशा पिकला असेल याची कल्पना होईलच. सर-कारला अप्रिय असणाऱ्या चळवळीचा परामर्ष खेडेगांवांत कसा घेतला जातो याचा तो पहिलाच अनुभव तेव्हां आम्हांला आला. तसेंच संध्याकाळीं चार वाजेपर्यंत उपोषण पडल्यानें, दुष्काळग्रस्त लोकांचें दुःख काय असेल याचीहि जाणीव आम्हां शहरवासी पांढरपेशांना झाली.

टिटवाल्याच्या ह्या मोहिमेचें वर्णन अनेक वेळां रसभरित रीतीनें करून शिवरामपंतांनीं आपल्या मित्रांची करमणूक केली. आणि चाळीस वर्षांची गोष्ट, तरीहि पण त्या प्रसंगाची आठवण माझ्या मनावर चांगलीच बिंबली आहे. आमचे एक मित्र कै० हर्डीकर, या दुष्काळी चळवळींत व्याख्यानें देण्याला जाऊन मेजवानीचें अजीर्ण होऊन परत आलेल्या लोकांची नांवनिशी थट्टेनें सांगत ! तेव्हां त्याला उतारा म्हणून आम्हीहि आमचा हा अनुभव मजेनें सांगत असूं.

## ( २ ) डॉ० बाळकृष्ण शिवराम मुंजे

सन १९२१-२२ ची गोष्ट. प्रेम, अहिंसा, Non-co-operation चे युगास प्रारंभ झाल्यानंतर पहिल्यांदा माझी व शिवरामपंतांची मुंबईस सरदारगृहांत भेट झाली. त्या दिवशीं मुंबईस विलायती कपड्यांची होळी महात्माजींच्या अध्यक्षतेखालीं होणार होती. मी कांहीं कामानिमित्त मुंबईस गेलों होतों. मी सरदारगृहाचा जिना चढून वर चाललों होतों व तिकडून अंगरखा, शुभ्र धोतर, खादीची टोपी अशा पोषाखांत अण्णासाहेब खालीं उतरत होते. ह्या वेळेस त्यांनीं घातलेली खादीची टोपी पाहून मी पहिल्यांदा त्यांना क्षणभर ओळखूं शकलों नाहीं व चकित होऊन विचारलें, 'कां अण्णासाहेब, डोक्यावरील पगडी गेली का ? आतां टोपी आली डोक्यावर !" ते हसले व म्हणाले, "आतां युग पालटलें आहे. तुमच्याप्रमाणें आम्हीं inappreciative नाहीं."

मला त्यांच्या या उद्गारांचा फार अचंबा वाटला व धक्का बसला, आणि वाटूं लागलें, कीं खरोखरच युग बदललें आहे कीं

काय ! तो प्रसंग अजूनहि माझ्या डोळ्यांपुढें कायम दिसतो. टिळकांना जाऊन तेव्हां फक्त एकच वर्ष झालें असेल नसेल म्हणून तर मला त्या प्रसंगाचा जास्तच 'शॉक' बसला.

## ( ३ ) दे० भ० शंकरराव देव, अध्यक्ष म. प्रां. काँग्रेस कमिटी

बहुतेक १९२६ साल असावें. स्वराज्यपक्षातर्फें मुंबई प्रांतिक कौन्सिलची निवडणूक लढविली जात होती. कै० अण्णासाहेब परांजपे व मी कौन्सिल-प्रचारासाठीं नगर जिल्ह्यांत दौऱ्यावर होतों. नगर जिल्ह्यांत गोदा व प्रवरा यांचा सुंदर संगम व त्या नद्यांचे कांठीं वसलेलें टोकें गांव हें प्रेक्षणीय व रमणीय स्थान आहे. क्षणभर राजकारणाचा नेहमींचा धक्काबुक्कीचा मामला विसरून त्या रमणीय स्थळाचा आनंद उपभोगण्यांत मी गर्क होऊन गेलों व आमचीं मनें शांत झालीं. त्या सुंदर स्थानींच संगमाच्या कांठावर नाना फडणीस व पेशवे यांनीं आपले वाडे बांधलेले आहेत. आतां आज ते केवळ प्राचीन वैभवाचीं स्मृतिचिन्हें म्हणून अगदीं जीर्णावस्थेंत पाहावयास मिळतात. कै० अण्णासाहेब, मी व बरोबर असलेल्या मंडळींनीं या जीर्ण, परंतु प्राचीन स्वराज्यांतील वैभवाची स्मृति करून देणाऱ्या या चिन्हांचें दर्शन घेतलें व आम्ही संगमाच्या कांठीं येऊन एका उंच बुरुजावर बसलों. पेशव्यांचा हत्ती या बुरुजाखालून पायऱ्या चढून जात असावा. कारण तो इतका भव्य आहे. एक क्षणभर अण्णासाहेबांचा चेहरा अतिशय विकल झालेला दिसला व लागलीच त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. एक क्षणभर, मला अण्णासाहेब शोक कां करतात हें प्रथम समजेना परंतु लागलाच माझ्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. गेलेल्या वैभवाचें स्मरण हें या शोकाचें कारण

आहे हें माझ्या लक्षांत आलें व त्या वेळेपासून अण्णासाहेबांच्याबद्दल माझ्या अंतःकरणांत एक विशेष आदर उत्पन्न झाला. अण्णासाहेबांच्या ठिकाणीं कांहीं दोष नव्हते असें नाहीं. दीर्घ परिचयानें ते मला माहितहि झाले होते. तथापि या प्रसंगानें त्यांच्या अंतःकरणांत सध्यांच्या गुलामगिरीबद्दल वसत असलेला भयंकर तीव्र भाव व स्वातंत्र्याचें प्रेम यांचें मला स्पष्ट दर्शन झालें. जेव्हां जेव्हां कोठेंहि अण्णासाहेबांचें नांव निघतें व स्मरण होतें तेव्हां गोदाप्रवरेच्या संगमाच्या कांठच्या त्या भव्य बुरुजावर स्वराज्यासाठीं शोक करीत असलेली अण्णासाहेबांची करुणमूर्ति माझ्या डोळ्यांपुढें उभी राहते.

## ( ४ ) **श्री० वामन मल्हार जोशी**, एम्. ए.

शिवरामपंतांचीं जीं कांहीं व्याख्यानें मीं ऐकलीं त्यांपैकीं एका शिवाजी-उत्सवाचे प्रसंगीं किर्लोस्कर थिएटरांत झालेलें त्यांचें अत्यंत उपरोधप्रचुर भाषण मला स्मरतें. कद्रू व विनतेची गोष्टच प्रथम त्यांनीं सांगण्यास सुरवात केली. एकदां कद्रू व विनता यांच्यामध्यें आपल्या पतीच्या मिरवणुकीचा घोडा पांढरा आहे कीं काळा आहे याविषयीं मतभेद झाला. विनता हिचें म्हणणें तो पांढरा आहे असें होतें व ते खरेंहि होतें; पण सवतीचें म्हणणें मनाशीं पटलें तरी कद्रू थोडीच कबूल करणार. तिनें तो काळाच आहे असें प्रतिपादिलें. शेवटीं वाद विकोपास जाऊन घोडा पांढरा ठरल्यास कद्रूनें विनतेचें व त्याच्या उलट ठरल्यास विनतेनें कद्रूचें दास्य पत्करावयाचें ठरलें. पुढें आपलें म्हणणें खरें करण्याकरितां कद्रूनें आपले पुत्र सर्प, यांना घोड्यास चावण्याची आज्ञा केली. मातेच्या आज्ञेप्रमाणें सर्पांनीं त्या धवल अश्वास

चावा घेतला व त्यामुळें त्याचा रंग काळाठिक्कर झाला.' ह्या पौराणिक गोष्टीस मोठ्या कौशल्यानें कलाटणी देत देत व शिवाजीच्या उज्ज्वल व धवल चारित्र्याचें आपल्या अमोघ वाणीनें वर्णन करीत करीत, पाश्चात्य इतिहासलेखक शिवाजीच्या शुभ्र कितीस काळिमा फासण्याचा कसा प्रयत्न करतात हें मोठ्या परिणामकारक रीतीनें त्यांनीं प्रतिपादलें. दोन दोन, अडीच अडीच तास श्रोतृवृंदास कह्यांत ठेवण्याची त्यांची कला फक्त एका कै० अच्युतराव कोल्हटकरांशिवाय फारच थोड्या जणांस चांगल्या प्रकारें साधली असेल.

१९२९ सालीं तें हिंगण्यास आमच्या कॉलेजांत व्याख्यान द्यावयास आले असतां स्त्रीशिक्षणाविषयीं त्यांचा ग्रह फारसा प्रतिकूल दिसला नाहीं. 'केवळ पुस्तकी शिक्षणांतून मिळणाऱ्या ज्ञानापेक्षां तेजस्वी बनण्यास शिकविणाऱ्या ज्ञानाचें अध्ययन करा' अशा प्रकारचा उपदेश त्यांनीं विद्यार्थिनींना केला होता.

१९३० सालच्या मडगांव येथील महाराष्ट्र-साहित्य संम्मेलनाचे अध्यक्षीय भाषणांतील शिवरामपंताविषयींचे काव्यमय उद्गार येथें उद्धृत करीत आहे.

ती भव्या मूर्ति गेली, रसिकजनमनो-मोहिनी गेलि वाणी,
गेली ती वक्रभाषा, छलनिरतखलां भेदि जी छद्मवाणी।
गेला तो देशभक्तिप्रचुर—मधुवर्ची, स्फूर्ति दे जो जनाला
संजीवी दास्यरुग्णां, यमसम कुजनां, 'काळ'कर्ताहि गेला॥

**(५) प्रो० नारायण केशव बेहेरे**, एम्. ए., बी. एस्सी., एल्. टी.,
धनतोली, नागपूर

लोकमान्य टिळक व अण्णासाहेब परांजपे या दोघांनाहि १९०६ पर्यंत मीं पाहिलें नव्हतें. परंतु 'केसरी' व 'काळ'

वाचून माझी अशी कल्पना झाली कीं, लोकमान्य सनातनी वृत्तीचें व अण्णासाहेब सुधारकी पंथाचे देशभक्त असावेत. परंतु पुण्याला मीं त्या दोघांची प्रथम भेट घेतली, तेव्हां माझ्या मनावरील भ्रमपटल दूर झालें. लोकमान्यांची सामाजिक सुधारणेला साधारण अनुकूलता दिसली व अण्णासाहेब धर्मनिष्ठ भासले. यासंबंधीं अण्णासाहेबांपाशीं संभाषण चाललें असतांना ते म्हणाले, "टिळकांसारख्या बुद्धि-प्रधान माणसाची धर्मनिष्ठा यथातथाच असावयाची—". टिळकांच्या तुलतेनें अण्णासाहेब स्वतःला मात्र हिंदु धर्माचे व संस्कृतिचे कट्टर अभिमानी समजत असत. त्या वेळीं मी सरासरी सोळा वर्षांचा असल्यामुळें माझ्या मनावर तसा ठसा उमटला खरा! परंतु पुढें काळाच्या ओघांत टिळकांचें धर्मप्रेम तत्त्वनिष्ठ असून अण्णासाहेबांचें धर्मप्रेम रूढिप्रिय असल्याचें अनुभवास आलें. वंगभंगाच्या प्रक्षोभक चळवळीच्या वेळीं मी नागपूरच्या मॉरिस कॉलेजांत शिकत होतों. इंग्रजी 'युगान्तर' व मराठी 'काळ' हीं त्या वेळीं आम्हां विद्यार्थ्यांची अत्यंत आवडतीं वर्तमानपत्रें होतीं. लोकमान्य टिळकांच्याबद्दल मनांत विलक्षण भक्ति असूनहि 'केसरी' 'काळा'पुढें मवाळ व फिका वाटे. 'काळा'चें स्फूर्तिदायक लेख वाचून अंगांत वीरश्री चढे व बाहु स्फुरण पावूं लागत.

मी वयानें लहान असलों तरी ज्ञानानें मोठा होतों. कारण तेव्हां इंटर पास होऊन मी बी. ए.च्या वर्गांत गेलों होतों. श्री० बाळकृष्ण हरि काणे हे त्या वेळीं मॉरिस कॉलेजांतच होते व कॉलेजच्या वसति-गृहांतच राहात असत. वीरेन्द्र घोस व कन्हयालाल दत्त हे दोन तरुण बंगाली विद्यार्थी, स्वदेशी व बहिष्काराचा पुरस्कार करण्याकरितां नागपुरास आले

व मॉरिस कॉलेजांतील वसति-गृहांतच उतरले होते. त्या तीव्र चळवळींत क्रान्ति व गुप्त कटाच्या शक्याशक्यतेबद्दलच्या गोष्टी विद्यार्थ्यांत चालणें स्वाभाविक होतें. त्या वेळीं ते विलायती पद्धतीच्या पण स्वदेशी कपड्यांच्या पोषाखांत नटलेले बंगाली कोवळे तरुण, क्रान्तिकारकांचे पुढारी असतील अशी आम्हां सामान्य विद्यार्थ्यांना कल्पना तरी यावी कशी. पुढें पुण्यास अण्णासाहेबांची गांठ पडली तेव्हां यासंबंधीं बोलणें झालें. ते म्हणाले, " टिळक उत्तम गणिती आहेत. सशस्त्र बंडाला यश मिळण्याचा शेंकडा पन्नास टक्के संभव असला तरी उरलेल्या पन्नास टक्क्यांचा भार ईश्वरावर टाकून त्या कार्यांत मी पुढाकार घेईन असें ते म्हणत असतात. पण अशा हिशेबी गणितानें जगांत आजपर्यंत क्रान्त्या घडून आल्या नाहींत. उत्कट भावना असेल तरच क्रान्ति घडून येईल. क्रान्तिकारकाला हिशेबी होऊन परवडत नाहीं."

* * *

अण्णासाहेबांचें पहिलें सार्वजनिक भाषण मीं ऐकलें तेव्हां पहिलीं पांच-दहा मिनिटें माझ्या मनावर विशेष परिणाम झाला नाहीं. ते महाराष्ट्रांतील नामांकित वक्ते आहेत अशी त्यांची ख्याति मीं ऐकिली होती. परंतु त्यांचें भाषण प्रत्यक्ष ऐकत असतांना प्रारंभीं माझी निराशा झाली. त्यांची शांत, गंभीर व भव्यमूर्ति, तो अंगरखा, ती भिकबाळी, तो संजाबदार घेरा, ती पगडी—या जुन्या हरदासी थाटाच्या पोषाखांत त्यांचें सौंदर्य ओसंडत होतें. 'पुरुषोत्तम' हाच हें मनाला पटलें. भाषेचा गंगौघ शांतपणें वाहत होता. शब्दांमागून शब्द व वाक्यांमागून वाक्यें ! त्यांत खंड नाहीं. अखंड प्रवाह चालू होता. हरिद्वारच्या गंगेचा वेग व खळखळाट

त्या भाषणांत नव्हता; परंतु काशचिं शांत गांभीर्य मात्र विलसत होतें. कापूस पिंजून पिंजून त्याचें रम्य धुकें निर्माण करावें किंवा विरल शुभ्र मेघांनीं आकाश छावून जावें त्याप्रमाणें त्यांच्या भाषणाचा मनावर परिणाम झाला व महासागराचें अमर्याद व स्वातंत्र्यपूर्ण चित्र डोळ्यांपुढें प्रगट झालें. एका गरीब, गांजलेल्या सुंदर परंतु विधवा रमणीच्या चिमुकल्या मूर्तीनें हळूहळू भारतमातेचें रूप धारण केलें. एका लहानशा दगडी शाळिग्रामांतून त्यांच्या शब्दसृष्टीनें शंख-चक्र-गदा-पद्म-धारी भगवान् विष्णूची लक्ष्मीसहित मूर्ति निर्माण केली ! त्यांचें व्याख्यान केव्हां संपलें हें त्या तंद्रींत कळलें देखील नाहीं.

## ( ६ ) श्री० भाऊसाहेब सोमण ( किरात ), बेळगांव.

शाहूनगरवासी नाटक मंडळीनें अण्णासाहेबांचें 'मानाजीराव' नाटक बसविलें होतें. प्रथमप्रयोगाचे वेळीं, मित्रमंडळीच्या गोतावळ्यामुळें अण्णासाहेबांना नाटकगृहाकडे येण्यास पांच-दहा मिनिटें वेळ झाला. 'दर्याबाई'चा वेष घेतलेले बाळाभाऊ जोग, " ते रागावले आहेत काय आमच्यावर ?" असें विचारीत असतांच शिवरामपंत रंगपटांत आले. तेव्हां दर्याबाईचे वेषांत सज्ज झालेले बाळाभाऊ, परांजप्यांच्या एका बाहूस स्पर्श करून म्हणाले, " कां रागावलांत ?" यावर शिवरामपंतांनीं विनोदानें वेळ मारून नेली. दुसरे दिवशीं नाटकासंबंधीं गोष्टी निघाल्या असतां शिवरामपंत म्हणाले, " बाळाभाऊंनीं काल रात्रीं मला स्पर्श करून विचारलें तेव्हां मला कसेंसेंच झालें. मी अगदीं शहारून गेलों !"

* * *

एकदां कोणी तरी एक बोट बुडाल्याची वार्ता परांजपे यांना सांगितली. तेव्हां ते म्हणाले, " बोटींतले हिंदु लोक सगळे बुडाले असतील आणि युरोपियन लोक तेवढे वांचले असतील आणि त्या बोटींतल्या पोस्टाच्या बॅगा पाण्यावर तरंगल्या असतील." या त्यांच्या उद्गारांवरून उपरोधप्रचुर वाणीचा उपयोग ते किती मार्मिकपणें करीत असत हें दिसून येतें.

* * *

बेळगांवीं १९२९ सालीं भरलेल्या साहित्य-सम्मेलनाच्या वेळीं परांजपे हे सरदार्स हायस्कूल होस्टेलच्या एका प्रशस्त खोलींत उतरले होते. त्या वेळीं मी म्हणालों, " आपणांसाठीं स्वतंत्र राहण्याची सोय मीं केली आहे तेव्हां आपण तिकडे राहायला चला." तेव्हां शिवरामपंत म्हणाले, " छेः ! छेः ! इथून मीं आतां हालणें शक्य नाहीं. मला या खोलीकडे पाहिल्यानंतर मी जणूं डेक्कन कॉलेजच्या खोलींतच आहे असें वाटत आहे." इतक्या उतार वयांत सुद्धां विद्यार्थिजीवनांतला मनमुराद आनंद लुटावयाची हौस या उद्गारांत दृग्गोचर होत नाहीं काय ?

**( ७ ) डॉ० विष्णु महादेव भट**, बी.ए., एम.बी.,बी. एस्., येवलें.

दे० भ० अण्णासाहेब परांजपे यांचा व आम्हा नाशिककरांचा ऋणानुबंध पुष्कळच पूर्वींपासून आला होता. नाशिकच्या प्रसिद्ध 'मित्रमेळ्या'चे एक प्रमुख संस्थापक कै० रा० म्हसकर हे 'काळां'त 'चित्रगुप्त' या सहीनें लिहीत असत. 'मित्रमेळा' ही संस्था स्वातंत्र्योन्मुख अशा तरुणांची होती. हिंदुस्थानास शक्य त्या उपायांनीं स्वातंत्र्य मिळविण्याची मित्रमेळ्याच्या सभासदांची प्रतिज्ञा होती. इतर देशांनीं स्वातंत्र्य कसें मिळविलें या विषयावर

दर आठवड्यास त्यांत साधार विवेचन होत असे. स्वातंत्र्य अथवा पूर्ण स्वराज्य हें काँग्रेसचें ध्येय १९२९ मध्यें ठरलें पण मित्र-मेळ्याच्या तरुण सभासदांनीं व अण्णासाहेबांनीं सन १९०० मध्येंच तें ध्येय ठरविलें होतें. नवीन पिढीस हें माहीत असावें म्हणूनच हें येथें नमूद करणें अवश्य वाटतें.

* * *

सन १९०५ मध्येंच असेल, आम्हीं 'मित्रमेळ्या'तर्फे त्यांना गणेशोत्सवास मुद्दाम व्याख्यानासाठीं निमंत्रण दिलें होतें. त्या वेळचीं त्यांचीं व्याख्यानें म्हणजे अमृताची एक यथेच्छ मेजवानी-च होती. नाशिकचा प्रचंड जनसमाज त्यांच्या व्याख्यानांनीं नुसता हुरळून गेला होता. तेव्हांपासून अण्णासाहेबांचा व आमचा संबंध अधिक दृढतर होत गेला.

अण्णासाहेबांची लेखणी व वाणी अत्यंत प्रभावी व तीक्ष्ण पण मन अत्यंत मृदु होतें. त्यांचे चिरंजीव कै० बाळासाहेब सांगत कीं, "'उत्तर रामचरित' शिकवितांना अण्णा ढसढसां रडत असत. एकदां त्यांच्या एका नातेवाइकाची लहान मुलगी कोंकणांत वारली. तिला त्यांनीं पाहिलीहि नव्हती. तरी तिच्या मृत्यूची बातमी ऐकल्यावर अण्णांचे डोळे पाण्यानें भरून आले." इतके ते मनाचे कोवळे व हळवे होते. पुढारीपणाच्या दृष्टीनें हा गुण नसून दुर्गुण होता. म्हणून विजयाच्या भरानें त्यांचें कोवळें मन जितकें उंचावत असे तितकेंच तें पराजयाच्या व संकटाच्या भरानें खालावत असे.

* * *

१९२० नंतर कांहीं वर्षांनीं अण्णासाहेब पूर्णपणें महात्माजींच्या राजकारणाचे आहारीं गेले. प्रथम प्रथम म० गांधींच्या चरक्याची

व सुताच्या राजकारणाची ते टर उडवीत. 'सुतानें स्वराज्य मिळतें तर देवळांत पुराण ऐकून सूत काढणाऱ्या म्हाताऱ्या आजीबाईनींच तें अगोदर मिळाविलें असतें' असें म्हणून ते या 'सुतकी' लोकांची नुसती रेवडी उडवीत. पुढें सत्याग्रहाच्या कार्यक्रमांत ते थोड्याशा हौसेनें शिरले तरी महात्मा गांधींच्या राजकारणानें स्वराज्य मिळेल अशी आशा त्यांना कधींच वाटत नव्हती. एकदां सर्वपक्षाच्या मंडळीसमवेत ते येवल्यास आले असतां ते व मी असे दोघेच फिरावयास गेलों होतों. तेव्हां मीं त्यांना स्पष्टच विचारलें, कीं "तुमच्यासारख्या क्रान्तिकारकांचा या राजकारणावर मुळीं विश्वास बसतोच कसा ?" "माझा त्यावर विश्वास बसत नाहीं पण कांहीं तरी चळवळ करून लोकांची स्वातंत्र्यलालसा जिवंत ठेवणें भाग आहे" असें ते म्हणाले. यावरून उसन्या अवसानानें निराशेचें राजकारण ते खेळत होते असें स्पष्ट म्हणावें लागतें.

पुढें पुढें त्यांच्यांत व माझ्यांत मतभेद उत्पन्न झाला तरी त्यांचा व माझा जिव्हाळा कधीं तुटला नाहीं. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव कै० बाळासाहेब व मी दोघेहि मित्र व समवयस्क असल्यानें त्यांचा व माझा घरोबा अधिकच असे. त्यांच्या बाळाप्रमाणें ते मला लेखीत—

## (८) श्री० विनायक शिवराम परांजपे, वकील

( अण्णासाहेब परांजपे यांचे चिरंजीव )

प्रो० शिवराम महादेव परांजपे हे अण्णासाहेब या टोपणनांवानें खाजगी रितीनें संबोधिले जात असत. आम्ही त्यांना घरीं अण्णा म्हणत असूं. 'बाळक्या' हें अण्णांचें लहानपणचें टोपणनांव. 'बाती' म्हणजे 'बाळक्या'ची आई, आमची आजी. एम् ए.

च्या परीक्षेंत ९०० रुपयाचें बक्षिस त्यांनीं जसेंच्या तसें आपल्या आईला समर्पण केलें. इतकी मायलेकांची एकमेकांबद्दल ओढ होती. पण आईच्या मृत्युसमयीं मायलेकांची गांठ पडली नाहीं. पहिल्या शिक्षेचे वेळीं तुरुंगांत गेल्यापासून त्यांची व आईची गांठ पडली नव्हती. तिच्या मृत्युसमयीं त्यांच्यासारखा वेष करून दुसऱ्या एकाला मातोश्रीच्या समोर उभें केलें, तेव्हां त्या प्रेमळ मातेनें प्राण सोडला. 'बाती'ला सरणावर ठेवून आतां अग्नि देणार इतक्यांत अण्णा स्मशानांत जाऊन पोंहोचले. त्या वेळच्या ती० अण्णांच्या विचारांची व विकारांची थोडीशी कल्पना त्यांच्या 'गोविंदाची गोष्ट' या कादंबरींतील गोविंदाच्या आईच्या मृत्यूच्या वर्णनावरून येऊं शकते.

त्यांचें लग्न महाडजवळच असलेल्या गोरेगांवच्या श्री० गोखले यांच्या मुलीशीं झालें. त्या वेळीं अण्णांचें वय ११।१२ वर्षांचें होतें. त्या वेळीं नवऱ्यामुलाची निवड मोडी अक्षराच्या वळणावरून करीत असत. या 'मुलाला' चांगलें वळणदार अक्षर काढतां येईना, म्हणून तो तेथून रुसून पळून गेला. श्री० गोखले माधवरावांना म्हणाले, " माधवराव, पुरे झाली परीक्षा. मी माझी मुलगी तुमच्या मुलाला देण्याचें ठरविलें आहे. मुलगा मला पसंत आहे." आणि त्याप्रमाणें पुढें हें लग्न झालें.

अण्णांचें अक्षर तसें कांहीं चांगलें नव्हतें. स्वच्छ, स्पष्ट सुवाच्य आणि वळणदार अक्षराबद्दल आम्हांला किती तरी वेळां त्यांच्याकडून 'प्रसाद' मिळालेला आहे. कामाला कारकून ठेवा-वयाचा म्हणजे त्याचें हस्ताक्षर चांगलें असलें पाहिजे अशी त्यांची एक ठराविक अट होती.

रत्नागिरीहून अभ्यासासाठीं पुण्याला आल्यावर अण्णांना सतार वाजविण्याचा नाद लागला होता. महाडहून खुद्द वडीलच जेव्हां पुण्यास आले आणि त्यांनीं अण्णांना पाहिजे होतें त्या शाळेंत जावयाची परवानगी दिली, तेव्हां कोठें गाडी रुळावर आली. पहिल्या जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलरशिपच्या वेळीं, अण्णांना पागोटें, दोन उपरणीं व पुस्तकें बक्षिस मिळालीं. पागोटें व उपरणीं अण्णांनीं आपल्या वडिलांना भेट म्हणून पाठवून दिलीं.

त्यांचे आवडते विषय म्हणजे संस्कृत, इंग्लिश व इतिहास हे होत. रोज कांहीं तरी नवीन शिकण्याचा ते नेहमीं प्रयत्न करीत आणि नव्या विषयाचें वेड लागलें म्हणजे त्यांना दुसरें कांहीं सुचत नसे. खगोलशास्त्रांत अवगाहन करण्याला ते एकदां उद्युक्त झाले. तेव्हां रात्रीच्यारात्री ते आपल्या वाड्याच्या तिसऱ्या मजल्यावर आकाशाकडे टक लावून पाहात बसत. पाली, अर्धमागधी, इंग्रजी भाषांतील ग्रंथ वाचतांना नोट्स टिपल्याशिवाय ते कधींच राहात नसत. अण्णा दिसायला अतिशय गंभीर, कांहींसे उग्र आणि क्रोधिष्ट दिसत. त्यांच्याशीं मनमोकळेपणानें बोलायला कोणीहि बिचकतच असे. बाहेर सार्वजनिक सभांतून तासचे तास अस्खलित बोलत राहणारे आमचे अण्णा घरीं पुष्कळसे घुमेच असत. ते बोलायचे अगदीं बंद झाले म्हणजे रागावले आहेत असें आम्ही समजत असूं. रागाचें कारण आमचें आम्हांलाच शोधून काढावें लागत असे.

व्याख्यानांतून आणि लेखनांतून दिसून येणारी वक्रोक्ति आम्हांला रोजच्या खासगी व्यवहारांत सुद्धां नेहमीं अनुभवास येत असे. पुस्तकाच्या कपाटाचें दार एकदां माझ्या हातून चुकून उघडें राहिलें; तेव्हां अण्णा मला म्हणाले, “ काय रे विनू, पुस्तकांना हवा

लागली म्हणजे त्यांचें आयुष्य जास्त वाढतें काय ?" हा उपरोध माझ्या ध्यानांत चटकन् आला नाहीं, पण दुसऱ्याच क्षणीं झालेली चूक ध्यानांत येऊन मीं कपाटाचें दार झटदिशीं लावून टाकलें.

लहान मुलांत ते फार रंगून जात. आपल्या लहानग्या नातवंडांच्या खेळण्यांत सामील होण्यांत आणि त्यांना शिकविण्यांत अण्णांना फार आनंद होई. शिकविण्याची आवड त्यांना फार आणि आपला विषय शिष्याला समजावून त्याच्या गळीं उतरविण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती.

श्री० कवडेशास्त्री किंवा रामदास गोवर्धनदास यांच्या दुकानांतील खासगी बैठकींतून अण्णांच्या विनोदी कोट्यांना आणि वक्रोक्तींना ऊत येत असे. साध्या माणसाला महाराज 'बनवून' त्याची किती तरी चेष्टा होत असे. असें असलें तरी सहृदयता, रसिकता, प्रेमळपणा, भाविकपणा हे त्यांचे स्वभावविशेष केव्हांहि निदर्शनास येत असत. श्रद्धाळूपणा आणि भाविकपणा तर इतका होता, कीं धार्मिक कृत्य किंवा कथापुराण चालू असलें म्हणजे त्यांचे नेत्र प्रेमाश्रूंनीं भरून येत असत आणि कंठ भक्तिभावानें सद्गदित होत असे. रोज देवाच्याजवळ दिवसाचा कांहीं वेळ घालविल्याशिवाय त्यांना कधींच बरें वाटलें नाहीं.

त्यांना व्यसन कोणत्याच गोष्टीचें नव्हतें. त्यांचा आहार चांगला होता. गोड पदार्थांची मात्र फारच संवय होती. इतकी कीं, जिलबीचा पाक पितांनाहि त्यांना कित्येकांनीं पाहिलें आहे. चहांत साखर घालावयाच्या ऐवजीं साखरेंत चहा घालावा लागत असे. हेंच गोड खाणें त्यांना शेवटीं बाधलें. डायबेटिक-कोमा ( मधुमेह ) होऊन त्यांचें देहावसान झालें. टापटीप, व्यवस्थितपणा, रेखीवपणा हा त्यांच्या स्वभावांतलि विशेष, पावलागणिक

दिसत असे. स्वतःच्या पोषाखांतील नीटनेटकेपणाकडे त्यांचें नेहमीं लक्ष असे. पंगतींतिल रांगोळ्या, मिरवणुकींतिल व्यवस्था, प्रवासाची तयारी अशा साध्या गोष्टींतहि ते लक्ष घालीत.

कधीं कधीं ज्योतिषाच्या फलश्रुतीची चौकशी करीत असत. शुक्रवार हा त्यांचा घातवार होता. त्यामुळें शुक्रवारीं आमच्या इथें विशेष असें कोणतेंहि कार्य होत नसे. एका शुक्रवारीं, 'त्यांत काय आहे ?' असें म्हणून चैत्रांतील हळदीकुंकवाचा समारंभ आरंभिला. त्या वेळीं विजेचे दिवे नव्हते. हंड्याझुंबरांची आरास होत असे. दोन हंड्यांतील जळत्या मेणबत्त्या वांकून हंड्या फुटल्या. आम्हीं सगळीं म्हणायला लागलों, हा घातवार !' अण्णा म्हणाले, " असेल, कदाचित् योगायोगाहि असेल !" असें असलें तरी 'काळ' पत्र मात्र शुक्रवारीं निघत असे. 'स्वराज्य' गुरुवारीं निघे.

सृष्टिसौंदर्याची आवड आमचे अण्णांना फार. पुण्याहून महाडास जेव्हां ते गाडीरस्त्यानें जात असत, तेव्हां सह्याद्रींतून ते मैलचे-मैल पायीं चालत जात. त्यांना चालण्याचा कधींच कंटाळा नसे. 'सह्याद्रीच्या फेऱ्यांत सांपडलेली कल्पनाशक्ति' वगैरेसारख्या लेखांचा जन्म याच सफरींतून झाला असला पाहिजे. 'मराठ्यांच्या लढायांचा इतिहास' ही लेखमाला लिहीत असतां पुण्याजवळील पाटस नांवाचें खेडेगांवीं 'मिलिटरी मॅन्यूव्हर्स' चालू होत्या त्या प्रत्यक्ष पहावयाला मिळाव्यात म्हणून ते पुण्याहून मुद्दाम पाटसला गेले आणि उन्हातान्हांतून मैलचे मैल सैन्याच्या मागून जमीन तुडवीत गेले. यावरून आपल्या आवडत्या विषयाशीं ते किती तदाकार होऊन जात असत हें दिसून येतें. प्रथम प्रथम त्यांना नाटकें पाहण्याचा फार नाद

होता. इतका कीं, पुणें येथील सोशल क्लबाच्या तालमींना सुद्धां ते हजर असत. कै० गणपतराव जोशी यांच्या अभिनयाच्या कला त्यांना आपल्या 'मानाजीरावा'चे वेळीं अगदीं जवळून पाहावयाला मिळाल्या होत्या. आवाजाचा चढउतार, हावभाव वगैरे, वक्तृत्वास आवश्यक असे नाटकी गुण प्रेक्षकांवर छाप पाडण्याच्या दृष्टीनें त्यांनीं नाटकाच्या रंगतालमींतूनच उचलले असले पाहिजेत.

त्यांच्या वक्रोक्तीचें एक मोठें मजेदार उदाहरण येथें देणें अस्थानीं होणार नाहीं. वेळ दुपारची होती. आपल्या नातीला आणि नातवाला अभ्यास करायला अण्णांनीं बसविलें होतें व दुपारचा 'टाइम्स' वाचण्यांत ते गुंतले होते. कांहीं वेळानें अण्णांनीं 'टाइम्सच्या' आडून पाहिलें तों, तीं लहान मुलें एकमेक एकमेकांला वांकुल्या दाखवीत होतीं. आपल्या चेहऱ्यावरील गंभीरता अणुमात्रहि कमी न करतां अण्णा दोघांनाहि म्हणाले, " हं, पाहूं बरं कोणाचीं तोंडं जास्त वांकडीं होतात? कोण जास्ती चांगलं वेडावून दाखवूं शकतों तें!" शब्दांतील मथितार्थ न समजण्याइतकीं लहान, तीं सातआठ वर्षांचीं मुलें, त्यांच्यामध्यें तोंडें वांकडीं करून दाखविण्याची चढाओढच सुरू झाली. नातू, नातीच्यावर ताण करण्यासाठीं तोंड फारच वांकडें करूं लागला. अण्णांच्या चेहऱ्यावरील गांभीर्य मुळींच कमी झालें नव्हतें. एखाद्या पंचाप्रमाणें ते या शर्यतीकडे पाहत होते. शेवटीं नातवानें पराकाष्ठाच चालविलेली पाहून ते म्हणाले, " छट्, नाना, अजून तुझें तोंड सरळच आहे!" नानाच्या ध्यानांत तेव्हां मात्र आलें कीं, अण्णांचें भाषण निराळ्या तऱ्हेचें आहे. तो खजिल होऊन तेथून तडक पळाला. त्या दिवशीं नानानें अण्णांना पुनः तोंड दाखविलें नाहीं!

तोच नातू आणि तेच अण्णा–आपल्या वडिलांच्या ऑफिसमध्यें एकदां दुपारीं नाना एकटाच अभ्यास करीत बसला होता. एकटाच असल्यानें कारकुनाच्या तक्क्याला टेकून आणि समोरील डेस्कावर पाय ताणून नाना अव्यवस्थितपणें अडवारला होता. कांहीं वेळानें तो माडीवरून खालीं आला. आजोबा म्हणाले, " बाळ नाना, इतका अभ्यास लहान मुलांनीं करूं नये ! " " अण्णा आमची परीक्षा जवळ आली आहे ना म्हणून इतका अभ्यास करावा लागतो." " पण नाना, इतका मानेवर खडा ठेवल्यासारखा अभ्यास करायचा ? ईझिचेअरवर तरी बसत जा, म्हणजे मान, पाय, कंबर तरी अवघडणार नाहीं...." आपल्याला अव्यवस्थित बसलेले अण्णांनीं पाहिलें असलें पाहिजे असें मनांत समजून घेऊन नाना लाजला आणि पुन: कधीं तसा बसला नाहीं. सभेंत काय किंवा खासगींत काय व्यवस्थित आणि टापटिपीनें बसण्याबद्दल त्यांचा नेहमीं कटाक्ष असे.

## ( ९ ) कै० गोविंदसुत

(श्री. दत्तात्रय परशुराम चिंचाळकर, बी. ए., एल्एल्. बी. यांच्या कृपेनें )

देशभक्त शिवरामपंत परांजपे व गोविंदसुत दोघेहि अतिशय विनोदी व समवयस्क जिवलग स्नेही. रत्नाकरांतील एका चित्रावरून शिवरामपंतांनीं शृंगाररसात्मक लेख लिहिला होता व त्या लेखावर बरीच प्रतिकूल चर्चा वृत्तपत्रांत येत होती. गोविंदसुत थट्टेनें शिवरामपंतांस म्हणाले, " या वयांत असले शृंगारिक लेख लिहिणें तुम्हांस शोभतें काय ? " यावर शिवरामपंतांनीं उत्तर दिलें, " एकूण तुम्हीहि या वयांत असले लेख वाचतां हें ठीक आहे का ? "

## ( १० ) रामचंद्र विनायक कुलकर्णी उर्फ 'आनंद-वनराम'

### ( तासगांव ) यांच्या रोजनिशींतील उतारा

(बापूभाऊ कुलकर्णी, आजनीकर, शाळामास्तर
तासगांव, यांच्या कृपेनें )

ता. २८–८–२९ शके १८५१

....शिवरामपंत परांजपे आजारी असल्याचें समजलें. तेव्हां त्यांना भेटण्यास गेलों. ऐकूं येत नाहीं व बोलत नाहींत, कान फुटला आहे, ताप आहे, आतां तुम्ही परत जा, असें मंडळींनीं सांगितलें. मी म्हणालों, 'मी एकदां पाहून तरी जातों. मला आंत न्या. मग मला आंत नेलें. तेथें मीं 'झोप लागली आहे काय ?' असें जरा मोठ्यानें म्हटलें. तोंच त्यांनीं तोंडावरचें पांघरूण काढून मजकडे पाहिलें व दोन्ही हात पुढें केले. मी बिछान्यावर गेलों. ते हळूच बोलूं लागले, " शब्दांवरून ओळखून पांघरूण काढलें. आज तेरा दिवस तुमचें स्मरण होत होतें. इच्छापूर्ति झाली. आनंद झाला. कान दुखतो. हात लावा. डॉ. चिपळूणकर कानाचे स्पेशालिस्ट त्यांचें औषध आहे. बरा होईल म्हणतात. काय होईल तें खरें. तापहि दोषी आहे. आपलें दर्शन व भेट झाली उत्तम झालें." असें म्हणून हात जोडले व डोळ्यांतून पाणी काढलें. माझ्याहि डोळ्यांत भरतें आलें. मी त्यांना भेटलों. समाधानाच्या दोन गोष्टी सांगून काना-अंगावरून हात फिरविला. त्यांनीं खुणेनें दुध मागवून साखर घालण्यास सांगून मला घेण्यास सांगितलें. त्यांचेजवळ तेथेंच तें घेतलें. भोजनाबद्दल खुणेनें विचारलें. मी जातों सर्व ठीक झालें आहे, असें म्हणून निरोप घेतला —"

(११) काव्यतीर्थ **काशीनाथ रघुनाथ वैशंपायन**, भालोदा (पूर्व खानदेश)

पूज्य अण्णासाहेब यांस टिळक विद्यालय, येवलें, या संस्थेनें वार्षिक समारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल विनंति केली होती. त्या विनंतीचा स्वीकार करून अण्णासाहेब परांजपे, (श्री० वासुकाका जोशी यांचेसह) ता. १ ऑगस्ट १९२६ रोजीं येवल्यास आले. येवलें येथील टिळक राष्ट्रीय विद्यालयांत लहान मुलांना गीता कशी शिकविली जाते याचा प्रत्यक्ष प्रयोग, गीताशिक्षक श्री० पुराणिक व श्री० वैशंपायन यांनीं दाखविला. त्या वेळीं एका चार वर्षांच्या बालकानें, "धर्मक्षेत्रे, कुरुक्षेत्रे...." असा श्लोक म्हणून संपवितांना पटकन् उडी मारली. गीर्वाण-भाषापटु व महाभारतप्रेमी अण्णासाहेब मनापासून हसले. दुपार-च्या जाहीर भाषणांत ते म्हणाले, "या विद्यालयांत विद्यार्थ्यांना गीता म्हणजे **'युद्धाची भाषा'** शिकविली जाते व मुलें ती शिक-तात ही विशेषता आहे." मुलांनीं रोज व्यायाम करावा असा उपदेश ते करूं लागले; तोंच बापू थत्ते (लक्ष्मण दत्तात्रय थत्ते, हल्लीं सुंदरदास मेडिकल कॉलेज, मुंबई) यानें, "आम्ही रोज १०८ नमस्कार घालतोंच तुम्ही सांगायचे आधीं—" असें म्हटलें. तेव्हां तो प्रतिभावान वक्ता, "शाबास! मी जो उपदेश करतों तो या शाळेंत पूर्णपणें आचरण्यांत येतो हेंच मी पुढें सांगणार होतों, पण उतावळेपणा नसला तर तो विद्यार्थी कसला? ........" असे उद्गारला!

* * *

ता. १ ऑगस्ट १९२६च्या सायंकाळीं ५॥ वाजण्याचे वेळची गोष्ट. येवलें टिळक राष्ट्रीय विद्यालयाच्या वार्षिक समारंभाचे

सन्मान्य पाहुणे म्हणून अण्णासाहेब, गंगाराम छबिलदास थिएटर-मध्यें येऊन दाखल झाले. त्या दिवशीं अण्णासाहेबांस ताप आला असल्यानें श्री० नानासाहेब वाघ यांनीं त्यांना खुर्चीवर बसूनच बोलण्याची विनंति केली. परंतु आपल्या वक्तृत्वांत एका तर्जनी-वांचून इतर कोणत्याहि प्रकारचा अभिनय न करितां सर्व रस प्रक्षोभित करणारा हा असामान्य वक्ता कांहीं बोलला नाहीं; पण भाषण करावयास उभा राहून, "........आपण सर्व वडीलधारी-मंडळी खालीं बसलीं असतांना मी खुर्चीवर बसण्याचा अविनय कसा करूं?" असें बोलून भाषणास प्रारंभ केला. नंतर 'वैशं-पायन' या आडनांवावर मोठी मजेदार कोटि केली. 'हे व्यासाचे शिष्य, महाभारताचे प्रचारक........आगलावे आहेत.' राष्ट्रीय शिक्षणावर मोठे मार्मिक विचार त्यांनीं विनोदात्मक शब्दांत प्रकट केले. त्यांपैकीं एक-दोन वाक्यें स्मरतात, "प्रल्हादाची एक शाळा होती, हिरण्यकशिपूचीहि एक शाळा होती........ सरकारची शाळा होती, विष्णुशास्त्र्यांची एक शाळा होती. दोन्हीहि शाळांत इतिहास शिकवीत. विष्णुशास्त्र्यांचे शाळेंत मुलां-मध्यें वीर्य उत्पन्न व्हावें म्हणून इतिहास शिकवीत तर सरकारी शाळेंत मुलांचें हृदयांत क्लैब्याचा संचार व्हावा म्हणून इतिहास शिकवीत...."

* * *

नोव्हेंबर १९२८ मध्यें नेहरू-रिपोर्टाचे प्रचारासाठीं निघा-लेल्या सर्वपक्षीय दौऱ्यांत अण्णासाहेबहि होते. येवलें येथें हा सर्वपक्षीय दौरा आला त्या वेळीं त्यांत आपल्या फाटक्या छत्रीची काळजी घेणाऱ्या कुलपति नानासाहेब वैद्यांपासून तों राजकारणांत

आपला एक बाप टिळक; दुसरा आपल्याला माहीत नाहीं' असें म्हणणाऱ्या वपुश्रीमान नारायणराव गुंजाळांपर्यंत सर्व प्रकारचे लोक होते. रात्रीं सभेचे आधीं टिळक विद्यालयांत थाटाची मेजवानी होती. सर्वांना चांदीचीं ताटें मांडलीं होतीं. लोणकढें तूप होतें. अण्णासाहेब चांदीच्या ताटांकडे पाहून म्हणतात, " दुसरा बाजीराव अद्यापि जिवंत आहे यांत संशय नाहीं." नानासाहेब वैद्य 'हा:, हा:, हा: ! करून' हसले व म्हणतात, " अण्णासाहेब, अहो तूप घ्या. लोणकढें आहे. गोळेच्या गोळे खा. हा: हा: हा: हा:ऽ!" अण्णासाहेब वक्त्याचें गांभीर्य आणून संस्कृतप्रमाणें शब्दांचा उच्चार करीत म्हणाले, " मला नको, मला बाधेल." लगेच नानासाहेब उत्तरले, " तुम्हां पोरांना बाधेल मग आम्हां म्हाताऱ्यांना फारच त्रास होणार हा: हा: हा: हाऽऽ!"

विद्वद्वर्यपूज्य नरसोपंत केळकरादिक सगळी मंडळी हास्यांत सामील झाली.

रात्रीं सभेंत भाषणें झालीं. सर्व पक्षांचीं माणसें यांत आहेत असें प्रत्येक वक्त्यानें सांगितलें. पण त्या दिवशीं कोणी मुसलमान नव्हता ही मार्मिक गोष्ट अभिजात वक्ते अण्णासाहेब यांच्याच फक्त लक्षांत आली. म्हणून त्या दिवशीं त्यांनीं आपल्या भाषणास 'विचित्र प्रारंभ' केला, " ....ते आज इथें नाहींत. ते आमच्याबरोबर जळगांवपर्यंत होते. ते वृद्ध गृहस्थ आहेत, त्यांना दाढीमिशा आहेत........ते जळगांवचे राहणारे आहेत. ते मुसलमान आहेत...." श्रोत्यांचें कुतूहल इतकें वाढविल्यावर मग ते म्हणाले, " त्यांचें नांव मीरशुकुला...." श्रोतृवृंदांत प्रचंड हशा पिकला.

(१२) श्री० नीलकंठ शंकर नवरे, बी.ए.(ऑनर्स), बी.टी., सोलापूर

आम्ही शाळा-कॉलेजांत असतांना जर आम्हांस कोणाचें व्याख्यान प्रिय असेल तर तें शिवरामपंतांचेंच ! पुण्याच्या गणेशोत्सवांतलि व्याख्यानमालेस प्रारंभ व्हावयाचा तो त्यांच्याच व्याख्यानानें. तें व्हावयाचें सोमवार पेठेंतील नागेश्वराचे देवालयांत. वेळ सायंकाळीं सहाची. आम्ही विद्यार्थिगण ५॥ वाजतां शाळा सुटल्यावर तिकडे धांवत जात असूं. १९१२ सालचे उत्सवांत त्यांनीं 'नह्यसत्यात् परोधर्मः' या विषयावर व्याख्यान दिलें. ते म्हणाले, " सत्याचा जगांत झालेला विजय असत्याला खपेना; म्हणून तें एका शास्त्रीबुवाकडे गेलें व म्हणालें, " न हि सत्यात् परोधर्मः " हें चरण बदलून टाका. तुम्हांला एक शालजोडी देऊं." शास्त्रीबोवांनीं 'नह्यसत्यात् परोधर्मः' असा 'अ' मध्यें घुसडून चरण जणूं काय जुनाच आहे असा करून दिला. असत्याचा आनंद गगनांत मावेना. जिकडे तिकडे विजयश्री त्याला माळ घालूं लागली. सत्याला समुद्रांत बुडविण्यांत आलें पण Truth will be out या न्यायानें तें बाहेर आल्याखेरीज राहत नसे. सत्याचा कडेलोट केला तरी तें प्रल्हादाप्रमाणें जिवंत राहिलें. सत्याला सप्तपाताळांत गाडलें तरी तें तेथून सुद्धां वर आलें....इ."

* * *

शिवरामपंत पहिल्या कारावासांतून परत आले तेव्हां त्यांनीं म्हटलेलें, 'एक इंग्लिश कवीचें, पुढील वचन व त्यावरील भाष्य अद्यापि पुष्कळांच्या कर्णरंध्रांत घुमत आहे !

Stone walls do not a prison make
Nor iron bars a cage ;

Minds innocent and quiet
Take that for a hermitage.

* * *

लकडीपुलालगतच्या विठ्ठलमंदिरांत १९१५ सालीं शिवजयंती-निमित्त झालेल्या व्याख्यानांत ‘शिवाजीचा दासबोध’ यावर बोलतांना “समर्थांचा दासबोध आपण वाचला असेल पण ‘शिवाजीचा दासबोध’ कोणी वाचला आहे काय?” अशी श्रोत्यांना पृच्छा करून ते म्हणाले, ‘शिवाजीचा दासबोध’ जरी अलिखित ( Unwritten ) असला तरी त्यांतील पुष्कळ ‘समास’ आपणांस पुण्याच्या आसमंतात् आणि महाराष्ट्रांत सर्वत्र तिखुरलेले आढळतील. येथून १५-२० मैलांवर असलेला ‘सिंहगड’ समास आपण पाहिला नाहीं काय? ‘रायगड’ समास आपणांस काय सांगत आहे?....”

लोकमान्यांच्या निधनानंतर झालेल्या त्यांच्या एका व्याख्यानांत ते म्हणाले, “लोकमान्य गेले पण त्यांचे गुण पाठीमागें आहेत, त्यांना आपण अटकाव केला पाहिजे. नाहींतर हे Father of Indian Unrest वरती चळवळ करतील आणि परमेश्वराशीं भांडून मला येथें लवकर कां आणिलें म्हणून त्याला विचारतील. लोकमान्यांच्या जाण्यानें परलोकाचाच काय तो फायदा झाला आहे.”

१९१५-१६ सालीं कै० ज. वि. ओक, यांच्या ‘लोकशिक्षण’ मासिकांत इतिहासाचार्य कै० विसुभाऊ राजवाडे यांनीं गेल्या ५० वर्षांतील कर्त्या पुरुषांची यादी दिली होती. तींत एकेका पुरुषाचें वैशिष्टयदर्शक असें एक एक विशेषण त्याचें नांवापुढें जोडलें होतें. त्यांत ‘वक्रोक्तिकुशल लेखक व वक्ता’ असें शिवरामपंतांचें यथार्थ वर्णन केलेलें होतें.

## ( १३ ) श्री० गो. शि. लिमये, मुंबई.

अत्यंत लहानशी गोष्ट पण कै० अण्णासाहेबांचें अंत:करण किती मोठें होतें याची कल्पना ही लहानशी गोष्ट आणून देईल. कै० अण्णासाहेबांचे कनिष्ठ चिरंजीव रा० विनायकराव परांजपे चार-सहा दिवस मुंबईस तापानें आजारी होते. अशा वेळीं त्यांचे खोलींत त्यांची शुश्रूषा करण्यास कोणी नाहीं म्हणून मी त्यांची काळजी घेत होतों. शेवटीं मी त्यांना म्हणालों, " पुण्यास नेऊन मी तुम्हांला तुमच्या मंडळींत व आईबापांच्या व्यवस्थेखालीं पोंहोचवितों." ते कबूल झाले. सेकंड क्लासनें मी त्यांना पुण्यास घेऊन गेलों. त्या वेळीं त्यांच्या वडिलांना व मातोश्रींना जे कांहीं वाटलें असेल तें मला शब्दानें सांगतां येत नाहीं. या आजारांत विनायकरावांचा पुनर्जन्मच झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. मीं विनायकरावांना पुण्यास पोंहोचाविलें नसतें तर कांहीं कमीजास्त झालें असतें अशा हळव्या कल्पनेस महत्त्व देऊन आपल्या कोमल अंत:करणाची साक्ष त्यांनीं पटविली. आपल्या मृत्यूपर्यंत अण्णासाहेबांनीं माझी विचारपूस पुत्रप्रेमानें केली. ज्यांचा माझा साऱ्या जन्मांत मुळींच परिचय कदाचित् झाला नसता तो अशा या अकल्पित योगायोगानें लाभला हें मी माझें सद्भाग्य समजतों.

## ( १४ ) श्री० व्यंकटेश विष्णु वैद्य, गोमंतक.

सन १९१९ सालीं मडगांव येथील सरस्वती उत्सवांत व्याख्यानें देण्याकरितां द० भ० परांजपे हे गोमंतकीयांच्या अत्याग्रहाच्या निमंत्रणावरून आले होते. पहिल्या दिवशीं दामोदर विद्याभुवनांत त्यांचें भाषण झाल्यावर दुसऱ्या दिवशीं आम्हीं कांहीं तरुण मंडळी मुद्दाम त्यांच्या भेटीस गेलों. आम्हीं त्यांस म्हटलें, " गोमंतकाला

स्वराज्य ( Autonomy ) मिळालें आहे अशी तुमची जी समजूत करून दिली गेली आहे तशी वस्तुस्थिति नाहीं. पोर्तुगीज सरकारनें आम्हांस दिलेले स्वराज्याचे हक्क केवळ तकलुपी आहेत ! ”

तेव्हां ते हसून म्हणाले, “ स्वराज्य ही इतकी मौल्यवान चीज आहे, कीं ती परकीय राज्यकर्त्यांकडून आपखुषीनें प्रजेला मिळणें अगदीं दुर्घट आहे. स्वराज्य हें राज्यकर्त्यांकडून घ्यावें लागतें आणि तसें घेतलें तरच तें टिकतें. पोर्तुगिज सरकारनें कृपावंत होऊन गोमंतकाला स्वराज्याचे हक्क दिले आहेत असें जेव्हां आम्हांला सांगितलें गेलें तेव्हांच त्यांत कांहीं भरींवपणा नाहीं असें आम्हांला वाटलें होतें ! ”

पुढें ते म्हणाले, “ तुम्हांला स्वराज्य मिळालें असो अगर नसो, लष्करी शिक्षण मिळण्याची तरी तुम्हांला सर्रास सोय आहे ना ? बस्स् ! लष्करी शिक्षण हीच स्वराज्याची पहिली आणि शेवटची पायरी आहे. ज्या लोकांचें लष्कर तेच देशाचे मालक. तुम्ही गोमंतकीय तरुणांनीं या संधीचा जरूर फायदा घेतला पाहिजे. स्वराज्य मिळविणें हें कठीणच; पण त्याहिपेक्षां स्वराज्याचें रक्षण करणें जास्त कठीण आहे. प्रत्येक गोमंतकीय तरुण येत्या दहा वर्षांत लष्करी शिक्षणांत पारंगत झाला पाहिजे हें ध्येय तुम्ही मनाशीं बाळगा आणि त्याप्रमाणें कृति करा, कीं यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें तुम्हांला जिकडे तिकडे स्थित्यंतर दिसून येतें कीं नाहीं तें पहा !”

पुढें गोमंतकांतील राण्यांच्या बंडाविषयीं गोष्टी निघाल्या तेव्हां ते म्हणाले, “ राणे हे दरवडेखोर असोत किंवा क्रान्तिकारक असोत. त्यांनीं गोमंतकाचें क्षात्रतेज जागृत ठेवलें यांत संशय नाहीं. गेल्या चारशें वर्षांतील गोमंतकाच्या इतिहासाचें सिंहा-

वलोकन केल्यास असें दिसून येतें, कीं ज्यांत युद्ध किंवा बंड झालें नाहीं असें एक पावशतकहि गेलें नाहीं हेंच आम्ही स्वराज्याच्या पात्रतेचें लक्षण समजतों. ज्या राष्ट्राच्या हातांतून तलवार गळली तें राष्ट्र कायमचें पारतंत्र्यांत गाडलें गेलें असें समजावें. तुमच्या हातांतील हत्यार हिसकून घेतलें गेलें नाहीं हें तुम्हीं आपलें भाग्य समजा ! ”

गोमंतकांतील ग्रामसंस्थांविषयीं बोलणें निघालें तेव्हां ते म्हणाले, “ भारतांतील प्राचीन ग्रामसंस्था इंग्रजांनीं नष्ट केल्या, पण गोमंतकांत त्या सर्वत्र विद्यमान आहेत. ग्रामसंस्थांचा व्यवहार सुरळीत रितीनें चालतो त्या प्रांतांतील लोकांना स्वातंत्र्याच्या मूलतत्त्वाविषयीं आम्हीं तें काय सांगावयाचें ? ब्रिटिश भारतांतील लोकांनीं तुमच्यापासूनच स्वराज्याचे धडे घेतले पाहिजेत. ‘एक-मेकांस साहाय्य करूं अवघे धरूं सुपंथ’ या न्यायानें तुमच्यांत जें कांहीं उणें आहे तें आम्ही भरून काढूं आणि आमच्यांतील उणीव तुम्ही भरून काढा. आमच्या तिकडे गोमंतकाची कीर्ति(!) ‘भलत्याच’ बाबतींत आहे. ‘दृष्टि तशी सृष्टि’ ही म्हण अगदीं सार्थ आहे. फ्रान्सांत जाऊन फ्रेंचांच्या स्वातंत्र्यवृत्तीचें, औद्योगिक संशोधनांचें, शास्त्रीय विद्यामंदिरांचें परिशीलन न करतां एखादा गृहस्थ पॅरिसमधील वेश्यागृहांचें दर्शन घेऊं लागला तर दोष कोणाचा ! ”

## ( १५ ) **श्री० विश्वनाथ बापु जोशी,** बी. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट, पुणें.

सुमारें ४३ वर्षें जाहलीं. मी डेक्कन कॉलेजांत प्रीव्हियसचे वर्गांत होतों व अण्णासाहेब त्या वेळीं फेलो होते. श्रावण महिन्यांत

प्रि० वामन शिवराम आपटे परलोकवासी झाले त्या दिवशीं मी ११॥ चे सुमारास कॉलेजांत गेलों. त्या वेळीं अण्णासाहेब मोठ्या चिंतातुर स्थितींत गांवांतून येणाऱ्या लोकांची वाट पाहत कॉलेजांतील भव्य कमानींत उभे होते. मला पाहतांच त्यांनीं विचारलें, " काय हो, गांवांतून आलांत ना, तर प्रि० आपटे यांची प्रकृति कशी काय आहे ? " मीं सांगितलें, " ते सकाळींच परलोकवासी जाहले. प्रेतयात्रा सुमारें एक वाजतां निघणार आहे." हे शब्द ऐकतांच अण्णासाहेबांना रडण्याचा उमाळा येऊन त्यांचे डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले व ते त्यांनीं आपल्या अंगरख्याचे टोंकास पुसले व म्हणाले, " आमचे गुरु गेले; मोठा वाईट प्रसंग आला ! " नंतर त्यांनीं त्या वेळचे प्रि० सेल्बीसाहेब यांस भेटून स्मशानयात्रेस सर्व विद्यार्थ्यांकरितां परवानगी मिळविली व शक्य तितके विद्यार्थी बरोबर घेऊन अण्णासाहेब परस्पर ओंकारेश्वरावर गेले. वाटेनें गुरूबद्दल त्यांनीं आपलें उत्कट प्रेम वरचेवर दाखविलें. मधूनमधून त्यांस दुःखाचे उसासे येतच असत. शेवटीं प्रेतदहनानंतर ते कॉलेजांत परत गेले तरी हुंदके फारसे बंद झाले नव्हते !

## ( १६ ) श्री० य. ए. नांदेडकर, एम्. ए.

१९२८ सालची गोष्ट. न्यू पूना कॉलेजचा व्याख्यानाचा दिवाणखाना विद्यार्थ्यांनीं फुलून गेला होता. शिवरामपंतांसारखा अप्रतिम रसाळ वक्ता, लक्ष्मणशास्त्री लेले यांच्यासारखा रसिक अध्यक्ष आणि शाकुन्तल नाटकासारखा विषय, असा योग आल्यावर व्याख्यानास गर्दी कां होणार नाहीं ? व्याख्यात्यांनीं आपल्या मधुर वाणीनें दीड तासपर्यंत सदहू विषयाचें प्रतिपादन केलें. त्यांनीं सांगितलें कीं, 'कालिदासाला शाकुन्तलाच्या द्वारें जनतेला

बोध करावयाचा आहे. उदाहरणार्थ पहिल्याच अंकांत हरणावर बाण सोडीत असतां दोन ऋषि त्याचा निषेध करतात. यावरून अनाथ व निरपराध जिवांची हत्या करणें चांगलें नव्हे असें कालिदासानें जनतेला सांगितलें. पांचव्या अंकांत राजेलोक कसे निष्ठुर असतात हें दाखवून सुखाचा संसार कसा करावा याचें चित्र सातव्या अंकांत रेखाटलेलें आहे. अशा तऱ्हेनें केवळ निरुपाधिक आनंदासाठीं हें नाटक कालिदासानें लिहिलें नसून त्याला कांहीं एक शिकवणूक जनतेला द्यावयाची होती.' वक्त्याच्या ओघवती वाणीबरोबर सर्व श्रोतृवंद वाहून गेला. सभा चित्रासारखी तटस्थ बसली होती. व्याख्यान संपलें. अध्यक्षांचा मतभेद झाल्यानें श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांनीं आपलें म्हणणें मांडलें.

एकदां प्रो० द. वा. पोतदार यांच्या घरीं शिवरामपंतांच्या व्याख्यानाबद्दल विषय निघाला तेव्हां ते म्हणाले, " अहो! त्यांचीं हीं शेवटचीं व्याख्यानें म्हणजे थंड झालेला विस्तव! त्यांचीं खरीं व्याख्यानें १९०० च्या सुमारासच झालीं. त्या वेळीं आम्ही तरुण मंडळी शिवरामपंतांचें व्याख्यान म्हटलें, कीं हटकून जात असूं. त्यांना विषय लागत नसे. प्रत्यक्ष व्याख्यानांत श्रोते तल्लीन होत; पण घरीं जातांना जो विचार करावा, कीं व्याख्यात्यानें 'काय सांगितलें?' तर 'कांहीं नाहीं.' असो. मला जेव्हां जेव्हां 'शाकुन्तल' वाचण्याचा अगर शिकविण्याचा प्रसंग येतो तेव्हां तेव्हां मला शिवरामपंतांच्या व्याख्यानाची आठवण होतें व मीं मनाशीं म्हणतों कीं, "काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम्."

## ( १७ ) श्री० 'शंकरसुत' वाडिया कॉलेज, पुणें

१९२७ सालची गोष्ट. आमच्या 'प्रभाकर' या हस्तलिखिताचा खास अंक निघाला होता. त्यावर अभिप्राय घेण्याकरितां मी अण्णासाहेबांस भेटण्यास गेलों होतों. 'रामदास आणि दासबोध' या लेखाचे प्रारंभीं त्यांचे 'काळा'तील एक अवतरण घातलें होतें तें असें, "दासबोध हें नांव रामदासांनीं आपल्या ग्रंथाला कोणत्या उद्देशानें ठेविलें असेल तें असो—परंतु दासबोधांत जीं निरनिराळीं प्रकरणें आहेत त्यांना अनुलक्षून 'दास म्हणजे गुलाम झालेले लोक, त्यांना केलेला बोध' असा अर्थ केल्यास अगदींच गैरवाजवी होणार नाहीं. गुलाम झालेल्या लोकांनीं आपल्या गुलामगिरीच्या पाशांतून कसें मोकळें व्हावें याविषयीं बोध या ग्रंथांत खरोखरच सांगितला आहे....." हा उतारा वाचून ते म्हणाले, "तुमच्यासारखीं शाळेंतलीं मुलें काळांतील लेख वाचून असल्या वयांत साहित्याची सेवा करतात हें पाहून मला मोठा आनंद वाटतो. याच अंकांतील, "उठा तरुण तोडण्या भरत-भूमिच्या शृंखला । स्मरा टिळक बोल ते, 'खल बना तुम्ही हो खला' या दोन ओळी त्यांना अतिशय आवडल्या. त्यांचें देहावसान झालें. त्या वेळीं मी इंग्रजी पांचव्या इयत्तेंत होतों. त्या पुण्यात्म्याचें अंत्यदर्शन घेऊन आल्यावर, शोकग्रस्त झालेल्या माझ्या मनांतून उद्भवलेल्या अनेक कल्पना, त्याच दिवशीं काव्यरूपानें बाहेर पडल्या.

शिक्का मारुनि देशदास असला दावोनि कीर्तिप्रभा ।
वक्ता उत्तम लोपला म्हणुनिया आपत्ति देशावर ॥

राष्ट्राची करण्यास उन्नति खरी पाजोनि ज्ञानामृत ।
मर्दाला चढवी नवी स्फुरणता त्याचा यशोचंद्रभा ॥
मातेला मिळवावयास झटला स्वातंत्र्य 'काळा' त ते ।
हानी हो अति कोहिनूर जणुं हा जातां लया आमुचा ॥
देवा ! कां नरकेसरी लवकरी घेवोनि तूं जातहि ।
वर्षोवर्षिं हिरे कितीक गळले ठावें तुला ईश्वरा ॥
पर्वा ना परक्यांस देत असतां त्या लेखणीनें शह ।
रांगाया शिकवीत बाल, तरुणा साहित्यगाड्यावर ॥
जन्मा येउनिया परां जपतसे शांती दयेचा नृप ।
पेशा सद्गुण पाहिजे युवक हो त्यांचा सदा पाळिला ॥

## ( १८ ) श्री० जयदेव कुलकर्णी, बेळगांव

लो० टिळक व अण्णासाहेब पुणें म्युनिसिपालिटीचे मेंबर असतांना एकदां कमिशनरसाहेबांकडून एक खलिता चीफ ऑफिसरांकडे आला. या खलित्यांत कांहीं सार्वजनिक उत्सवासंबंधीं साधकबाधक मजकूर असल्याचें टिळक-अण्णासाहेबांस समजलें. तेव्हां वर्तमानपत्रकार या नात्यानें त्यांनीं त्यांतील मजकूर प्रसिद्ध करण्याकरितां तो खलिता ( किंवा त्याची प्रत ) कांहीं वेळ आपले स्वाधीन करण्याविषयीं सांगितलें. पण तो खलिता आपल्या हजेरींत ऑफिसमध्येंच वाचावयास देऊं एवढेंच चीफ ऑफिसरांनीं कबूल केलें. तेव्हां खलित्यांतील अर्धा मजकूर परांजपे यांनीं व अर्धा टिळकांनीं संपूर्ण लक्षांत ठेवावयाचा असें ठरवून दोघे राष्ट्रभक्त तो खलिता वाचून आले; व त्यांतील संपूर्ण मजकूर निःस्पृह टीकेसह दुसरे दिवशीं 'काळ' व 'केसरी'त फडकला.

यावरून अण्णासाहेबांची तीव्र स्मरणशक्ति दिसून येईल.

**( १९ ) श्री० सुंदरराव भास्कर वैद्य,** एल्. एम्. ई. (मुंबई)

'काळ' पत्रावरील खटल्यांत शिक्षा होऊन तुरुंगांत गेल्यावर शिवरामपंतांनीं प्राणायाम सुरू केला व तेथें त्यांस तिसऱ्या नेत्रांतून उजेड दिसूं लागला; पण त्यांस तो उजेड पुनः बंद कसा करावा हें समजेना. त्यांस झोंप घेतां येईना. डोळे बंद केले तरी प्रकाश दिसत असे. शेवटीं जेव्हां त्यांची कारागृहांतून मुक्तता झाली तेव्हां ते कै० गजानन भास्कर वैद्य यांस भेटले. कै० वैद्य यांनीं 'तुम्ही प्राणायाम करण्याचा नाद सोडून द्या' असें सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं केलें व प्रकाश दिसण्याचें बंद झालें. पुढें त्यांची प्रकृति नीट सुधारली.

**( २० ) श्री० जनार्दन सखाराम करंदीकर,** संपादक, 'केसरी'.

कै० प्रो० शि. म. परांजपे, यांच्या आठवणी लिहिण्याचा विचार मनांत उद्भवला, कीं मनाला उद्वेग वाटतो. शिवरामपंतांनीं आपल्या वर्तमानपत्राला, 'काळ' हें नांव कां दिलें, या नांवांत किती खोल अर्थ भरलेला होता हें सांगण्याची जरूरी नाहीं. पण त्या 'काळ' पत्राच्या मथळ्यावर 'सर्व यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः' हा श्लोक त्यांनीं एका अर्थानें घातला असतां काळानें जणूं काय त्याचा सूड घेण्याच्या बुद्धीनें त्यांचें सर्व चैतन्ययुक्त व स्फूर्तिप्रद वाङ्मय 'सर्व यस्य वशादगात्स्मृतिपथं' असें करून सोडावें ही स्थिति खरोखरच उद्वेगजनक नाहीं काय ? इतर अनेक लेखकांचें वाङ्मय सरकारच्या रोपास पात्र होऊन जप्त झालें असेल पण शिवरामपंतांचें खरें अस्सल वाङ्मय जसें सगळेंच्या सगळें जप्त झालें तसा घोरतर प्रसंग कोठल्याहि लेखकावर क्वचितच आला असेल ! यामुळेंच आतां प्रो० परांजपे यांच्या आठवणींना इतरांच्या

आठवणींपेक्षां विशेष महत्त्व आलें आहे. लो० टिळक हे त्यांच्या लेखांच्या रूपानें वाचकांपुढें वावरतात आणि 'आठवणीं'च्या रूपानेंहि समाजापुढें वावरतांना दिसतात. शिवरामपंतांची स्थिति मात्र अक्षरशः 'स्मृतिशेष' झाली! म्हणूनच त्यांच्या आठवणी मुद्दाम आठवून आठवून संग्रहित करून ठेवणें जरूर आहे.

* * *

## ते हि नो दिवसा गताः ?

१९११ सालीं शिवराज्याभिषेकोत्सवानिमित्त लकडीपुलाशेजारच्या विठोबाच्या देवळांत शिवरामपंतांचें व्याख्यान झालें. व्याख्यानाच्या भरांत शिवाजीच्या वेळचें निस्सीम राष्ट्राभिमानाचें, अतर्क्य पराक्रमाचें, कल्पनातीत स्वार्थत्यागाचें वर्णन करतां करतां, 'तेहि दिवसा गता:' ( ते वैभवाचे दिवस गेले ) असे उद्गार त्यांच्या तोंडून सहजगत्या बाहेर पडले. परंतु झटकन् भानावर येऊन त्यांनीं त्या वचनाचा रोख बदलून तेंच वचन प्रश्नार्थक करून, 'तेहि नो दिवसा गता: ?' असा प्रश्न टाकून त्याचें विवरण सुरू केलें. 'तेहि नो दिवसा गता:' या वचनामुळें श्रोत्यांच्या मनावर निराशेची व दैववादाची छाप बसेल आणि व्याख्यानाच्या अखेरीस निराशेचें वातावरण पसरून तशा निराशामय स्थितींत श्रोत्यांनीं निघून जावें हें त्यांना श्रेयस्कर वाटलें नाहीं. अर्थातच 'ते हि नो दिवसा गता: ?' ( खरंच का ते दिवस कायमचे गेले; तसे दिवस नाहींच का फिरून यावयाचे ? ) असा सूचक प्रश्न टाकून, तसे दिवस पुनश्च आपणांलाहि खात्रीनें येतील, असा आशावाद त्यांनीं उभारला आणि काय केल्यानें पुनः तसले दिवस पाहावयास सापडतील असा ओघानेंच येणारा दुसरा प्रश्न उपस्थित करून जेव्हां बाजीप्रभु, तानाजीसारखे धाडसी व परा-

क्रमी पुरुष आत्मबलिदानास सिद्ध होतील, 'मराठा तितुका मेळवावा' या वचनानुसार संघटना करणारा शिवाजीसारखा अलौकिक शूर पुढारी, स्वकार्योन्मुख होईल आणि मोरोपंत पेशवे, बाळाजी आवजी यांसारखे धोरणी मुत्सद्दी, मार्गातले कांटे दूर करून प्रगतीचा मार्ग निष्कंटक करतील त्या वेळीं तसे दिवस आम्हांलाहि पुन्हा पाहावयास मिळतील असें सांगून त्यांनीं उत्साहपूर्ण असा व्याख्यानाचा समारोप केला.

* * *

## सातारा येथील प्रांतिक परिषद्

सभेंतील बहुमत आपल्या विरुद्ध बाजूचें झालें आहे असें उघड दिसत असतां जो आपल्या वक्तृत्वानें तें आपल्या बाजूला खेचून आणतो तो खरा वक्ता होय. असा वक्तृत्वाचा प्रभाव शिवराम-पंतांनीं अनेक वेळां गाजविला होता. यांतलें एकच उदाहरण सांगतों —

१९१४ सालीं साताऱ्यास प्रांतिक परिषद भरली होती. त्या वेळीं नेमस्त आणि जहाल यांचा समेट करून यापुढें संयुक्त प्रांतिक परिषद् भरवावी असा सभेच्या चालकांचा विचार होता व समेटाचा एक ठराव विषयनियामक कमिटींत चर्चेला निघाला. समेट व्हावा ही गोष्ट सर्वांसच इष्ट वाटत होती; पण तो कोणत्या अटीवर व्हावा याविषयीं तीव्र मतभेद होता. विषयनियामक कमिटीची सभा रात्रीं ९ वाजतां सुरू झाली होती व साडेअकरा वाजून गेले तरी अद्यापि वाटाघाट संपली नव्हती. पण त्या वेळीं एकंदरींत रंग असा दिसून आला कीं, मवाळांच्या सर्व अटी कबूल करून एकदांचा समेट करून टाकावा व वाद मिटवावा. विशेषतः विजापूरचे श्री० श्रीनिवासराव कौजलगी यांचें भाषण समेटाला अनुकूल

असें झालें आणि त्यांची छाप सभेवर इतकी पडली कीं, 'मतें घ्या, मतें घ्या' अशी मागणी सगळीकडून ऐकूं येऊं लागली. या वेळीं मतें घेतल्यास आपण हरणार हें शिवरामपंतांना उघड दिसूं लागलें. त्या वेळीं ते पुनश्च बोलावयास उभे राहिले. वादाचा एक मुख्य मुद्दा अद्यापि वाटाघाटींतून राहिला आहे असें निमित्त पुढें करून त्यांनीं भाषण करण्याला अध्यक्षांची परवानगी घेतली आणि आपल्या भाषणांत वक्रोक्ति, व्याजोक्ति, अन्योक्ति, दृष्टान्त, अर्थान्तरन्यास इत्यादि सर्व साधनांचा उपयोग करून त्यांनीं विषयनियामक कमिटीवर अशी छाप पाडली कीं, सभेचें मत पार उलटलें आणि या अटीवर समेट करूं नये, आपल्या तर्फेच्या नव्या अटी प्रतिपक्षास मान्य होतील तरच तडजोड करावी असें ठरलें आणि त्या तडजोडीचा निकाल सकाळीं, पुन्हा कमिटीची बैठक होऊन तींत करावा असें ठरून विषय-नियामक कमिटीची सभा रात्रीं बारा वाजतां, निकाल न लागतांच, आटोपली. त्या-नंतर रात्रभर खासगी वाटाघाट किती झाली, प्रत्येक बाजूनें आपल्याकडे बहुमत करण्यासाठीं कॅनव्हसिंग कसें सुरू केलें, सकाळीं पुन: सभा भरली असतां शिवरामपंतांनीं सुचविलेल्या अटीवर कसा समेट झाला आणि परिषदेंत नगरचे श्री० बाळा-साहेब देशपांडे आणि श्री० शिवरामपंत परांजपे यांची अत्यंत मार्मिक व खोंचदार भाषणें कशीं झालीं हें त्या परिषदेस हजर असलेल्या सर्वांना विदित आहे. पण आदले दिवशीं रात्रीं डाव अंगावर आला असतां तो अत्यंत कुशलतेनें उलटविण्याची जी कामगिरी शिवरामपंतांनीं केली ती कित्येकांच्या स्मरणांत नसेल म्हणून तिची आठवण करून देण्यांत येत आहे.

* * *

## उत्तम लेखांचा नामनिर्देश

कै० शिवरामपंत परांजपे यांची शेंकडों भाषणें ज्यांनीं ऐकलीं व त्यांचे शेंकडों लेख ज्यांनीं वाचले त्यांच्या कानांत त्यांची ती व्याजोक्तिपूर्ण रसाळ भाषा घुमघुमत होती, पण आतां त्यांच्या भाषणाची स्मृति तर फार लोपत चालली. लेखांचीहि जवळ जवळ तीच अवस्था होत चालली आहे. पण त्यांच्या लेखांतील कांहीं मथळेच इतके ठसकेदार व वैचित्र्यपूर्ण होते, कीं त्यांची आठवण अद्यापि लुप्त झाली नसल्यामुळें त्यांतील कांहीं लेखांच्या मथळ्यांचा नामनिर्देश करतों. हेतु एवढाच, कीं कालान्तरानें त्यांच्या लेखांवरची बंदी उठून त्यांचें पुनर्मुद्रण शक्य झाल्यास त्या लेखांकडे प्रकाशकांचें लक्ष प्रथम वेधलें जावें. मथळ्यांचा निर्देश केवळ आठवणीवर विसंबून केला जात असल्यामुळें त्यांत कदाचित् कांहीं शब्दांचा फेरफार झाला असण्याचा संभव आहे एवढें लक्षांत घेण्यास हरकत नाहीं. १ ईश्वरी लीला अगाध आहे, २ एका सोमयागाची हकीगत, ३तीनशें ल्यूथरांची मिरवणूक, ४भाऊसाहेबांचा घण, ५ माझ्यावर राज्य आलें, ६ आहे का नाहीं मी सर्व्हंट, ७संकष्टीचा अर्धा उपवास, ८हत्यारांचा कायद्याच्या हक्क, ९रावणाचे पराक्रम, १० लोकमान्य आणि राजमान्य, ११ पोलंडची अधोगति, १२ रशियांत काय झालें, इ. इ.

### ( २१ ) प्रो० श्री. नी. चाफेकर, एम्. ए., एल्एल्. बी.

कै० शिवरामपंत परांजपे यांचा माझा प्रत्यक्ष संबंध असा फारच थोडा आला; व तोहि त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या वर्षा दोन वर्षांतच, परस्परांच्या दोनदां भेटी होण्याच्या रूपानें आला. या भेटींची आठवण अत्यंत उद्बोधक व आल्हाददायक आहे. पहिल्या

भेटीचा प्रसंग म्हटला म्हणजे 'मॅक्बेथ' नाटकाचें त्यांनीं केलेलें मुळाइतकेंच परिणामकारक स्वारस्यपूर्ण मराठी रूपान्तर जें 'मानाजीराव' नाटक त्याची दुसरी आवृत्ति तयार झाली. त्याची एक प्रत देण्यासाठीं ते स्वतः अकल्पितपणें माझ्या घरीं आले. मुंबई विश्वविद्यालयाची सध्यांची घटना अमलांत येण्यापूर्वीं मी मराठी अभ्यासक्रमाच्या 'नियामक मंडळा'चा सभासद म्हणून निवडून आलों होतों. त्या वेळेपर्यंत बी. ए.च्या अभ्यासक्रमांत बर्वेकृत 'हिम्मतबहाद्दर' व प्रि० आगरकृत 'विकारविलसित' व कै० महाजनीकृत 'मोहविलसित' हीं 'हॅम्लेट'चीं रूपान्तरें मराठी विषयांत नेमलीं जात. त्याचप्रमाणें शेक्सपियरच्या इतर प्रमुख नाटकांचींहि रूपान्तरें नेमल्यास आपल्या वाङ्मयविभूतींचा गौरव करण्याचा सुयोगहि अनायासें साधल्यासारखा होईल असें मला वाटून कै० शिवरामपंतांचें 'मानाजीराव नेमावें असें मीं सुचविलें व तें इतर सभासदमित्रांस मान्य होऊन त्याप्रमाणें ते त्या सालच्या अभ्यासक्रमांत नेमण्यांतहि आलें. अभ्यासक्रम रीतसर छापून होण्यापूर्वीं ही गोष्ट त्यांच्या कानांवर जावी असें वाटून श्री० किरात यांच्याजवळ मी ही गोष्ट सहजगत्या बोललों. ही बातमी कै० अण्णासाहेबांच्या कानांवर गेल्यावर त्यांस संतोष वाटल्याचें समजलें व त्यांनीं 'मानाजीरावा'ची नवीन आवृत्ति काढविण्याचें ठरविलें. त्यांत मुखपृष्ठावर घालण्यासाठीं शेक्सपियरच्या नाटकाची एक विशेष इंग्रजी सचित्र आवृत्ति पाहिजे होती तीहि मिळवून रा० भाऊसाहेब यांचेमार्फत त्यांस पोंचती केली. याप्रमाणें नवी आवृत्ति तयार झाल्यावर मला स्वहस्ताक्षरांनीं लिहिलेली एक प्रत देण्यासाठीं ते माझ्याकडे आले. त्यामुळें मला स्वाभाविकच त्यांच्या अंगच्या सहजसिद्ध निगर्वी व सौजन्यशील वृत्तीचे

जागाहिंवर कौतुक वाटलें व त्यांच्या मोठेपणाची यथार्थ कल्पना येऊन त्यांच्याविषयींचा आदर वृद्धिंगत झाला. अभिप्रायपर चार ओळीहि लिहिण्याविषयीं त्यांनीं मला सुचविलें तें ऐकून तर मला संकोचल्यासारखें वाटलें. निरभिमान, गुणग्राही व स्वाभाविक सौजन्य अंगीं असणाऱ्या खऱ्या विद्वानांचें हें अत्यंत हृदयस्पर्शी व अकारण अन्यगौरवतत्पर उदारत्व कोणीकडे; आणि दुसऱ्याविषयीं असद्भाव व नीच अनादराची भावना असूनहि केवळ स्वार्थासाठीं त्याच्या स्वाभाविक सौजन्याचा पूर्ण फायदा घेऊन स्वार्थपूर्ति होतांच त्याच्याशींच हितशत्रुत्वानें व नीच कृतघ्नतेनें वागणाऱ्या लोकांची सर्पवृत्ति व अधमता कोणीकडे !

दुसरी आठवण, खऱ्या विद्वानाच्या शीलास साजेशी, सर्वसंग्राहक वृत्तीची व अन्यगुणलेशगौरवतत्पर साहित्यरसिक अशा मर्मज्ञतेची द्योतक आहे. बेळगांवच्या साहित्यसम्मेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवडणूक निश्चित झाल्यावर पुण्यांतील कित्येक वाङ्मयव्यवसायी मंडळींना आपल्या घरीं बोलावून अध्यक्षाच्या भाषणांत कोणकोणत्या मुद्द्यांचा व विषयांचा समावेश असावा व सम्मेलनांत पुणें वगैरे ठिकाणच्या महाराष्ट्रीयांनीं आपलें धोरण कसें काय ठेवावें याविषयीं चर्चा केली. वादग्रस्त मुद्द्यांना प्राधान्य न देतां किंवा स्वमताभिनिवेशाच्या आहारीं न जातां सर्वांनीं खेळीमेळीचें धोरण ठेवावें असें ठरलें. बेळगांवांत कानडी-मराठी वाद अत्यंत तीव्र स्वरूपांत असल्यामुळें साहित्यसम्मेलनाचें अधिवेशन कसें काय पार पडतें याची सर्वांनाच काळजी लागून राहिली होती. पण शेवटीं अध्यक्षांच्या चतुर व ऐक्य स्थापन करण्याच्या कळकळीनें केलेल्या भाषणाचा सुपरिणाम होऊन 'आक्रमणा'च्या केवळ काल्पनिक भीतीनें व्याकुळ होऊन

महाराष्ट्रीयांबद्दलच्या रोषाच्या दुहीच्या भुतानें पछाडलेल्या कर्नाटकी बंधूंचा 'संशयकल्लोळ' उपशम पावला व बेळगांवचें सम्मेलन अपूर्व उत्साहानें, उज्जल यशस्वितेनें साजरें होऊन साहित्यसम्मेलनाच्या इतिहासांत संस्मरणीय झालें आहे. कै० शिवरामपंतांसारख्या मराठी भाषेच्या एकनिष्ठ व अपूर्व कर्तबगारीच्या सुपुत्राचा गुणगौरव शेवटपर्यंत न केल्यामुळें सर्व महाराष्ट्रास कृतघ्नतेचा व कायमचा काळिमा लागला असता तो या मानानें टळला! प्रस्तुत प्रसंगीचें अध्यक्षीय भाषण आजन्म व्यासंगी विद्वानास साजेसें व अभिनिवेशरहित आहे. जवळ येऊं घातलेल्या मृत्यूच्या पावलांची चाहूल ऐकूं येऊं लागल्यामुळेंच कीं काय, सम्मेलनाच्या समारोपाचें त्यांचें भाषण त्यांच्या ऐहिक जीवितरूप करुणोदात्त नाटकाचें मृदुमंजुलरूप भरतवाक्यच ठरलें. तें भाषण ऐकण्याची अपूर्व संधि ज्यांना लाभली त्यांच्या मनापुढें त्या वेळचा एकंदर देखावा उभा राहून व कै० परांजपे यांचें हृदयाला द्रवित करणारे कळकळीचे व कोमल मृदु वक्तृत्वशैलीचे करुणमधुर नाद अजूनहि कानांत घुमून राहून एक प्रकारचा अपूर्व व खेदसंमिश्र आनंद होतो.

## (२२) वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी

कै० अण्णासाहेब यांना मीं राजकारणांतील गुरु मानले आहेत व ते कैलासवासी होण्यापूर्वीं सुमारें १५ वर्षें त्यांचा व माझा अतिशय सहवास होता; व कोणत्याहि राजकीय कामांत ते मला घेऊन कार्य करीत त्यामुळें राजकारणांतील उघडपणें केलेली व करावयाची त्यांची हालचाल मला समजत असे. लोकमान्य टिळक विलायतेहून आल्यानंतर त्यांच्या सन्मानार्थ रे मार्केटच्या

पटांगणांत मोठी सभा करावयाची होती. त्या वेळीं कांहीं लोक विरोध करण्याकरितां हजर राहणार होते ही माहिती पूर्वी कळली होती. सभेची व्यवस्था विरोधकांच्या विरोधाला न जुमानतां नीट राहावी याकरितां अनेक लोकांनीं अनेक उपाय सुचविले होते. कै० अण्णासाहेबांनीं लोकांचें म्हणणें ऐकून घेतल्यानंतर रात्रीं दहा वाजतां सभेची जागा स्वत: पाहून व्यवस्थेबद्दलच्या सूचना स्वयं-सेवकांस केल्या. व्यासपीठाची जागा ठरविली व ती ठरवितांना वक्त्यांचीं तोंडें कोणत्या दिशेकडे असावीं तें वाऱ्याची दिशा पाहून ठरविलें व विरोधकांना कोठें बसविलें असतां ते काबूंत राहतील याबद्दलचाहि युक्तायुक्त विचार सांगितला. वक्ता अध्यक्ष व सभेची जागा यांची कशी जुळणी करावी याबद्दल त्यांनीं जी माहिती सांगितली ती खरोखरच त्यांनीं अनुभवानें ठरविली होती ती ऐकून मला त्यांच्या खोल विचाराबद्दल कौतुक वाटलें.

न्यायशास्त्राच्या अभ्यासाचा उपयोग ते व्याख्यानांत भरपूर करीत. स्वराज्य पक्षांतून प्रतिसहकारपक्ष निर्माण होऊन पं० मोतीलाल नेहरू व श्री० केळकर यांच्यांत वादावादी झाली. त्या वेळीं नाफेरवाल्या पक्षाची मदत स्वराज्यपार्टीला मिळावी म्हणून श्री० जमनादास मेहतांनीं अण्णासाहेबांची एके सकाळीं भेट घेतली. श्री० जमनादास मेहतांचा स्वभाव अण्णासाहेबांना माहीत असल्यामुळें त्यांच्याशीं झालेलें संभाषण अंत:करणाला भिडून झाल्याचें मला वाटलें नाहीं. श्री० जमनादास निघून गेल्यावर मीं विचारलें, " तुम्ही श्री० जमनादास यांना आपले पक्षातर्फें निश्चित असें कांहीं सांगितलेंच नाहीं ? " त्या वेळीं मी, दे. भ. पोपटलाल शहा, कै० वेखंडे पाटील या सर्वांकडे विशेष अर्थानें पाहून त्यांनीं जें उत्तर दिलें तें त्यांचें अनुमानप्राविण्याचें द्योतक होतें. अण्णा-

साहेब म्हणाले, " अहो वैद्यबुवा, श्री० मेथा अजून पूर्णपणें रिस्पॉन्सिव्हिस्टांशीं आपला संबंध तोडून आले नाहींत. आजच पहा ते आपलेकडे येण्यापूर्वी गायकवाडवाड्यांतून भेटून आलेले आहेत. त्यांच्याशीं जुळलें तर ते त्यांस प्रथम मिळतील." यावर मीं म्हटलें, " श्री० मेथा मुंबईहून आले तें स्टेशनवरून परभारें आपलेकडेच आले गायकवाडवाड्यांत गेले नाहींत." त्यावर अण्णासाहेब म्हणाले, " श्री० मेथांच्या मोटारीचें तोंड कोणकिडे होतें? ते जर स्टेशनवरून परभारें आले असते तर मोटारीचें तोंड पूर्वेकडे म्हणजे बुधवाराकडे असते काय? अर्थात् ते मजकडे येण्यापूर्वी गायकवाडवाड्यांत जाऊन तेथें विचारविनिमय करून आले असले पाहिजेत!" आम्हां कोणालाहि न कळलेली ही गोष्ट केवळ अनुमानाचे जोरावर व सूक्ष्मतेनें पाहण्यानें अण्णासाहेबांना समजली याबद्दल तेथें जमलेल्या दहा-पंधरा लोकांना आश्चर्य वाटलें. संध्याकाळीं चौकशी करतां श्री० मेथा गायकवाडवाड्यांतूनच आले होते असें समजलें.

एकदां ते व मी तुळशीबागेंतून जात असतां रामाचे सभामंडपांत कीर्तन चाललें होतें. कथेकरी कोणी सामान्यच होते. तथापि सभामंडपाचे कोपऱ्याजवळील झाडाआड उभे राहून अण्णासाहेब कीर्तन ऐकूं लागले. कथेकरीबुवा मोठ्या आवाजानें परंतु अव्यवस्थितपणें वेदान्तविषय सांगत होते. दहा मिनिटें झालीं तरी अण्णासाहेब निघेनात, तेव्हां मीं म्हटलें, " तुमच्यासारख्याला ऐकण्यासारखें यांत काय आहे?" अण्णासाहेब उत्तरले, " अहो, या हरदासांत निर्भयपणा आहे. आपलें चूक आहे कीं बरोबर आहे याची पर्वा न करतां तो पहा कसे खडाखड बोलत आहे. वक्त्याला हा गुण अवश्य पाहिजे."

बेळगांव साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर अण्णासाहेब मला बेळगांवास येण्याचा आग्रह करूं लागले. श्री० वासुकाका जोशी, कै० गोविंदसुत चिंचाळकर वगैरे मंडळी आमचेकडे जमली असतां मला बरोबर येण्याचा फारच आग्रह करूं लागली. माझा वैद्यकीचा धंदा असल्यामुळें बाहेरगांवीं तीन-चार दिवस मोडणें हें नुकसानकारक आहे असें मीं सांगितलें. तरी अण्णासाहेबांचा आग्रह चालू होताच. तेव्हां अण्णासाहेबांना निरुत्तर करण्याकरितां मी म्हणालों, " मीं कोणताहि ग्रंथ लिहिला नाहीं, कीं मी कांहीं साहित्यिक नाहीं तेव्हां मी साहित्य-सम्मेलनाला कसा येऊं ? " यावर ते हसत हसत म्हणाले, " अहो, एवढीच का अडचण ! तुम्ही गेलीं सहा वर्षें शहर कॉंग्रेसचे सेक्रेटरी आहां तेव्ह्या अवधींत शेंकडों हस्तपत्रकें लिहून छापविलीं नाहींत काय ? एवढीच साहित्यसेवा-संमेलनाचे प्रतिनिधि होण्यास अगदीं पुरेशी आहे." या त्यांच्या विनोदानें सर्व मंडळी खूप हसली व मी निरुत्तर झालों.

अण्णासाहेब यांचें अंतःकरण फारच कोमल असे. भांडणाचा त्यांना मनापासून तिटकारा असे. परंतु त्यांचें बरेंच आयुष्य राजकीय पक्षांशीं भांडण्यांत गेलें. असहकाराचे चळवळींत निघालेल्या मुळशी पेटा सत्याग्रहाचे बाबतींत झालेल्या मतभेदामुळें महाराष्ट्रांत दोन पक्ष झाले. ते मोडावे म्हणून त्यांनीं अनेक खटपटी केल्या. विरारचा तंटा न व्हावा म्हणून सभेचे वेळेपर्यंत कै० विठ्ठलभाई पटेलांशीं ते विचारविनिमय करीत होते. पुढें कॉंग्रेस कमिट्यांच्या निवडणुकीच्या वेळीं प्रत्येक वर्षीं तीव्र अनुयायांना शांत करून समेटाचा प्रयत्न करीत. परंतु कांहीं ना कांहीं निमित्त होऊन त्यांचे प्रयत्न फुकट जात. एके वेळीं अशा प्रयत्नांना कंटाळून

निराशेनें ते मजजवळ म्हणाले, " शास्त्रीबुवा मी जिवंत आहें तोंपर्यंत राष्ट्रीय विचारांच्या लोकांचा एकपक्ष व्हावा म्हणून प्रयत्न करीन या उपर ईश्वराची मर्जी ! " यानंतर थोड्याच दिवसांनीं पुण्यास प्रांतिक परिषद भरली व त्या वेळीं दोन्ही पक्ष एक झाल्याचें दिसलें. प्रांतिक परिषदेचे वेळीं सुद्धां दोन्ही पक्षांत अनेक मतभेदाचे प्रसंग येत व अण्णासाहेबांचे अनुयायी दररोज तक्रारी करीत. परंतु प्रत्येक वेळीं अण्णासाहेब माघार घेऊन दुसऱ्या पक्षाशीं मित्राप्रमाणें वागले. त्या वेळीं श्री० केळकर व अण्णासाहेब, दे० भ० सुभाषबाबूबरोबर एकमेकांचे घरीं पानसुपारीला गेले. १९३० सालीं ते जिवंत असते तर महाराष्ट्रांतील दोन्ही पक्षांतील लोक सत्याग्रहाचे संग्रामांत एक होऊन काम करीत आहेत हा देखावा पाहून त्यांस आनंद झाला असता.

( २३ ) श्री० रा. गो. भिडे, उपसंपादक केसरी

लहानपणापासून केसरी व काळ हीं पत्रें वाचण्याची आवड. त्यांतल्या त्यांत काळांतील भावनामय भाषेनें मन जास्त आकर्षून जाई. अशा थोर पुरुषाचें दर्शन एकदां घडावें या हेतूनें येथील नव्यापुलावरील कोनकर यांच्या वाड्यांत त्या वेळीं काळपत्राची कचेरी होती तेथें गेलों. पण जावयास कांहीं तरी निमित्त पाहिजे म्हणून, त्याच सुमारास काळांतील निवडक निबंधांचीं पुस्तकें सवलतीनें देण्याची जाहिरात प्रसिद्ध झाली होती, तीं घेण्यासाठीं गेलों. खुद्द अण्णासाहेबांशीं एकादा शब्द बोलण्यास सांपडावा अशी इच्छा. परंतु त्यांची प्रत्यक्ष गांठ पडून नमस्कार झाल्यावर मनांतली कल्पना मनांतच राहिली. त्यांच्याशीं काय बोलावें हेंच समजेनासें झालें. पुस्तकें मात्र घेऊन परत आलों. ही त्यांची माझी पहिली भेट.

यानंतर स. १९१६ सालीं पुण्यास नोकरी, स्वराज्यसंघ कचेरींत व नंतर केसरी कचेरींत, लागल्यानंतर त्यांचा संबंध बराच आला. निकट संबंध फार कमी. परंतु लोकमान्यांच्या बरोबरीनें त्यांच्या-बद्दल आदर वाटे. अण्णासाहेब हे स्वत: अत्यंत विनोदी. त्यांच्या कोट्या मार्मिक असून त्या संस्कृतच्या कोंदणांत बसवून त्यांचें स्पष्टीकरण ते करूं लागले म्हणजे मनास अत्यंत आल्हाद वाटावयाचा. श्री० कृष्णशास्त्री कवडे यांचा दवाखाना बुधवारांत मोरोबादादांच्या वाड्यांत असतांना नित्य सायंकाळीं अण्णासाहेबांच्या विनोदानें तेथील वातावरण प्रसन्न व्हावयाचें.

स. १९१७ सालीं नाशिक येथें प्रांतिक परिषदेचें अधिवेशन झालें. त्यापूर्वींच लोकमान्यांनीं स्वराज्यसंघाची संस्थापना केली होती. त्यासंघातर्फे यशवंतरावमहाराजांच्या पटांगणावर श्री० दादाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखालीं अण्णासाहेबांचें 'स्वराज्य' या विषयावर व्याख्यान झालें. श्रोतृसमुदाय ७–८ हजार तरीं होता. रात्रीचें शांत वातावरण. मंजुळ गीत गात गोदा प्रसन्न चित्तानें वाहत असलेली व अण्णासाहेबांच्या आवडत्या विषयावर व्याख्यान ! असा मधुर संगम जमून आल्यावर व्याख्यान कसें रंगलें असेल याची कल्पनाच करावी. हें व्याख्यान रात्रीं ९ पासून १२॥ पर्यंत गंगौघाप्रमाणें चाललें होतें. व्याख्यानांत अनेक दृष्टांत, दाखले देत-देत प्रचलित स्थिति अत्यंत भेदकपणें लोकांपुढें मांडीत असतांना 'हे जगांतील शकारांनो ! ' असे उद्गार त्यांच्या तोंडून विषयाला धरून निघाले. त्याबरोबर समाजांतील कुणी तरी एक 'ओ' म्हणून ओरडला. वस्तुत: तो गृहस्थ व्याख्यानाशीं इतका तादात्म्य पावला होता, कीं अण्णासाहेबांनीं आपणासच उद्देशून हे उद्गार काढले असावेत अशा कल्पनेनें तो बोलला. त्यानंतर हशा कसा पिकला

हें जाणतां येण्यासारखें आहे. परंतु सांगण्याची गोष्ट तीन-साडे-तीन तास व्याख्यानाचा ओघ सारखा सुरू असून सुद्धां एवढा प्रचंड समुदाय पण त्यांनीं आपल्या अगदीं मुठींत आणून कसा ठेविला त्याची कल्पना येईल.

* * *

चिकोडी येथें बेळगांव जिल्हा सभेचें अधिवेशन झालें असतांना लो० टिळक, परांजपे, वगैरे मंडळी गेली होती. किंबहुना लोकमान्य आपल्या गांवीं यावेत म्हणूनच हें अधिवेशन घडवून आणण्यांत आलें होतें. तेथेंहि अण्णासाहेबांचें 'स्वराज्या'वर व्याख्यान झालें. या व्याख्यानांत त्यांनीं दिल्लीनगरींतील पांडवांच्या राज्यारोहणा-पासून आतांपर्यंत कसकशीं स्थित्यंतरें होत गेलीं व हिंदूंच्या रक्तानें माखलेले झगे घालून, मोंगलांनीं सिंहासनावर कसें पदारोपण केलें येथपासून इंग्रजांनीं दिल्ली ही राजधानी करीपर्यंतचा इतिहास इतका बहारीनें व वक्तृत्वपूर्णपणें रंगविला, कीं श्रोतृसमाजापुढें त्यांनीं हजारों वर्षांचा चित्रपट दाखविला. त्यांची वक्तृत्वशैली अवर्णनीय भावनामय व तरुणांच्या अंतःकरणावर छाप पाडणारी होती. तसेंच त्यांचें लिखाणहि होतें.

## ( २४ ) श्री० वामन मोरेश्वर ऊर्फ बाबासाहेब पोतदार, पुणें.

अगदीं लहानपणींहि शिवरामपंतांस नाटकाचा नाद होता. आम्ही उभयता सुमारें ९-१० वर्षांचे असतांना महाडानजीक आमचे बिरवाडी गांवीं आमचे आतेच्या म्हणजे आंबेकर यांचे घरीं श्रीरामनवमीचे उत्सवाचे शेवटीं कांहीं तरी पौराणिक नाटक करीत असूं. एक-दोनदां 'नरसिंह अवतार' नाटक केल्याचें स्मरतें. जुन्या नाट्यपद्धतींत प्रारंभीं विदूषक, गणपति व सरस्वती अशीं

पात्रें येण्याची वहिवाट होती. त्या वेळीं शिवरामपंतांनीं सरस्वतीचे पात्राचें काम उत्तम केल्याचें स्मरतें. मीहि प्रल्हादाची भूमिका करीत असे.

आम्ही दोघेहि सुमारें १५-१६वर्षांचे झाल्यावर इंग्रजी शिकण्याकरितां रत्नागिरीस गेलों. तेथें कांहीं दिवस एके ठिकाणींच राहात असूं. उभयतांचा स्नेहसंबंध चांगलाच जमला. रत्नागिरी हायस्कूलमध्यें १८७८ सालीं दाखल होऊन पांचव्या इयत्तेपर्यंत आम्हीं तेथें अभ्यास केला; परंतु त्या सुमारास पुण्यास कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं टिळक व नामजोशी यांचे साहाय्यानें न्यू इंग्लिश स्कूल काढिलें. शास्त्रिबुवांचे मराठी शिकविण्याचा थोडासा साक्षात् अनुभव आम्हांस असल्यामुळें पुण्याच्या ह्या नव्या शाळेच्या जाहिराती जेव्हां रत्नागिरीस आल्या तेव्हां आमच्यांत मोठी खळबळ झाली व आम्ही पुण्यास येण्याचें ठरविलें. त्याबद्दल रत्नागिरी हायस्कूलाचे विद्यार्थ्यांत फार मोठी खळबळ झाली व बरेच विद्यार्थी पुण्यास आले. या चळवळींत माझ्याबरोबर शिवरामपंतांनींहि पुढाकार घेतला होता.

आम्हीं पदवीधर झाल्यावर उभयतांचे व्यवसाय निरनिराळे पडल्यामुळें आमच्या गांठी नेहमीं पडत नसत. प्रसंगविशेषीं भेटी होत. त्यामुळें आमचा पूर्वस्नेह-संबंध लोकांस माहीत नसे.

## (२५) श्री० द. प. चिंचाळकर, बी. ए., एल्एल्. बी.

१९०० ते १९०५ पर्यंत दरसाल, पुण्यांतील प्लेगामुळें अण्णासाहेब दोन-तीन महिने चिंचवड येथें देवस्थानच्या वाड्यांत राहत असत. चिंचवडच्या वास्तव्यांत आम्ही अनेक बालमित्र मंडळी गांवाबाहेर सायंकाळीं फिरावयास जात असूं व व्यायामासाठीं अनेक

खेळ खेळत असूं. त्याच रस्त्यानें शिवरामपंत कधीं कधीं जात येत असत. त्यामुळें आमच्या खेळांतील बोलणीं त्यांच्या कानांवर साहजिकच जात. खेळांत अमक्यावर राज्य आलें, आतां तमक्यावर राज्य आलें अशी भाषा यावयाचीच. अशा अजाण मुलांच्या खेळाचा दृष्टान्त देऊन त्याच वेळीं काळांत एक लेख आला होता. त्या लेखांतील तात्पर्य असें होतें, कीं आपल्या सर्वांच्याच डोक्यांवर इंग्रजांचें राज्य हल्लीं आलेलें आहे. जो डावांत हरतो त्याच्यावर राज्य ऊर्फ पारतंत्र्य येत असतें व पुनः डाव खेळून आपल्या मानेवरील तें पारतंत्र्याचें जोखड फेकून द्यावयाचें असतें. अजाण मुलांची ती आकुंचित दृष्टि सोडून हिंदुस्तान देशाच्या स्थितीचा व्यापक विचार केल्यास आपल्या सर्वांवरच परकीय राज्य आलें आहे व त्यांतून मुक्त होण्याकरितां आपण सर्वांनींच खटपट केली पाहिजे असा त्या लेखाचा आशय होता. जेव्हां आम्हीं सर्व संवगड्यांनीं तो लेख वाचला तेव्हां आमचे रोजचे खेळ पाहूनच शिवरामपंतांच्या प्रतिभेला त्या लेखांतील विचार सुचले असले पाहिजेत असें आमच्या अल्प समजुतीप्रमाणें आम्ही निश्चित अनुमान काढून त्या सुंदर लेखाचें श्रेय आम्हीं बालसंवगड्यांनीं आपल्याकडे घेतलें.

**श्री० रायबागकर** (पंतांच्या छापखान्यांतील एक कंपॉझिटर):—

आपल्या हाताखालच्या लोकांशीं शिवरामपंत फारच प्रेमानें वागत असत. एकादा नोकर जेवण करून आला नसल्यास ते त्यास जेवावयास घालीत किंवा एकादा नोकर आजारी आहे हें समजल्यास ते त्याची आस्थेनें विचारपूस करीत व स्वखर्चानें औषधपाणीहि देत. प्रुफें तपासण्याविषयीं पंत फारच दक्षता घेत. पहिलें व शेवटचें प्रुफ ते नेहमीं तपासत; पण एकादा शब्द नवीन घालावयाचा झाल्यास ते कंपॉझिटरला त्रास न होईल अशा बेतानें

घालीत. आपल्या पत्रांत कंपोझिंगच्या चुका राहिल्यास मात्र ते फारच रागावत असत.

## (२६) सौ० सुशिलाबाई देशमुख (प्रो० अण्णासाहेब यांच्या कन्या.)

( श्री० संपादक 'त्रिकाळ' यांचे कृपेनें )

आमच्या कै० ती० अण्णांच्या चारित्र्याविषयीं जर लिहावयास लागलें तर तें लिहावें तितकें थोडेंच होणार आहे; आणि त्यांतून माझ्यासारख्या अज्ञ मुलीला तर तें खरोखरच अशक्य आहे.

घरांतील त्यांची वागणूक प्रेमळ, आनंदी व व्यवहारी होती. राजकारणाच्या रस्त्यानें जात असतांना सुद्धां आपलीं धार्मिक कर्तव्यें, परमेश्वरावरील निस्सीम भक्ति, स्वजनाविषयींचें कर्तव्य व प्रेम हें ते कधींहि विसरले नाहींत. त्यांचा स्वतःचा दांडगा आत्मविश्वास त्यांची हरएक प्रसंगीं कसोटीच पाहत होता कीं काय, असें त्यांच्या वागणुकीवरून भासत असे. आम्हां मुलांना जर बरें नसलें तर आमच्याजवळ बसून, पाठीवरून हात फिरवून ते सांगावयाचे, कीं तूं देवाचें नांव घे, म्हणजे तो आपलें बरें करील. देव आपलें नेहमीं चांगलेंच करील, तो कधींहि वाईट करणार नाहीं. आणि त्या वेळीं आमच्याकडून आम्हांला शिकविलेल्यापैकीं श्लोक, आर्या वगैरे म्हणवून घेत असत, आणि आम्ही त्या म्हणूं लागलों म्हणजे ते रडूं लागत; इतकें त्यांचें अंतःकरण परमेश्वराविषयीं प्रेमानें पाझरूं लागे! आपल्या मनांत त्याचा अर्थ खालपर्यंत जाऊन पोंचेपर्यंत पुनः पुन्हा तेंच तें म्हणावयास सांगून सद्गदित होऊन आमचेबरोबर तेहि गुणगुणूं लागत. त्याचा सर्व अर्थ आम्हांला पुनः पुन्हा समजावून सांगत व वारंवार देवावरील अढळ श्रद्धेची आठवण करून देत असत.

ही साधी गोष्ट लोकांना सामान्य माणसाप्रमाणेंच भासेल; पण आम्हांला ती खरोखरच अलौलिक वाटते, निदान मला तरी वाटतेच वाटते असें मी सांगूं शकेन.

आम्हा तिन्ही भावंडांत मी अण्णांची जास्त लाडकी होतें. मी मुलगी म्हणून घरांतील कामाकरतां ते कधींहि बोलत नसत. उलट आईनें जर काम सांगितलें तर ते मला बाहेर नेऊन वाचावयास बसवीत आणि तें वाचन म्हणजे सुद्धां शाळेंतील अभ्यास नव्हे– तर भक्तिविजय, पांडवप्रताप, गीता, रामरक्षा, विष्णुसहस्रनाम, नवनीतांतील कांहीं भाग हें होय. माझ्या वडील भावास ते अभ्यासाविषयीं पुष्कळ बोलत. ते त्यास शिकवीतहि असत. पण मला शाळेंतील अभ्यास कधींहि शिकविला नाहीं. ते जितके प्रेमळ होते तितकेच कडकहि होते. परंतु त्या कडकपणाला मर्यादा होती. आमची आई सांगते, कीं एकदां आईनें अण्णांना विचारलें कीं बाळला ( आमचे दादा ) बरोबर घेऊन आम्ही नाटकाला जाऊं का? तो म्हणतो कीं नाटक फारच चांगलें आहे. तेव्हां अण्णांनीं एकदम 'हो खुशाल जा' म्हणून सांगितलें. त्याप्रमाणें ती गेली, आणि रात्रीं घरीं आल्यावर दादांनीं किती हांका मारल्या पण त्यांनीं कडी काढली नाहीं! सकाळीं उठल्यावर ते दादांना आणि आईला 'न भूतो न भविष्यति बोलले.'

पहांटे तीन तीन वाजल्यापासून उठून ते आंघोळ वगैरे आटोपून वाचन सुरू करीत. साताला ऑफिसमध्यें जाऊन बसलेले असावयाचेच. आंघोळ लवकर करण्याकडे त्यांचा फारच कटाक्ष! कांहीं विचार डोक्यामध्यें आला, कीं उठलेच आणि बसले लिहावयास. मग तिकडे बारा वाजोत नाहीं तर चार वाजोत! 'गोविंदाची गोष्ट' लिहीत असतांना आमच्याकडून ते झोपाळ्यावरील

ओंव्या म्हणून घेत असत ! 'विंध्याचल' कादंबरी लिहीत असतांना सुद्धां अशाच जात्यावरील व झोपाळ्यावरील नवीन नवीन ओंव्या म्हणून घेत व त्या लगेच टिपून घेत. सतत श्रम करण्याची त्यांची चिकाटी कांहीं वेगळीच होती ! ते कधीं कंटाळलेले किंवा दमलेले दिसतच नसत ! अविश्रांत श्रम, सदोदित वाचन आणि लेखन ह्यांत ते मग्न असत. रात्रीचे दोन दोन वाजेपर्यंत लिहीत बसून, पुन्हा दोन तास झोप घेऊन चाराला उठून पुन्हा लिहावयास बसावयाचे ! आम्हां मुलांना कांहीं सांगावयाचें झालें तर ते म्हणजे 'वाचा आणि लिहा. पुष्कळसे वाचा आणि पुष्कळ लिहिण्याची हाताला संवय करा.' टिळक महाविद्यालयाचीं मुलें त्यांचेकडे शिकावयास येत असून तें शिकवणें म्हणजे आपल्या मनांतील मनोदय, ऐकणाऱ्याच्या मनांत जितक्या सोप्या शब्दांनीं बिंबवितां येईल तितका तो उघड करून सांगण्याची हातोटी शिकवितांनाहि दिसून येत असे.

बोलावयास उभे असतांना ते जितक्या मोठ्यानें बोलत असत तितकेंच ते घरांत हळू बोलत असत. दोन हातांपलीकडे असणाऱ्या माणसाला सुद्धां त्यांचें बोलणें ऐकूं जावयाचें नाहीं. इतकें हळू बोलण्याबद्दल त्यांचा वचक असे. ते रात्रीं आठाला बाहेरून फिरून आल्यावर अंगणांत काठी वाजली, कीं झालोंच आम्ही, गप्प ! मग आल्यावर हळूहळू सर्वांच्या चौकश्या वगैरे होऊन जेवावयास बसावयाचे ! जेवण झाल्यावर मग आम्ही पाय वगैरे चेपावयाचे व पायाला तेल लावावयाचें असल्यास लावावयाचें. खाण्यापिण्यांत व कपडालत्त्यांत ते बरेच रसिक होते. रोज नवीन नवीन पुष्कळसे पदार्थ ( व ते सुद्धां गोडाचे ) असे जेवणांत पाहिजे असत. पुष्कळ कढत व पुष्कळ गोडाच्या पदार्थांवांचून

त्यांचें जेवण कधींच झालें नाहीं. त्यांचें जेवण म्हणजे रोजचा मेजवानीचा बेतच असावयाचा. जेवणाप्रमाणें त्यांना विड्याचीहि फार आवड होती. पण हें सर्व मुळशीच्या सत्याग्रहांतून सुटून आल्यावर बरेंच कमी कमी होत गेलें. सुटून आल्यावर त्यांना सूत काढण्याचा फार नाद लागला होता. ते स्वतः रोज रहाट घेऊन त्यावर सूत काढीत असत आणि तें सुद्धां चांगलें बारीक व सारखें येत असे. मधुमेह झाल्यापासून पुढें पुढें त्यांची साखर अजिबात बंद झाली तरी त्याविषयीं त्यांचें अडलें आहे असें कधींच झालें नाहीं. असेल त्या स्थितींत राहण्याची मनाची तयारी हा त्यांच्या स्वभावांतील विशेष होय. त्यांच्या स्वभावाचें चित्र आणखी किती तरी तऱ्हेनें रेखाटतां येईल; पण त्याला माझ्यासारखी अज्ञ मुलगी कशी पुरी पडणार !

REFBK-0005440

# बीं-बियाणें





कॅबिज, नोलकोल, कॉलिफ्लॉवर इत्यादि विलायती व सर्व प्रकारच्या देशी भाजीपाल्याचें तसेंच फुलझाडांचें बीं आमचेकडे योग्य भावानें मिळतें. कॅटलॉगकरितां लिहा.

प्रो० जी. के. बर्वे

**कर्नाटक सीड्स हाउस,**

अनसूरकर लेन, बेळगांव